GOVERNMENT OF INDIA
NATIONAL LIBRARY, CALCUTTA

Class No. Mar. 891.443

Book No. C 516

N. L. 38. Vol. 1

MGIP Santh.—S1—30 LNL/58—9-4-59—50,000.

संपूर्ण बंकिमचंद्र.

४६

इंदिरा.

४७

सीताराम.

४८

विषवृक्ष.

भारत-गौरव-ग्रंथमाला—पुष्प ४६-४७-४८

संपूर्ण बंकिमचंद्र.

(प्रथम खंड)



NATIONAL LIBRARY
No. 154
Date 19.2.53
CALCUTTA.

न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते ।

—भगवान् श्रीकृष्ण.

अनुवादक

श्रीयुत वासुदेव गोविंद आपटे, बी. ए.

सन १९२३

(सर्व हक्क स्वाधीन.)

साधी प्रत तीन रुपये] किंमत. [कापडी प्रत साडेतीन रुपये.

किंमत ४-४-०

PUBLISHER :

P. S. BHASE,

Manager,

BHARAT GOURAV GRANTH MALA,

Girgaon, Bombay.

Printed by

Keshav Ravaji Gondhalekar

at his

JAGADHITECHHU PRESS

607 Shanwar Peth, Poona.

प्रकाशकाचे दोन शब्द.

कित्येक महिने प्रकाशित होणार होणार म्हणून सांगतां सांगतां आज इतक्या दिवसांनीं संपूर्ण बंकिमचंद्राचा हा प्रथम खंड भगवान् श्रीकृष्ण कृपेनें प्रकाशित होत आहे. वंग साहित्यांत बाबू बंकिमचंद्र यांची केवढी योग्यता आहे, हें महाराष्ट्र साहित्य भक्तांना चांगलें ठाऊक आहे. बंकिमचंद्र हे केवळ बंगाल्यांतच नव्हत तर सर्व हिंदुस्थानांत पहिले आणि पहिल्या प्रतीचे कादंबरीकार व लेखक होऊन गेले. बंगाल्यांत यांना साहित्य सम्राट अशी संज्ञा मिळालेली असून यांच्या तोडीचा लेखक अजून झाला नाहीं, असें वंगजनतेस वाटते.

महाराष्ट्रांत कादंबरी लेखनास व प्रकाशनास ज्या काळापासून आरंभ झाला,—साधारण—तेव्हांपासून भाषांतर करून कादंबऱ्या लिहिणारांचें लक्ष वंगकादंबऱ्याकडे गेलेलें दिसतें आणि त्याप्रमाणें हळू हळू बंकिमचंद्र यांच्याहि कादंबऱ्या मराठींत इतर बंगाली कादंबऱ्याबरोबर येऊं लागल्या. या कादंबऱ्या केवळ मनोरंजनासाठींच आहेत, यापेक्षां त्यांत अधिक असें महत्व कांहीं नाहीं, अशी त्या वेळीं फक्त वाचकांचीच समजूत झाली होती, असें नाहीं तर, लेखकहि त्याच भावनेनें या कादंबऱ्यांचीं भाषांतरें भराभर करीत होते. थोडेंफार बंगाली येण्याबरोबर हा उदरंभरणाचा धंदा या लेखकांना आणि एका मोठ्या नांवाजलेल्या कादंबरीकाराच्या कादंबऱ्या म्हणून प्रकाशकांना चांगला मानवला, एवढेंच. वस्तुतः वाङ्मयाचें त्यामुळें कांहींच कल्याण झालें नाहीं.

बंकिमबाबूंनीं आपली प्रत्येक कादंबरी विशेष हेतूनें लिहिलेली आहे, लोकांचें मनोरंजन करावें, ही लालसा त्यांच्या चित्तांत कधींच उत्पन्न झाली नाहीं, तर वाङ्मय, समाजसेवा आणि देशहित या दृष्टीनेंच त्यांनीं आपल्या लेखणीनें प्रत्येक शब्द लिहिलेला आहे. आरंभीं आरंभीं साधारण वंगजनतेचीहि अशीच समजूत झाली कीं, हें केवळ मनोरंजन आहे; परंतु

हळू हळू या सर्व लेखांकडे विद्वानांचें लक्ष गेले व आरते आरते सगळ्या बंगाल्यांत त्याविषयीं चर्चा व वादविवाद चालू झाले. आणि मग बंकिमबाबूंचा एक शब्द जरी बाहेर पडला तरी तिकडे सगळ्यांचें चित्त वेधू लागलें; परंतु इकडे महाराष्ट्र भाषांतरकारांना याची गंधवार्ताहि नव्हती. त्यांचे प्रास्ताविक लेख पाहिले म्हणजे ही गोष्ट स्पष्टतेनें नजरेस येते. इतक्यावरच हें भागलें असतें तर मोठीशी खेदाची गोष्ट नव्हती; परंतु हीं भाषांतरें केवळ निरसच झालीं असे नाहीं, तर तीं चुकीचीं, दुर्बोध व अपूरींहि झालीं. या अशा अनेक कारणामुळें बंकिमचंद्रांची खरोखर योग्यता किती, याचें ज्ञान महाराष्ट्रीयांस मुळींच झालें नाहीं व म्हणून सुमारें एक वर्षापासून महाराष्ट्रांतील कांहीं विद्वानांनीं या कादंबऱ्या हातीं घेण्यास आम्हास आग्रहाच्या सूचना केल्या.

परंतु हें असलें कार्य हातीं घ्यावें कीं घेऊ नये, हे आमचे आम्हालाच ठरवितां येईना. एक तर काम फार मोठें आणि कोणी सुयोग्य भाषांतरकारहि मिळेना. पण परमेश्वराची कृपा अशी विलक्षण कीं, याच वेळीं बंगाल्यांत कांहीं विद्वानांचे बंकिमबाबू विषयीं अत्यंत सुंदर लेख प्रसिद्ध झाले व बंकिमचंद्रांच्या लेखांची किंमत दुणावली. हे लेख सामान्य लेखकांनीं लिहिलेलें नसून, बाबू विपिनचंद्रपाल, बाबू अरविंद घोष वगैरे सारख्या लेखकांनीं लिहिलेले आहेत. बंकिमचंद्र यांची विषवृक्ष कादंबरी—जी या खंडात दिली आहे, ती फारतर दोनशे पृष्टांची आहे; परंतु तिच्यावर एका लेखकाने अडीचशे पृष्ठांची नुसती टीका लिहिली आहे. या खळबळीमुळें महाराष्ट्रांतल्या विद्वानांचा आग्रह पुन्हा जोरानें सुरू झाला आणि मुख्य आनंदाची गोष्ट ही कीं, एवढ्या मोठ्या दगदगीचें काम प्रकृति बरोबर नसतांहि रा. वासुदेवराव आपटे यांनीं स्वसंतोषानें पतकरलें. आणि ग्रंथमालेची भाग्यरेषा उपटण्याचे एवढ्यावरच न थांबतां नागपूरचे सुप्रसिद्ध महाराष्ट्र शाहीर रा. आनंदराव कृष्णाजी टेकाडे यांनीं बंकिमबाबूंच्या कादंबऱ्यांतील काव्यें मराठींत आणण्याचें अभिवचन मोठ्या आनंदानें दिलें. इतक्या सर्व गोष्टी जुळून आल्यावर, या दाराशीं चालून आलेल्या सलील गंगौघांत जर आळशाप्रमाणे भारत गौरव ग्रंथ-

चें निमज्जन करणार नाहीं, तर तिच्यासारखी दुर्दैवी तीच, असें आम्हांस सहजच वाटलें व शक्ति नसतांहि हें एवढें मोठें काम महाराष्ट्रीयांच्या भरंवशावर शिरावर घेतलें.

या बाबतींत आणखी पुष्कळ सांगावयाचें आहे; पण स्थलसंकोचास्तव अधिक ऊहापोह करतां येत नाहीं. प्रत्येक खंडास जोडण्यासाठीं कांहीं प्रास्ताविक लेख आमच्या हातीं पडले आहेत. त्यांत विपीनचंद्रपाल, अरविंद घोस यांचे लेख असून 'पूर्वीच्या भाषांतरांतील दोष' या नांवाचा एक विस्तृत लेख एका महाराष्ट्र विद्वानाकडून आलेला आहे. त्यापैकीं अरविंद घोष यांचा ऋषि बंकिमचंद्र हा सुंदर लेख या खंडास जोडला आहे. बाकीचे लेखहि यथावकाश पुढील खंडास जोडण्याचा आमचा मनस आहे.

आरंभीं प्रत्येक खंड चारशें पृष्टांचा करण्याचा आमचा विचार होता; परंतु विषवृक्ष ही कादंबरी अपुरी राहूं लागली. एकादी कादंबरी अपुरी राहिली म्हणजे आश्रयदाते व ग्रंथमाला अशा उभयपक्षीं मोठा घोटाळा होतो, हा अनुभव पुष्कळ वेळां आल्यामुळें विषवृक्ष ही कादंबरी पुरी करण्याचें ठरविलें व त्यामुळें चारशें ऐवजीं साडेपांचशें पृष्ट संख्या झाली. पृष्टसंख्या इतकी वाढली, तरी त्या बेतानें किंमत मात्र फारच थोडी वाढविली आहे. सुप्रसिद्ध चित्रकार रा. हळदणकर यानीं काढलेलें एक तीन रंगाचें चित्र या खंडास जोडलें आहे. या एका चित्रासच दीडशें रुपयापेक्षां अधिक खर्च आला आहे. पुढच्या खंडासहि अशीं तीन रंगाची चित्रें आश्रयदात्यांकडून योग्य प्रोत्साहन मिळाल्यास जोडण्याची आम्हांस फार उमेद आहे. या खंडांत चित्रें देण्यासाठीं व मुखपृष्ठांसाठीं ग्रंथमालेनें केवढा खर्च सोसला आहे, याचा आश्रयदात्यांनीं न्यायबुद्धीनें विचार करावयास पाहिजे. चित्रें, छपाई, कागद मुखपृष्ठ, मजकूर या सर्व दृष्टीनें या खंडाचा विचार केल्यास ग्रंथमालेच्या साहसाचें कोणासहि कौतुकच वाटेल; परंतु नुसतें कौतुक करून किंवा प्रशंसेनें पाठ थोपटून ग्रंथमालेचें सांपत्तिक खाचाड बुजणार नाहीं. त्याला सक्रिय सहानुभूति पाहिजे आणि सहानुभूति म्हणजे आम्ही प्रत्यक्ष सांपत्तिक मदत मागत

अवलंबून नसून त्याच्या बुद्धिगर्भांतून बाहेर पडणाऱ्या मंत्रावर अवलंबून असतो. एका अवनत राष्ट्राला आणि परंपरेनें साऱ्या मानव कुलाला नव्या जीवनदायी मंत्राची आवश्यकता होती. आणि हा मंत्र या पुरुषाच्या मुखाच्या द्वारें जनतेला पोहोंचवावा, असा ईश्वरी संकेत होता. एक जीवनदायी देखावा जनतेला परमेश्वरास दाखवावयाचा होता आणि तो पाहण्यासाठीं या पुरुषाला त्यानें दिव्य दृष्टि दिली. त्यानें जो संदेश ऐकला आणि जें दिव्य विश्वरुप पाहिलें त्याचें कथन लोकांस त्यानें केलें. हें करतांना आपल्या शब्दांत आपलें सारें सामर्थ्य त्यानें एकवटलें होतें. आणि ज्या शब्दांच्या द्वारें हा ईश्वरी संदेश त्यानें जनतेला दिला. ते शब्द अशा सामर्थ्याचे होते कीं, त्यांच्या श्रवणाबरोबर मनुष्याचीं अंतःकरणें मुळापासून हादरलीं. त्यांचीं मनें क्षणार्धांत स्वच्छ झालीं आणि पूर्वी कधींहि अनुभवास न आलेले सामर्थ्य तेथें उत्पन्न होऊन अशक्य वाटणाऱ्या गोष्टी सिद्ध करण्यासाठीं सारा जनसमूह खडबडून उठला. हाच मंत्र जनतेला देण्यासाठीं या मंत्रद्रष्टयाचा अवतार झाला आणि हा मंत्र त्यानेंच प्रथम पाहिला.

आज बंकिमचंद्राचें नांव सर्वतोमुखीं झालें आहे. त्याचें पूजन आज सर्व करीत आहेत, याचा अर्थ काय ? त्यानें कोणता संदेश आपणास सांगितला आणि कोणतें दिव्यरूप त्यानें पाहिलें ? बंकिमचंद्र हा मोठा कवि होता. त्याचें भाषाप्रभुत्व विश्रुत होतें. त्याचप्रमाणें कल्पनेच्या साम्राज्यांत इतस्ततः वावरून नानाविध कल्पनामय चित्रें निर्माण करण्याचें सामर्थ्यहि त्याला होतें; पण आज त्याचें नांव इतकें सर्वतोमुखीं झालें आहे, याचें कारण त्याचें काव्य नव्हे, त्याचें भाषाप्रभुत्व नव्हे अथवा ग्रंथ लेखनहि नव्हे. कपालकुंडला, विषवृक्ष, कृष्णकांताचें मृत्युपत्र, इत्यादि ग्रंथ एखाद्या भाषाकोविदाच्या दृष्टीनें सर्वोत्कृष्ट असतील अथवा देवी चौधुराणी, आनंद मठ, कृष्ण चरित्र, अथवा धर्मतत्व यांसारख्या पुस्तकांची चर्चा एखादा टीकाकार करील; तथापि ज्याचें नांव आज सर्वांस ठाऊक झालें आहे, तो बंकिम कपालकुंडला वगैरे ग्रंथांचा बंकिम नसून उत्तरार्धांत सांगितलेल्या ग्रंथांचा तो बंकिम आहे. नवविचारांचें

बीजारोपण अर्वाचिन् हिंदुस्थानांत ज्यांनीं केलें, त्यांच्या यादींत आनंद मठाच्या लेखकाचें नांव अवश्य गोंविलें जाईल. पूर्वार्धांतील बंकिम हा नुसता कवी होता. तो कुशल भाषा लेखक होता; पण उत्तरार्धांतील बंकिम मंत्रद्रष्टा आणि राष्ट्रोद्धारक पुरुष होता.

आतां बंकिम चंद्राच्या ग्रंथांचा विचार केवळ काव्याच्या दृष्टीनें केला तरीहि बंगालच्या दृष्टीनें त्याचें कार्य मोठ्या राष्ट्रीय कार्यांतच मोडण्यासारखें आहे. राष्ट्रोद्धारच्या चळवळींत बंगाल्यानें पुढाकार घ्यावा, असा ईश्वरी संकेत होता. आणि बंगाल्याला त्या पदावर आरूढ करण्याची प्रथम तयारी बंकिमनें केली. या दृष्टीनें विचार केला, म्हणजे पूर्वार्धांतील बंकिमहि राष्ट्रकार्य कर्ता होता, असें म्हणणें अवश्य आहे. कोणतेंहि राष्ट्र उदयोन्मुख झालें, म्हणजे तेथें प्रादुर्भूत होणाऱ्या नव्या कल्पना व्यक्त दशेस आणण्याचें साधन अवश्य असतें. त्या कल्पना सर्वतोमुखीं होतील, सर्वांच्या अंतःकरणांत त्या मुरतील, आणि सर्वांचीं अंतःकरणें त्या हालवून सोडतील, अशा स्वरूपानें त्या लोकांपुढें येणें अवश्य असतें. सर्वांच्या अंतःकरणांत त्या एकदम भिनून जातील, अशा भाषेनें त्यांची मांडणी करावी लागते. उदयोन्मुख, बंगाल्याचें हें कार्य बंकिमचंद्रानें केलें. आणि अशा रीतीनें त्यानें बजावलेली मातृभूमीची सेवा अत्यंत महत्त्वाची आहे. बंगाली भाषेचें स्वरूप त्यानें विकृत केलें, असा आरोप कोणीं कोणीं त्यांजवर करतात; पण जुन्या शुद्ध बंगाली भाषेचें सामर्थ्य नव्या कल्पना व्यक्त करण्यास पुरेसें नव्हतें. जुने पुराणे विचार त्या भाषेनें व्यक्त होण्यासारखे होते. जुन्या पंडितांच्या नागर भाषेंत ग्राम्यभाषेचें मिश्रण बंकिमनें केलें, असा आरोप त्याजवर आहे. बंकिमची भाषा जुन्या देव भाषेसारखी नसून ती ग्राम्य आहे, असें या टीकाकारांचें म्हणणें आहे; पण नव्या विचारांची मांडणी जुन्या पंडितगीरीच्या भाषेनें झाली असती, तर त्या विचारांचीं बीजें मूळांतच दग्ध होऊन गेलीं असतीं. जुन्या बोजड आणि अवजड भाषेच्या ओझ्याखालीं हे नवे कोंवळे विचार भरडून जाऊन निःसत्व झाले असते. त्यांना मूर्तरूप देणारी भाषा कोंवळी, लवचिक आणि हलकी असणेच अवश्य

होतें. पंडितांचे गहन विचार सांगण्याचें कार्य त्यावेळीं व्हावयाचें नव्हतें. शास्त्रीय ग्रंथसंपत्ति निर्माण करण्याचा तो काळ नव्हता. त्या काळाला आणि त्या विचारांना साजेल आणि पोषक होईल, अशाच भाषेची आवश्यकता त्यावेळीं होती. देववाणीचें सामर्थ्य, तिचा प्रौढपणा अथवा तिचें नाजुक सौंदर्य आणि त्याचप्रमाणें आपल्या चालू भाषेचा जोरकसपणा यांचें मिश्रण जिच्यांत असेल, अशी भाषा त्यावेळीं हवी होती. चालू भाषेचा दमदारपणा आणि देववाणीचें गांभीर्य यांचें बेमालुम मिश्रण जिच्यांत असेल, अशा भाषेची गरज त्यावेळीं आपणांस होती. ही गोष्ट बंकिमचंद्राच्या लक्षांत आली आणि ती गरज भागविण्याची प्रेरणा त्याला झाली. बंगाल्याचे नवे विचार योग्य स्वरुपानें मूर्त स्थितीस आणण्याचें साधन बंकिमचंद्रानें दिलें.

हिंदुस्थानाला कोणत्या प्रकारच्या भाषेची जरूर आहे, हें ज्याप्रमाणें बंकिमनें ताडलें, त्याचप्रमाणें राजकीय बाबतींत आमच्या उणीवा काय आहेत, हेंहि त्याच्या लक्षांत बरोबर आलें होतें. सध्याच्या राजकीय पद्धतीची चळवळ पोकळ आणि निरुपयोगी आहे, ही गोष्ट त्याला कळून चुकली होती. 'लोकरहस्य आणि कमलाकांताचें दप्तर या दोन ग्रंथांत या पद्धतीवर मर्मभेदक टीका करून तिचें स्वरूप त्यानें लोकांपुढें स्पष्ट मांडलेलें आहे. पण अशा रीतीनें केवळ विध्वंसकच टीका करून तो थांबला नाहीं. राष्ट्राच्या उद्धारासाठीं आज कशाची गरज आहे, हें त्यास ठाऊक होतें. राजशासनाच्या दडपेगिरीला लोकांकडून तिच्याहून अधिक तोलाचें प्रत्युत्तर मिळालें पाहिजे, ही गोष्ट त्याच्या लक्षांत आली होती. दडपशाहीच्या बळाला क्षणोक्षणीं वाढत जाणाऱ्या राष्ट्रशक्तीनें तोंड दिलें पाहिजे, हें त्याला कळून चुकलें होतें. ग्रामसिंहाचें मार्ग टाकून सिंहाचे मार्ग आतां पत्करा, असा उपदेश त्यानें आम्हास केला आहे. भिक्षेकऱ्याची तुंबा टाकून देऊन आपल्या हातीं वीरकंकण बांधा, असा त्याचा उपदेश आहे. आनंदमठ आणि देवी चौधुराणी या ग्रंथांच्या पोटीं हेंच तत्व त्यानें गोंवलें आहे. त्याचप्रमाणें पाशवी बळाच्या मागें नैतिक बळ असलें पाहिजे, हा मुद्दाहि त्याच्या दृष्टिपथांतून सुटला

नव्हता. या नैतिक बळाचें पहिलें अधिष्ठान त्याग हें आहे. देशाकरतां सर्वस्वाची आहुति आणि त्याच्या मुक्तीकरतां काया वाचा मनें करून एकांतिक सेवा, या दोन गोष्टींची आवश्यकता आपणास आहे, असा संदेश त्यानें दिला आहे. त्यानें निर्माण केलेले देशकार्य कर्ते आणि असि-धाराव्रती हे राजकीय बैरागी आहेत. देशसेवेशिवाय दुसरा कोणताहि विचार त्यांच्या चित्तास शिवत नाहीं. बाकीच्या साऱ्या वस्तू कमी मोलाच्या म्हणून बाजूस सारून देऊन देशसेवा व्रताचें उद्यापन झाल्या-नंतर त्यांजकडे पहावयाचें असा त्यांचा संकल्प आहे. ज्याला स्वतःच्या पोटचें पाणी हलवावयास नको अथवा ज्याला स्वतःचीं बायकापोरें देशा-हून अधिक प्रिय आहेत, तो देशभक्त बंकिमच्या दृष्टीनें अपूर्ण व दुबळा दिसतो. त्यागाप्रमाणेंच शिस्त आणि नियमबद्ध रचना या वस्तूंचीहि आवश्यकता आपणास आहे, असें त्यानें प्रतिपादिलें आहे. आनंदमठ या संस्थेचें सभासदत्व स्वीकारण्यास किती कडक शिस्त अंगीं बाणली पाहिजे, हे देवी चौधुराणीच्या उदाहरणानें त्याने स्पष्ट केलें आहे. त्याग आणि शिस्त या बरोबरच धर्माचेंहि अधिष्ठान असलें पाहिजे, ही गोष्ट बंकिम विसरला नव्हता. देशसेवा हें धर्म कार्य आहे, अशी जाणीव प्रत्येक सेवकाच्या मनांत बाणली पाहिजे. राष्ट्रसेवा हाच धर्म हा बंकि-मच्या लेखांचा एक मुख्य मुद्दा आहे. 'धर्म तत्व' या ग्रंथांत ही कल्पना प्रथम जन्म पावली असून कृष्ण चरितांत तिचें मूर्तरूप पूर्णत्वानें प्रगट झालें आहे. कर्मयोगाच्या सर्व अंगाचें विवरण येथें उत्कृष्ट रीतीनें झालें असून या योगाची परिसमाप्ती देशसेवेंत झाली पाहिजे, असें प्रतिपादन बंकिमनें केलें आहे. आनंदमठ या ग्रंथांत ही कल्पना मध्यवर्ती आहे. साऱ्या ग्रंथाची उभारणी या एकाच कल्पनेवर झाली असून त्याच कल्प-नेचें काव्यमय स्वरूप एकाच कवितेंत व्यक्त झालें असून ती कविता साऱ्या देशाला आज राष्ट्रगीतासारखी होऊन बसली आहे. देशाच्या मुक्तीसाठीं कोणता मार्ग स्वीकारला पाहिजे आणि देशसेवा हें धर्मव्रत बनलें पाहिजे, ही गोष्ट सर्वांच्या निदर्शनास आणून बंकिमनें हें दुसरें मोठें राष्ट्रकार्य केलें आहे. देशांत जें नवें चैतन्य आज वावरत आहे

इंदिरा.

इंदिरा.

प्रकरण पहिलें.

'मी सासरीं जाईन.'

फारा दिवसांनीं मी सासरीं जाण्यास निघाल्यें होत्यें. माझ्या वयाला एकोणिसावें वर्ष लागलें होतें; पण अजून सासर म्हणून कसें तें पाहिलें नव्हतें. कारण काय ? तर माझे वडील श्रीमंत होते. मामंजींनीं मला मूळ पाठविलें होतें; पण वडीलांनीं तेव्हां मला पाठविलें नाहीं; उलट निरोप पाठविला कीं, 'जावईबुवांला पोटापाण्याला लागून बायकोचें न् आपलें पोट भरण्याचें सामर्थ्य येऊं द्या,आणि मग मुलीला घेऊन जा.आतां येऊन तिला काय खायला मिळणार आहे ?' हा निरोप ऐकून तिकडच्या मनाला वाईट वाटलें. तिकडचं वय तेव्हां वीस वर्षांचें होतें. लागलीच मनाचा निश्चय केला कीं स्वतः कमाई करून कुटुंबाचें पालनपोषण करतां येतें कीं नाहीं तें दाखवावयाचें. असा विचार करून स्वारी पश्चिमेकडच्या प्रांताला निघून गेली. त्या काळीं आगगाडी नव्हती, आणि वाट फार बिकट होती. पायीं चालावयाचें, संगतसोबत नाहीं, आणि जवळ पैसाहि नाहीं, अशा स्थितींत पंजाबाकडे जाणें झालें. ज्याला येवढी अवघड गोष्ट करतां आली, त्याला पैसा मिळविणें काय कठीण होतें ? पैसा मिळूं लागला; इकडेहि पैसा पाठविण्यांत येऊं लागला; पण सात आठ वर्षांत स्वतः इकडे येणें झालें नाहीं, किंवा माझा समाचार सुद्धां घेण्यांत आला नाहीं. मला या गोष्टीचा भारी राग आला. मी आईबापांवर रागावल्यें. पैसे पाहिजेत ! जळले मेले ते पैसे ! कमाई करण्याची गोष्टच अगोदर त्यांनीं काढावयाची नव्हती. पैशानें का मी सुखी होणार होत्यें ? माझ्या माहेरीं पैसा रगड होता. आम्हीं चिंचोक्यासारखे खेळायला पैसे घेत होतों. एके दिवशीं तर पैशापासून कसें काय

सुख लागतें तें पहावें म्हणून मी पैसे पसरून त्यांवर निजेण्याचा विचार केला आणि आईला तो विचार सांगितला.तेव्हां आई म्हणाली, 'वेडी कुठली!' पण आईला माझ्या मनांतलें इंगित कळून चुकलें. तिनें काय युक्ति केली न कळे; पण मीं आपला वृत्तांत लिहिण्यास ज्या काळापासून प्रारंभ केला आहे त्या काळापासून थोड्याच अवधींत स्वारीचें घरीं येणें झालें. लोक-वार्ता उठली कीं, स्वारीनें कमिसारियटच्या कामांत चांगलेच पैसे लाटले ! मामंजींचें बाबांना पत्र आलें कीं 'आपल्या आशिर्वादानें चि.उपेंद्र (अग बाई! तिकडचें नांव घ्यायचें नाहीं तें मीं घेतलें, याबद्दल वडील माणसांनीं क्षमा करावी) बायकोचें पोट भरण्याला समर्थ झालेला आहे. सूनबाईला आण-ण्यासाठीं इकडून मेणा व माणसें पाठविलीं आहेत. आतां तरी तिला पाठवावें, नाहींपेक्षां चिरंजिवाचा द्वितीय संबंध करावा लागेल.'

बाबा मनांत म्हणाले, 'फार चांगल्या माणसाशीं गांठ पडली आहे ए-कूण!' नुकताच मोठेपणा आलेला होता. मेण्याला आंतून किनखाबाचे पडदे आणि वर भरजरीचें छत होतें. मेण्याच्या दांड्याला (लोभीपणाचें चिन्ह म्हणून कीं काय !) नक्राचा चांदीचा मुखवटा बसविलेला होता. बरोबर ज्या दासी आल्या होत्या, त्यांच्या अंगावर रेशमी वस्त्रें असून गळ्यांत सोन्यामोत्यांचे मोठाले अलंकार होते. बंदोबस्तासाठीं चारजण काळेकभिन्न, धिप्पाड शरीराचे, व दाढीवाले पाहारेकरी देण्यांत आले होते.

आमचे बाबा म्हणजे पिढीजाद श्रीमंत घराण्यांतले. त्यांना हा प्रकार पाहून जरा गंमतच वाटली. ते म्हणाले, 'बाळ इंदिरे! आतां तुला माहेरीं जास्त दिवस ठेवून घेतां येत नाहीं. तूं आतां जा. लवकरच तुला आणायला माणसें पाठवीन. पण संभाळ हो ! आंगठा कितीहि मोठा झाला, तरी त्याला केळीच्या खांबाची सर यायची नाहीं, हें ध्यानांत ठेव, आणि हंसूं नकोस.'

मधून मधून मी उत्तरादाखल म्हणाल्यें, 'आंगठा सुजून केळीच्या खांबायेवढा होतो कीं नाहीं तें माझ्या जिवाला विचारावें. तुम्हीं हंसूं नका म्हणजे झालें.'

माझी बहीण कामिनी म्हणाली, ' ताई, आतां तूं कधीं ग येशील ?' हें विचारतांना तिच्या डोळ्यांतून टिपें गळत होतीं तीं मीं पदरानें पुसलीं. ती म्हणाली, ' सासर म्हणजे काय ग ? तें कसें असतें तें तुला ठाऊक आहे ? '

मीं म्हटलें, ' आहे ठाऊक. तें नंदनवनासारखें असतें. तेथें पाय देतांच स्त्रिया अप्सरा आणि पुरुष मेंढे बनतात. तेथें नित्य कोकिळांचा स्वर ऐकूं येतो, दक्षिणेकडचा थंड वारा येत असतो, आणि अमावास्येलासुद्धां पूर्ण-चंद्राचें दर्शन घडतें.'

कामिनी हंसून म्हणाली, ' म्हणजे काय मरण ?'

प्रकरण दुसरें.

निघाल्यें.

माझें सासर मनोहरपूर येथें होतें, आणि माहेर महेशपुरास होतें. या दोन गांवांत दहा कोसांचें अंतर होतें. यासाठीं आम्ही पहाटेस निघालों. विचार हा कीं पांचसात घटका रात्रीपर्यंत तेथें पोहोंचूं.

रात्र होणार म्हणून माझ्या डोळ्यांला पाणी आलें. रात्र झाली म्हणजे अंधार पडेल, मग हा कोण आणि मी कोण हें कांहींच ओळखतां येणार नाहीं; आईनें मोठ्या मेहनतीनें माझी वेणी घालून दिली होती ती विस-कटेल; केसांच्या बटा खालीं लोंबतील, आणि वाईट दिसतील; विडा खाऊन रंगलेलें तोंड तहानेनें सुकून जाईल; आणि वाटेच्या दगदगीनें अंग दुखूं लागेल; अशा एक का दोन ? किती तरी गोष्टींची भीति वाटूं लागली. तुम्ही हें ऐकून हंसतां ? कपाळ माझें ! बाबांनो, हंसूं नका; मी पहिल्यानेंच सासरीं जाण्यास निघाल्यें होतें हें ध्यानांत धरा.

वाटेंत कालदिघी नांवाचें एक मोठें तळें लागतें. त्याचा विस्तार जवळ जवळ अर्धा कोस आहे. तळ्याच्या दरडी पहाडासारख्या उंच आहेत.

डोंगरांतली वाट; चारी बाजूंनीं उंच उंच वटवृक्षांची घनदाट छाया, आकाशांतल्या मेघाप्रमाणें तळयाचें नीलवर्ण पाणी; हा देखावा फार मनोहर दिसतो. तेथें माणसांची फारशी वस्ती नाहीं. घाटावर एकच दुकान आहे. जवळच एक गांव आहे. तळयावरून त्या गांवालाहि कालदिघी हें नांव पडलें आहे.

या तळयापाशीं जाण्याला एकट्या दुकट्या माणसाला भय वाटत असे. चोरांच्या भीतीमुळे येथें येणें झालें तर लोक जमाव करून येत. चोरांच्या भीतिवरून या तळयाला 'चोरांची दीघी' हे नांव पडले होते. घाटावरचा दुकानदार चोरांना सामिल होता म्हणतात! आम्हांला त्याचें भय वाटलें नाहीं. कारण आमच्याबरोबर सोळा भोई, चार पहारेकरी व शिवाय कांहीं इतर लोक होते. भोई लोक म्हणाले, 'आतां थोडीशी न्याहारी केल्याशिवाय आमच्यानें पुढची मजल चालवणार नाहीं.' पहारेकरी त्यांना मना करून म्हणाले, 'छेः छेः! ही जागा वाईट आहे.' पण आपण पुष्कळजण आहों, भय बाळगण्याचे कारण नाहीं, असें ते म्हणाले आणि आमच्यापैकीं कोणीहि अद्याप कांहीं खाल्लें नव्हते, तेव्हां अर्थात् बाकीच्यांनींहि त्यांच्या होस हो मिळविला.

तळयाच्या कांठापाशीं एका वडाच्या मोठ्या वृक्षाखालीं माझा मेणा उतरला. देवाला स्मरून सांगत्यें त्यावेळीं मला भारी राग आला. मुक्कामाला लवकर पोंचावें म्हणून मी देवाला नवस करीत होत्यें. बिचारे भोई हातपाय ताणून, 'हुश्शी हुश्श' करीत मळक्या कपड्यानें वारा घेऊं लागले. पण छेः! स्त्रीजात मोठी मतलबी! मला काय होतं नवस करायला? मी लोकांच्या खांद्यांवर मेण्यांत बसून जाणारी; खांदे दुखणार त्यांचे; तशांत मी जात होत्यें आपल्या पतिराजांच्या भेटीला; ते जात होते पोटाची खांच मूठभर तांदुळांनीं कशी तरी भरायला पाहिजे म्हणून! मग ते हवा खाण्यासाठीं थांबले म्हणून मला राग आला यांत काय आश्चर्य? धिक्कार असो अंगांत मुसमुसलेल्या यौवनाला!

याप्रमाणें विचार करीत करीत बराच वेळ घालविल्यावर मला दिसून आले कीं माझे लोक माझ्यापासून बरेच दूर गेले. मग मी मेण्याचा

पडदा सारून तळ्यांची शोभा पाहूं लागल्यें. तेव्हां आमचे भोईलोक सगळे दुकानाच्या समोरच्या वडाच्या छायेंत चिलीम पीत बसलेले दिसले. ती जागा माझ्यापासून सुमारें दीड बिघा अंतरावर होती. चारी बाजूंला उंच पहाड असून मध्यभागीं तो विस्तीर्ण तलाव होता; पहाडावर गुरें चरत होतीं. तळ्यांत पक्षी क्रीडा करीत होते. त्या क्रीडेनें तळ्याच्या पाण्यांत लाटा उठून त्यांच्या आघातानें कमलपत्रें, शेवाळ व इतर जलज वनस्पति झोके खात होत्या. आमचे पाहारेकरी स्नान करीत होते. त्यांच्या अंग-चालनानें उठलेल्या खळबळीमुळें नीलवर्ण पाण्यांत श्वेतवर्ण मुक्ताहार कोणीं टाकिला आहे असें दिसत होतें.

वर आकाशाकडे सहज नजर टाकिली तेव्हां अहाहा !, किती मजेदार देखावा दिसला ! आकाशाचा तो नीलवर्ण, शुभ्रवर्ण मेघांचे थर, त्यांचें आकारवैचित्र्य, व आकाशांत उडत असतांना नभोमंडलांत बारीक बारीक काळ्या ठिपक्यांप्रमाणें दिसणारे पक्षी पाहून मनाला वाटलें कीं माणसाला पक्ष्याचें रूप घेतां येईल अशी एखादी विद्या नाहीं काय ? अशी विद्या अवगत असती तर मी ज्यांच्या दर्शनाची इच्छा फार दीर्घ-काळापासून करीत आल्यें होत्यें त्यांच्या भेटीसाठीं केव्हांच उडून गेल्यें असतें.

पुनः एकदां मी तळ्याकडे पाहिलें तेव्हां मला थोडीशी भीति वाटली, कारण कीं माझ्या बरोबरचीं सगळींच माणसें खाबाला गेलीं होतीं. माझ्या तैनातीच्या दोघी बाया—एक माहेरची व एक सासरची—तिकडेच गेल्या होत्या. माझ्याजवळ कोणीहि नव्हतें; आणि ठिकाण असलें भयंकर ! प्रसंग येऊन बेतला तर माझ्यासारख्या पडदपोशी स्त्रीला मोठ्यानें हाक सुद्धां मारतां यावयाची नाहीं ! आतां काय करावें ?

अशी भीति मनांत संचरते न संचरते तोंच मेण्याच्या मागच्या बाजूस झाडावरून खालीं कांहीं पडल्यासारखा एक आवाज झाला. मी तिकडचें मेण्याचें दार उघडून पाहिलें तों एक काळाकभिन्न विकटाकृति मनुष्य ! भयभीत होऊन मीं तें दार झटदिशीं लावून घेतलें. पण इतक्यांत मनाला वाटलें कीं, अशा वेळीं तें दार उघडें ठेवणेंच चांगलें. म्हणून पुनः तें

दार उघडणार, त्याच्यापूर्वीच दुसऱ्या एका मनुष्यानें झाडावरून खालीं उडी टाकली. पाहतां पाहतां तिसरा आला, चौथाही तसाच आला, आणि ते चौघे माझा मेणा उचलून नेऊं लागले.

दुरून पाहारेवाल्यांनीं तें पाहिलें, तेव्हां ' कोन है–कोन हय रे ' करीत ते ओरडले आणि पाण्यांतून बाहेर येऊन दौडत सुटले.

आतां माझ्या लक्षांत आलें कीं, मी चोरांच्या तडाख्यांत सांपडल्यें आहें. आतां लज्जा आणि मर्यादा ठेवून कसें चालणार ? म्हणून मीं मेण्याचीं दोन्ही दारें उघडलीं. एकदां वाटलें कीं, त्यांतून उडी टाकून पळून जावें. पण इतक्यांत माझे लोक दौडत व ओरडत आपल्याकडे येत आहेत असें पाहून मनाला थोडा धीर आला. पण तो क्षणभरसुद्धां टिकला नाहीं. जवळपासच्या झाडांवरून दबून असेच बसलेले दुसरे चोर भराभर उड्या टाकून उतरले आणि पहिल्या चार चोरांना मिळाले. त्यांनीं वटवृक्षांच्या घनदाट राईत माझा मेणा नेला. चोरांची संख्या बरीच फुगली. त्यांच्यापैकीं कांहींच्या हातांत वेळूच्या काठ्या आणि कांहींच्या हातांत झाडांच्या खांद्या होत्या.

चोरांची संख्या मोठी पाहून माझ्या बरोबरच्या माणसांचे हातपाय गळाले. त्यांचा धावण्याचा वेग मंदावला. माझ्या तर तोंडचें पाणी पळालें. एकदां वाटलें कीं उडी टाकावी. पण चोर मेणा घेऊन सारखे वेगानें चालले होते. अशा वेगांत उडी टाकणें म्हणजे हातपाय मोडण्याचा संभव ! तशांत एक चोर हातांतली काठी दाखवून मला म्हणाला, ' उडी टाकलीस तर ही काठी पाठींत बसलीच समज. ' तें ऐकून मी तर अगदीं कुंठितच झाल्यें.

आमच्या पहारेकऱ्यांपैकीं एकजणानें पुढें येऊन मेणा धरला. तेव्हां एका चोरानें हातांतल्या दंडाचा प्रहार करून त्याला जमिनीवर निपचेत पाडलें. तो जो एकदा पडला तो पुनः कांहीं उठलेला दिसला नाहीं. आपल्यापैकीं एका जणाची झालेली ही गत पाहून बाकीचे पाहारेकरी निराश झाले. इकडे चोर माझा मेणा निर्विघ्नपणें घेऊन चालले होते. एक प्रहर रात्र होईपर्यंत त्यांनीं याप्रमाणें मेणा वाहिल्यानंतर एक

ठिकाणीं त्यांनीं तो खालीं ठेविला. तें स्थान अतिशय अंधकारयुक्त निबिड वनांत होतें. चोरांनीं एक दिवटी पेटविली आणि मला म्हटलें, ' तुझ्या-जवळ असेल नसेल तें सगळें दे; नाहीं तर पहा प्राणाशीं गांठ पडेल. ' काय करणार ! अंगावरचे सगळे दागिने मीं आपल्या हातानें काढून दिले. हातांतलीं कांकणें निघेनात; तीं चोरानीं ओढून काढलीं. त्यांनीं मला नेसायला एक फाटकें तुटकें मलीन वस्त्र दिलें. तें नेसून मीं माझें नेसलेलें रेशमी लुगडें सोडून त्यांच्या स्वाधीन केलें. चोरांनीं माझें सर्वस्व हरण केलें. मेण्याचे दांडे मोडून त्यांची चांदीसुद्धां काढून घेतली, आणि मेण्याला आग लावून दिली. याप्रमाणें अत्याचाराचा मुद्दापत्ता सगळा नाहींसा करून चोरहि चालते झाले. त्या घोर अंधकारमय अरण्यांत मी एकटी राहिल्यें. येथें रानटी पशूंच्या मुखांत आपण आतां पडणार असें दिसून येतांच मला रडें कोसळलें. म्हणून मी त्या चोरांच्या पायां पडून म्हटलें, ' पायां पडल्यें. मला आपल्या बरोबर घेऊन चला. ' मरण्यापेक्षां चोरांची संगत भली असें त्यावेळीं माझ्या मनाला वाटलें.

एका म्हाताऱ्या चोराला माझी करुणा येऊन तो म्हणाला, ' बाई! तुझ्या सारख्या गोऱ्यागोमट्या मुलीला आम्ही कोठें नेणार ! तसें केलें तर आमचा दरोडा तेव्हांच उघडकीला येईल आणि आम्ही पकडले जाऊं'.

एक तरुण चोर म्हणाला, ' मी हिला घेऊन जातों. हिच्यासारख्या माणुकाच्या पायीं कैदेंत पडावें लागलें तरी बेहेत्तर आहे. ' तो आणखी जे कांहीं अचकट विचकट शब्द बोलला ते मला लिहितां येत नाहींत. फार काय, पण त्यांची नुसती आठवणसुद्धां करतां कामा नये. तो म्हातारा त्या चोरांच्या टोळीचा नाईक होता. तो त्या चोराला म्हणाला, ' खबरदार ! या काठीनें तुझें डोकसें मारीन, ध्यानांत ठेव. तुझें पापकृत्य पाहणें या माझ्या डोळ्यांला सहन व्हायचें नाहीं.'

इतकें बोलून ते चालते झाले.

प्रकरण तिसरें.

सासरीं जाण्याचें सुख.

अशी विचित्र घटना कधीं कोठें घडली आहे काय ? इतकी विपत्ति आणि असें दुःख कधीं कोणावर येऊन पडलें होतें काय ? पतिराजाची व आपली पहिल्यानेंच भेट होणार म्हणून मी किती हौसेनें अंगावर दागिने घातले होते ! किती हौसेनें वेणीफणी केली होती ! विडा खाऊन ओंठ रंगविले होते. उंची अत्तरें लावून अंग सुगंधित केलें होतें. सगळें एकोणीस वर्षांचें वय ! अंगांत तारुण्य मुसमुसत होतें. माझें अमूल्य शरीररत्न स्वामीच्या चरणीं केव्हां अर्पण करीन अशी उत्कंठा लागली होती ! तों एकाएकीं हा काय वज्राघात झाला ! माझे अलंकार गेले, जावोत. भुकेनें व तहानेनें प्राण जाऊं लागले, जावोत. ते पाहिजे आहेत कोणाला? गेलेलेच बरे–पण जर ते गेले नाहींत, आणि यांतून वांचल्यें तर पुढें ? कोठें जाणार? आतां स्वामीदर्शन आपणांस कसचें घडतें? आईबापांना तरी आपली खबर कशी पोंचणार ? कांहींच मार्ग दिसेना. रडावें तर रडेंसुद्धां फुटेना.

रडावयाचें नाहीं असें मीं अखेर ठरविलें.पण डोळ्यांतून टिपें गळण्याचें थांबेना. तरी मी त्यांना दाबून धरण्याचा यत्न चालविलाच होता. इतक्यांत दुरून एक गर्जना कानीं पडली. वाटलें वाघ येतो आहे. मनाला आनंद झाला. वाघानें खाल्लें तर सगळ्या दुःखांचा एकदम अंत तरी होईल असें वाटलें. हाडें मोडून रक्त पिईल ना ? पिऊं दे. मरण येईल तर शरीराचे कष्ट तरी चुकतील. तेंच परमसुख वाटलें. म्हणून रडण्याचें थांबवून मोठ्या आनंदानें मी वाघाची मार्गप्रतीक्षा करीत उभी राहिल्यें.त्याची गुरगुर जेव्हां जेव्हां ऐकूं येई तेव्हां तेव्हां तो वाघ माझ्या दुःखांचा हरणकर्ता, माझा प्रेमळ मित्र आहे. असें मनांत येई. पण बरीच रात्र झाली तरी तो आला नाहीं. तेव्हां मी निराश झाल्यें. मग माझ्या मनाला वाटलें कीं अशा निबिड अरण्यांत सर्प असावयाचेच. एखाद्याच्या तरी अंगावर आपला पाय पडावा आणि त्याच्या दंशानें मृत्यु येऊन या दुःखांतून सुटावें, म्हणून मी त्या

रानांत पुष्कळ हिंडल्यें. हो ! माणसाला पाहून सगळे प्राणी पळतात !. त्या रानांत सरसर, पटपट, असे किती तरी प्रकारचे शब्द कानीं पडत. पण व्यर्थ. सापाच्या अंगावर माझा पाय पडेना ! माझ्या पायांला किती कांटे बोचले, किती विंचू लागले, पण काय उपयोग ? सर्पदंश झाला नाहीं तो नाहींच. पुनः निराशा झाली. भुकेनें आणि तहानेनें प्राण व्याकुळ झाले होते. हिंडण्याला अंगांत शक्ति राहिली नव्हती. इतक्यांत समोर एक अस्वल येऊन उभें राहिलें. वाटलें कीं बरें झालें. याच्या हातून कां मरण येईना ? म्हणून मी त्याला मारायला गेल्यें. पण हाय ! तें बिचारें कांहींच उत्तर न देतां एका झाडावर चढून गेलें. थोड्या वेळानें त्या झाडावरून येणारा हजारों माशांचा गुंगुंगुं असा आवाज कानीं पडला. तेव्हां मी समजल्यें कीं या झाडावर मधमाशांचें मोहोळ असलें पाहिजे. तें अस्वल तरी मधाच्याच लग्यावर मला सोडून झाडावर चढून गेलें असावें.

उत्तररात्रीं पहाटेपहाटेस मला झोप येऊं लागली, तेव्हां झाडाला टेकून बसल्याबसल्याच मीं झोप घेतली.

प्रकरण चौथें.

आतां कुठें जायचें ?

माझी झोप उघडली तेव्हां कावळे, कोकिळा चिमण्या इ० पक्षी आपापल्या सोबत्यांना हाका मारीत होते. सूर्याचे कोमल किरण वेळूच्या बनांत पानांच्या गर्दींतून वाट काढीत काढीत येत खालीं जमीनीवर प्रकाशाच्या ठिपक्यांसारखे पडले होते. त्यामुळें सूर्य आपल्या करांनीं पृथ्वीच्या अंगावर मोत्यांचे अलंकार घालीत आहे असा भास होत होता. चांगला प्रकाश पडला तेव्हां माझ्या अंगाखांद्यावर कांहीं नाहीं, सगळे अलंकार चोरांनीं काढून नेले, हें पहिल्यानेंच माझ्या दृष्टोत्पत्तीस आलें. रडत रडत मीं एका वेलीचा तुकडा तोडून तो कंकणासारखा माझ्या उजव्या हातांत बांधिला.

मग मीं आपल्या भोंवतीं पाहिलें तेव्हां मला आढळून आलें कीं मी बसल्यें होतें त्या ठिकाणाच्या भोंवतालच्या प्रदेशांत जागजागीं झाडाच्या

फांद्या तोडून टाकिलेल्या होत्या; कांहीं झाडें समूळ तोडलेलीं होतीं; आणि कांहींच्या नुसत्या डहाळ्या तोडलेल्या होत्या. त्यावरून वाटलें कीं येथें लांकूडतोडे येत असतील. अर्थात् येथून गांवांत जाण्याला वाट असेल. प्रकाश पडल्यावर वांचण्याची मला इच्छा झाली, आणि आशेला अंकुर फुटले. माझें वय तें किती ! एकोणीस वर्षांचें ! त्या वयाला अशी आशा उद्भवणें साहजिक होतें. शोधतां शोधतां एक वाट दिसली. तेव्हां मी त्या वाटेनें जाऊं लागल्यें. वाट अधिकाधिक स्पष्ट होऊं लागली तेव्हां गांवाला जाऊं असा मनाला धीर वाटला.

इतक्यांत एक अडचण मनांत उभी राहिली. गांवांत जावयाचें कसें ! चोरानें दया करून जें फाटकें तुटकें वस्त्र दिलें होतें त्यानें कमरेपासून खालीं गुडघ्यापर्यंतचा शरीराचा भाग कसाबसा झाकला गेला होता. पण तोंडावरून पदर कसा घ्यावयाचा ! लोकांना तरी हें काळें झालेलें तोंड कसें दाखवावयाचें ! त्यापेक्षां गांवांत न जातां येथेंच मरावें हें चांगलें, असा माझ्या मनानें निर्धार केला.

पण रविकिरणांनीं उज्वलित झालेल्या पृथ्वीकडे पाहून, पक्ष्यांचा मंजुल कलरव ऐकून, आणि प्रत्येक लतेवर वाऱ्याच्या झुळुकेबरोबर हेलकावे खाणारे पुष्पांचे समुदाय अवलोकन करून, वांचण्याची इच्छा मनांत प्रबळ झाली. मग झाडांचीं कांहीं पानें तोडून व तीं परस्परांशीं टांचून मीं एक प्रकारचें वल्कल तयार केलें आणि तें कमरेपासून वर गळ्यापर्यंत बांधून कशीबशी लज्जा रक्षणी केली. पण अशा करण्यानें मीं वेड लागलेल्या माणसासारखी दिसूं लागल्यें. मी त्याच वाटेनें पुढें पुढें चालल्यें. थोड्या वेळानें गुराढोरांच्या हंबरण्याचा आवाज ऐकूं येऊं लागला. त्यावरून गांव जवळ आहे असें मीं ताडलें.

पण आतां माझ्यानें चालवेना. अगोदर मला पायीं चालण्याचा कधीं अभ्यास नव्हता; तशांत सगळी रात्र जागरण झालेलें; रात्रीं अनेक शारीरिक व मानसिक कष्ट झाले होतेच; आणि त्यांत पुनः क्षुधा आणि तृषा यांनीं जीव व्याकुळ झाला होता. म्हणून शीण येऊन मी एका झाडाखालीं निजून राहिल्यें. अंग टाकण्याचा कायतो अवकाश होता. मला तत्काळ झोप लागली.

झोपेंत मला एक स्वप्न पडलें. जशी काय मी मेघावर आरूढ होऊन इंद्रलोकीं आपल्या सासरीं जाण्यास निघाल्यें आहें. रतिपति मदन हा माझा पति आणि रतिदेवी ही माझी सवत आहे. तिच्या हातांतल्या पारिजातक वृक्षाच्या फांदीसाठीं मी तिच्याशीं भांडल्यें आहें. इतक्यांत कोणाच्या तरी अंगाला स्पर्श होऊन माझा निद्राभंग झाला. पाहल्यें तों एक तरुण पुरुष! तो कोणी मजुरासारखा हीन जातीचा असून माझा हात धरून ओढीत आहे असें दिसलें. सुदैवानें जवळच एक लांकूड पडलें होतें. तेंच हातांत घेऊन उचलून मीं त्याच्या डोक्यांत घातलें. इतका जोर, त्या वेळीं माझ्या अंगांत कोठून आला तें परमेश्वराला माहित ! तो मनुष्य डोकें चोळीत चोळीत बेदम पळतच सुटला.

मीं तें लांकूड फेकून न देतां त्याच्यावर भार •टाकीत टाकीत चालूं लागल्यें. बरेंच लांब गेल्यावर एक वृद्ध बाई भेटली. ती एक गाय हांकून नेत होती. तिला मीं विचारलें, ' महेशपूर कोठें आहे ? ' तिनें विचारलें, ' बाई, तुम्ही कोण ? तुमच्यासारखी देखणी स्त्री एकटी दुबळी रानावनांतून कशी हिंडेल ? अहाहा ! किती हें लावण्य ! चल, बाई, माझ्या घरीं. ' मी तत्काळ ' होय ' म्हणून तिच्या घरीं गेल्यें. मला फार भूक लागलेली पाहून तिनें मला थोडेंसें दूध प्यायला दिलें. तिला महेशपूर ठाऊक होतें. मीं म्हटलें, ' मला महेशपुरास नेऊन पोंचविशील तर मी तुला पांच रुपये देईन.' ती म्हणाली, 'तें सगळें खरें. पण इकडे घरांतलीं माझीं कामें कोण करील ? ' तिनें मला रस्ता सांगितला. त्या रस्त्यानें मी एकटी जाऊं लागल्यें. संध्याकाळपर्यंत चालतां चालतां अगदीं थकून गेल्यें. वाटेंत एक वाटसरू भेटला. त्याच्याजवळ महेशपुराविषयीं मीं चौकशी केली, तेव्हां माझ्याकडे पाहून तो चकित झाला. बराच वेळ विचार करून मग तो म्हणाला, ' बाई, तुम्ही कोठून आलांत ? ' म्हाताऱ्या बाईनें आपल्या गांवाचें जें नांव सांगितलें होतें तें मीं त्याला सांगितलें. तेव्हां तो म्हणाला, ' तुम्ही वाट चुकलांत. अगदीं उलट दिशेला आला आहां. येथून महेशपूर एका दिवसाच्या वाटेवर आहे. '

तें ऐकून माझ्या डोळ्यापुढें काजवे चमकूं लागले. मीं त्याला विचारलें, "तुम्ही कोठें जाणार आहां? ' तो म्हणाला 'गौरीग्राम जवळच आहे तेथें.' मीहि त्याच्या मागोमाग चालूं लागल्यें.

गांवांत प्रवेश केल्यावर त्यानें विचारलें, 'तुम्ही कोणाच्या घरीं जाणार आहां ? ' मीं म्हटलें, 'माझी येथें कोणाची ओळख नाहीं. मी येथेंच झाडाखालीं निजून राहीन. त्यानें माझी जात विचारली. मीं म्हटलें 'मी कायस्थ आहें.' तो म्हणाला, 'मी ब्राह्मण आहें. तुम्ही माझ्याबरोबर चला. तुमचे कपडे फाटक्या तुटक्या चिंध्या आहेत खरे; पण तुम्ही घरंदाज दिसतां. एरवीं असें लावण्य कोणाला लाभणार आहे ?'

जेथें तेथें माझ्या लावण्याची प्रशंसा ऐकून माझा तर अगदीं झळफळाट होऊं लागला. पण ब्राह्मण पोक्त वयाचा होता म्हणून मी त्याच्या बरोबर गेल्यें.

त्या ब्राह्मणाच्या घरीं गेल्यावर दोन दिवस मला विश्रांति मिळाली. तो ब्राह्मण भिक्षुक होता. त्यानें माझ्या विचित्र पोषाखाकडे पाहून विस्मित होऊन विचारलें, 'बाई, तुमच्या, लुगड्याची अशी दशा कशानें झाली ? तुमचें मूळचें लुगडें कोणीं काढून घेतलें ? मीं नुसता 'हो' कार दिला. त्यानें आपल्या 'यजमानाच्या घरून दोन लुगडीं आणून दिलीं, आणि घरांत बांगड्या होत्या त्या माझ्या हातांत भरल्या. भटजीच्या बायकोनें भात करून मला खायला दिला, तो मीं खाल्ला आणि एका चटईवर अंग टाकिलें. इतकी थकल्यें होत्यें, पण झोप येईना. अशा हालअपेष्टेंत दिवस कंठण्यापेक्षां देव मला मरण कां देत नाहीं ? हाच विचार तेव्हां वारंवार मनांत येऊं लागला. त्यामुळें झोप येईना.

उजाडतां उजाडतां थोडासा डोळा लागला. पुनः एक स्वप्न पडलें. तें असें कीं, समोर प्रत्यक्ष यमाची काळीकुट्ट मूर्ति आपल्या भयंकर दंष्ट्रा विस्तरून हंसत होती असें दिसलें मग कोठली झोप येणार ? निजून उठल्यावर सगळें अंग दुखूं लागलें, पाय सुजले, आणि बसण्याची सुद्धां शक्ति माझ्या अंगांत राहिली नाहीं.

अंग दुखण्याचें थांबेपर्यंत मला अर्थात् त्या ब्राह्मणाच्या घरीं राहावें लागलें. भटजी आणि त्यांची स्त्री यांनीं माझी चांगली बरदास्त राखिली

होती. पण महेशपुरला जाण्याचा कांहीं उपाय दिसेना. कोणाहि बाईला त्या गांवचा रस्ता ठाऊक नव्हता. तिकडे जाणारी कोणी बाईहि आढळेना. पुरुष जाणारे होते, पण त्यांच्याबरोबर जायचें मला भय वाटे. भटजीलाहि ती गोष्ट पसंत नव्हती.

एके दिवशीं असें कळलें कीं त्या गांवचे कृष्णदास बसु नांवाचे एक प्रतिष्ठित गृहस्थ सहकुटुंब सहपरिवार कलकत्त्यास जावयाचे आहेत. हा मला फार उत्तम सुयोग वाटला. कलकत्त्याहून माझें माहेर व सासर दोन्ही फार दूर होतीं खरीं, पण कलकत्त्यांत माझे एक जातभाई कामकाजानिमित्त राहत होते. मीं मनांत म्हटलें, 'कलकत्त्यास गेल्यें तर त्यांचा शोध अवश्य करीन. ते मला माहेरीं बाबांच्याकडे पाठविण्याची तजवीज करतील. निदान माझी हकीकत तरी त्यांना कळवितील.'

मी हें भटजींना सांगितलें. तेव्हां त्यांना तें पटलें. ते म्हणाले, 'कृष्णदास बाबू माझे यजमानच आहेत. तुम्हांला बरोबर नेण्याविषयीं मीं त्यांना शब्द टाकला तर ते ऐकतील. ते चांगले पोक्त व भले गृहस्थ आहेत.'

भटजी मला घेऊन कृष्णदास बाबूंकडे गेले, आणि त्यांनीं माझी हकीकत त्यांना सांगून बरोबर नेण्याविषयींची गोष्ट काढली. बाबूमहाशयांनीं कबूल केलें. मग मी त्यांच्या येथेंच राहिल्यें. आणि दुसरे दिवशीं पहाटेस त्यांच्या मंडळीबरोबर मींहि कलकत्ता सोडिलें. आमचा पाहिला मुक्काम चार पांच कोसांवर गंगेच्या तीरीं झाला. दुसरे दिवशीं आम्ही नौकेंत बसलों.

प्रकरण पांचवें.

कलकत्त्यास.

मला अद्याप कधीं गंगेचें दर्शन घडलें नव्हतें. तें होतांच मला अतिशय आनंद झाला हें सांगावयास नकोच. मी क्षणभर आपलें सगळें दुःख विसरल्यें. गंगेचें तें विस्तीर्ण पाल, त्यावर उसळणाऱ्या लाटा, त्या लाटांवर सूर्याचे किरण पडल्यामुळें दृष्टीचा टप्पा पोंचेल तोंपर्यंत पाण्यांत दिसणारा प्रकाशाचा झकझकाट, तीरावरच्या उंच वृक्षांच्या सुशोभित रांगा, प्रवाहांत

इतस्ततः संचार करणारा नौकसमूह, नौका वल्हविणाऱ्या भावाड्यांचें गुणगुणणें, वल्ह्यानें पाणी तोडतांना पाण्यापासून निघणारा नाद, आणि घाटावर स्नानास येणाऱ्या भाविक लोकांचा कोलाहल, हा सगळा देखावा कुतूहल उत्पन्न करणारा व आनंददायक होता. गंगाबाई खरोखर पुण्यवान् आहे. मी कित्येक दिवसपर्यंत रोज तिच्याकडे टक लावून बसत असे. पण डोळ्यांची तृप्ति म्हणून कधीं झालीच नाहीं.

ज्या दिवशीं आम्हांस कलकत्त्यास पोंचावयाचें होतें त्याच्या आदले दिवशीं संध्याकाळीं भरतीचें पाणी गंगेच्या मुखांत शिरल्यामुळें आमची नौका चालेना. म्हणून अलीकडे एका गांवाजवळच्या पक्क्या बांधलेल्या घाटाला ती लावण्यांत आली होती. तेथें काय काय मौज आम्हीं पाहिली! ब्राह्मणपंडित स्नान करून शुचिर्भूतपणानें आसनावर बसून मंत्रपाठ करीत आहेत; कोणी शास्त्रार्थाची चर्चा करीत आहेत; अनेक सुंदर स्त्रिया नटून थटून पाणी नेण्यासाठीं गंगेवर आल्या आहेत; कोणी पाणी उडवीत आहेत; कोणी पाण्यांत कळशी भरीत आहेत; कोणी हंसताहेत; कोणी गप्पा-गोष्टी करीत आहेत; व कोणी गंगास्तोत्र म्हणत चालल्या आहेत, अशा अनेक मौजा दिसत होत्या.

त्याच दिवशीं त्याच जागीं आलेल्या दोन मुली मीं पाहिल्या. ती गोष्ट मी कधीं विसरणार नाहीं. दोघींचें वय सात आठांच्या सुमारांत होतें त्यांच्या ठायीं विशेषसें सौंदर्य नसलें तरी त्या दिसायला सुरेख होत्या आणि त्यांनीं शृंगारहि बराच केला होता. कानांत डूल, गळ्यांत हंसळी व दुसरे कांहीं अलंकार होते; वेणींत फुलें खोंचलीं होतीं; पायांत पैंजण वाजत होते. त्यांच्या काखेखालीं कमरेवर एकेक लहान कळशी होती. त्या तोंडानें गाणीं गुणगुणत होत्या. एकीनें एक चरण म्हणावा, दुसरीने दुसरा म्हणावा असें आळीपाळीनें त्यांचें गाणें म्हणणें चाललें होतें. एकीचें नांव अमला व दुसरीचें निर्मला होतें.

मुलींचें तें गाणें ऐकून दुःखानें तप्त झालेल्या माझ्या अंतःकरणाला थोडीशी शीतलता प्राप्त झाली. मी त्या मुलीचें गाणें कान देऊन ऐकत होतें हें पाहून वसुमहाशयांची सहधर्मिणी म्हणाली, ' काय तें भिकार

गाणें येवढें कान देऊन ऐकत्ये आहेस?' मीं म्हटलें, 'काय बिघडलें त्यांत?' बाई म्हणाल्या, ' बायकाच्या जातीला हें शोभतें काय ?,

मी—सोळा वर्षांच्या मुलीला तें कदाचित् नाहीं शोभणार. पण सात वर्षांच्या मुलीच्या तोंडून असें गाणें ऐकून मौज वाटते. मोठ्या माणसाच्या हातची थप्पड गोड लागत नाहीं; पण तीच तीन वर्षांच्या पोराच्या हातची गोड लागते.

बाई यावर कांहींएक बोलल्या नाहींत. रुष्ट होऊन बसल्या. मी आपल्याशीं म्हटलें 'एकच गोष्ट एकीला चांगली वाटते, तर दुसरीला तीच वाईट लागते. अशी भिन्नता कां उत्पन्न व्हावी ? एखादी वस्तु दरिद्र्याला दिली म्हणजे तें दान पवित्र व पुण्यकारक समजलें जावें, आणि तीच वस्तु एखाद्या बड्या माणसाला दिली म्हणजे तो खुषामतीचा एक प्रकार गणण्यांत यावा हें काय आश्चर्य आहे ! सत्य हा धर्माचा पाया आहे. पण निरनिराळ्या अवस्थेंत त्याला आत्मश्लाघेचें किंवा परनिंदेचें रूप प्राप्त होतें हें कसें ? 'दया धरमका मूल है' हें सर्वांना कबूल आहे. पण तीच दया एखाद्या दुराचारी माणसाविषयीं दाखविली तर ती पाप ठरते हें काय ? एखाद्या सामान्य माणसानें आपल्या स्त्रीचा वनांत त्याग केला तर तो महापापी, चांडाळ समजला जातो; पण श्रीरामचंद्रानें सीतेला वनांत नेऊन सोडलें त्याला कोणी महापातकी म्हणत नाहींत ?' अवस्थाभेदावर हें सगळें अवलंबून आहे असा शेवटीं मनानें निर्णय दिला. पण ती गोष्ट माझ्या मनांत पक्की राहून गेली.

आम्ही नावेंतून कलकत्त्याकडे जाऊं लागलों. दुरूनच मला ह्या शहराविषयीं विस्मय व भीति वाटूं लागली. केवढें विस्तीर्ण शहर ! काय ते वाड्याचे एकावर एक मजले ! घरांची कोण गर्दी ! जसा कांहीं घरांचा अफाट समुद्रच ! घरांना कांहीं अंतच नाहीं ! जहाजांच्या शिडांचें तर जसें काय अरण्यच होतें ! तें पाहून माझी अक्कलच गुंग झाली. असंख्य नौकांचा तो समुदाय पाहून मीं मनाशीं म्हटलें, ' माणसांनीं इतक्या नौका कशा बांधिल्या असतील ! आम्ही जवळ जाऊन पोंचलों तेव्हां नदीच्या तीरावरच्या राजमार्गानें मुंग्यांच्या रांगेसारखी एकीमागून एक

चाललेल्या गाड्यांची व मेण्यांची रांग दिसली. पायीं चालणारांची तर गणनाच करतां येत नव्हती. त्याबरोबर मनांत आलें कीं अशा गर्दीत आमच्या काकांचा शोध कसा लागणार ? नदीतीराच्या वाळवंटांत रेतीचा अमुक एक कण शोधून काढण्याचें काम जितकें कठीण, तितकेंच कठीण हें काम आहे.

प्रकरण सहावें.

सुबी.

कृष्णदास बाबू कलकत्त्यास कालीघाटावर कालीदेवीच्या पूजेसाठीं आले होते. ते भवानीपुरांत उतरले होते. मला त्यांनीं विचारलें, 'तुमच्या काकांचें घर कोठें आहे ? कलकत्त्यांत कीं भवानीपुरांत ?'

मला तें कांहीं ठाऊक नव्हतें.

त्यांनीं मला विचारलें, 'कलकत्त्यांत ते कोठें राहतात ?'

मीं म्हटलें, ' हें कांहींच मला ठाऊक नाहीं.'

मला वाटलें होतें कीं महेशपूर जसें एक मोठें खेडेगांव आहे, तसेंच कलकत्ताहि असेल. व तेथल्या कोणाहि माणसाच्या ओळखीचीं बाकीचीं शिष्ट माणसें असतील. तेथे प्रत्यक्ष पहात्यें तर कलकत्ता म्हणजे अनंत वाड्यांचा एक अफाट समुद्रच ! माझ्या काकांचा शोध लावण्याचा कांहीं मार्ग दिसेना. कृष्णबाबूंनीं आपल्याकडून शोध करण्याची शर्थ केली; पण कांहीं उपयोग झाला नाहीं.

बाबू महाशयांना कलकत्त्याहून काशीला जावयाचें होतें. पूजाकृत्य उरकल्यावर काशीस जाण्याची त्यांनीं तयारी केली. तेव्हां मला रडूं येऊं लागलें. त्यांची पत्नी मला म्हणाली, 'माझें ऐक. आतां तूं येथें कोणाच्या तरी घरीं चाकरीस रहा. आज सुबी यायची आहे. मी तिला सांगेन. म्हणजे ती आपल्या घरीं तुला चाकरीला ठेवून घेईल.' मी तें ऐकून धाडकन् अंग टाकिलें आणि मोठ्यानें रडूं लागल्यें. मीं म्हटलें, ' अखेर माझ्या कपाळीं

दुसऱ्याची चाकरी करण्याचें आलें आं.? माझ्या पडण्यानें ओठाला लागून त्यांतून रक्त निघालें.कृष्णदास बाबूंना माझी दया आली यांत शंका नाहीं. पण ते म्हणाले, ' मी काय करणार ?' तेंहि खरेंच. माझेंच दुर्दैव !

मी घराच्या एका कोपऱ्यांत एकटी रडत बसल्यें. संध्याकाळ होण्याच्या थोडें अगोदर कृष्णबाबूंची पत्नी मला हाक मारून म्हणाली, ' ही सुवी आली पहा. तुला तिच्या येथें नोकर म्हणून राहावयाचें असलें तर मी तिला विचारल्यें.'

खायला न मिळालें तर बेहेत्तर आहे, पण दुसऱ्याचे. येथें, चाकरीला राहावयाचें नाहीं हें माझें ठरलें होतें. पण म्हटलें कोण सुवी दुवी आहे ती एकदां पाहूं तर खरी ? ' सुवी ' हें नांव मीं प्रथम ऐकिलें, तेव्हां मला वाटलें होतें कीं साहेबलोकांसारखी खेडेगांवच्या लोकांना पाहण्याला न मिळणारी अशी कांहीं अपूर्व वस्तु असेल. पण पाहिलें तर तसें कांहींएक नव्हतें. ती एक बाई होती. होती बरीक खरीच पहाण्यासारखी. माझ्याच वयाची. वर्ण माझ्यापेक्षां उजळ होता असेंहि नाहीं.तिच्या कानांत इयरिंग, हातांत कांकणें,आणि गळयांत मोहनमाळ होती.ती काळी चंद्रकळा नेसली होती, त्यामुळें ती मूर्ति फारच प्रेक्षणीय दिसे.अशी मुद्रा माझ्या पहाण्यांत नव्हती. जगूं काय कमळ फुललें आहे ! चारी बाजूंनीं वेणींतून बटा सुटून सापासारख्या गळयांत आल्या होत्या. मोठाले डोळे होते. पातळ पण तांबडे लाल ओठ होते. तोंड लहानच पण नव्यानेंच उमललेल्या फुलासारखें टवटवीत होतें. झाडाच्या फांद्या जशा वाऱ्याच्या सोसाट्यानें आमूलाग्र हालतात, तसें तिचें सगळें अंग खेळण्यानें हालत होतें. जशा नदीच्या प्रवाहांत लाटा उठतात, तशा तिच्याहि अंगांत खेळण्याच्या ऊर्मी उठत होत्या. तिच्याकडे मन आकर्षिलें जावें अशी तिच्या रूपांत काय जादू भरली होती तें मला कळेना. वाचकांनीं हें ध्यानांत ठेवावें कीं, मी कांहीं पुरुष नव्हत्यें—स्त्रीच होत्यें—आणि एके काळीं मलाहि आपल्या सौंदर्याचा मोठा अभिमान वाटत असे. तिच्याबरोबर एक तीन वर्षांचा मुलगा होता, तोहि अर्धवट उमललेल्या फुलासारखा होता. उठतो आहे, बसतो आहे, खेळतो आहे, डोलतो आहे, नाचतो आहे, धांवतो आहे,

हंसतो आहे, वटवट करतो आहे, मारतो आहे, आणि पुनः सगळ्यांशीं योग्य आदर ठेवून वागतो आहे.

मी टक लावून त्या दोघांकडे पहात होत्यें. तें पाहून कृष्णबाबूंच्या पत्नी म्हणाल्या, 'मघांशीं मीं विचारलेल्या प्रश्नाचें उत्तर नाहीं मिळालें? काय विचार आहे?' मी विचारल्यें, 'या कोण? कोणाच्या? व काय करीत असतात!

बाई म्हणाल्या, 'कोण म्हणजे? सुबी. आणखी काय जास्त सांगावयाचें आहे?' तेव्हां सुबीबाई सुद्धां हंसू लागल्या, आणि म्हणाल्या, 'मावशीबाई! कोणी नवीन माणूस दिसते आहे. ओळखीचें दिसत नाहीं.' इतकें म्हणून सुबीबाईनीं माझ्या तोंडाकडे पाहिलें, आणि म्हटलें, 'माझें नांव सुभाषिणी. या माझ्या मावशी आहेत. लहानपणापासून या मला सुबी म्हणतात.' यावर आमच्या बाई म्हणाल्या, 'कलकत्त्यास रामदत्तबाबूंच्या चिरंजीवाशीं हिचा विवाह झाला. म्हणजे एकंदरीनें मोठेंच माणूस म्हटलें पाहिजे. लहानपणापासून ही सासरींच असते. म्हणून हिची भेट फारशी कधीं होत नाहीं. मी येथें पूजेसाठीं आल्येंच होत्यें. म्हणून म्हटलें मुद्दाम बोलावून आणून भेट घेऊं. मोठ्यांचें घर आहे. तेथलें कामकाज तुला करतां येईल ना?'

मी हरमोहन दत्तांची मुलगी, रुपयामोहोरांची गादी करून तिच्यावर निजूं इच्छिणारी. तिला आतां दुसऱ्याच्या येथें चाकरी करणें कसें आवडेल? माझ्या डोळ्यांत पाणी आलें, आणि त्याबरोबर हंसूंहि आलें. तें दुसऱ्या कोणाच्या लक्षांत आलें नाहीं; सुभाषिणीच्या मात्र आलें. ती आमच्या बाईंना म्हणाली, 'मावशी! मी यांना एकीकडे नेऊन सगळें कांहीं सांगत्यें. जर यांना तें कबूल असलें तर मी आपल्याबरोबरच यांना घेऊन जाईन.' असें म्हणून सुभाषिणीनें मला हात धरून घराच्या आंतल्या खोलींत नेलें. तेथें दुसरें कोणी नव्हतें. फक्त तो छोटा छोकरा धांवत धांवत आला होता. सुभाषिणी व मी दोघीहि खालीं बसलों. मग ती म्हणाली, 'ताई, तुमचें नांव काय?' 'ताई!' अहाहा! किती प्रेमळ शब्द! वाटलें नोकरी करायचीच झाली तर हिच्याजवळ करावी. मीं मनांत

म्हटले, 'मला दोन नांवे आहेत. एक रूढ आहे, दुसरें नाहीं. तेव्हा जें रूढ नाही तेच यांना सागावे झाले.' म्हणून मीं कुर्मुदनी असे नांव सांगितलें.

मुलगा म्हणाला, ' कुर्मुडनी ! '

सुभाषिणी म्हणाली, ' तुम्ही कोण ? कायस्थ ? ' ' मी म्हटले 'होय.' तेव्हा ती म्हणाली, 'तुमच्या वडिलाचे किंवा सासऱ्याच नाव, रहाण्याचें ठिकाण वगैरे गाष्टा मी आता विचारीत नाहीं. मला आज येवढेच सागावयाच आहे कीं तुम्ही मोठ्या घरदाज कुळातल्या दिसता. तुमच्या हातावर व गळ्यावर राज घालण्याच्या अलकाराच्या खुणा दिसत आहेत. तुमच्या सारख्याना चाकरी करायला कोण सागेल ? तुम्हाला स्वैंपाक करता येतो काय ?'

मी [illegible] रण्याच्या कुशलतेबद्दल माझी तारीफ [illegible]

सुभाषिणी म्हणाली, [illegible] स्वतःच स्वैंपाक करतो. (मध्येच मुलगा म्हणाला 'मा स्वैंपाक करता, नाही ग आई ?') पण येथें [illegible] रिवाजाप्रमाणे एक बाई स्वैंपाकाठी ठेविली आहे. ती जायची आहे आता आपल्या गावाला. तिच्या जागी तुम्हाला ठेवीन म्हणत्यें. तुम्हाला एकटीला स्वैंपाकाचे सगळे काम करावे लागणार नाही. आम्हीहि पाळीपाळीने करू लागू त्यात तुमच्या [illegible], एखादे वेळी पाळी येईल. मग आहे का कबूल ? (मुलगा म्हणाला 'काय ! आजी ?' सुभाषिणी म्हणाली 'हो. तू पाजी.' मुलगा म्हणाला. 'नाही. मी बाबू. बाबा पाजी.' सुभाषिणी म्हणाली, 'असें बोलू नये.' असें म्हणून सुभाषिणीनें माझ्याकडे हसत पाहिले.)

मीं उत्तर केलें, 'तुमच्यासारख्याजवळ नोकरीला राहायला सुद्धा मी कबूल आहे '

यावर सुभाषिणी म्हणाली, ' माझ्या मर्जीवर काय आहे ? सासूबाईला तुम्हीं खुष ठेविले पाहिजे. त्याचा स्वभाव आहे थोडासा कुरकुऱ्या. पण त्याना खुष ठेवण्याची हातोटी तुम्हांला साधेल असे वाटते. '

इतकें बोलून ती मध्येंच आमच्या बाईकडे गेली आणि माझ्याबद्दलची माहिती विचारूं लागली. बाईनीं तिला काय सांगितलें तें मला ऐकूं आलें नाहीं. असा तर्क आहे कीं त्यांना माझ्याबद्दलची जेवढी माहिती होती तेवढी त्यांनीं सांगितली असेल. त्यांना माझी कांहींच हकीकत कळलेली नव्हती. भटजीबोवांनीं जेवढी माहिती सांगितली तेवढीच त्यांना ठाऊक. सुभाषिणीचा मुलगा आपल्या आईबरोबर या वेळीं गेला नव्हता. तो माझा हात धरून खेळत होता. मींहि त्याच्याशीं बोलत होत्यें. इतक्यांत सुभाषिणी परत आली.

मुलगा म्हणाला, ' आई, हे पहा यांचे हात कसे रंगलेले आहेत !' सुभाषिणी म्हणाली ' मीं पुष्कळ पाहिले आहेत. तूंच पहा. ' मुलाशीं इतकें बोलून ती मला म्हणाली, ' चला. गाडी तयार आहे. येता ना ? कां मी हात धरून नेऊं ? हें पहा. मघाशीं सांगितली ती एक गोष्ट ध्यानांत धरा. सासूबाईंची तेवढी मर्जी संभाळा म्हणजे झालें.'

सुभाषिणीनें मला ओढून नेलें, आणि गाडींत बसविलें. भटजीबुवांनीं दिलेल्या दोन लुगड्यांपैकीं एक मी नेसल्यें होत्यें आणि दुसरें दांडीवर वाळत होतें. तें ओढून बरोबर घेण्याइतकी सुद्धां संधी तिनें मला दिली नाहीं. त्याचा मोबदला म्हणून मीं मुलांना उचलून कडेवर घेतलें आणि मुके घेत घेत गाडींत जाऊन बसल्यें.

प्रकरण सातवें

शाईची बाटली.

सुभाषिणीच्या सासूबाईंची मर्जी संभाळायची हा मंत्र शिकवून ठेवल्याप्रमाणें मीं गेल्याबरोबर प्रथम त्यांना नमस्कार केला, आणि त्यांची चरणधूळ घेऊन मग मी त्यांच्याकडे पाहूं लागल्यें. त्या तेव्हां गच्चीवर अंधेरांत एक चटई पसरून आणि उशीवर डोकें टेकून निजल्या होत्या. एक नोकरीण त्यांचे पाय चेपीत होती. त्यांना पाहून मला असा भास झाला कीं,

जणूं काय कांठोकांठ शाई भरलेली मोठी बाटली चटईवर आडवी पडलेली आहे. तिच्या डोक्यावरचे पांढरे केस टिनच्या डब्याच्या झांकणाप्रमाणें शोभत होते. अंधकार वाढत चालला होता. मला पाहून तिनें सुबीला विचारलें, 'ही कोण ग ?'

सूनबाई (सुबी) म्हणाल्या, 'सैपाकासाठीं आपण बाई शोधीत होतों ना ? ती आज आणिली आहे !'

सासू—कुठं मिळाली ही बाई ?

सून—माझ्या मावशीनें मिळवून दिली आहे.

सासू—ब्राह्मण कीं कायस्थ ?

सून—कायस्थ.

सासू—फुटलें तुझ्या मावशीचें कपाळ ! कायस्थ घऊन काय करावयाचें? एकादे दिवशीं ब्राह्मणाला मूठभर भात करून घालीन म्हटलें तर हिचा कांहीं उपयोग होणार आहे का ?

सून—रोज कुठें आपण ब्राह्मणांना भात घालीत असतों ? जितके दिवस चालेल तितके दिवस चालवून घ्यावें. पुढें एखादी ब्राह्मणाची बाई मिळाली तर ठेवतां येईल. ब्राह्मणाच्या स्वैपाकघरांत आम्ही पाऊल ठेविलें कीं त्यांचें कपाळ उठतें ना ?

मी मनांत सुभाषिणीची फार प्रशंसा करीत होत्यें. सासूबाईचें मन वश करून घेण्याची विद्या तिला चांगली अवगत होती असें दिसलें. सासू म्हणाली 'तें खरें ग ! पण हलक्या सलक्या लोकांच्या ठायीं इतका ताठा नसावा. कायस्थाची मुलगी समजूनच कांहीं दिवस तिला आपल्या घरीं ठेवून घेऊं. तिला काय पगार कबूल केला आहे ?'

सून—पगाराची गोष्टच अजून निघाली नाहीं.

सासू—काय वेडी पोर आहे ही ! नोकरीला माणूस ठेवायच्या आधीं त्याचा पगार नको का ठरवायला ?

सासूबाईनें 'तूं पगार किती घेशील ?' असें विचारलें. मीं म्हटलें, 'मला आपल्या आश्रयाला राहावें आहे तर आपण द्याल तो पगार मला पतकरायला पाहिजे.'

सासू—ब्राह्मणाच्या बाईला थोडा जास्त पगार द्यावा लागतो. तूं कायस्थ आहेस. तुला अन्नवस्त्र आणि दरमहा तीन रुपये पगार मिळेल.

मला नुसता आश्रय मिळाला तरी पुरे होता. म्हणून मीं लागलीच तें कबूल केलें. फार काय सांगूं ? पगार घेण्याची गोष्ट निघतांच माझे प्राण कासावीस होऊं लागले. मीं म्हटलें, 'बरें आहे.'

मला वाटलें होतें कीं आतां सर्व भानगड मिटली. पण छे: ! शाईच्या बाटलींत पुष्कळच शाई होती. सासूनें विचारलें, ' तुझें वय काय ग ? अंधेरांत रूपावरून वयाचा अंदाज करतां येत नाहीं. बाकी आवाजावरून वय थोडेंच असलसें दिसतें.'

मीं म्हटलें, ' एकोणीस वीस वर्षें. '

सासू-' तर तूं दुसरीकडे काठें काम पहा. इतकी तरुण मुलगी आम्ही ठेवीत नसतो. '

सुभाषिणी मध्येंच म्हणाली, ' कां बरें ? तरुण मुली कांहीं कामकाज करीत नाहींत का ?'

सासू-तुला कळत नाहीं. तरुण लोकांत चांगलीं माणसें थोडींच असतात.

सून-असें कसें म्हणतां येईल ? देशांतलीं सर्व तरुण माणसें काय वाईटच समजावयाचीं ?

सासू-तसें नाहीं ग. माझें म्हणणें कीं या हलक्या नोकरवर्गांत चांगलीं तरुण माणसें थोडींच आढळावयाचीं.

आतां मला रड आवरेना. मला रडण्याचा हुंदका आला. शाईची बाटली सुनेला म्हणाली, ' सोडून चालली वाटते ?'

सून-असें दिसते.

सासू-जाऊं दे.

सून-पण गृहस्थाच्या घरीं आलेल्या माणसाला कांहीं खायला दिल्या-वांचून कसें जाऊं देतां येईल ? तिला कांहीं खायला घालून निरोप देत्यें.

इतकें बोलून सुभाषिणी उठली आणि माझा हात धरून मला आपल्या शयनगृहांत घेऊन गेली. मीं म्हटलें, ' आतां मला का धरून ठेवता ?

पोटासाठीं किंवा प्राणरक्षणाखातर सुद्धां असे शब्द ऐकायला मी राहणार नाहीं. '

सुभाषिणी म्हणाली, ' मी रहा म्हणत नाहीं. पण आमच्या येथें आल्याच आज तशा आजची गत्न येथेच रहा. '

मी तरी जाणार कोठें ? म्हणून डोळे पुसून मीं त्या गोष्टीला रुकार दिला.

कांहीं इकडच्या तिकडच्या गोष्टी केल्यानंतर सुबीनें विचारिलें, ' येथें राहण्याचें जर जमत नाहीं, तर कोठें जाणार ? '

मीं म्हटलें, ' गंगामातेकडे. '

सुबीनेंहि डोळे पुसले आणि म्हटलें, ' छे: छे: ! तसें करूं नका. मी सांगतें तें नीट ऐकून घ्या. मध्येंच कांहीं गडबड उपस्थित करूं नका. '

इतकें बोलून तिनें हाराणी नांवाच्या आपल्या नोकरणीला हाक मारली. ती आली. चांगली धष्टपुष्ट, काळीकभिन्न, चाळीस वर्षांच्या वरच्या वयाची, हसूं पोटांत मावत नाहीं अशी एक हंसरी बाई पुढें येऊन उभी राहिली. सुभाषिणीनें तिला म्हटलें, ' एकदां तिकडे बोलावणं धाड. '

हारिणी म्हणाली, 'पण अशा भलत्याच वेळीं धनी कसे येतील ? बोलावणें कसें धाडूं ? '

सुभाषिणी भिंवई चढवून म्हणाली, ' काय वाटेल तें कर. पण बोलवायला जा. '

हारिणी हंसत हंसत निघून गेली. मीं सुबीला विचारलें, ' कोणाला बोलावणें पाठवावयाचें ? यजमानाला काय ?

सुबी म्हणाली, ' त्यांना नाहीं तर काय गांवच्या वाण्याला बोलावणें पाठवीत असतात ? '

मीं विचारलें, ' ते आल्यावर मी उठून जाऊं ना ? '

सुबी म्हणाली, ' नको. येथेंच बसल्या रहा. '

सुभाषिणीचे यजमान आले. चांगला देखणा पुरुष होता. त्यानें आल्याबरोबर विचारलें, ' काय हुकूम आहे ? ' मग मला पाहिल्यावर म्हणाले, ' हें कोण ? '

सुभाषिणी म्हणाली, 'त्यासाठींच तर बोलावणें पाठविलें. आपली स्वैंपाकाची बाई गांवाला जाते आहे. तिच्या जागीं यांना ठेवावें म्हणून मी यांना माझ्या मावशीच्या घरून घेऊन आल्यें. पण सासूबाईंच्या मनांत यांना ठेवायचें नाहीं.'

यज०—कां बरें ?

सुभा०—तरुण म्हणून.

सुभीचे यजमान हंसले, आणि म्हणाले, 'मग, या भानगडींत मीं काय करावयाचें ?'

सुभा०—यांना ठेवून घ्यायचें ! दुसरें काय ?

यज०—तें कसें ?

सुभाषिणी यजमानाच्या जवळ जाऊन मला ऐकूं येणार नाहीं अशा हलक्या सुरांत म्हणाली, 'मी सांगत्यें म्हणून.' पण मला तिचे शब्द ऐकूं आले. तिचे यजमानहि त्याच सुरांत म्हणाले, 'जसा आपला हुकूम!'

सुभा०—मग केव्हां योग येईल ?

यज०—जेवायच्या वेळीं.

ते गेल्यावर मीं म्हटलें, 'तुम्हीं मला ठेवून घेतलेंत तरी असे वाईट शब्द सहन करून मीं कसें रहावें तें तुम्हीच सांगा ?'

सुभा०—पुढचें पुढें. पण आजच्या एका रात्रीनें गंगा कोठें निघून तर जात नाहींना ?

रात्रीचे नऊ वाजले. सुभाषिणीचे यजमान (रमणबाबू हें त्यांचें नांव) जेवायला बसले. त्यांची आई जवळच बसली होती. सुभाषिणी मला ढकलीत ढकलीत तिकडे घेऊन चालली, आणि म्हणाली, 'काय होतें तें पाहूं.'

मी दाराआड उभी राहून सगळें पहात होत्यें. नानाप्रकारच्या खाद्यांनीं ताट भरलेलें होतें. पण रमणबाबूंनीं एक-दोन घास घेतले आणि ते सगळे पदार्थ बाजूला सारले. त्यांच्या आईनें विचारलें, 'आज खात कां नाहींस ?'

रमणबाबू:—आजचा स्वैंपाक असा झाला आहे कीं, मुतेंखेतें सुद्धां त्याला तोंड लावणार नाहींत. ब्राह्मणाच्या बाईच्या हातचें अन्न खाऊन मला तर आतां अगदीं वीट आला आहे. माझ्या मनांत असा विचार आला आहे कीं, उद्यांपासून चार दिवस आत्याबाईकडे जेवायला जात जावें.

हें ऐकलें तेव्हां सासूबाईचा चेहरा उतरला. त्या म्हणाल्या, 'तसें नको करायला. आम्हीं दुसरीं एक बाई आणिली आहे.'

बाबू हात धुऊन उठून गेले. सुभाषिणी म्हणाली, 'पहा! माझ्यासाठीं आज तिकडे उपाशीं राहायचें झालें. पण आपलें काम तर झालें!'

मी अगदीं कुंठित झाल्यें. मी कांहीं बोलणार इतक्यांत हाराणी येऊन सुबीला म्हणाली, 'मोठ्या सासूबाई तुम्हांला बोलावताहेत.' इतकें सांगून ती माझ्याकडे पाहून उगीचच्या उगीच हंसली. मी समजल्यें कीं तिला हंसण्याचा रोग लागलेला आहे. सुबी घरांत सासूबाईकडे गेली. मी आडून त्यांचें बोलणें ऐकत उभी राहिल्यें.

सासू:—मघांची ती कायस्थ बाई गेली का?

सुभा:—नाहीं. तिला जेवायला घालून पाठवायची म्हणून तेव्हां जाऊं दिलें नाहीं.

सासू:—स्वैंपाक कसा काय करते?

सुभा:—तें कांहीं ठाऊक नाहीं.

सासू:—आज ती न गेली तर नाहीं का चालण्यासारखें? उद्यां तिच्या कडून एकदोन पदार्थ करवून परीक्षा पाहूं.

सुभा:—तर मग मी तिला आजची रात्र ठेवून घेत्यें.

असें बोलून सुभाषिणी माझ्याकडे आली आणि मला स्वैंपाक करतां येतो ना म्हणून विचारूं लागली. मीं म्हटलें, 'होय.'

तिनें पुनः विचारलें, 'पण चांगला स्वैंपाक करतां येतो काय?'

मीं उत्तर केलें, 'उद्यां माझ्या हातचा स्वैंपाक खाऊन पहा. मग काय म्हणायचें तें म्हणा.'

सुभा०:— तसें नाहींग. मीं एवढ्यासाठीं विचारलें कीं जर अभ्यास नसला तर मी शिकवीन.'

मीं हंसल्यें आणि म्हटलें, ' पुढचें पुढें पाहतां येईल.'

प्रकरण आठवें.

ब्राह्मणबाईचें अकांडतांडव.

दुसरे दिवशीं मींच स्वैंपाक केला. सुभाषिणी तो पाहण्याला आली. त्याच वेळीं मीं फोडणी दिली. तेव्हां जे तिखट उधळलें त्यानें खोकत खोकत ती निघून गेली. म्हणाला 'हे तर मरण आलें.'

स्वैंपाक झाला. मुलें जेवायला बसलीं. सुबीचा मुलगा भाज्या—चटण्या फारशा खात नसे. म्हणून तिनें मुलीस विचारलें, 'हेमा, आजचा स्वैंपाक कसा काय झाला आहे ?'

ती म्हणाली 'छान ! वा ! छान !' त्या मुलीला गाणी रचण्याचा नाद होता. लागलीच माझ्या स्वैंपाकावर गाणें रचून जेवतांना ती ते म्हणू लागली. पण तिच्या आईनें तिला धमकाविलें. तेव्हां ती गप्प बसली.

त्यानंतर रमणबाबू जेवायला आले. मी आडून पाहू लागल्यें. त्यांनीं सगळ्या चटण्या भाज्या खाऊन टाकिल्या आणि आपल्या आईला विचारलें, ' आई, आजचा स्वैंपाक कोणाच्या हातचा आहे ?'

सासू:——नव्या बाईच्या हातचा.

रमणबाबू:——चांगला झाला आहे स्वैंपाक.

इतकें बोलून ते हात धुण्यासाठीं पानावरून उठले.

त्यानंतर सुबीचे मामंजी जेवायला आले. त्यांच्यासमोर मी गेल्यें नाहीं. सुबीच्या सासूच्या सांगण्यावरून पूर्वींच्या ब्राह्मणबाईनें त्यांना भात नेऊन वाढला. तेव्हां तरुण वयाची बाई ठेवायला सुबीची सासू कां संकोच करीत होती त्याचें कारण मला उमगलें, आणि त्या दिशेकडे जायचें नाहीं असा मीं निश्चय केला.

सुबीचा सासरा कशा वर्तनाचा आहे याची मी मागून नोकराचाकरांत चौकशी केली. सगळ्यांनीं सांगितलें कीं ते फार सद्वर्तनी आणि जितेंद्रिय आहेत. पण सुबीची सासू–शाईची बाटली–मात्र कांठोकांठ काळ्या शाईनें भरलेली आहे.

ब्राह्मणाची बाई वाढून आल्यावर मीं तिला विचारलें, ' मालकांनीं माझ्या स्वैंपाकाविषयीं कांहीं म्हटलें काय ? '

ती रागानें लाल झाली होती. ती मोठ्यानें ओरडून म्हणाली, ' सैंपाक फार चांगला झाला आहे बरं बाई ! मलासुद्धां असा करतां येत नाहीं. आतांच इतका ताठा आहे तर पुढं म्हातारपणीं किती येईल कोण जाणे ! असा सैंपाक करता यायला चांगलें रूप आणि तरुण वय लागतें. '

तिच्या झळफळण्यावरून मालकांना सैंपाक आवडला असावा असें मीं अनुमान बांधिलें. पण त्या बाईची गमत करण्यासाठीं मीं म्हटलें, 'खरेंच, चांगलें रूप आणि तरुण वय हीं पाहिजेतच. समोर म्हातारी कोतारी दिसली तर खाणाराला अन्न तरी कसें गोड लागेल ?'

दांत बाहेर विचकून दाखवून ती म्हणाली, 'तुमचें रूप आणि तरुणपण जन्मभर असेच टिकणार आहे, म्हातारपण कांहीं येणार नाहीं, हें मला ठाऊक आहे.'

अशा रागाच्या सपाट्यांत असतांना ती लोणच्याचें मडकें उचलून ठेवायला गेली व तें आपटून फुटलें. तेव्हां मीं म्हटलें, 'पाहिलेंत काकू ? रूप आणि तरुणपण नसलें म्हणजे असें हातून मडकें फुटतें.'

हें मी म्हणण्याचाच काय तो अवकाश होता. ती बुड्डी हातांत लाटणें घेऊन मला मारायला धांवली. वयपरत्वें मनुष्याच्या अंगीं चिरडखोरपणा येत असतो. मला वाटतें त्या बाईनें माझे सगळे शब्द सुद्धां ऐकले नसतील तोंच ती इतकी चिडली, आणि मला दुरुत्तरें करूं लागली. मग मलाहि स्फुरण चढलें. मीं म्हटलें, ' काकू ! थांबा. हातांत लाटणें घेण्यापेक्षां तो लोखंडी चिमटा घेतलेला बरा. नाहीं का ?'

या वेळीं सुभाषिणी स्वैंपाकघरांत आली. रागाच्या सपाट्यांत ब्राह्मणबाई-

च्या लक्षांत ती गोष्ट आली नाहीं. ती पुनः मला मारायला अंगावर धावली आणि म्हणाली, 'चावट कुठली! नाहीं नाहीं तेंच बोलते! हातांत लाटणें घ्यायचें नाहीं तर काय पायांत धरीत असतात? हिला वाटतें कीं जणूं काय मला वेड लागलें आहे.'

सुभाषिणीनें तिचे ते शब्द ऐकले, आणि भिंवया चढवून ती बाईला म्हणाली, 'काकू! मी नवी बाई आणिली आहे ती तुम्हीं तिला हवें तसें बोलावें आणि चावट म्हणावें येवढ्यासाठीं काय? असें बोलायचें असलें तर आतांच्या आतां या घराच्या बाहेर व्हा.'

इतकें झालें तेव्हां त्या बाईचे डोळे उघडले. तिचें तिलाच वाईट वाटलें असावें. तिनें हातांतलें लाटणें टाकिलें आणि रडत रडत म्हणाली, 'मीं कधीं हो हिला कांहीं बोलल्यें? मीं तोंडांतून शब्दसुद्धां काढिला नाहीं.'

तें ऐकून सुभाषिणी खदखदा हंसूं लागली. ब्राह्मणबाई म्हणाली, मी कांहीं वाकडा शब्द बोलल्यें असेन तर देव मला नरकांत लोटून देवो.'

मीं म्हटलें, 'पुरे नाहीं कां झालें अजून?'

तरी तिचें तोंड आपलें चाललेंच होतें. 'मला नरक प्राप्त होईल, मला यमयातना होतील.' इ० इ०

मीं मध्येंच म्हटलें, 'काकू, यमलोकीं जाण्याची येवढी घाई कां? दोन दिवस या जगांत रहाना?'

आणखी कांहीं वेळ अशींच आमचीं गंमतीचीं बोलणीं झाल्यावर बाईनें सुबीकडे माझी तक्रार नेली. 'ही पोर मला हवें तसें टाकून बोलल्ये, आणि तुम्ही तें ऐकून स्वस्थ बसतां. तिला कांहीं बोलत नाहीं. मी आतां ही तक्रार मोठ्या बाईसाहेबाकडे घेऊन जात्यें' असें कांहीं ती म्हणाली.

सुभाषिणी म्हणाली, 'तुम्ही अगोदर तिला चावट कां म्हणालात?'

हें ऐकल्याबरोबर त्या बाईनें आरडून ओरडून सारें घर डोक्यावर घेतलें. 'मी कधीं हो तिला चावट म्हटलें? कधीं म्हटलें बोला ना?' हेंच पालुपद तिचें चालू होतें.

मग आम्ही तिला शांत करण्यासाठीं तिच्याशीं गोड शब्द बोलूं लागलों. प्रथम मीं म्हटलें, 'पण मी कुठें म्हणत्यें आहे तुम्ही मला चावट म्हणालां

म्हणून ? यांनीं म्हटलेला चावट शब्द कोणीं येथें ऐकिला ? मीं तरी निदान तो ऐकिला नाहीं.'

म्हातारी म्हणाली 'ऐकून घ्या हें बोलणें. माझ्या तोंडून असे वाईट शब्द कधीं निघायचेच नाहींत.'

सुभाषिणी म्हणाली, 'असें झालें असेल कीं बाहेर नोकराचाकरांत एखा-द्यानें दुसऱ्याला चावट म्हटलें असेल, आणि तें माझ्या कानीं आलें असेल. बाकी काकू असा शब्द बोलायच्या नाहींत ही माझी खात्रीच आहे. काकूंचें काम कसें अगदीं चोख असतें ! स्वैंपाक तर असा छान करतात कीं साऱ्या कलकत्ता शहरांत तसा कोणाला करतां येणार नाहीं.'

बाई माझ्याकडे वळून म्हणाली. 'ऐकून घ्या या काय म्हणतात तें.'

मीं म्हटलें, 'त्यांत काय ऐकावयाचें आहे ? कलकत्त्यांतले सारे लोक तुमच्याविषयीं हेंच म्हणताहेत.'

आमच्या अशा बोलण्यानें बाईचें मन प्रसन्न झालें. त्या हसून म्हणाल्या, 'तुम्ही भल्या घरंदाज कुटुंबांतल्या दिसतां. तुमच्यासारख्यांच्या संबंधानें वेडावाकडा शब्द माझ्या तोंडून निघेलच कसा ? तुमचा सैंपाक चांगला झाला आहे हो. कांहीं काळजी करूं नका. त्यांतून मी आणखी दोन तीन दिवस येथें आहेंच. एखादें कांहीं येत नसलें तर तुम्हांला शिकवून जाईन. मग तर झालं ?'

म्हातारीची याप्रमाणें मला घटकाभर बरीचे करमणूक झाली. फार दिवस झाले माझ्या मागें एकसारखें रडणें लागलें होतें. फार दिवसांनीं आज मी हंसल्यें. तो हास्यकारक तमाशा दरिद्री माणसाच्या निधीप्रमाणें फार गोड लागला. म्हणून त्याचें येवढें विस्तारानें येथें वर्णन केलें. त्या दिवशींची गमत मी जन्मभर विसरणार नाहीं. पुनः अशी मौज कधीं होणार नाहीं.

नंतर सुबीच्या सासूबाई जेवायला बसल्या. मीं केलेल्या चटण्या भाज्या त्यांना आग्रहानें वाढल्या, आणि त्यांनीहि त्या आवडीनें खाल्ल्या. मग त्या म्हणाल्या, 'स्वैंपाक चांगला झाला आहे. कुठें हा तूं करायला शिकलीस ?'

मी म्हटलें 'माहेरीं.'

त्यांनीं विचारलें, ' कुठें आहे तुझें माहेर ?'

मीं या वेळीं खोटें बोलल्यें. सासूबाई म्हणाल्या, ' श्रीमंतांच्या घरच्या-सारखा आजचा सैंपाक झाला आहे. तुझे वडील श्रीमंत आहेत वाटतें ?'

मी म्हटलें 'हो.' तेव्हां त्या म्हणाल्या, ' मग तूं दुसऱ्याच्या घरीं स्वैंपाकाला राह्यला कशी आलीस ?'

मीः—ग्रहदशेमुळें.

सासूः—तर आतां तूं आमच्यापाशींच राहा. सुखानें राहशील. माहेरच्या सारखें तुला येथें सुख लागेल.'

मग त्यांनीं सुभाषिणीला बोलावून म्हटलें, ' सूनबाई, हिला तूं वेडावाकडा शब्द कधीं बोलूं नकोस, बरें का ? तूं स्वतः बोलणार नाहींसच, पण दुसऱ्याहि कोणाला बोलूं देऊं नकोस.'

सर्वांच्या मागून सुभाषिणी जेवायला बसली. मीहि तिच्याजवळ पान मांडून बसल्यें. खातां खातां तिनें विचारलें, 'ताई, तुझ्या हातचा स्वैंपाक म्हणजे द्रौपदीची पाकस्थालीच म्हणावयाची ! द्रौपदी खरोखर फर्स्ट क्लास बबर्जी असली पाहिजे.'

मीं म्हटलें, ' श्रीमंताच्या मुलीचें असेंच सगळे कौतुक करतात.'

सुभाषिणी म्हणाली, 'तें कांहीं खोटें नाहीं. सासूबाई तुझें इतकें कौतुक कां करतात त्याचें आणखी एक कारण आहे. कोणीकडून तरी मुलांना पोटभर चांगलें अन्न खाण्याला मिळावें ही त्यांची इच्छा. म्हणून त्या तुझ्यावर खुष आहेत. तूं आतां दुप्पट पगार मागितलास तरी त्या देतील.'

मीं म्हटलें, ' मला पगार बिगार कांहीं नको. अडअडचणीच्या वेळीं हाताशीं खर्चायाला कांहीं असावें म्हणून थोडासा घ्यायचा इतकेंच. तो सुद्धां मी तुमच्या जवळ ठेवायला देणार आहे. तुम्ही त्यांतून थोडीशी रक्कम एखाद्या गरीबाला दान केली तरी माझी हरकत नाहीं. मला तुमच्या येथें आश्रय मिळाला हेंच मला पुष्कळ आहे.'

प्रकरण नववें.

पिकलेल्या केसांचें सुखदुःख.

मला आश्रय मिळाला. इतकेंच नाहीं, तर वर एका हितचिंतक मैत्रिणी-चाहि लाभ झाला. सुभाषिणीचें माझ्यावर अगदीं मनापासून प्रेम आहे. ती मला आपल्या बहिणीप्रमाणें समजते व तसेच वागविते हेंहि मला दिसून आलें. त्यामुळें नोकरचाकरहि माझ्याशीं आदरानें वागूं लागले. इकडे स्वैपकासंबंधानेंहि सोयीचीच गोष्ट घडली. ती ब्राह्मणबाई गांवाला जाणार होती ती गेली नाहीं. तिनें पाहिलें कीं, आपण रजेवर गेलों म्हणजे आपल्या जागीं ही (मी) येणार आणि आपली जागा कायमचीच पटकावून बसणार, आणि आपली नोकरी जाणार. म्हणून कांहीं निमित्त काढून तिनें जाण्याचा बेत रहित केला. सुभाषिणीच्या शिफारशीमुळें आम्ही दोघीहि राहिलों. तिनें सासूबाईला समजाविलें कीं ' कुमुदिनी (मी) घरंदाज कुळांतली मुलगी आहे. तिच्या एकटीच्यानें स्वैंपाकघरांतलीं सगळीं कामें उरकायचीं नाहींत; आणि काकू झाल्या आतां बुड्ढ्या. त्यांनीं आतां कोठें जायचें ? ' तेव्हां सासूबाई म्हणाल्या, ' तेंहि खरेंच. पण दोघींनाहि ठेवावयाचें म्हणजे खर्च नाहीं का वाढणार ? '

सुभाषिणी म्हणाली, ' एकीलाच ठेवायेचें झालें तर काकूंना ठेवावें. कुमूला रजा द्यावी.'

सासुः– छेः छेः ! तसें नाहीं करतां येत. काकूच्या हातचा स्वैंपाक मुलें मनापासून खात नाहींत. त्यापेक्षां दोघीहि असलेल्या चालतील.

माझ्या कष्टनिवारणार्थ सुभाषिणीनें हा संवाद मोठ्या कुशलतेनें घडवून आणिला होता. सासूला तिनें कळसूत्राच्या बाहुलीसारखें आपल्या मुठींत ठेविलें होतें. कां बरें तसें नसेल ? ती रमणबाबूंची पत्नी. तिचा शब्द खालीं कोण पडूं देईल ? ही एक गोष्ट. दुसरी–ती फार बुद्धिवान् होती. आणि तिसरी—तिचें रूप जसें सुंदर तसा तिचा स्वभावहि सुंदर होता. तिच्यामुळें मला दुःखाच्या काळांत सुद्धां सुख लागलें.

मी स्वैंपाकांतले एक दोन शेलके पदार्थ करीत असें. बाकीचा सगळा स्वैंपाक काकूच करीत. मी आपला वेळ सुभाषिणीशीं बोलण्यांत व तिच्या मुलांना खेळविण्यांत घालवी; किंवा सुभाषिणीच्या सासूची मर्जी संपादण्याकडे लावी. या शेवटच्या कामांत एकदां एक मोठें विघ्न उपस्थित झालें होतें. सासूबाईला वाटे कीं, आपलें वय कांहीं फार नाहीं. कांहीं थोडेसे केस दुर्दैवानें पिकले आहेत. तेवढे उपटून काढले म्हणजे आपण पूर्ववत् तरुण दिसायला लागूं. म्हणून त्या योग्य संधी पाहून जवळच्या माणसाला पांढरे केस उपटून काढण्यास सांगत. एकदां या कामासाठीं मी वेठीस धरल्यें गेल्यें. माझा हात चपळ ! मी भराभर पांढरे केस काढूं लागल्यें. तेव्हां सुभाषिणीनें दुरून बोटानें खूण करून मला बोलाविलें. मी त्यांची परवानगी विचारून सुभाषिणीकडे गेल्यें. तेव्हां ती म्हणाली, ' हें काय तूं मांडलें आहेस ? सासूबाईचें डोकें गुळगुळीत करून ठेविलेंस ना !'

मीं म्हटलें, ' केव्हांना केव्हां तरी एक दिवस या गोष्टीचा निर्णय लावावा लागणारच. तो आज लावण्यांत काय गैर आहे ? '

सुभाः—असें केल्यावर तुला येथें राहायला मिळेल असें वाटतें कां तुला ? तुला घालवून दिलें तर कोठें जाशील ?

मीः—काय करूं ? कांहीं केल्या माझा हात थांबत नाहीं.

सुभाः—वेडी आहेस तूं ! त्यांच्या मर्जीसाठीं एखाद दुसरा केस काढावा झालें.

मीः—पण त्या बऱ्या मला तशा सोडतील ?

सुभाः— त्यांना म्हणावें कीं, पिकलेला केस उगीच एखाद दुसरा दिसतो आहे. ते फारसे नाहींतच. इतकें बोलून निघून यावें झालें.

मीं हंसून म्हटलें, ' असें धडधडीत खोटें सांगावयाचें ? हा तर कालदिवीच्या दरोडेखोरांच्या सारखा दुष्टपणा होईल. आणि लोक मला काय म्हणतील ?

सुभाः—कालदिवीचे दरवडेखोर म्हणजे ग काय ?

सुभाषिणीशीं बोलण्याच्या भरांत मला भान राहिलें नाहीं आणि 'काल

दिधीचे दरोडेखोर ' हे शब्द चुकून माझ्या तोंडून निघून गेले. तरी मीं जीभ आवरली आणि म्हटलें ' तें आणखी एखादे वेळीं सांगेन. '

सुभाः—मी आतां जें सांगितलें तें एकदां तूं करून पहाच.

हंसत हंसत मी सासूबाईपाशीं गेल्यें आणि पुनः पिकलेले केस काढूं लागल्यें. दोनचार केस काढल्यावर मीं म्हटलें, ' कोठें आहेत पिकलेले केस ? मला तर बाई फारसे कोठें दिसतच नाहींत. एखाद दुसरा असलाच तर उद्यां काढतां येईल. '

हें ऐकून त्या हळूंच हंसल्या, आणि म्हणाल्या, ' कसें बोललीस ! नाहींतर हीं बाकीचीं माणसें ! मला सांगतात कीं तुमचे सगळे केस पिकले!'

त्या दिवशीं सासूबाईनीं मला फारच प्रेमानें वागविलें. पण रोज रोज त्यांचे जवळ बसून पिकलेले केस काढावे लागणार नाहींत अशी कांहीं व्यवस्था करण्याचा मीं विचार केला. पगार हातीं येतांच त्यांतला एक रुपया अगोदर हाराणीच्या हातावर ठेविला, आणि तिला म्हटलें कीं, कोणाकडून तरी कलपाची एक शिशी आणवून दे. हाराणी हंसत हंसत चालती झाली. हंसूं थांबल्यावर मला म्हणाली, ' कोणाच्या केसांसाठीं कलपाची शिशी आणवितां ? '

मीं म्हटलें, ' मोठ्या बाईसाहेबांसाठीं.'

हंसतां हंसतां तिची मुरकुंडी वळली. ती पटकन् खालीं बसली. इतक्यांत ब्राह्मणबाई तेथें येऊन उभ्या राहिल्या. तेव्हां हंसूं झांकण्यासाठीं हाराणीनें आपल्या तोंडाशीं फडकें धरलें. पण तिचें हंसूं कांहीं आवरेना. शेवटीं तेथून ती पळून गेली. बाईनीं मला विचारलें, ' कां ग ? ही आज येवढ्यानें कां हंसते आहे ? ' मीं तिला हंसण्याचें खरें कारण सांगितलें. तेव्हां त्या म्हणाल्या, ' यांत हंसण्यासारखें काय आहे ? केसांला कलप लाविला म्हणून काय बिघडलें ? ' रुपेरी केस रुपेरी केस, ' म्हणून वात्रट पोरें थट्टा करून हंसतात, त्यांचें हंसणें तर अशानें बंद होईलना ? '

हाराणी हंसली, पण तिनें काम केलें. तिनें लवकरच कलपाची एक शिशी आणून दिली. मी ती घेऊन सासूबाईच्या जवळ जाऊन बसल्यें,

आणि शिशींतला थोडा कलप हातावर घेऊन त्यांच्या केसाला लावायला लागल्यें. त्यांनीं विचारलें, ' तुझ्या हातांत काय ग आहे ! '

मीं म्हटलें ' आहे एक अर्क. हा डोक्याला लाविला म्हणजे पांढरे केस आपोआप गळून पडतात, आणि काळे केस तेवढे राहतात.'

सासू:—अरे वाः ! असा अर्क आम्हीं नव्हता कधीं ऐकला. बरें आहे, लावून पहा. पण पाहूं ! कलप तर नाहींना !'

मी तो कलप त्यांच्या केसाला खूप लाविला, आणि मग म्हटलें 'आतां पिकलेला असा एकहि केस राहिला नाहीं. ' इतकें बोलून मी चालती झाल्यें. ठरलेल्या मुदतीनंतर सगळे केस काळे झाले. दुर्दैवानें एकदां हाराणी सासूबाईंची खोली झाडण्यासाठीं हातांत केरसुणी घेऊन गेली. तिच्या नजरेस केस काळे झाल्याची गोष्ट प्रथम पडली तेव्हां तिला हंसतां हंसतां पुरे वाट झाली. तिच्यानें हंसूं आवरेना. शेवटीं ती तशीच झपाट्यानें बाहेर निघून गेली. तिला इतकें हंसूं लोटलेलें पाहून इतर चाकरहि 'काय झालें ! काय झालें !' म्हणून तिला विचारूं लागले. खाशी गडबड उडाली ! तेव्हां ती पुनः केरसुणी घेऊन आली आणि झाडण्याचें काम तिनें संपविलें. काकूबाई त्या वेळीं गच्चीवर केस वाळवीत बसल्या होत्या. त्यांनीं तिला हंसण्याचें कारण विचारलें. ती बिचारी काय सांगणार ! तिनें नुसतें डोक्यावर हात ठेवून खुणेनें दाखविलें. काकूबाईला तें समजेना. त्या खालीं येऊन पाहूं लागल्या; पाहतात तों सासूबाईंचे केस काळे झालेले दिसले. तेव्हां त्या म्हणाल्या, ' हें हो काय झालें ! तुमचे केस काळे कशानें झाले? कांहीं औषध बिवषध तर नाहीं लाविलें ! '

इतक्यांत सुभाषिणीनें येऊन मला धरलें आणि हंसत हंसत म्हटलें, ' हें काय तूं केलेंस ! सासूबाईंच्या केसांना कलप लाविलास कीं काय !'

मीं म्हटलें ' हो. '

सुभा:—काय म्हणावें तुला ! तुझ्या या करण्यानें केवढा घोटाळा उडाला आहे !

मीं म्हटलें, ' येवढें भ्यायला नको कांहीं.'

इतक्यांत सासूबाईनीं मला बोलावून म्हटलें, 'काय ग कुमे, तूं काय माझ्या केसांना कलप लाविलास ?'

मीं पाहिलें कीं, माझ्या करण्याचा सासूबाईंना राग तर नाहींच आला, पण उलट त्यांची मुद्रा माझ्यासंबंधानें खुषीची दिसली. म्हणून मीं म्हटलें, 'तुम्हांला हें कोणीं सांगितलें ?'

सासू:—स्वैंपाकाच्या बाई म्हणत होत्या.

मी:— त्यांना काय लागतें आहे म्हणायला ? कलप नाहीं, औषध लाविलें आहे.

सासू:—असें कां ? तर मग तुझें औषध फार चांगलें आहेसें दिसतें. एक आरसा आणून दे पाहूं ?

मी एक आरसा त्यांना दिला. आरशांत पाहून त्या म्हणाल्या," अरे वा:! एकूणएक केस काळे झाले ! पण दुर्दैवी पोरी, लोक आतां म्हणतील कीं यांनीं कलपच लाविला.'

सासूबाईंची मर्जी प्रसन्न झाली. त्यांनीं माझ्या स्वैंपाक करण्याच्या कौशल्याची तारीफ करून माझा पगार वाढवून दिलाच होता, आणि आतां माझ्या हातांत नुसत्या कांचेच्या बांगड्या आहेत असें पाहून पुष्कळ दिवस पेटींत ठेवून दिलेल्या स्वतःच्या सोन्याच्या बांगड्या मला बक्षीस दिल्या. त्या घेतांना माझ्या जिवाला फार अवघड वाटलें. पण 'मला नकोत' असें म्हणण्याइतका अवसरच त्यांनीं मला दिला नाहीं.

एकदां योग्य संधी पाहून काकूबाई मला म्हणाल्या, 'आणखी आहे का तुमच्या जवळ औषध?'

मीं विचारलें, 'कोणतें औषध ?'

काकू०:—सासूबाईच्या केसांना लाविलें तें.

मी झटकन् कलपाची शिशी त्यांच्या स्वाधीन केली. काकूबाईनीं रात्रीं ती घरीं नेऊन निजायच्या वेळीं अंधेरांत आपल्या केसांना तिच्यांतलें औषध लाविलें. तें कांहीं केसांना लागलें, कांहींना नाहीं. कांहीं तोंडाला व डोळ्यांला लागलें. सकाळीं काकूबाई आल्या तेव्हां त्यांचे केस पंचरंगी मांजराच्या केसांसारखे कांहीं काळे, कांहीं कबरे, कांहीं पिंवळे असे दिसूं

लागले. आणि तोंडाचा कांहीं भाग काळ्या तोंडाच्या वानराप्रमाणें आणि कांहीं मांजरासारखा दिसूं लागला. पण तें सोंग पाहतांच सगळेच लोक हंसूं लागले. जो काकूबाईच्या तोंडाकडे पाही तो हंसूं लागे. हाराणी तर हंसतां हंसतां बेजार झाली, आणि दम छातींत छातींत सुभाषिणीला म्हणाली, 'वहिनीबाई, मला रजा द्या कशी ? येथें एकेक प्रकार हंसण्यासारखा होत असतो. हंसतां हंसतां एखादे दिवशीं माणसाचा प्राण निघून जायचा !'

सुभाषिणीची मुलगीसुद्धां म्हणाली,'आई ! आईग, तें पहा काकूबाईनीं आज कसें सोंग आणिलें आहे तें !' इतकें म्हणूनच ती थांबली नाहीं. तिनें त्यावर लागलींच एक गाणें रचिलें आणि म्हणून दाखविलें.

आपल्याकडे पाहून सगळे लोक कां हंसतात तें अद्याप काकूंना कळले नव्हतें. त्या विचारूं लागल्या 'माझ्याकडे पाहून कां हो तुम्ही सगळे हंसतां ? ' कोणी कांहीं बोलेना. त्यामुळें काकूबाई चिडल्या. शेवटीं एकजणीनें धीर करून त्यांना म्हटलें, 'काकूबाई, म्हातारपणीं ही काय हो तुम्हांला बुद्धि झाली ? '

हा प्रश्न ऐकल्यावर मग काय विचारतां ? ती ज्याला त्याला शिव्या देऊं लागली. त्या शिव्यांना ना ताळ ना तंत्र ! ' तुमचा सत्यानाश होवो' असे आशिर्वाद झाले; तुमच्या पतींना व मुलाबाळांना यम कां नेत नाहीं? म्हणून यमराजाला आव्हान करण्यांत आलें; पण यमराजानें त्यांच्या शब्दांना मान दिला नाहीं. काकूबाई तसाच चेहरा घेऊन त्या दिवशीं जेवणाचे वेळीं रमणबाबूपुढें वाढायला गेल्या. रमणबाबूला सुद्धां ते वेळीं हंसूं लोटलें, पण त्यांनीं मोठ्या प्रयासानें तें दाबलें. पण मनुष्य आत्मसंयमन तरी किती करणार ?बाबू लवकर चार घास खाऊन उठून गेले.

अखेर सुभाषिणीला काकूबाईची कींव आली. ती काकूबाईना म्हणाली, 'काकू, राग नका मानूं. पण तुम्ही एकदां दिवाणखान्यांतल्या मोठ्या आरशांत आपलें तोंड पहा.'

म्हातारी उठली आणि दिवाणखान्यांत गेली. आरशांत तोंड पाहतांच ती मोठ्यानें रडूं लागली. तेव्हां मीं तिला हळूच म्हटलें, ' काकूबाई, मीं

ते औषध केसांना लावण्याला दिलें होतें, तोंडाला लावण्याला नव्हतें दिलें.' त्यांना माझ्या बोलण्याचा अर्थच समजेना. त्यांनीं मला शिव्याशाप देण्याचा सपाटा सुरू ठेविला.त्या चिडल्या असें पाहून मुलें त्यांच्या पाठीस फारच लागलीं. अखेर मी जाऊन सुभाषिणीच्या मुलीला उचलून घेतलें, आणि बाकीच्या मुलांना रागें भरून हुसकावून लाविलें.तेव्हां तीं पळालीं.

प्रकरण दहावें.

आशेचा प्रदीप.

त्याच दिवशीं संध्याकाळीं सुभाषिणीनें माझा हात धरून मला ओढीत एका निवांत जागीं नेलें, आणि तेथें बसून ती मला म्हणाली, 'ताई, मागें एके दिवशीं कालदिघीच्या दरवडेखोरांची गोष्ट तूं बोलली होतीस, आणि पुढें सांगेन म्हणाली होतीस. ती आज मला ऐकूं दे.'

मीं बराच वेळ विचार केला, आणि शेवटीं म्हणाल्ये, 'ती या हतभागिनीची कहाणी. माझे वडील चांगले सुखवस्तु थोर गृहस्थ आहेत.तुमचेहि वडील मोठेच आहेत, पण दोघांत तुलना केली तर तुमचें मोठेपण कांहीं नाहीं म्हणावें लागेल. माझे वडील अद्याप आहेत. त्यांचें अतुल ऐश्वर्य अजूनहि आहे. आजसुद्धां त्यांच्या दारांशीं हत्ती झुलतो आहे. माझ्या कपाळीं जें दुसऱ्यांचे घरीं स्वैंपाकाला राहण्याचें आलें आहे त्याला कारण कालदिघीचा दरोडाच होय.'

इतकें बोलणें झाल्यावर दोघी जणी कांहीं वेळ स्तब्ध बसल्या. सुभाषिणी म्हणाली, 'तुला आपली कहाणी सांगतांना कष्ट वाटत असले तर नकोस सांगूं. मला तुझी कहाणी ठाऊक नव्हती म्हणून सहज विचारली.'

मीं म्हणाल्ये, 'सगळी सांगत्ये. तुम्ही माझ्यावर येवढा लोभ करतां हे काय तुमचे मजवर थोडे उपकार आहेत ? तुम्ही विचारल्यावर मला सांगायला कां कष्ट वाटावे ?'

मीं आपल्या वडिलांचें नांव सांगितलें नाहीं,तसें गांवाचेंहि सांगितलें नाहीं; पतिचें, सासऱ्याचें किंवा त्यांच्या गांवाचेंहि नांव सांगितलें नाहीं. बाकीचें

सांगितलें. माझी हकीकत ऐकतां ऐकतां सुभाषिणी रडायला लागली. मलाहि ती सांगतांना मधून मधून हुंदके येत होते हें सांगावयास नकोच.

दुसरे दिवशीं पुनः सुभाषिणीनें मला एकीकडे नेलें, आणि म्हटलें 'तूं आपल्या गांवाचें नांव सांगितलें पाहिजे.'

तिच्या आग्रहावरून मीं तेंहि तिला सांगितलें.

सुभा०:—तुमच्या गांवाला जवळ असें कोणतें पोष्टहपीस आहे ?

मीः—काय पोष्टहपीस ? आहे एक पोष्टहपीस.

सुभा०:— पण त्याचें नांव गांव ?

मीः—तें नाहीं मला ठाऊक.

सुभाः—ज्या गांवीं तुझें माहेर आहे त्याच गांवीं पोष्टहपीस आहे का दुसऱ्या गांवाला आहे ?

मीः—तें मला नाहीं ठाऊक.

सुभाषिणी खिन्न होऊन बसली. ती कांहीं बोलली नाहीं.

पुन: दुसरे दिवशीं आदल्या दोन दिवसांप्रमाणेंच आम्ही दोघी एकांतांत बसलों होतों. तेव्हां सुभाषिणीनें विचारलें, 'तूं चांगली कुलीन घराण्यांतली मुलगी. किती दिवस दुसऱ्याच्या घरीं नोकरी करणार ? तूं गेलीस तर मला फार दुःख होईल खरें; पण स्वतःच्या सुखासाठीं तुझें नुकसान व्हावें असें इच्छिण्याइतकी पापी चांडाळीण मी नाहीं. आम्ही तुझी सल्ला—'

तिचें बोलणें पुरें होऊं न देतां मीं मध्येंच विचारलें, 'आम्ही' म्हणजे कोण ?

सुभाषिणी म्हणाली, ' आम्ही म्हणजे मी आणि माझे यजमान. आम्ही तुझी सल्ला विचारतों कीं तुझ्या वडिलांना तूं येथें असल्याचें वर्तमानपत्रानें कळवावयाचें आहे. तेवढ्याचसाठीं पोष्टहपीसाचें नांव विचारलें.'

मीः—एकूण तूं माझी सगळी हकीकत यजमानाला कळविली वाटतें !

सुभा०:— हो, कळविली. त्यांत काय बिघडलें ?

मीः—कांहीं बिघडलें नाहीं. बरें पुढें ?

सुभा०:—महेशपुरालाच पोष्टहपीस असेल असें समजून पत्र लिहिलें आहे.

मीः—काय ? पत्र लिहिलें सुद्धां ?

सुभा०:— होय.

माझ्या आनंदास सीमा राहिली नाहीं. पत्राचें उत्तर कधीं येतें म्हणून मी दिवस मोजूं लागलें. पण उत्तर आलें नाहीं. माझें दुर्दैव ! महेशपुराला पोष्ट हपीस नव्हतें. त्या काळीं 'हल्लींच्या सारखीं दर एक गांवाला पोष्ट हपिसें झालेलीं नव्हतीं. मी मोठ्याची मुलगी. आपल्या गांवीं पोष्ट हपीस आहे कीं नाहीं याची माहिती कशाला असेल ? पोष्ट हपीसाचा पत्ता न लागल्यामुळें तें पत्र कलकत्त्याच्या बड्या पोष्ट हपीसांत गेलें. तेथें तें फोडून पहाण्यांत आलें, आणि तें लिहिणाराच्या पत्त्यावर परत पाठविण्यांत आलें.

मी पुनः रडण्याला सुरुवात केली. सुभाषिणी आली आणि म्हणाली, 'तूं आपल्या यजमानाचें नांव सांग.'
मी थोडेंसें लिहायला शिकल्यें होत्यें. मीं तें नांव लिहून दाखविलें. मग तिनें सासऱ्याचें नांव विचारलें. तेंहि लिहून दिलें. मागून गांवाचें नांव तिनें विचारलें. तेंहि सांगितलें. पोष्ट हपीसाचें नांव ? तें मात्र मला सांगतां येईना.

नंतर कळलें कीं, रमणबाबूंनीं माझ्या सासरीं पत्र पाठविलें. पण तिकडून-हि उत्तर आलें नाहीं. तेव्हां मी फारच खिन्न होऊन बसल्यें. पण एक गोष्ट तेव्हांची सांगण्यासारखी आहे. ती ही कीं, आशा माझ्या मनाला उत्तेजित करीत होती. म्हणून पत्र लिहिण्याला मी मना केलें नाहीं. आतां विचार केला कीं दरोडेखोरांच्या तडाख्यांत मी सांपडल्यें होत्यें. म्हणून माझ्या जातीविषयीं शंका घेऊन सासरचीं माणसें मला वाळींत टाकतील यांत शंका नाहीं. त्यांना पत्र लिहिण्यांत अर्थ नाहीं. ही गोष्ट मी सुभाषिणीजवळ बोलल्यें, तेव्हां ती गप बसली.

आतां मला कळून चुकलें कीं यापुढें आपली धडगत नाहीं. मीं तेव्हां अंथरुण धरलें.

प्रकरण अकरावें

माझें चोरून पाहणें.

एके दिवशीं पहाटेस उठून पहात्यें तों घरांत कांहीं गडबड चाललेली दिसली. रमणबाबू एक नामांकित वकील होते. त्यांचें एक मोठें अशील होतें. ते गृहस्थ दोन दिवस झाले कलकत्त्यास आले आहेत असें कळलें. रमणबाबू व त्यांचे वडील त्या गृहस्थाकडे खेपा घालीत होते. याचें कारण येवढेंच कीं, त्याच्याशीं यांचा बराच व्यवहार चालत असे. आज दुपारीं त्यांना आपले घरीं मेजवानी आहे म्हणून स्वैंपाकघरांत आज गडबड चालली आहे असें कळलें.

स्वैंपाक चांगला झाला पाहिजे म्हणून तें काम आज माझ्याकडे देण्यांत आलें होतें. मी आपल्याकडून खूप हुशारीनें स्वैंपाक केला. पानें आंतल्या माजघरांत मांडलीं होतीं. रामरामबाबू व रमणबाबू व दुसरी कांहीं निमंत्रित मंडळी पानांवर येऊन बसली. वाढण्याचें काम म्हातारीकडे दिलेलें होतें. मी घरची सोडून इतर मंडळीसमोर वाढायला कधीं गेल्यें नाहीं.

काकू पानें वाढीत होत्या व मी स्वैंपाक घरांत होत्यें. अशा वेळीं एक गडबड झाली. रमणबाबू म्हातारीवर रागावले. कारण काय, तर तिनें वरण वाढायला नेलें होतें. रमणबाबूला ते नको होतें. म्हणून त्यांनीं मध्यें हात घालून उंहूं, उंहूं म्हटलें. तेव्हां म्हातारीच्या हातांतलें वरणाचें भांडें एकदम निसटून बाबूच्या पानांत पडलें. तेव्हां बाबू रागावून म्हणाले 'वाढतां येत नाहीं तर यावें कशाला वाढायाला ? दुसऱ्या कोणाकडे तें काम द्यायचें असतें !' आम्ही स्वैंपाक घरांतून ते शब्द ऐकले.

रामरामबाबू म्हणाले, ' तुमच्याने हें काम होणार नाहीं. कुमीला वाढायला सांगा.

सासूबाई घरांत नव्हत्या. कोण मना करणार ? खुद्द घरच्या यजमानाचा हुकूम आम्ही अमान्य तरी कसा करावयाचा ? बरें मी वाढायला गेल्यें तर सासूबाईहि तिकडून रागवायच्या. तरी दोन चारदां मीं म्हातारीला

बजाविलें होतें कीं 'काकू,फार जपून वाढा हो.' पण आतां तर त्या भयानें वाढायला जाण्याला कबूलच होईनात.' तेव्हां मला पुढें व्हावेंच लागलें. मीं चांगले हात तोंड धुतलें, स्वच्छ लुगडें नेसलें, तोंडावरून पदर घेतला, आणि वाढायला गेल्यें. मला काय स्वप्न पडलें होतें कीं माझ्या या करण्यापासून पुढें त्रास होणार आहे? मी स्वतःला मोठी बुद्धिमान् समजत होत्यें; पण मला विकत घेण्याइतकी बुद्धिमत्ता सुभाषिणीपाशीं होती हें मला ठाऊक नव्हतें !'

मी पडदानशीन बायको. पण तोंडावरून पदर घेतला तरी माणसाचा स्वभाव झांकून राहत नाहीं. तोंडावरच्या पदराच्या आडूनच मीं जेवायला बसलेल्या बाबूकडे पाहिलें.

त्यांचें वय तीस वर्षांचें दिसलें. त्यांचा वर्ण गोरा असून शरीराचा बांधा नीटस व कोणाचेंहि चित्त आकर्षण करील असा होता. त्यांना पहातांच माझें मन चलबिचल झालें. पक्वान्नाचें ताट घेऊन मी आपली पाहत उभीच राहिल्यें ! मी तोंडावरल्या पदराच्या आडून त्यांच्याकडे पहात होत्यें, इतक्यांत त्यांनींहि वर मान केली. मी त्यांच्याकडे नजर लावून पहात होत्यें ही गोष्ट त्यांच्या लक्ष्यांत आली. मी कांहीं जाणून बुजून वाईट दृष्टीनें पहात नव्हत्यें. तशी पापबुद्धिहि माझ्या अंतःकरणांत नव्हती. साप सुद्धां फणा काढतो ती जाणून बुजून काढीत नाहीं. तशी वेळ आली म्हणजे ती आपोआपच स्वयप्रेरणेनें उभी रहाते. सापाच्याहि मनांत पापबुद्धि नसते. तसाच कांहीं प्रकार यावेळीं घडला. पुरुष म्हणतात कीं बायका अंधारांत उभ्या राहून पाहूं लागल्या म्हणजे त्यांचे डोळे तोंडावरच्या बुरख्यांतून अधिकच प्रकाशमान दिसतात. बाबूला तसें कांहीं दिसलें असेल तर सांगवत नाहीं. त्यांनीं किंचित् स्मित करून खालीं मान घातली. तें त्यांचें स्मित फक्त माझ्याच लक्ष्यांत आलें. मीं त्यांच्या ताटांत पक्वान्न वाढून स्वैंपाकघरांत चालती झाल्यें.

तेव्हांपासून मी फार लज्जित आणि दुःखी झाल्यें. मी सवाष्ण असून जन्मविधवा होत्यें. विवाहाच्या वेळीं एकदांच मला पतिराजाचें दर्शन घडलें होतें. अर्थात् तारुण्यांतली माझी प्रवृत्ति अद्याप अतृप्तच होती. या

वेळीं खोल जलाशयांतल्या पाण्यांत खळबळ होऊन त्यांत तरंग उठावे तशी माझी स्थिति झालेली पाहून माझें मन अस्वस्थ झालें. मी मनांतल्या मनांत एक हजार वेळां स्त्रीजन्माचा धिक्कार केला असेल. मला मेल्यापेक्षां मेल्यासारखें झालें.

स्वैंपाकघरांत आल्यापासून मी मागची आठवण करूं लागल्यें. तेव्हां पाहुण्याला मीं कोठें तरी पूर्वीं पाहिलें आहे असें वाटूं लागलें. शंका फेडून घ्यावी, म्हणून मी जाळींतून त्यांच्याकडे बारकाईनें पाहिलें तेव्हां खात्री झाली. मीं मनांत् म्हटलें कीं, मीं यांना ओळखल्यें.

इतक्यांत वाढायला आणण्याविषयीं रामरामबाबूंकडून सूचना आली. नाना प्रकारचे पदार्थ केले होते ते वाढायला नेले. त्यांची ती माझ्याकडची दृष्टि मनांत घोळूं लागली. पाहुण्यांनीं रामरामबाबूला म्हटलें, ' स्वैंपाक फार छान झाला आहे!•'

रामरामबाबूंना त्यांच्या बोलण्यांतलें अंतःस्थ मर्म कळलें नाहीं. ते म्हणाले, ' या बाईस स्वैंपाक चांगला करतां येतो. '

मीं मनांत म्हटलें, ' डोंबल तुमचं. '

पाहुणेः--मोठी आश्चर्याची गोष्ट ही कीं आजच्या जेवणांतले दोन तीन पदार्थ आमच्या प्रांतांतल्या चालीप्रमाणें तयार केलेले दिसतात.

रामः--तें शक्य आहे. या बाईचें राहणें इकडचें नाहीं.

पुनः मी वाढायला गेल्यें असतां संधी साधून पाहुण्यांनीं प्रत्यक्ष मलाच विचारलें कीं तुम्ही कोठच्या राहणाऱ्या ?

मला मोठी पंचाईत पडली. या परक्या गृहस्थाशीं आपण बोलावें कीं नाहीं ? पण अखेर ठरविलें कीं बोलावें.

पण दुसरी अडचण ही आली कीं, मी यांना खरें सांगूं कीं खोटें सांगूं ? त्याचाहि मनानें निकाल दिला कीं खोटें सांग. मला खोटें बोलावेंसें कां वाटलें तें ज्यानें स्त्री-हृदयाला चातुर्यप्रिय आणि वक्रगामी केलें आहे त्या देवालाच ठाऊक ! मीं मनांत विचार केला, कीं ' जरूरी पडेल तेव्हां सत्य बोलणें ही आपल्या हातांतली गोष्ट आहे. येथें थोडेंसें

खोटें बोलून पाहूं.' म्हणून मीं पाहुण्याच्या प्रश्नाला उत्तर केलें, 'माझं घर कालदिघीला आहे.'

तें ऐकतांच ते जरा दचकले. थोड्या वेळानें मृदुस्वरानें त्यांनीं म्हटलें 'कालदिघी कोणती ? चोरांची ?'

मीं म्हटलें, 'हो.'

त्यावर ते कांहीं बोलले नाहींत.

मी आपली पक्वान्नांचें ताट हातांत घेऊन उभीच होत्यें. असें उभें रहाणें माझ्यासारखीला प्रशस्त नव्हतें ही गोष्ट मी विसरून गेल्यें होत्यें. नुकताच मी स्वतःचा हजार प्रकारें धिक्कार केला होता तेंहि आतां विसरल्यें. पाहुण्याचा हात मंदावला होता. हें पाहून रामरामबाबू म्हणाले, 'उपेंद्रबाबू, हात कां थांबविलात ?' येवढेंच मला ऐकायचें होतें. उपेंद्र-बाबू ! होय. हें नांव ऐकण्याच्या अगोदरच मी ओळखलें होतें कीं हेच माझे पतिराज.

मी स्वैंपाकघरांत गेल्यें. हातांतलें ताट टाकून दिलें आणि मनांतल्या मनांत हर्ष मानूं लागल्यें. ताटाचा आवाज रामरामबाबूंच्या कानीं गेला, आणि काय पडलें म्हणून त्यांनीं चौकशी केली. माझ्या हातांतलें ताट पडलें म्हणून त्यांना कळलें.

प्रकरण बारावें.

हाराणीचें हंसणें बंद !

येथून पुढें येणाऱ्या माझ्या आत्मवृत्तांत माझ्या पतीचें नांव येणें अवश्य आहे. तेव्हां त्यांचें नांव मीं कोणत्या शब्दानें सांगावें या प्रश्नाचा निर्णय करण्यासाठीं तुम्ही हवी तर पांच सहृदय स्त्रियांची एक कमिटी नेमून त्या कमिटीचा निर्णय मागवा. पांचशें वेळां, 'पतिराज' 'पतिराज' म्हटलेलें ऐकून तुमचे कान किटतील असें करूं ? कां सगळी लाजलज्जा गुंडाळून ठेवून त्याला 'उपेंद्र' या नांवानेंच संबोधूं ? कां 'प्राणनाथ'

'प्राणप्रिय ' 'प्राणेश्वर' अशी त्याच्या संबंधानें अलंकारिक शब्दयोजना करून शब्दावडंबर माजवूं ! जे मला सर्वांपेक्षां अधिक प्रिय, आणि ज्यांचें नांव उच्चारण्याची प्रतिक्षणीं मला मनापासून उत्कट इच्छा, त्यांच्या संबंधानें योजण्यासारखा शब्द आपल्या भिकारड्या भाषेंत नाहीं. माझी एक मैत्रीण नवऱ्याला (नोकराचाकराचें उदाहरण पाहून) 'बाबू' म्हणत्ये. पण नुसता 'बाबू' हा शब्द तिच्या कानाला गोड लागत नाहीं. म्हणून मनाला वाटणारें दुःख हलकें करण्यासाठीं ती त्याला 'बाबूराम' म्हणत असते. आपणहि तसेंच करावें अशी मलाहि इच्छा होते.

पक्वान्नाचें ताट हातचें टाकिल्यानंतर मीं मनाशीं निश्चय केला कीं, हरवलेलें रत्न ब्रह्मदेवानें परत आणून दिलें आहे. ते आतां हातचें जाऊं देऊं नये. लहान पोरीसारखें लाजल्यानें तें हातचें जाण्याचें भय आहे.

असा विचार करून मी अशा जागीं उभी राहिल्यें कीं कोणी बाहेर कचेरींतून जाऊं येऊं लागलें तर सगळें दिसावें. मीं मनांत म्हटलें, ' जर इकडे पहा, तिकडे पहा, असें न करतां जाणें झालें तर मी आज वीस वर्षें पर्यंत पुरुषांच्या चरित्राचें सूक्ष्म अवलोकन केलें तें सारें व्यर्थ ! मी स्पष्ट बोलत्यें, माफ करा. मी तोंडावरचा पदर मागें ओढून तो लहान करून उभी राहिल्यें. हें लिहिण्यास मला आतां लज्जा वाटते खरी, पण त्यावेळीं त्यांना डोळे भरून पहावें ही इच्छा माझ्या मनांत किती प्रबळ झाली होती त्याचा मनाशीं नीट विचार करा.'

सर्वांच्या पुढें रमणबाबू जाऊं लागले. ते चोंहींकडे पाहत पहात जात होते. जणूं काय ते कोणाला तरी शोधीत होते! त्यांच्या मागून रामरामदत्त बाबू गेले. त्यांनीं इकडे तिकडे मुळींच पाहिलें नाहीं. त्यांच्यानंतर तिकडून जाणं झालं. तिकडचे डोळे मात्र कोणाचा तरी शोध करीत आहेत असे चंचल दिसत होते. मीं त्यांच्या नजरेच्या टप्प्यांत गेलें. त्यांची दृष्टि माझ्याच शोधांत आहे असें आतां स्पष्टपणें आढळून आलें. तिकडची दृष्टि माझ्यावर पडलेली दिसतांच मी जाणून बुजून--काय सांगूं? सांगायला लाज वाटते--तिकडे नेत्रकटाक्ष फेंकिले. सापानें अंगाचें वेटाळें घालून बसणें हा जसा त्याचा नैसर्गिक स्वभाव आहे तशीच स्त्रियांच्या संबंधाची ही

गोष्ट त्यांच्या स्वभावाच्या अंगभूतच असते. हे आपले पति असें ओळख-ल्यानंतर त्यांच्यावर कोणती स्त्री आपले विषारी नेत्रकटाक्ष टाकणार नाहीं? असें दिसलें कीं, त्या बाणांनीं तिकडच्या मर्माला आघात होऊन स्वारीचें बाहेर जाणे झालें.

आतां हाराणीची पायधरणी केली पाहिजे असें माझ्या मनाला वाटलें. मी तिला हळूच एकीकडे बोलाविलें. ती हंसत हंसत आली, आणि म्हणाली, 'पानें वाढण्याच्या वेळीं काकूबाईची खूप गंमत झाली ना?' उत्तराची वाट न पाहतां ती पोट धरधरून हंसूं लागली.

मी म्हटलें, 'ते मला आहे ठाऊक. पण त्यासाठीं मी तुला बोलाविलें नाहीं. साऱ्या जन्मांत एक वेळ तरी माझ्यावर उपकार कर. हे बाबू कोठें जात आहेत ते नीट पाहून मला खबर दे!'

हाराणीचें हंसणें एकदांचें थांबलें, आणि गंभीर स्वरानें ती म्हणाली छी:! बाई, तुमच्या मागें ही पीडा आहे हे मला ठाऊक नव्हतें.'

मी हंसल्ये, आणि म्हणाल्ये, 'माणसाचे सगळे दिवस सारखे जात नसतात. तुझा उपदेश तूर्त तुझ्याजवळच राहू दे, आणि माझें येवढें काम करतेस कीं नाहीं ते बोल?'

हाराणी म्हणाली, 'माझ्यानें नाहीं बाई असलें घाणेरडें काम करवत.'

मी रिक्त हस्तानें हाराणीची भेट घ्यायला आल्ये नव्हतें. मला जो पगार मिळाला होता त्यांतले पांच रुपये मीं तिच्या हातावर ठेविले आणि म्हटलें, 'आतां माझें डोकें खाऊं नकोस. जें काम सांगितलें तें मुकाट्यानें कर जा.'

ती ते रुपये फेकूनच देत होती. पण फेकल्यास त्यांचा खणखण् नाद होईल म्हणून जवळच मातीचा एक ढीग होता त्यवर तिनें ते ठेवले आणि न हंसतां अतिशय गंभीरपणानें म्हटलें, 'मी तुमचे रुपये फेकूनच देणार होत्यें. पण आवाज होईल आणि तुमच्या तोंडाला काळोखी लागेल म्हणून हळूंच येथें ठेविले आहेत. उचला ते आणि पुनः अशी गोष्ट तोंडावाटे काढूं नका.'

मला रडायला यायला लागलें. सगळ्या नोकराचाकरांत तिचा काय तो मला भरंवसा वाटत होता. बाकीच्या लोकांविषयीं माझा पूर्ण बेभरंवसा होता. तिनें 'नाहीं' म्हटलें तेव्हां आतां कोणाजवळ शब्द टाकावा? माझ्या रडण्याचें गूढ कारण तिला समजलें नाहीं. तथापि तिला माझी दया आली आणि ती म्हणाली, ' अशा रडतां काय ? ते गृहस्थ तुमच्या ओळखीचे का आहेत ?'

माझ्या मनाला एकदां वाटलें कीं आपली खरी खरी हकीकत तिला कळवावी. पुनः वाटलें कीं ती हकीकत तिला कदाचित् खरी वाटणार नाहीं, आणि उगाच बोभाट मात्र होईल. विचार करतां करतां शेवटीं मनाचा निश्चय झाला कीं या कामीं सुभाषिणीवांचून मला गति नाहीं, तीच माझी बुद्धि व तीच रक्षणकर्ती. तिला आपण आपली सारी हकीकत खुल्या मनानें सांगितलीच आहे. तथापि हारणीला मी म्हणाल्यें 'हो. ओळखीचे आहेत. पुष्कळ ओळख आहे. तुला सारी हकीकत सांगितली तर ती खरी वाटायची नाहीं म्हणून मी बोलले नाहीं. माझा तुला विश्वास येत नाहीं यांत तुझ्याकडे दोष नाहीं. '

' तुझ्याकडे दोष नाहीं ' येवढे शब्द तोंडांतून निघून गेले खरे, पण त्यांनीं मला विचारांच्या ब्रह्मघोटाळ्यांत पाडिलें. तिच्याकडे दोष नाहीं, तर काय माझ्याकडे आहे ? तो कसा ? माझ्याकडे दोष नाहीं तर तिला लोक नांवें ठेवतील असें काम मीं का सांगितलें ? अशीं एक कीं दोन ? किती तरी तर्कटें माझ्या मनांत चाललीं होतीं ! जिच्यावर दुर्दशेचा घाला येऊन पडतो तीच त्या दुर्दशेंतून पार पडण्यासाठीं असले कुतर्क करीत बसते. मीं हारणीला पुनः म्हटलें, 'यांत ग काय वावगें आहे ?'

हारणी—तुमच्या मनांत त्यांना भेटायचें आहे का ?

मी—हो.

हारणी—केव्हां ?

मी—रात्रीं सगळी मंडळी निजल्यावर.

हारणी—तुम्ही एकट्याच भेटीला जाणार ?

मी—हो.

हाराणी—तर मग माझ्या बापाच्यानें हें काम होणार नाहीं.

मीं म्हटलें 'वहिनीबाईनीं सांगितल्यावर मग तर करशील ?

हाराणी म्हणाली, 'तुम्हांला काय वेड लागलें आहे ? वहिनीबाई कुळशीळाच्या, या घराच्या गृहलक्ष्मी, पतिव्रता बाई आहेत. त्या काय असलें काम हातीं धरणार आहेत ?

मी:—त्यांनीं तुला मना केलें नाहीं म्हणजे झालें ना ? मग जाशील ?

हा०—जाईन. पण मला तुमचे हे रुपये नकोत. तुमची रकम तुम्ही संभाळा.

मी:—बरें तर, तुला फुरसत असेल तेव्हां हें काम जरूर कर.

मग मी डोळे पुसून सुभाषिणीला शोधायला गेल्यें. एकीकडेसच तिची गांठ पडली. मला पाहतांच तिची मुद्रा सकाळीं नुकत्याच उमललेल्या फुलाप्रमाणें प्रफुल्लित झालेली दिसली. सकाळीं पुष्पभारानें आच्छादिलेल्या लतेप्रमाणें किंवा चंद्रोदयाबरोबर उज्ज्वल होणाऱ्या नदीच्या प्रवाहाप्रमाणें तिचें सगळें अंग आनंदानें प्रफुल्लित झालें होतें. हंसून आणि माझ्या कानाजवळ तोंड नेऊन तिनें विचारलें, 'कसें काय ? पुरतें ओळखलें ना ?'

मला आकाशांतून पडल्यासारखें झालें. मीं म्हटलें, 'कोणाला ओळखलें ? कोण ते ? मीं ओळखलें कीं नाहीं तें तुम्हांला कसें समजलें ?

सुभाषिणी तोंड फिरवून म्हणाली, 'तुझा सोन्याचा चांदोबा आपण होऊन तुझ्या हातांत आला असें का तूं समजतेस ? आकाशांत जाऊन जाळें टाकण्याची विद्या मला येत आहे. त्या विद्येनें तर तुझा चांदोबा पकडून मला आणितां आला.'

मीं म्हटलें, 'तुम्ही म्हणजे कोण ? रे—बाबू सुद्धां ?'

सुभा:—नाहीं तर दुसरें कोण समजलीस ? तूं आपले यजमान व मामंजी यांचीं नांवें व गांवाचें नांव सांगितलें होतेंस त्याचें तुला स्मरण आहे ? तीं नांवें ऐकूनच तिकडून ओळखणें झालें. तुझ्या उ—बाबूचा एक मोठा मुकद्दमा इकडच्या हातांत आहे. त्या निमित्तानें तुझ्या उ—बाबूला कलकत्याला येण्याविषयीं इकडून लिहून गेलें. त्यानंतर कालचें जेवायचें निमंत्रण.

मीः—त्यानंतरच मध्यें हात घालून म्हातारीच्या हातांतलें वरणाचें भांडें पांडलें. होय ना ?

सुभाः—हो. तें सुद्धां आमचेंच कारस्थान होतें.

मीः—मग माझी कांहीं ओळख दिली कीं काय ?

सुभाः—वाः ! मग सर्वनाशच म्हणावयाचा ! ती कशी देतां येईल ? तुला चोरांनीं कसें पकडून नेलें व मग तूं कोठें गेलीस? ती सगळी हकीकत इकडे कोठें अजून ठाऊक झाली आहे ? तुझी नक्की ओळख पटली कीं लागलीच तुला ते थोडेच घरीं नेणार आहेत ? पण तुझ्या कामाला गति तर देऊन ठेविली ? इकडून तुला असें सांगणं आहे कीं येथपर्यंत आम्हीं मजल आणिली आहे. आतां पुढचें तू आपली पहा.

मी—मी एकदां नशीबाची परीक्षा पाहणार आहें. माझें कार्य न सांधलें तर मी जीव देईन. माझी भेटच न घेतली तर काय करायचें ? हा आतां माझ्यापुढें प्रश्न आहे.

सुभा०—तूं त्यांची कोठें व केव्हां भेट घेणार ?

मी—तुम्ही दोघांनीं माझ्यासाठीं इतके श्रम घेतले तसें याहि कामांत मला तुमचें साह्य पाहिजे आहे. तिकडच्या मुक्कामाच्या जागीं जाऊन भेट घेतां येणार नाहीं. मला तेथें कोण नेणार ? आणि कोण भेट करविणार ? पण येथें ती होऊं शकेल.

सुभा०—केव्हां ?

मी०— रात्रीं सगळी मंडळी निजल्यावर.

सुभा०—अभिसारिकेसारखी तूं जाणार ?

मी०—दुसरा काय उपाय आहे ? आणि तसें जायला मला कोणती हरकत आहे ? ते माझे पतिच आहेत.

सुभा०—हरकत कांहीं नाहीं. पण तसें करायला त्यांना रात्रीं येथें अडकवून ठेविलें पाहिजे. ते उतरले आहेत ती जागा येथून जवळच आहे.

म्हणून हें कसें काय जुळेल याची शंका वाटते. बरें, एकदां तिकडची गांठ घेऊन पाहाल्यें.

सुबीने रमणबाबूला बोलावणें पाठविलें. त्यांच्याशीं तिचें जें काय बोलणें झालें तेंहि तिने येऊन मला सांगितलें. ती म्हणाली, 'तिकडे जें कांहीं करतां येण्यासारखे आहे ते येवढेंच कीं, मुकद्दम्याचे कागदपत्र त्यांनीं आतांच पाहायचे नाहींत. कांहीं तरी सबब सांगून तें काम तसेंच तूर्त ठेवायचें. कागदपत्रें रात्रीं पाहूं असें ठरवायचें आणि त्यासाठीं तुमच्या यजमानाला येथेंच बोलावून घ्यावयाचें. कागदपत्र पाहतां पाहतां बरीच रात्र करावयाची. अर्थात् रात्रीं फराळालाहि आग्रहानें ठेवून घ्यावयाचें. इतकें केले म्हणजे आमचे काम संपलें. मग तुम्ही जी काय करामत असेल ती दाखीव. तुम्ही रात्रीं येथेंच राहा असा आग्रह आम्हांला कसा करतां येईल?'

मीं म्हटले, 'तो आग्रह करण्याचें तुम्हांला कारण पडणार नाही. तें काम मीच करीन. जेणें करून माझा आग्रह मोडवणार नाहीं असें करीन. एकदां दोनदां आमची नजरानजर झालीच आहे. तिकडचा स्वभाव जरा विचित्र आहे. तिकडे आग्रहाचा संदेश तरी कसा पाठवावयाचा? कागदावर दोन ओळी लिहून देईं तेवढा कागद कोणाच्या तरी हातीं तिकडे पोंचता केला म्हणजे झालें.

सुभा०—चाकराच्या हातीं पाठवूं नकोस.

मी—जन्मजन्मांतरीचे माझे ते पति नसते, तर प्राण गेल्यानें परपुरुषाशीं असा व्यवहार मीं केला नसता.

सुभा०—तेंहि खरेंच. बरें, एखाद्या नोकरणीच्या हातीं पाठविला तर?

मी—अशी कोण आपल्या विश्वासाची आहे ! नसता बभ्रा व्हावयाचा आणि केलेलें सगळें फुकट जायचें !

सुभा०—हाराणी आहे भरंवशाची.

मी—मी तिच्या जवळ ही गोष्ट काढली होती. भरंवशाची म्हणूनच ती फार नाराज झाली ! तुमच्या सांगण्यानें कदाचित् ती जाईल. पण अशी गोष्ट करण्याबद्दल तुम्हांला तरी तिला कसें सांगतां येईल ! छे: !

तुम्हांला या भानगडींत घालायला नको. मी एकटी मेल्यें तर हरकत नाहीं. जळले मेले हे डोळे ! नेहमीं पाण्यानें भरून येतात !

सुभा०---हाराणी माझ्यासंबंधानें कांहीं म्हणाली काय ?

मी---तुमच्या कडून हरकत नसली तर करीन म्हणाली आहे.

सुभाषिणी क्षणभर विचारांत पडली. मग ती म्हणाली, ' संध्याकाळ-नंतर या कामासाठीं तिला येण्याला सांग.'

प्रकरण तेरावें.

मला परीक्षा द्यावी लागली.

संध्याकाळच्या वेळीं माझे यजमान कागदपत्र घेऊन रमणबाबूंकडे आले. ही खबर मला कळली तेव्हां मी पुनः एकदां हाराणीच्या हाता-पायां पडल्यें. तिची आपली एक गोष्ट--' वहिनीबाईकडून हरकत नसली तर करीन. मग मी समजेन कीं यांत वाईटसाईट असें कांहीं नाहीं. ' मीं म्हटलें, ' तुझ्यानें होईल तें कर. ' इकडे माझ्या मनांत अग्नीची ज्वाळा पेटली होती.

येवढें इंगित समजल्यावरुन ती हंसत हंसत सुभाषिणीकडे गेली. मी तिच्या येण्याची वाटच पाहत होत्यें. हाराणी हंसत हंसत व मोकळे सुटलेले केस सावरीत सावरीत त्वरेनें आली. मीं विचारलें, ' येवढें हंसूं कशाचें येत आहे ? '

हाराणी---अशा ठिकाणीं कां कोणी दुसऱ्या माणसाला पाठवीत असतें ? माझा आतां जीवच जात होता.

मी---तो कसा ?

हाराणी---मला ठाऊक आहे कीं वहिनीबाईच्या खोलींत केरसुणी नसते. म्हणून रोजच्यासारखी मीं केरसुणी घेऊन गेल्यें आणि खोली झाडून आल्ये. पण आज पाहाल्यें तों त्यांच्या हातांत केरसुणी ! ' मी जाऊं का ?'

म्हणून मीं विचारलें मात्र. इतक्यांत त्याच केरसुणीचा तडाखा माझ्या पाठींत बसला. माझें भाग्य म्हणून मला पळून येतां तरी आलें. नाहीं तर केरसुणीच्या माराखालीं माझा गरीबाचा प्राणच जायचा! पहा हा माझ्या पाठीवरचा वळ मी खोटें बोलत असेन तर!

हाराणीनें हंसत हंसत मला आपली पाठ दाखविली. सगळी खोटी गोष्ट. वळ मुळींच नव्हता. तेव्हां ती म्हणाली, 'आतां काय करूं? बोला. करून येत्यें.'

मी०:—केरसुणीचा तडाखा खाल्ला तरी जाण्याची गोष्ट आहेच का?

हाराणीः—केरसुणीचा मार मिळाला. पण मना तर केलें नाहीं? मीं म्हटलें तुमच्याकडून हरकत नसली तर जात्यें.

मीः—केरसुणीचा मार ही हरकत नव्हे काय?

हाराणीः—हें पहा बाई! वहिनीबाईनीं मारायला केरसुणी उगारली तेव्हां त्यांच्या ओंठावर हंसूं झळकलेलें मीं पाहिलें. आतां काय करायचें बोला.

मग मी कागदाच्या एका तुकड्यावर पुढील मजकूर लिहिला—"मीं आपणास मन व प्राण अर्पण केले आहेत. आपण त्यांचा स्वीकार करणार ना? जर करणार असलां तर आज रात्रीं याच घरांत निजण्याचें करावें. खोलीचें दार उघडें ठेवावें—तीच स्वैंपाकीण."

पत्र लिहिलें. पण लज्जेनें मी इतकी व्याकुळ झाल्यें कीं, वाटे कीं तळ्यांत जाऊन जीव द्यावा, निदान अंधेरांत लपून तरी बसावें. पण काय करणार? ब्रह्मदेवानें माझ्या कपाळीं लिहिलें तें खरें. मला वाटतें कीं, इतकी दुर्दशा त्यानें दुसऱ्या कोणाहि कुलवान् स्त्रीच्या कपाळीं लिहिली नसेल.

कागदाच्या घड्या घालून मी तो हाराणीजवळ दिला, आणि म्हटलें, 'जरा थांब.' सुभाषिणीकडे जाऊन तिला मीं म्हटलें 'एकदां बाबूसाहेबांना बोलवा. एक गोष्ट बोलायची आहे.' सुभाषिणीनें तसें बोलावणें पाठविलें. रमणबाबू उठून आले. तेव्हां मीं हाराणीला म्हटलें कीं तूं आतां जा ती गेली. थोड्या वेळानें तिनें चिठ्ठीचा जबाबहि आणिला. कागदाच्या एका

कोपऱ्यांत ' बरें आहे ' असे शब्द लिहिले होते. मी हाराणीला म्हटलें ' तूं येवढें काम केलेंस तसें आणखी एक काम कर. दोनप्रहर रात्रीं मला त्यांची निजण्याची जागा दाखवायला ये.'

हाराणीः—त्यांत कांहीं वाईट नसलें तर येईन.

मीः—कांहीं वाईट नाहीं. ते मागच्या जन्मीं माझे यजमान होते.

हाराणीः—मागच्या जन्मीं कीं या जन्मीं तें मला नीट कळत नाहीं.

मीं हंसून म्हटलें, 'गप्प बैस.'

हाराणी हंसून म्हणाली 'जर या जन्मींचे असले तर पांचशें रुपये बक्षीस पाहिजे. त्याशिवाय माझ्या पाठीवरचा घाव बरा व्हावयाचा नाहीं.'

मी सुभाषिणीकडे जाऊन हा सगळा संवाद तिला सांगितला. तिनें सासूबाईंना जाऊन सांगितलें कीं आज कुमुदिनीला बरें नाहीं. ती स्वैंपाक करणार नाहीं. काकूंनाच स्वैंपाकाला लावावें.

काकूबाई स्वैंपाकाला लागल्या. सुभाषिणी मला आपल्या खोलींत घेऊन गेली आणि खोलीचें दार लावून घेतलें. मीं विचारलें ' अशी कैद कशासाठीं ?' ती म्हणाली 'कशासाठीं ? तुला शृंगारावयाचें आहे यासाठीं.'

मग तिनें माझें तोंड स्वच्छ धुऊन पुसलें. केसांना सुगंधी तेल लाविलें. वेणी घातली. सुबी म्हणाली, ' आज वेणी घालावयाची फी पांचशें रुपये बरें का ? योग्य वेळीं पांचशें रुपये पाठवून दे.' मग आपल्या बासनांतलें एक उंची लुगडें काढून तें मला तिनें बळेंच नेसविलें. आपले दागिनेहि माझ्या अंगावर ती घालूं लागली. मी म्हटलें 'मला ते नकोत.' त्यासाठीं पुष्कळ वाद झाला. मीं तिचें ऐकलें नाहीं. तेव्हां ती म्हणाली, ' तुझ्यासाठीं एक नवा पोषाख आणिला आहे. तो तर घालशील ?' असें म्हणून तिनें फुलांचा पोषाख माझ्या अंगावर चढविला, गळ्यांत हार घातला, आणि सोन्याच्या इयरिंगची एक नवी जोडी काढून मला म्हणाली, ' र—बाबूंनीं तुला देण्यासाठीं ही मुद्दाम विकत आणिली आहे. तूं कोठेंहि गेलीस तरी ही जोंपर्यंत तुझ्या कानांत राहील तोंपर्यंत आमची आठवण तुला राहील. कोणी बाई नेम सांगावा ? तुझी पुनः भेट होते कीं नाहीं ? परमेश्वर करो

आणि ती न होवो. ही आतांच तुला देत आहें. हिला तरी नाहीं म्हणूं नकोस.'

हे शब्द बोलत असतांना सुभाषिणीचा कंठ भरून आला होता. माझेहि डोळे पाण्यानें भरून आले होते. ' नको' हा शब्द माझ्या तोंडून निघेना. सुवीनें माझ्या कानांत इयरिंग घातलें.

सगळा शृंगार आटोपल्यावर सुभाषिणीच्या मुलाला मांडीवर घेऊन कांहीं वेळ मी त्याच्याशीं बोलत बसल्यें. थोड्या वेळानें तो झोपीं गेला. नंतर एक दुःखाची गोष्ट माझ्या मनांत आली. ती सुभाषिणीला सांगितल्या-वांचून माझ्याच्यानें राहवलें नाहीं. मी म्हणाल्यें, 'मला आनंद झाला आहे खरा; पण मधून मधून तिकडच्या विषयीं शंकाहि मनाला वाटते. तेच माझे पति हें मीं पक्कें ओळखलें आहे. म्हणून मीं जें कांहीं केलें आहे त्यांत माझ्या दृष्टीनें कांहीं गैर नाहीं. पण त्यांनीं मला ओळखलें आहे असें म्हणण्याला कांहीं आधार दिसत नाहीं. मला त्यांचें शेवटचें दर्शन घडलें तेव्हां ते चांगले वयांत आलेले होते. तरी पण मला थोडीशी शंका आली. ती ही कीं मीं अकरा वर्षांची मुलगी असतांना त्यांनीं मला पाहिलेलें आहे. तेव्हां त्यांनीं मला ओळखले असण्याचा फारसा संभव नाहीं आणि तसें कांहीं लक्षण आज दिसलेहि नाहीं. त्यांच्या दृष्टीनें मी परस्त्रीच. असें असून त्यांना माझ्या प्रेमपाशांत पडण्याचा मोह उत्पन्न झाला हें पाहून त्यांच्याविषयीं मन कलुषित होतें. पण ते यजमान, मी त्यांची पत्नी—त्यांना नांवें ठेवणें मला योग्य नाहीं, हें जाणून मी गप्प बसल्यें. मनांत विचार केला कीं योग्य संधि मिळतांच मी तिकडचा हा स्वभाव बदलायला लावीन.'

सुभा०—अग! आपण मुलींनीं कशाला पुरुषांची बरोबरी करायला पहावे?

मी—कां बरें?

सुभा०—स्त्री आणि पुरुष यांचा दर्जा सारखा असें तुला वाटतें ना? तर मग तूं कमिसारियटमध्यें जाऊन पैसे मिळवून आण पाहूं!

मी—पुरुषांनीं मूल पोटांत वागवावें, आणि बाळंत व्हावें. मग मीहि पहा कमिसारियटमध्यें जाऊन पैसे आणित्यें कीं नाहीं तें! ज्याला जें

साध्य असेल तें तो करतो. पुरुषांना इंद्रियदमन करणें इतकें कठीण कां वाटतें ?

सुभा०—बरं बाई ! अगोदर आपल्या घरीं जा, आणि मग सुखानें घराला आग लावा. बरें पण हें राहूं दे. अगोदर तूं त्यांच्या मनाला कसा मोह पाडशील त्याची परीक्षा दे. त्याशिवाय तुला दुसरा उपाय नाहीं.

मी अंमळ विचार करून म्हटलें ' मी ती विद्या शिकल्यें आहें कोठें?

सुभा०—माझ्याजवळ शिक आतां. मी या विद्येंत पक्की निष्णात आहे हें आहे ना तुला ठाऊक ?

मी—तें मी पाहात्येंच,

सुभा०—तर मग शीक माझ्यापाशीं. घटकाभर कल्पना कर कीं तूं पुरुष आहेस. आतां मी तुझें मन कसें भुलवित्यें पहा.

असें बोलून सुभीनें डोक्यावरून तोंडावर पदर ओढिला. आपल्या हातानें लाविलेला सुगंधि, त्रयोदशगुणी, उत्तम पिकलेल्या पानांचा, गोविंद-विडा जाऊन आणिला. त्या विड्याचीं पानें इतकीं उत्तम होतीं कीं, तीं सुभाषिणी खास आपल्या पतिराजासाठींच राखून ठेवीत असे; स्वतः सुद्धां कधीं खात नसे. रमणबाबूसाठीं ती स्वतः हुक्का तयार करून देई. तसा तिनें आतां माझ्यासाठीं आणिला. त्याची नळी माझ्या हातीं दिली आणि विस्तव फुंकूं लागली. मग फुलांचा गुच्छ माझ्या हातांत देऊन स्वतः हातांत पंखा घेऊन सुभी मला वारा घालूं लागली. तिच्या हातांतल्या बांगड्यांतून मंजुळ मधुर नाद निघूं लागला.

मीं म्हटलें, 'ताई ! इतकी सेवाचाकरी ! मी त्या विद्येंत बरीच निष्णात झाल्यें आहें; त्याचा परिचय तिकडे करून द्यावा म्हणून कां आज आग्रह करून रात्रीं येथें ठेवून घेतलें आहे ?

सुभा०—आपण स्त्रिया दासी नव्हत तर कोण आहों ?

मीः—जेव्हां तिकडच्या मनांत प्रेमाचा उद्भव होईल तेव्हां दासीपणा शोभेल. तेव्हां पाय चेपीन, वारा घालीन, विडा लावून देईन, हुक्का तयार करून देईन, सगळें कांहीं करीन.

मग सुभाषिणी हंसत हंसत माझ्याजवळ येऊन बसली व माझा हात आपल्या हातांत घेऊन गोडगोड गोष्टी करूं लागली. प्रथम हंसत हंसत, विडा खात खात, आणि कानांतल्या बाळ्यांना झोके देत देत, तिनें जें सोंग सजविलें होतें त्याला अनुरूप असें भाषण ती करूं लागली. भाषणाच्या ओघांत ती आमच्यांतला संबंध विसरली आणि मैत्रिणीसारखी वागूं लागली. तिच्या डोळ्यांत एक अश्रु चमकूं लागला. तेव्हां तिचें मन प्रफुल्लित करण्यासाठीं मी म्हणाल्यें, 'तुम्हीं जी आतां मला शिकविली ती स्त्रियांची अस्त्रविद्या आहे खरी; पण तिकडच्या मनावर त्या अस्त्राचा परिणाम होईल तेव्हां खरें म्हणायचें.'

सुभा०—तसाच प्रसंग आला तर आपल्या ब्रह्मास्त्राचा प्रयोग करावा. तो प्रयोगहि तूं शिकून घेईनास ?

इतकें बोलून तिनें माझ्या गळ्याभोंवतीं आपला हात घातला आणि माझें मुख किंचित् वर करून माझें चुंबन घेतलें. तेव्हां माझ्या डोळ्यांतून एक टीप गळून गालावर पडलें. प्रेमाचा उमाळा कंठापर्यंत आला होता. तो गिळून टाकून आणि डोळे पुसून मीं म्हटलें, 'ताई ! संकल्प न सांगतां दक्षिणा तेवढी द्यायला सांगत्येस काय ?'

सुभा०—एरव्हीं तुला ती विद्या यायची नाहीं. येते काय ? देतेस परीक्षा ? मी होत्यें उ-बाबू–

इतकें बोलून ती कोचावर नीटनेटकी बसली. तिला हंसू आवरेना. तेव्हां तिनें तोंडाला पदर लाविला. हंसणें थांबल्यावर तिनें एकदां माझ्या तोंडाकडे चमत्कारिक दृष्टीनें पाहिलें. तेव्हां तिचें तिलाच खूप हंसू लोटलें. पुनः तिनें तें दाबलें आणि मला म्हटलें, 'देत्येस परीक्षा माझ्या-पुढें ?' तेव्हां माझ्या विद्येचा दाखला जो वाचकांना पुढें कळणारच आहे तो आतांच मीं सुबीला दिला. तिनें मला कोचापासून दूर ढकललें आणि म्हटलें, 'पापी, चांडाळणी, कोठून आलीस ?'

मीं म्हटलें, 'कां बरें ?'

सुभाषिणी म्हणाली, 'स्त्रीच्या हास्ययुक्त नेत्रकटाक्षापुढें पुरुषांचा काय टिकाव लागणार आहे ? ते मरून भुतें होतील भुतें!'

मीं विचारलें, 'झाल्यें कां मी प्ररीक्षेंत पास ?'

सुभा०—हो. छानदार पास झालीस. कमीसारियेटमधल्या एकशें-एकुणसत्तर पुरुषांत एकानें सुद्धां असा स्त्रीचा नेत्रकटाक्ष कधीं पाहिला नसेल. माणसाचें डोकें फिरूं लागतें, तेव्हां थोडेंसें बदामाचें तेल त्यावर चोळावें लागतें.

मी—बरें तर. आतां बाबूंची जेवण्याची वेळ झाली. त्यांची स्वारी इतक्यांत इकडे येईल. आतां मला येथून गेलेंच पाहिजे. तूं जें कांहीं आज मला शिकविलेंस त्यांतली एक गोष्ट मला फार गोड लागली. ती कोणती ? तर मुखचुंबन. दे, आणखी एकवार मला तो धडा दे.

तेव्हां सुभाषिणीनें माझा गळा धरला, व मीहि तिचा धरला. आम्हीं परस्परांना गाढ आलिंगन दिलें, चुंबन घेतलें, आणि दोघी रडूं लागलों. असें प्रेम कोठें दुसरीकडे दिसेल काय ? सुभाषिणीसारखी प्रेमळ स्त्री कोठें आढळेल काय ? मी तर मेल्यें तरी तिचे उपकार विसरणार नाहीं.

प्रकरण चौदावें.

माझी प्राणत्यागाची प्रतिज्ञा.

मी हाराणीला खबरदारीनें राहण्याविषयीं बजावून आपल्या निजण्याचे जागीं गेल्यें. बाबू वगैरे मंडळींचीं जेवणें उरकलीं होतीं. इतक्यांत एक गडबड झाली. कोणी पंखा मारूं लागले, कोणी औषध आणायला सांगूं लागले, कोणी डाक्तराला आणण्याविषयीं घाई करूं लागले, अशी मोठी गडबड उडाली होती. मी हाराणीला विचारलें, ' ही कसली ग येवढी गडबड चालली आहे ?

हा०—त्या पाहुण्याबाबूंना चक्कर आला आहे.

मी—मग?

हा०—आतां कांहीं बरे आहेत. पण आपल्या बिन्हाडीं जाण्याची हिंमत नाहीं म्हणून येथेंच पलीकडच्या खोलींत त्यांची निजण्याची व्यवस्था केली आहे.

मीं यांतलें वर्म ओळखलें, आणि म्हटलें, ' सगळे दिवे मालविले जातील तेव्हां झोप लागेल.'

हा०—पण शरीरपीडा आहे ना ?

मी०—शरीरपीडा कसली आली आहे ? तुझ्या डोंबल्याची ?

हाराणी हंसत हंसत चालती झाली. कांहीं वेळानें सगळे दिवे मालविले गेले. सगळी मंडळी निजली. हाराणी मला इष्ट स्थळीं पोंचवून परत गेली. मीं खोलींत प्रवेश केला. पाहिलें तर पाहुणे एकटेच निजले आहेत. आणि दुखणें बिखणें कांहीं नाहीं. खोलींत दोन मोठाले दिवे जळत होते. दिव्यांपेक्षां पाहुण्याच्या लावण्याचाच प्रकाश जास्त पडला होता. मीं कामशरांनें पीडित होऊन माझ्या अंगावर रोमांच उभे राहिले होते.

मी वयांत आल्यानंतरच्या काळांत पतीशीं संभाषण करण्याचा हा पहिलाच प्रसंग होता. मला त्या वेळीं जें कांहीं सुख वाटलें तें अगदीं अवर्णनीय ! एरव्हीं मी फार बोलकी आहें; पण तिकडच्यांशीं बोलायला मीं सुरवात केली तेव्हां माझ्या तोंडून शब्दच फुटेना. माझा कंठ दाटून आला, आणि सगळें अंग थरथरां कांपूं लागलें. छाती धडधडा धडाडूं लागली, तोंडाला कोरड पडली, आणि बोलायच्या ऐवजीं मी रडूं लागल्यें.

माझ्या रडण्याचें कारण तिकडे कळलें नाहीं. मला म्हटलें, 'कां रडतां? मीं कांहीं तुम्हांला बोलाविलें नाहीं. तुम्ही आपण होऊनच आलांत. मग रडण्याचें कारण काय ? '

या कठोर वाक्यानें मला मर्मांतिक वेदना झाल्या. मी कुलटा आहें अशी तिकडची समजूत झालेली पाहून माझ्या डोळ्यांतून अश्रूंचा अधिकच पूर लोटला. एकदां मनाला वाटलें, आपण कोण आहों तें सांगून ओळख पटवावी म्हणजे हृदयाच्या यातना तरी सहन कराव्या लागणार नाहींत? पण तिकडूनहि मनाला वाटलें कीं, मीं ओळख दिली आणि माझ्या शब्दावर

इकडचा विश्वास बसला नाहीं; किंवा मी कालादिघीची राहणारी, तेव्हां आपल्या स्त्रीला चोरांनीं नेल्याची हकीकत कर्णोपकर्णीं हिला कळली असेलच आणि आपल्या संपत्तीच्या व वैभवाच्या लोभानें मीच तुमची स्त्री असें खोटेंच ही सांगत आहे असें मनानें घेतलें, तर पुढें काय ? म्हणून मीं आपली ओळख दिली नाहीं. एक दीर्घ निश्वास टाकून आणि डोळ्यांचें पाणी पुसून तिकडच्यांशीं भाषण करूं लागल्यें. इकडच्या तिकडच्या गोष्टी झाल्यावर मला म्हटलें, ' कालादिघीसारख्या ठिकाणीं असें सौंदर्य निर्माण होतें हें मला ठाऊक नव्हतें. '

माझी दृष्टि तिकडच्या डोळ्यांकडे होती. तिकडून माझ्याकडे मोठ्या विस्मयानें पहाणें चाललें होतें.

तिकडच्या भाषणाला उत्तर म्हणून मी नटत मुरडत म्हणाल्यें, ' माझें कसलें आलें आहे रूप ? आमच्या त्या प्रांतांत आपल्या स्त्रीसारखी रूपवान् स्त्री झाली नाहीं.' या निमित्तानें तिकडच्या कानावर स्त्रीच्या संबंधानें मुद्दाम दोन शब्द मीं घातले, आणि विचारलें 'आपल्या कुटुंबाचा कांहीं तपास लागला काय ?'

उत्तर---नाहीं. तुम्हांला देश सोडून इकडे आल्याला किती दिवस झाले?

मी---तो प्रकार घडल्यावर लवकरच मी तेथून निघाल्यें. आपण पुनः लग्न केलें असेलच ?

उत्तर---नाहीं.

नंतर पुष्कळ गोष्टी झाल्या. मी प्रश्नांवर प्रश्न विचारले. उत्तरें देण्याला अवसरच दिला नाहीं. मी अभिसारिका होऊन आल्यें होतें. पण तिकडून आदराचे चार शब्द तोंडांतून काढायलासुद्धां मीं संधी दिली नाहीं. तिकडून विस्मयाच्या दृष्टीनें माझ्याकडे पहाणें झालें.

पुनः लग्न केलें नाहीं आणि सवत घरांत आणिली नाहीं हें ऐकून मला आनंद झाला. मीं म्हटलें, ' आपण बडे लोक ! अर्थात् पुनः लग्न करावें कीं नाहीं याचाहि मोठाच विचार येऊन पडला असेल. आपण जर मनांत आणिलें असतें तर मुलीला काय तोटा होता ? एक सोडून दोन

लग्नें करतां आलीं असतीं, आणि मग पहिलीचा शोध लागून त्या असल्या वर घरांत उगाच भांडणें लागलीं असतीं.'

किंचित् हंसून उत्तर आलें, 'तें भय आतां उरलें नाहीं. आतां जरी शोध लागला तरी घरांत घेण्याचें नांव नको. आतां कसली आली आहे तिला जात आणि पात ? आणि जातीबद्दलच्या भानगडी कोण करीत बसला आहे!'

हें ऐकून शिरावर प्रचंड वज्राघात झाल्यासारखें मला झालें. माझ्या सगळ्या आशा एकदम नष्ट झाल्या. समजा, माझी ओळख पटली असती तरी माझा स्वीकार केला गेला नसता, आणि माझा सारा जन्म फुकट गेला असता.

मीं अवसान आणून म्हटलें, ' जर आतां आपली व त्यांची गांठ पडली तर आपण काय कराल ? '

उत्तर—दुसरें काय करणार ! त्याग करीन.

किती निर्दयपणा हा ! मी तर तो पाहून अगदीं कुंठित झाल्यें. माझ्या डोळ्यांपुढें चक्कर येऊं लागले.

त्याच रात्रीं मी आपल्या पतिराजांच्या शय्येवर बसून आणि त्यांच्या मोहनमूर्तीकडे पाहून प्रतिज्ञा केली कीं, इकडून धर्मपत्नी म्हणून माझा अंगीकार झाला नाहीं तर आपण प्राणत्याग करायचा.

प्रकरण पंधरावें

घराच्या बाहेर.

मग चिंतित मुद्रेनें माझ्यापासुन दूर व्हावयाचें झालें. स्वारी आता मला वश झाली हें मीं पूर्वींच सूचित केलें आहे. मीं म्हटलें '.गेंड्याच्या खड्गप्रहारांत जर पाप नाहीं, हत्तींच्या दंतप्रयोगांत, वाघांच्या नखव्यापारांत, किंवा रेड्याच्या शृंगाघातांत जर पाप नाहीं, तर मलाहि पाप लागणार

नाहीं.कारण परमेश्वरानें स्त्रीजातीला जीं आयुधें दिलीं आहेत तीं उभयतांच्या मंगलसाधनासाठींच आहेत आणि त्यांचा उपयोग मीं मंगलसाधनासाठींच करीन. मीहि तिकडच्यापासून जरा दूरच बसल्यें, आणि प्रफुल्लित चित्तानें त्यांच्याशीं गोष्टी करूं लागल्यें. मग तिकडून हळूहळू सरकत सरकत माझ्याकडे येणें झालें. मीं म्हटलें, 'माझ्याजवळ यायला नको. मीं समजलें. आपणाला कांहीं भ्रम झाला आहे. (मीं हें हंसत हंसत म्हटलें आणि बोलत असतांना वेणी सोडून ती पुन: बांधीत बसल्यें.) मी सांगत्यें काय भ्रम झाला आहे तो. पण ध्यानांत ठेवा. मी कुलटा नाहीं. आपल्या तोंडून देशाकडची कांहीं खबर ऐकावयाला मिळेल म्हणून आल्यें आहें. दुसरा कांहीं वाईट हेतु नाहीं.'

तिकडचा माझ्या शब्दावर विश्वास बसला असें दिसलें. मग मीं हंसत हसत म्हटलें, 'आपण माझी गोष्ट ऐकून घेतली नाहीं, तेव्हां ही मी चालल्यें. हीच आपली शेवटची भेट.' याप्रमाणें बोलून मी जाण्याची इच्छा दर्शविली आणि तें करतां करतां माझ्या कोमल व सुवासित केशकलापाला झटका देऊन त्यांचा स्पर्श तिकडे होईल असें मोठ्या युक्तीनें केलें. ज्याप्रमाणें वसंतऋतूंत संध्याकाळच्या वेळीं शीतलसुगंध वायूनें लतेच्या पानाला किंचित हलवावें, त्याप्रमाणें करून मी उठल्यें.

मी खरोखरच जाण्यासाठीं उठलेली पाहून तिकडचें मन खिन्न झालें, आणि पुढें होऊन माझा हात धरण्यांत आला. हात धरून राखून विस्मित मुद्रेनें त्या हाताकडेच नजर लावण्यांत आली. मीं म्हटलें, 'काय पाहावें आहे?' तिकडून उत्तर मिळालें, 'हातांत काय आहे? फूल! फुलाची येवढी प्रतिष्ठा ऑं? फुलापेक्षां मनुष्य अधिक सुंदर नाहीं काय? फुलापेक्षां त्याच्यांत कितीतरी अधिक सौंदर्य आहे! हें मीं आताच प्रथम पाहिलें.' मी रागाचा आविर्भाव दाखवून हातांतून हात सोडवून घेतला, पण हंसून म्हटलें, 'आपण फार भले माणूस दिसतां! मला स्पर्श करूं नका. मला दुराचारी स्त्री समजलांत वाटतें?'

इतकें म्हणून मी दाराकडे जाण्यासाठीं पुढें पाऊल टाकिलें. पतीनीं—अजून त्या गोष्टीची आठवण झाली कीं मनाला दुःख होतें—हात जोडून

आणि विनवणी करून म्हटलें, ' पहा. माझ्या शब्दाचा मान राखा; जाऊं नका; तुमचें रूप पाहून मी मोहित झालों आहें. असें रूप मी आजपर्यंत कधीं पाहिलें नव्हतें. आज पाहिलें. पुनःहि कधीं पाहायला मिळणार नाही.'

मी परत फिरल्यें, पण बसल्यें नाहीं. मी म्हटले, ' प्राणप्रिया ! मी कोणत्या झाडाचा पाला आहें ? आपल्यासारख्या रत्नाचा त्याग करून मला जावें लागतें आहे याचेंच मला दुःख वाटतें. पण काय करणार ? धर्म हेंच माझें एकटें धन आहे. एका दिवसाच्या सुखासाठीं मी वेडी अविचारानें आपल्याकडे आल्यें. कांहीं विचार न करतां अपणास मी पत्र लिहिलें ही गोष्ट खरी; पण माझा अधःपात केव्हांहि झालेला नाहीं. येथेंहि माझ्या रक्षणाचा मार्ग मला खुला आहे. माझें भाग्य कीं आतां तरी योग्य सुविचार मला सुचला. मी चालल्यें. '

तिकडून म्हटलें, ' तुमचा धर्म तुम्ही पाहून घ्या. तुम्ही माझी अशी अवस्था करून टाकिली आहे कीं, आतां मला धर्माधर्मांचें ज्ञान बिलकुल राहिलेलें नाहीं. मी तुम्हांला शपथ घेऊन सांगतों कीं,तुम्ही चिरकाल माझ्या हृदयाची धनीण होऊन राहाल. एकाच दिवसासाठीं असे समजूं नका.'

मीं हंसून म्हटलें, ' पुरुषांच्या शब्दांचा काय बाई विश्वास धरावा ? एका घटकाभरच्या भेटींत कां इतका पालट होणार आहे ?' इतकें बोलून मी पुनः जाऊं लागल्यें. दारापर्यंत जाऊन पोंचल्यें. आतां तिकडे बिलकूल धीर राहिला नाहीं. तिकडून माझे पा[illegible] धरणें झालें आणि माझ्या वाटेंत आडवें पडायचें झालें. दीर्घ सुस्कारा सोडला.• तिकडची ही स्थिति पाहून मला फार दुःख झालें. मीं म्हटलें, ' तर मग आपल्या बिऱ्हाडीं जाऊं या. येथें राहिलों तर आपण मला एखादे वेळीं सोडून जाल.'

तिकडून या गोष्टीला तत्काळ संमति मिळाली. बिऱ्हाड जवळच होतें. गाडीहि तयार होती. दारावरचे शिपाईहि निजलेले होते. मी ह[illegible] आवाज न होऊं देतां दार उघडलें आणि गाडींत जाऊन बसल्यें. तें बिऱ्हाड पाहिलें तर एक मोठी दोनमजली हवेली होती. मी एका खोलींत शिरल्यें. मी आंत जातांच बाहेरच्या दाराला आंतून कडी लाविली तिकडची स्वारी बाहेरच्या बाहेरच राहिली !

बाहेरून पुष्कळ काकुळतीच्या गोष्टी करण्यांत आल्या. मी हंसत हंसत म्हणाल्यें, ' मी आतां आपली दासी झाल्यें आहें. पण आपल्या प्रणयाचा आवेग उद्यां पहाटपर्यंत राहतो कां जातो तें पाहायचें आहे. जर उद्या तो कायम राहिलेला दिसला, तर आपल्याशी बोलेन. आज इतकेंच.'

मी दार उघडलें नाहीं. अर्थात् स्वारी दुसरीकडे कोठें निजायला गेली. ज्येष्ठांतला भयंकर उकाडा. तृषेनें अतिशय पीडित झालेल्या रोग्याला स्वच्छ शीतल जलाशयापाशीं बसवून त्याला पाणी पितां येऊं नये असें त्याचें तोंड बांधावें. म्हणजे पाण्याविषयींचा त्याच्या मनाचा ओढा ज्यास्तच वाढतो कीं नाहीं पहा.

बऱ्याच वेळानें मीं दार उघडलें. पाहिलें तर स्वारी दाराशींच येऊन उभी ! मीं आपल्या हातानें तिकडचा हात धरला आणि म्हटलें, ' प्राणनाथ ! मला आतां रामरामदत्ताच्या घरीं पोंचती केली तर ठीक आहे, नाहीं तर मी एक आठवडाभर अबोला ठेवीन. हा आठवडा आपल्या परीक्षेचाच. ' तिकडून ही गोष्ट कबूल करण्यांत आली.

प्रकरण सोळावें

खून करून फाशीं गेल्यें.

पुरुषाला दग्ध करून टाकण्यासाठीं जे कांहीं उपाय ईश्वरानें स्त्रीच्या हातांत ठेविले आहेत ते सगळे उपाय करून मीं आपल्या पतीला त्रास दिला. मी स्त्री—मी आपल्या तोंडानें स्पष्टपणानें ती गोष्ट कशी सांगूं ? आग कशी पेटवावी तें जर मला न कळतें तर त्या रात्रीं आग इतकी पेटली नसती. मी किती उसासे टाकिले, किती फूत्कार केले व कशाप्रकारें पतीचें हृदय दग्ध करून टाकिलें तें लज्जेमुळें येथें सांगत नाहीं. माझ्या स्त्रीवाचकांपैकीं कोणी नरहत्येचें व्रत घेतलें असेल आणि त्याची सफलता केली असेल तर तिलाच कांहीं समजेल. जर कोणी पुरुषवाचक कधीं अशा घातकी स्त्रीच्या तडाख्यांत सापडला असेल तर त्यालाहि तें कळेल

फार काय सांगूं ! स्त्रीजात म्हणजे या लोकींची कंटक होय. आमच्या स्त्रीजातीच्या हातून जगाचें जितकें अनिष्ट झालें आहे किंवा होण्यासारखें आहे, तितकें पुरुषजातीच्या हातून झालें नाहीं व होणारहि नाहीं. भाग्यच म्हटलें पाहिजे कीं ही नरघाताची विद्या सगळयाच स्त्रियांना ठाऊक नसते! नाहींतर पृथ्वी निर्मनुष्यच झाली असती.

या आठवडयांत मी नेहमीं पतींच्या अगदीं जवळ राहिलें. आदरपूर्वक त्यांच्याशीं बोलत असें; निरस गोष्टींचें नांव सुद्धां काढिलें नाहीं. हंसणें, मुरडणें, हावभाव करणें वगैरे इतर स्त्रियांचीं शस्त्रें आहेत. मी पहिल्या दिवशीं अदबीनें बोलल्यें, दुसरे दिवशीं प्रेमाचीं लक्षणें दाखविलीं, आणि तिसरे दिवशीं गृहिणीप्रमाणें सगळें कामकाज करूं लागल्यें. ज्यापासून आहारविहारांत, खाण्यापिण्यात, स्नानांत, सगळ्या गोष्टींत तिकडे सुख लागेल तें करण्याविषयीं विशेष दक्षता घेऊं लागल्यें. स्वैंपाक मी स्वतःच करीं. बारीक सारीक कामें सुद्धां सगळीं स्वतः करीं. तिकडे थोडें जरी असुख झालें तरी रात्रभर जागून मी तिकडची सेवा करी.

आपणाला हात जोडून माझी येवढीच विनंति आहे कीं, हा सगळा कृत्रिमपणा होता अशी मात्र समजूत करून घेऊं नका. या इंदिरेच्या मनाला एका गोष्टीचा मोठा अभिमान वाटतो; आणि ती गोष्ट ही कीं उदरभरणासाठीं किंवा पतीच्या धनानें आपणांस ऐश्वर्य प्राप्त होईल अशा लोभानें कृत्रिम प्रेम दाखविण्याची विद्या माझ्यापाशीं नाहीं. इंद्राच्या इंद्राणीचें पद मिळत असल तरी मी त्या मोहजालांत अडकणार नाहीं. पतीचें मन आकर्षून घेण्यासाठीं हंसणें, मुरडणें इ. गोष्टी मी करीन; पण कृत्रिमपणाचें प्रेम मला दाखवितां येत नाहीं. परमेश्वरानें माझी मूर्ती तशी घडविलीच नाहीं. ज्या अभागिनीला ही गोष्ट समजण्याइतकी बुद्धि देवानें दिली नसेल, नरकवास भोगण्यास पात्र अशी जी स्त्री मला म्हणेल कीं तुला हंसून, नटून, मुरडून, केस मोकळे सोडून आणि पुनः बांधून, किंवा बोलण्याच्या निमित्तानें आपल्या सुगंधित केशकलापाला झटका देऊन त्यांचा स्पर्श पुरुषाच्या छातीला होईल असें करण्याची विद्या तुला येते, पण पतीचे

पाय चेपणे, त्याला विडा लावून देणें, हुक्का तयार करून देणें इत्यादि प्रकारें त्यांची सेवा करण्याची विद्या मात्र येत नाहीं–जी हतभागी स्त्री मला असें म्हणेल त्या काळतोंडीन माझा हा जीवनवृत्तांत वाचूच नये.

स्त्री वाचकहो ! तुम्ही निरनिराळ्या प्रकृतीच्या–निरनिराळ्या स्वभावांच्या पुष्कळजणीं–आहां. पुरुषवाचकांची गोष्टच मी या वेळीं सोडून देत्यें. त्यांना या शास्त्रांतलें काय कळतें ?–तुम्हांला म्हणून मी खरी खरी अंदरकी बात सांगत्यें. हे माझे पात. यांची सेवा करणें हाच माझा खरा आनंद–तोहि कृत्रिम, दिखाऊ, नव्हे. अगदी खऱ्या खऱ्या अंतःकरणापासून मी त्यांची सेवा केली. मी मनांत म्हटलें की जर यांनीं माझा अंगीकार न केला तर मला पृथ्वीच्या पाठीवर कसलेंहि सुख लागायचें नाहीं. जे पूर्वीं कधीं प्राप्त झाले नाहींत, आणि कदाचित् पुढेंहि प्राप्त होणार नाहींत ते सुखोपभोग थोडे दिवस कां होईना यथेच्छ भोगून घ्यावे म्हणून मीं अगदीं जीव लावून पतिसेवा केली. त्यापासून कितीसें सुख मला लागलें ते तुमच्यापैकीं कांहीं जणींना समजेल, कांहीं जणींना समजणार नाहीं.

पुरुषवाचकहो ! कृपा करून माझ्या हंसण्या खेळण्यांतलें तत्त्व तेवढें ग्रहण करा. ज्याच्या बुद्धीला कॉलेजांतल्या परीक्षा पास होण्यानेंच आकाशाला हात पोहोंचल्यासारखें वाटतें, किंवा वकीलीच्या धंद्यांत दहा वीस रुपये कमावून आणिले म्हणजे मोठा दिग्विजय केला असें ज्याच्या बुद्धीला वाटतें, ज्यांच्या बुद्धीच्या अभावालाच राजदरबारीं मोठा सन्मान मिळतो, त्यांच्या बुद्धीच्या आंत पतिभक्तीचें तत्त्व प्रवेश करूं शकणार नाहीं. जे म्हणतात कीं विधवांचे पुनर्विवाह लावावे किंवा मुलींना शाळेंत शिकायला पाठवून पुरुषांप्रमाणे निरनिराळ्या शास्त्रांत त्या पंडिता होतील असें करावें, अशांना पतिभक्तीचें तत्त्व कसें कळणार ? येवढ्याचसाठीं हंसण्याखेळण्यांतलें तत्त्व तेवढें ग्रहण करा अशी मीं अगोदर त्यांना विनंति केली आहे. ज्याप्रमाणें माहूत अंकुशानें हत्तीला आपल्या कह्यांत ठेवितो; गाडीवान् चाबकानें घोड्याला ताब्यांत ठेवितो; गुराखी हातांतल्या काठीनें गुरांना धाकांत ठेवितो; किंवा इंग्रज डोळे रंगवून एतद्देशीय तरुणांना वश करून घेतो; त्याचप्रमाणें हंसून खेळून माझ्यासारखी स्त्री तुम्हांला वश करून घेते. पतिभक्ति हा

तर माझा मोठा गुण आहे. हंसणारी खेळणारी, उच्छृंखल अशा हलकट निंदाव्यंजक विशेषणांनीं कलंकित होण्याचा माझ्यासारखीला जो प्रसंग येतो तो सगळा तुमच्या दोषांमुळें.

तुम्ही म्हणाल, ' केवढी ही अहंमन्यता ! केवढा अहंकार !' होय. अहंकार आहे खरा, व या अहंकाराचें फळ मला हातोहात मिळालेंहि. जो निराकार आहे, ज्याला अंग नाहीं तरी जो धनुष्यबाण धरतो, व ज्याला आईबाप नाहींत पण स्त्री आहे,(जो आत्मयोनि आहे), व ज्याच्या फुलाच्या बाणानें पर्वत सुद्धां विदीर्ण होतात, तोच परमेश्वर स्त्रीजातीचा गर्व हरणारा आहे. मीं क्रीडाकौतुकाच्या पाशांत दुसऱ्याला पकडलें आणि त्याबरोबर स्वतःहि पकडल्यें गेल्यें. आग लावायला गेल्यें. अग्नीनें दुसऱ्याला जाळिलें आणि स्वतःहि जळून दग्ध झाल्यें. शिमग्यांत गुलाल खेळण्याप्रमाणें दुसऱ्याचें अंग लालभडक करायला गेल्यें तर स्वतःच अनुरागानें लाल झाल्यें. त्यांचें रूप—मनोहर रूप—त्याविषयीं मीं मागें सांगितलेंच आहे. असा जो लावण्याचा मूर्तिमंत पुतळा त्याची धणीण मीच. • त्यांच्याच सौभाग्यानें मी सौभाग्यवती, आणि त्याच्याच रूपानें मी रूपवती आहें. त्यानंतर हा वियोगाचा अग्नि पेटलेला. मला हंसण्याचें ज्ञान आहे पण हंसण्यावर कांहीं उतार आहे कीं नाहीं ? मला नेत्रकटाक्ष कसे टाकावे तें कळतें; पण कटाक्षावर प्रतिकटाक्ष टाकतां येत नाहींत काय ? माझा अधरोष्ठ चुंबनाच्या इच्छेनें दुरून फुरफुरतो. फुलाची कळी तिच्या पाकळ्या विकसित झाल्या म्हणजे उमलते. त्यांचा रक्तपुष्पतुल्य कोमळ अधरोष्ठ पाकळ्या फोडून उमलणाऱ्या पुष्पाप्रमाणें माझ्याकडे कां वळत नाहीं ? मी जर त्यांच्याबरोबर हंसल्यें असल्यें, त्याच्याकडे पाहिलें असतें, त्याच्या चुंबनाविषयींची माझ्या इंद्रियांची आकांक्षा प्रदर्शित केली असती, तर विजयी झाल्यें असत्यें. तें घडलें नाहीं. तें हास्य, ते नेत्रकटाक्ष, तें अधरोष्ठाचें स्फुरण, केवळ अपरिमित प्रेमाचें लक्षण होतें. म्हणूनच मला अपयश आलें. अपयश आल्यावर हेंच पृथ्वीचें सोळा आणे सुख म्हणून मी त्याचा स्वीकार केला. ज्या देवानें त्यांच्याशीं

माझा विवाहसंबंध घडवून आणिला, त्याचें स्वतःचें शरीर भस्मसात् झालें ही खूप मौज झाली म्हणायची !

परीक्षेचा काळ सरत आला. पण मी त्यांच्या प्रेमांत इतकी गुरफटून गेल्ये होत्ये कीं, परीक्षेचा काळ संपल्यावर त्यांनीं मारमारून हाकून दिलें तरी मी गेल्ये नसत्ये. अखेरीस मला ओळखल्यावर सुद्धां धर्मपत्नी म्हणून माझा स्वीकार त्यांनी न केला, आणि रखेलीप्रमाणे त्यांच्याजवळ राहावें लागलें, तरी राहिल्ये असत्य. आपले यजमान आपणास मिळाल्यावर लोकलज्जेची मा पर्वा करणारी नाहीं. पण तेंहि या भाग्यांत नसेल तर ? या भीतीमुळें वेळ मिळेल तेव्हा मी रडत बसें.

हेंहि मला कळलें कीं प्राणनाथाचा पक्षच्छेद झाला आहे. आतां उडून जाण्याची शक्ति त्यांच्या ठायीं नाहीं. त्यांच्या अनुरागाच्या होमांत घृताच्या आहुती पुष्कळच पडल्या आहेत. त्यांना आतां दुसरें कांहीं काम काज नसल्यामुळें ते एकसारखे मजकडे टक लावून पहात बसत. मी गृह कृत्यें करीत असें, तेव्हां लहान पोराप्रमाणें तेंहि माझ्या मागें मागें येत. त्यांच्या चित्ताचा दुर्दमनीय वेग पावलोपावलीं दिसून येत असे, आणि मी इषारा केला कीं थांबत असे. केव्हां केव्हां ते माझ्या चरणाला स्पर्श करून रडत बसत, आणि म्हणत कीं मी या आठवड्यांत तुझ्या म्हणण्याप्रमाणें वागेन, पण माझा त्याग करूं नकोस. शेवटीं मी पाहिलें कीं मी जर यांचा त्याग केला तर याची अवस्था अधिकच वाईट होईल. आठवडा संपल्यावर कांहीं न बोलतां आम्ही परस्परांच्या अधीन झालो. ते मला कुलटा समजत होते, तें मी सहन केलें. पण मला कांहींहि समजण्यांत आलें तरी हत्तीच्या पायात मी साखळदंड घातला ही गोष्ट मला कळून चुकली.

प्रकरण सतरावें.

अगोदर शिक्षा, मग चौकशी !

आम्ही कलकत्त्यांत कित्येक दिवस सुखानें व स्वच्छंदानें राहिलों. त्यानंतर पाहिलें कीं एके दिवशीं तिकडची स्वारी हातांत एक चिठ्ठी घेऊन खिन्न चित्तानें बसली होती. म्हणून असें बसण्याचें कारण मीं पुसलें. तेव्हां मला सांगण्यांत आलें कीं घरचें पत्र आलें आहे. घरीं जावें लागेल.

मीं विचारलें, 'कोणाला ? मला ?' मी धाडकन् भुईवर अंग टाकिलें. माझ्या डोळ्यांतून अश्रूंच्या धारा वाहूं लागल्या.

तिकडून माझा हात धरणें झालें. मला उचलून पोटाशीं धरलें, माझें चुंबन घेतलें, माझे डोळे पुसले आणि म्हटलें. 'मी त्याच विचारांत पडलों आहें. तुला सोडून मला जायचें नाहीं.'

मी——तेथें माझें नांव कोणीं विचारलें तर काय सांगणें होईल ? मला कसें व कोठें ठेवण्यांत येईल ?

ते——मी त्या सगळ्या गोष्टींचा विचार करीत आहें. आपलें गांव म्हणजे कांहीं मोठें शहर नाहीं कीं एखाद्या ठिकाणीं ठेविलें तर कोणाला कळणार नाहीं. आईच्या व बाबांच्या डोळ्यांदेखत तुला ठेवायचें कोठें !

मी——न गेलें तर नाहीं का चालण्यासारखें ?

ते——छेः छेः ! गेलें तर पाहिजेच.

मी——किती दिवसांनीं परत यायचें ? लवकरच यायचें असलें तर मला येथेंच राहूं द्यावें.

ते——लवकर येईनच असा भरंवसा देतां येत नाहीं. कलकत्त्याला मी कधीं काळीं येत असतों.

मी——आपल्याला जायचें असलें तर जावें. आपल्या मार्गांत माझी अडचण नको (हें बोलतांना मी खूप रडत होत्यें) माझ्या नशीबीं असेल तसें होईल.

ते——पण तूं दिसली नाहींस तर मी वेडा होईन ना ?

मी---हें पहा. मीं कांहीं आपली लग्नाची स्त्री नाहीं. (हें ऐकून तिकडे जरा दचकून उठणें झालें). आपल्यावर माझा कांहीं अधिकार नाहीं. आपण मला यावेळीं रजा—

तिकडे मला जास्त बोलूंच दिलें नाहीं. म्हटलें, ' अशी गोष्ट बोलण्याचें कारण नाहीं. आज विचार करून कांहीं तरी निश्चित ठरवितों. उद्यां काय तें सांगेन. '

सध्याकाळीं रमणबाबूला येऊन जाण्याविषयीं लिहिलें. चिठ्ठींत लिहिलें होतें कीं ' कांहीं गुप्त गोष्ट बोलायची आहे. येथें न आलांत तर बोलायची राहून जाईल.'

रमणबाबू आले. मी दाराच्या आड उभी राहून ऐकत होत्यें. यजमान म्हणाले, " आपल्या येथें स्वैंपाकासाठीं एक अल्पवयी मुलगी आहे तिचें नांव काय ?'

रमण०—कुमुदिनी.

उपेंद्र०—तिचें घरदार कोठें आहे ?

रमण०—कांहीं सांगतां येत नाहीं.

उपेंद्र०—ती सवाष्ण आहे कीं विधवा ?

रमण०—सवाष्ण.

उपेंद्र०—तिचा नवरा आपल्या ओळखीचा आहे काय ?

रमण०—हो.

उपेंद्र०—कोण ?

रमण०—आतांच मला सांगतां येत नाहीं.

उपेंद्र०—कां ? कांहीं गुप्त रहस्य आहे वाटतें ?

रमण०—हो, तसेंच कांहीं आहे.

उपेंद्र०—आपणाला ही बाई कोठें मिळाली ?

रम०—आमच्या कुटुंबानें तिच्या मावशीच्या घरून हिला आणिलें.

उपेंद्र०—राहूं द्या या पोकळ गोष्टी. बरं, हिची चालचलणूक कशी काय आहे ?

रम०—नांव ठेवायला अगदीं जागा नाहीं. एक मात्र खोड आहे. ती आमच्या बुद्धया स्वैंपाकीणबाईला भारी चिडवीत असते. त्याशिवाय तिच्यांत दुसरी कांहीं खोड नाहीं.

उपेंद्र०—स्त्रियांच्या चालचलणुकींतल्या दोषासंबंधानें मी विचारीत आहें.

रमण०—अशी उत्कृष्ट वर्तणूक दुसरीकडे कोठें दिसावयाची नाहीं.

उपेंद्र०—पण तिचें घरदार काठें आहे तें कां नाहीं सांगत ?

रमण०—तें सांगण्याची मला परवानगी नाहीं.

उपेंद्र०—तिचा नवरा कोठें असतो ?

रमण०—मघाचेंच उत्तर.

उपेंद्र०—तो जिवंत तरी आहे काय ?

रमण०—हो आहे.

उपेंद्र०—तुम्ही त्याला ओळखतां ?

रमण०—हो ओळखतों.

उपेंद्र०—ती बाई आतां कोठें आहे ?

रमण०—याच तुमच्या घरांत.

हें उत्तर ऐकून पतिराजाची स्वारी दचकली, आणि विस्मित होऊन विचारूं लागली, 'हें तुम्हीं कशावरून म्हणतां ?'

रमण०—तें सांगण्याचा मला अधिकार नाहीं. आपली उलट तपासणी संपली ?

उपेंद्र०—हो. संपली. पण मी ही सगळी चौकशी कशासाठीं करीत आहें तें तुम्हीं नाहीं विचारलें ?

रमण०—दोन कारणांमुळें मीं तें विचारलें नाहीं. एक कारण हें कीं मीं विचारलें असतें तर आपण खरी गोष्ट मला सांगितली नसती. कां ? मी सांगतों तें खरें कीं खोटें ?

उपेंद्र०—बरें, दुसरें कारण ?

रमण०—कशासाठीं तुम्ही चौकशी करीत आहां तें मला ठाऊक आहे.

उपेंद्र०—अरे वा: ! काय तें सांगा पाहूं ?

रमण०—तें मीं सांगणार नाहीं.

उपेंद्र०—बरें तुम्हांला तें सगळें ठाऊक आहेसें दिसतें तर मग मीं जो बेत योजिला आहे तो सिद्धीला जाईल कीं नाहीं तें सांगा पाहूं ?

रमण०—चांगला जाईल. तुम्हीं कुमुदिनीलाच विचारा.

उपेंद्र०—आणखी एक गोष्ट विचारायची आहे तुम्हांला कुमुदिनी-विषयींच्या ज्या काहीं गोष्टी माहीत आहेत त्या कागदावर लिहून सही करून द्याल काय ?

रमण०—हों. अगदीं बिनशर्त. लिहून मोहोरबंद पाकिटांत घालून कुमुदिनीच्याजवळ देईन. तुम्हांला आतांच तो कागद वाचायला मिळा-वयाचा नाहीं. आपल्या गांवीं गेल्यावर खुशाल वाचा. आहां या गोष्टीला कबूल ?

बराच वेळ विचार केल्यावर तिकडून उत्तर आलें, ' हो. आहें कबूल. माझ्या बेताला आपलें म्हणणें अनुकूळ आहे का पण ? '

रमण०—हो आहे.

मग आणखी कांही गप्पा गोष्टी झाल्यावर रमणबाबू उठून गेले. ते गेल्या-वर उ—बाबू माझ्याजवळ येऊन बसले.

मीं विचारलें—' या सगळ्या गोष्टी आज काय म्हणून निघाल्या ? '

ते—सगळ्या गोष्टी तूं ऐकिल्यास वाटतें ?

मी—हो. ऐकल्या. तेव्हापासून मी आपल्या मनाशीं म्हणत्ये आहे कीं, मी तर तुमचा खून करून फांशीं सुद्धां गेल्ये. आतां मागून चौकशी करण्यांत कोणता लाभ आहे ?

ते—आजकालच्या कायद्यानें असें सुद्धां होऊं शकतें.

प्रकरण अठरावें

मोठीच फसवणूक !

त्या दिवशीं तिकडे अहोरात्र दुसऱ्याच कांहीं गोष्टींचा विचार चाललेला दिसत होता. त्या दिवशीं रोजच्यासारखें माझ्याशीं बोलणें चालणें झालें नाहीं. माझ्याकडे सारखें पहात बसणेंहि झालें नाहीं. त्यांच्यापेक्षां मलाच चिंता करण्याला विशेष कारण होतें. तिकडची सचिंत मुद्रा पाहून माझ्या अंतःकरणाला वेदना होऊं लागल्या. मी माझें दुःख दाबून टाकून तिकडच्या जिवाला हुरूप आणण्याचा यत्न करूं लागल्यें. नानाप्रकारच्या फुलांचे हार गुंफून तिकडच्या गळ्यांत घातले. तऱ्हेतऱ्हेचे विंडे लावून दिले. निरनिराळ्या प्रकारचे फराळाचे जिन्नस तयार करून पुढें ठेवले. मी एकीकडे रडत होत्यें आणि एकीकडे तिकडचें मन रिझेल अशा प्रकारच्या रसभरित व मनोरंजक गोष्टी रचण्यांत गढून गेल्यें होतें. तिकडचें मन विषयासक्त होतें हें ठाऊक असल्यामुळें तशाच प्रकारच्या गोष्टी मीं रचिल्या होत्या. मी हरमोहन दत्ताची मुलगी. विषयकर्म मला ठाऊक नव्हतें असें नाहीं. इतके उपाय केले, पण एकाचासुद्धां उपयोग झाला नाहीं. तेव्हां मला रडूं येऊं लागलें. रडण्यांत रडणें मिळून तें बरेंच वाढलें.

दुसरे दिवशीं पहाटेस स्नान वगैरे आन्हिक कृत्यें उरकून थोडासा फराळ केल्यानंतर स्वारीनें मला आपल्याजवळ बसायला सांगितलें, आणि म्हटलें ' मी जें विचारीन त्याचें खरें खरे उत्तर देशीलना ?' तेव्हां रमणबाबूंच्या उलटतपासणीची मला आठवण झाली. मीं म्हटलें 'सांगेन तें खरें सांगेन. पण सगळ्या प्रश्नांचीं उत्तरें मला देतां येणार नाहींत.'

त्यांनीं विचारलें, ' तुझा पति जिवंत आहे असें ऐकतों. त्याचें नांव गाव सांगशील ? '

मी---आजच नाहीं. आणखी कांहीं दिवसांनीं सांगेन.

ते---तो हल्लीं कोठें आहे हें सांगशील ?

मी---येथेंच कलकत्त्यांत आहेत.

ते—(थोडेसें दचकून)–तूं कलकत्त्यांत आणि तुझा पतिहि कलकत्त्यांत ! मग तूं त्याच्याजवळ कां राहत नाहींस ?

मी—त्यांच्याशीं माझा परिचय झालेला नाहीं.

वाचकहो ! ऐका, मी सगळें खरें खरें सांगत्ये. माझे यजमान या उत्तरानें विस्मित होऊन म्हणाले, ' तुम्ही नवरा–बायको, आणि परस्परांशीं परिचय झालेला नाहीं म्हणतां ! किती आश्चर्याची गोष्ट आहे ?

मी—सगळ्यांचा होतो असें नाहीं. आपला तरी झाला आहे काय ?

या माझ्या उत्तरानें कुंठित होऊन म्हणायचें झालें कीं ' ती एक दुर्दैवाची घटना आहे. '

मी—दुर्दैव सर्वत्रच आहे.

ते—तें असो. पण पुढें मागें तो तुझा पति तुझ्यावर हक्क विक्र सांगण्याचा संभव दिसतो काय ?

मी—तें माझ्या हातीं आहे. मी जर त्यांना आपली ओळख दिली तर मात्र काय होईल तें सांगतां येत नाहीं.

ते—तुझ्या पुढें सगळ्या गोष्टी स्पष्टपणें ठेवतों. तूं मोठी बुद्धिवान् आहेस हें मला दिसून आलें आहे. तेव्हां तुझी सल्ला काय आहे ती सांग.

मी—बरें आहे. सांगावें.

ते—मला घरीं गेलें पाहिजे.

मी—तें कळलें. पुढें ?

ते—घरीं गेल्यावर लवकरच परत यायला मिळणार नाहीं.

मी—हेंहि कळलें पुढें ?

ते—तुला एकटीला सोडून तर मला जातां येत नाहीं. तसें करणें म्हणजे माझें मरणच !

मीं हंसत हंसत म्हटलें, ' दुर्दैवा ! काकबळी टाकिल्यावर कावळ्यांना काय तोटा ! '

ते—कोकिळेचें दुःख कोकिळेलाच विचारावें. मी तुला घेऊन जाईन.

मी--घेऊन जाणार? पण ठेवणार कोठें आणि कोणाच्या ओळखीनें?

ते--कांहीं तरी मोठें कपटजाल केलें पाहिजे. काय करावें याचाच कालपासून विचार करीत आहें. त्यामुळेंच काल तुझ्याशीं कांहीं बोललों नाहीं.

मी--असें सांगा कीं ही इंदिरा शोध करतां करतां रामराम दत्त बाबूंच्या घरीं सांपडली.

ते--अरेरे! सर्वनाश! तूं कोण तर?

स्वारी अगदीं कुंठित होऊन दोन्ही डोळ्यांतल्या बाहुल्या वर करून माझ्या तोंडाकडे पाहूं लागली. मीं विचारलें, 'कां बरें? काय झालें?'

ते--इंदिरा हें नांव तुला कसें कळलें? आणि माझ्या मनांतला गुप्त विचार तुला कसा समजला? तूं मनुष्य आहेस कीं कोणी मायाविनी आहेस?

मी--तें मी मागून सांगेन. आतां मी आपली उलट तपासणी करत्यें. आपणहि खरीं खरीं उत्तरें द्यावीं.

ते (भीत भीत)--विचार.

मी--त्या दिवशीं आपणाकडून मला सांगावयाचें झालें कीं माझ्या पत्नीचा शोध लागला तरी तिला पुनः घरांत घेणार नाहीं. कारण, तिला दरोडेखोरांनीं पकडून नेलें होतें. तिला घरांत घेतलें तर जातिभ्रष्ट होईन. आतां आपण मलाच इंदिरा म्हणून घरीं नेलें तर जातिभ्रष्टतेचें भय राहणार नाहीं ना?

ते--नाहीं कसें? पुष्कळच राहील. पण तेव्हांची गोष्ट थोडी निराळी होती. तिच्यामुळें माझ्या प्राणावर संकट येणार नव्हतें. आतां तुझ्या वांचून माझे प्राण वांचणार नाहींत. जात मोठी कीं प्राण मोठे? जातीचेंहि संकट फारसें मोठें नाहीं. कारण, इंदिरा जातिभ्रष्ट झाली आहे असें कोणी म्हणत नाहींत. कालादिघीपाशीं ज्यांनीं दरोडा घातला ते लोक पकडले गेले आहेत. आम्हीं तिच्या अंगावरचे दागिने तेवढे काढून घेतले आणि तिला सोडून दिलें असें त्यांनीं जबानींत स्पष्ट सांगितलें आहे. इतकेंच कीं ती आतां कोठें आहे व तिचें पुढें काय झालें तें कोणाला कळ-

लेलें नाहीं. तिचा शोध लागलाच तर ज्याच्या योगानें आम्हांला कोणत्याहि प्रकारचा काळिमा लागणार नाहीं असा सारा वृत्तांत अनायासेंच तयार करतां येईल. रमणबाबूंनीं जें लिहून दिलें आहे तेंहि या बेताला पोषकच आहे. त्यांतूनहि एखादें खुसपट निघालेंच, तर गांवांतल्या लोकांचीं तोंडे प्रायश्चित्त वगैरे घेण्यानें बंद करतां येतील. आमचेजवळ पैसा रगड आहे आणि 'द्रव्येण सर्वे वशाः' हें आहेच.

मी—येवढी अचडण दूर झाल्यावर मग नाहींना दुसरी कांहीं अड-चण येण्यासारखी दिसत?

ते—दुसरी अडचण म्हणजे एकच. तुझा स्वीकार करण्याची. तूं खरी इंदिरा नाहींस, तिचा तोतया आहे, असें उघडकीस आलें तर बरीक अडचण येईल.

मी—आपल्या घरीं मला ओळखणारें कोणी नाहीं. मूळच्या इंदिरेलाहि इतक्या वर्षांनीं कोणीं ओळखलें नसतें. ती लहान असतांना आपण तिला एकदां पाहिलेली होती. मग माझें कपट उघडकीला कसें येणार?

ते—सहज बोलण्यानें एखादे वेळीं पकडले जावयाचें?

मी—आपण आहांच जवळ. मला चांगलें पढवून ठेवायचें म्हणजे झालें.

ते—ते तर मीं मनांत योजिलेंच आहे. पण सगळ्या गोष्टी कशा शिकवितां येतील? शिकविलेली नाहीं अशीच एखादी गोष्ट उपस्थित झाली म्हणजे अडचणच. समज, एखादे दिवशीं खरीखुरी इंदिरा येऊन उभी राहिली. तर तिला येथली सगळी माहिती, आणि तूं नवखी, तेव्हां चौकशींत तुझें ढोंग बाहेर पडेल.

मी थोडेंसे हसल्यें. अशा अवस्थेत माणसाला आपोआपच हंसूं येतें. पण आपण खरोखर कोण आहों तें उघड करण्याची योग्य वेळ अजून आली नव्हती. म्हणून मीं हंसत म्हटलें, 'मला कोणाला फसवितां येत नाहीं. मला आपण आतांच विचारलें कीं तूं मनुष्य आहेस कीं माया-विनी? मी सांगत्यें कीं मी मनुष्य नाहीं (हें ऐकून स्वारी दचकली). मी कोण आहें तें मग सांगेन. आतां इतकेंच सांगत्यें कीं कोणीहि मला फसवूं शकणार नाहीं.'

माझे शब्द ऐकून स्वारी अगदीं कुंठित झाली. बुद्धिमत्ता व उद्योगप्रियता हे दोन गुण स्वारीच्या अंगीं चांगले होते. एरव्हीं इतक्या थोड्या काळांत इतका पैसा मिळवितां आला नसता. ते दिसायला बाहेरून अगदीं अरसिक, वाळलेल्या लांकडासारखे अगदीं नीरस, शुष्क दिसत; पण त्यांचें अंतर्याम पहावें तर अत्यंत मधुर, अत्यंत कोमळ, अत्यंत प्रेमळ होतें. रमणबाबूंप्रमाणें किंवा आजकालच्या पोरासारखें उच्च शिक्षण तिकडे मिळालेलें नव्हतें. देवावर पूर्ण श्रद्धा होती. देशोदेशीं प्रवास केल्यामुळें भुतेंपिशाचें, डाकिनी, योगिनी, मायाविनी वगैरे संबंधाच्या पुष्कळ गोष्टी ऐकण्यांत आलेल्या होत्या, आणि त्यांच्यावर थोडासा विश्वास होता. मीं तिकडचे मन मोहून टाकलें होतें त्याचें आता स्मरण झालें. माझ्या ठायीं असामान्य बुद्धि आहे असें म्हटलें होतें त्या गोष्टीचीहि आठवण झाली. ज्या गोष्टींतले गूढ कळलें नव्हतें अशा कांहीं गोष्टी होत्या. त्याहि आतां डोळ्यांपुढें उभ्या राहिल्या. त्यामुळें मी मनुष्य नाहीं असें जे मीं आतां म्हटलें तो गोष्ट खरी वाटली, आणि कांहीं काळपर्यंत तिकडची बुद्धि कुंठित झाली. पण थोड्या काळानंतर स्वतःच्या बुद्धिबळानें तो विश्वास दूर करण्यांत आला, आणि म्हटलें, 'बरं तर. तूं मायाविनी कशी ते सांग पाहूं ?'

मी—विचारावें.

ते—माझ्या पत्नीचें नांव इंदिरा. हें तुला ठाऊक आहे. पण तिच्या बापाचें नांव सांग पाहूं ?

मी—हरमोहन दत्त.

ते—त्यांचें घरदार कोठें आहे ?

मी—महेशपुराला.

ते—तूं कोण ?

मी—तें मी पुढें सांगेन. आतां येवढेंच सांगत्यें कीं मी मनुष्य नाहीं.

ते—तूं मागें सांगितलें होतें कीं तुझें माहेर कालादिघीजवळ आहे. तेथच्या लोकांना ही सगळी माहिती असण्याचा संभव

आहे. पण हरमोहनबाबूंच्या वाड्याच्या सदर दरवाज्याचें तोंड कोणत्या दिशेला आहे तें सांग पाहूं ?

मी—दक्षिणेला. एक मोठें फाटक असून दोन्ही बाजूंला दोन सिंहिणींचीं चित्रें आहेत.

ते—त्यांना किती मुलगे आहेत ?

मी—एक.

ते—त्याचें नांव ?

मी—वसंतकुमार.

ते—त्याला किती बहिणी आहेत ?

मी—आपल्या विवाहाच्या वेळीं दोन होत्या.

ते—त्यांचीं नांवें ?

मी—इंदिरा आणि कामिनी.

ते—त्यांच्या घराजवळ एक तळें आहे. त्याचें नांव काय ?

मी—देवी-दिघी. त्यांत पुष्कळ कमळें उगवलीं आहेत.

ते—हो. तें समजलें.तूं कधीं महेशपुरला होतीस ? असलीस तर मग इतकी माहिती असल्याचें नवल नाहीं. आणखी कांहीं गोष्टी सांग पाहूं ? इंदिरेच्या विवाहाच्या वेळीं कन्यादान कोठें करण्यांत आलें होतें ?

मी—देवघराजवळच्या दालनांत वायव्येकडच्या कोपऱ्यांत.

ते—तें कोणीं केलें ?

मी—तिच्या धाकट्या काकानें.

ते—इंदिरेचें लग्न कधीं झालें ?

मी—वैशाख शुद्ध चतुर्दशी शके १८१९रोजीं.

हीं सगळीं बरोबर दिलेलीं उत्तरें ऐकून स्वारी क्षणभर चकित झाली. तथापि पुनः थोडा विचार करून म्हणाली, ' मी आणखी दोन गोष्टी विचारूं काय ?'

मी—विचारा.

ते—इंदिरेच्या फलशोभनाच्या दिवशीं सगळी मंडळी निघून गेली

आणि माझी व तिची एकांतांत गांठ पडली, तेव्हां मी तिला एक गोष्ट विचारली आणि तिनें तिचें उत्तर दिलें. ती गोष्ट कोणती सांग पाहूं ?

या प्रश्नाचें उत्तर देण्यास मला थोडा विलंब लागला. कारण, त्या गोष्टीची आठवण करतांना माझ्या डोळ्यांला पाणी आलें होतें तें मी पुशीत होत्यें. तेव्हां तिकडून म्हटलें, ' आतां सांपडलीस ! समजलों, तू कांहीं माया. विनी नाहींस. ' मी डोळे पुसण्याचे राहूं दिलें आणि म्हटलें, ' आपण इंदिरेला त्यावेळीं म्हटलें, " आपला आज कोणता संबंध घडला आहे तें सांग पाहूं !" तेव्हां ती म्हणाली " आजपासून आपण माझें दैवत आणि मी आपली दासी झाल्यें आहें. " हा एक प्रश्न झाला. आतां दुसरा कोणता विचारायचा आहे ?

ते—आणखी प्रश्न विचारण्याचें भय वाटतें. माझी बुद्धि तूं अगदीं कुंठित करून टाकिली आहे. तरी पण इंदिरेशीं एकांतांत असतांना घडलेली दुसरी एखादी गोष्ट सांग पाहूं !

मी—आपण एकदां एका हातांत इंदिरेचा हात घेऊन आणि दुसरा तिच्या खांद्यावर ठेवून तिला कांहीं विचारलें. तेव्हां तिनें सणसणीत जबाब दिल्यावरून आपण तिच्या तोंडांत मारली. पण लागलीच आपणाला त्या गोष्टीचा पश्चात्ताप होऊन आपण तिचें मुखचुंबन घेतलें.

हें सांगतांना माझें शरीर अपूर्व आनंदरसांत बुडाल्यासारखें झालें होतें. माझ्या आयुष्यांतलें तेंच पहिलें मुखचुंबन. त्यानंतर नुकती परवां सुभाषिणीनें केलेली सुधावृष्टि. या दोन गोष्टींमधल्या काळांत भयंकर खरखाट झाला होता. हृदय वाळलेल्या लाकडासारखें शुष्क झालें होतें.

या गोष्टीचें चिंतन करीत असतांना मीं पाहिलें कीं, स्वारी हळूहळू उशीवर डोकें टेकून डोळे मिटूं लागली आहे. तेव्हां मी म्हणाल्यें, ' आणखी कांहीं विचारावयाचें आहे ?'

तिकडून म्हणणें झालें, ' नाहीं. तूं स्वतः इंदिरा तरी असली पाहिजेस किंवा मायाविनी तरी असली पाहिजेस.'

प्रकरण एकोणिसावें.

विद्याधरी.

मीं पाहिलें कीं, स्वतःचा परिचय यावेळीं अनायासें करून देतां येईल. यजमानांच्याच तोंडून माझ्या विषयींच्या गोष्टी प्रकट झाल्या होत्या. पण कांहीं थोडीशी शंका राहिली असल्यामुळे मीं आपली ओळख न देण्याचें ठरविलें, आणि म्हटलें, 'आतां मी स्वतःची कहाणी सांगत्यें बरें का!' कामरूप येथें आमचें राहणें. तेथील आदिशक्तिदेवीच्या मंदिराच्या पिछाडीस आमचें घर आहे. लोक मला डाकिनी म्हणतात; पण मी डाकिनी नाहीं; मी विद्याधरी आहे. माझ्या हातून देवीचा कांहीं अपराध घडला. त्यावरून शाप मिळून मीं हा मनुष्यदेह धारण केला आहे. स्वैपाकीणबाई आणि कुलटा होण्याचा प्रसंग मजवर आला तो त्या शापाचाच परिणाम. सगळ्या दुर्दैवी घटनांचें मूळ तो शापच आहे. आतां त्या शापातून मुक्त होण्याची वेळ आली आहे असें पाहून मी जगन्मातेची स्तुति करून तिला प्रसन्न करून घेतलें आणि देवीनें आज्ञा केली कीं, महाभैरवीच्या दर्शनानें तुला मुक्ति मिळेल.

ते—ती महाभैरवी कोठें आहे ?

मी—महेशपुरांत. आपल्या सासुरवाडीच्या उत्तरेस. ते त्यांचेंच कुलदेवतेचें स्थान आहे. त्यांच्या घरांतून त्या मंदिराला जाण्याची वाट आहे. आपण महेशपुराला जाऊं या.

तिकडून कांहीं वेळ विचार करून म्हणायचें झालें कीं ' मला वाटतें तूंच इंदिरा असशील. कुमुदिनी इंदिरा असली तर केवढें भाग्य म्हणावयाचें ! मग माझ्या सुखाला या पृथ्वीवर तोड नाहीं म्हणून !'

मी—तें जें काय असेल तें असो. आपण महेशपुराला जाऊं म्हणजे उलगडा होईल.

ते—तर चला. उद्यांच आपण येथून निघूं. मी तुला कालादिघीच्या पार करून महेशपुरास पाठवून देईन आणि मग आपल्या गांवाला जाईन. हात जोडून तुला माझी येवढी प्रार्थना आहे कीं, तूं इंदिरा अस, कुमुदिनी अस, कीं विद्याधरी अस, माझा त्याग करूं नकोस म्हणजे झालें.

मी—छेः छेः, शापांतून मुक्त झाल्यावर देवीच्या कृपेनें मला आपला लाभ पुनः घडणार आहे. आपण मला प्राणांहून अधिक प्यार आहां.

'ही भाषा कांहीं डाकिनीसारखी दिसत नाहीं,' इतकें म्हणून स्वारी बाहेर गेली. तिकडे कोणीसें आलें होतें. दुसरें कोणी नाहीं, रमणबाबू होते. रमणबाबू तिकडच्याबरोबर आंत आले आणि त्यांनीं एक गांठोडें माझ्या-पुढें आणून ठेविलें., त्याच्या संबंधानें त्यांनीं तिकडे जें सांगितलें, तेंच त्यांनीं मलाहि सांगितलें. ते म्हणाले, 'सुभाषिणीला कांहीं निरोप सांगा-यचा आहे काय?'

मी—असा निरोप सांगावा कीं, उद्या मी महेशपुराला जाणार आहे. गेल्याबरोबर मी शापमुक्त होईन.

यज०—तुम्हांला ही सगळी भानगड ठाऊक आहे वाटतें?

रमण०—मला कांहीं सगळी माहिती नाहीं; पण आमच्या कुटुंबाला आहे.

मग बाहेर जाऊन माझ्या यजमानांनीं रमणबाबूला विचारलें "डाकिनी, योगिनी, विद्याधरी इ० योनींवर तुमचा विश्वास आहे काय?"

रमणबाबूंना आमच्या सगळ्या गुप्त गोष्टींची माहिती होतीच. ते म्हणाले, 'होय. आमचें कुटुंब म्हणत होतें कीं, कुमुदिनी ही एक शापग्रस्त विद्याधरी आहे.'

यज०—कुमुदिनी कीं इंदिरा? घरांतून नीट विचारून या.

रमणबाबू यानंतर फार वेळ थांबले नाहींत. हंसत हंसत निघून गेले.

प्रकरण विसावें.

विद्याधरी अंतर्धान पावली!

याप्रमाणें संभाषण झाल्यावर योग्य वेळीं आम्ही दोघे कलकत्त्याहून निघालों. त्यांनीं मला कालादिघी (तोच दुर्दैवी तलाव!) सुरक्षितपणें पार करून मग आपल्या गांवाकडे प्रयाण केलें.

माझ्या बरोबर दिलेल्या लोकांनीं मला महेश्वरपुराला पोंचविलें. त्या लोकांना गांवाच्या बाहेर राहण्यास सांगून मी एकटी पायीं गांवांत गेल्यें. माझ्या वडिलांच्या वाड्यासमोर एका निवांत स्थानीं बसून मी प्रथम पुष्कळ रडल्यें, आणि नंतर वाड्यांत गेल्यें. बाबा समोरच होते. त्यांना प्रथम नमस्कार केला. त्यांनीं मला ओळखलें व त्यांना अवर्णनीय आनंद झाला.

मी इतके दिवस कोठें होत्यें व परत कशी आल्यें वगैरे कांहीं एक मीं सांगितलें नाहीं. आईनें व बाबानीं विचारलें तेव्हां मीं म्हटलें की ते मागाहून सागन.

दुसऱ्या एका वेळीं मीं आपली कहाणी स्थूल मानानें सांगितली. सगळी कच्ची हकीकत सांगितली नाहीं. इतकें त्यांच्या ध्यानांत आणून दिले कीं, अखेर मी आपल्याच यजमानाजवळ होत्यें. त्यांच्या बरोबरच आल्ये आणि एक दोन दिवसांत तिकडूनहि येथें येणं व्हावयाचें आहे. कामिनी, माझी धाकटी बहीण, माझ्याहून दोन वर्षांनीं लहान होती. तिला मीं म्हटलें, आपण जरा गंमत करूं या.' तेव्हां दोघींनीं बसून कांहीं बेत ठरविला. सगळ्यांना अगोदर आपला बेत कळवून शिकवून ठेविलें. आईला व बाबांनाहि कामिनीनें सांगून ठेविले कीं कुमूताईला उघडपणें अजून घरांत घेतलेलें नाहीं: पण या युक्तीनें आतांच तें घेतां येईल. म्हणून ती येथें आली आहे, हें जावईबुवा येतील तेव्हां त्यांना कळवूं नका.

दुसरे दिवशीं तिकडची स्वारी आली. तिचा योग्य मानपान करावयाचा तो यथेच्छ करण्यांत आला. मी आल्ये अहे ही गोष्ट तिकडे बाहेर कोणाकडून कळली नव्हती. कोणाला विचारतांहि येईना. त्यामुळें जेव्हां फराळासठीं घरांत येणें झालें तेव्हां तोंड उतरलेले दिसलें.

तिकडच्या फराळाच्या वेळीं मी समोर गेल्यें नाहीं. कामिनी व तिच्या दोन चार मैत्रिणी या मात्र जवळ होत्या. त्या वेळीं संध्याकाळ होऊन गेली होती. कामिनी तिकडे पुष्कळ गोष्टी विचारूं लागली. तिच-

डून जीं उत्तरें मिळत तीं मी आडून सर्व ऐकत होत्यें. अखेर तिकडून कामिनीला विचारणें झालें कीं, तुमच्या ताई कोठें आहेत ?

कामिनी खूप दीर्घ निश्वास टाकून म्हणाली, ' कोण जाणे कोठें आहे! कालादिघीपाशीं जो सर्वनाश झाला त्यानंतर तिची कांहीं एक खबर कळली नाहीं.'

तिकडची मुद्रा अधिकच खिन्न झाली. पुढे बोलवेचना. कुमुदिनी हातची गमावली असें तिकडे वाटलं असावें. कारण, लागलीच तिकडच्या डोळ्यांतून अश्रूंच्या धारा वाहूं लागल्या.

कामिनी म्हणाली, ' कुमुदिनी किंवा आणखी कोणी, पण एक परकी बाई परवांचे दिवशीं मेण्यांतून आली खरी. तिनें अगोदर भैरवीच्या मंदिरांत जाऊन देवीला नमस्कार केला. इतक्यांत एक मोठा चमत्कार घडून आला. एकाएकीं आभाळांत ढग येऊन जोराचा पाऊस पडूं लागला. त्या वेळीं ती स्त्री हातांत त्रिशूळ घेऊन चमकत चमकत आकाशांत कोठें निघून गेली !'

इतकें ऐकल्याबरोबर तिकडून फराळाचें ताट तसेंच टाकून उठायचें झालें. हात धुतल्यावर डोक्यावर हात देऊन स्वारी बराच वेळ बसली आणि कांहीं वेळानें म्हणाली, ' ज्या ठिकाणीं कुमुदिनी अंतर्धान पावली तें ठिकाण मला नाहीं का दिसायचें ? '

कामिनी म्हणाली, ' हो. न दिसायला काय झालें ! अंधेर पडला आहे, मी दिवा घेऊन येत्यें दाखवायला.'

असें म्हणून कामिनीनें इषारा करून मला सुचविलें कीं, अगोदर तूं जा, मागाहून दिवा आणून मी उपेंद्रबाबूला घेऊन येत्यें. त्याप्रमाणें मी पुढें जाऊन मंदिराच्या सोप्यांत बसल्यें.

त्या ठिकाणीं दिव्याच्या उजेडानें कामिनीनें स्वारीला आणिलें. त्यांनीं येऊन माझ्या पायांपाशीं लोळण घेतली आणि म्हटलें, ' कुमुदिनी कुमुदिनि ! तूं आलीच आहेस तर आतां पुनः मला सोडून जाऊं नकोस'

दोनचार वेळां याप्रमाणें म्हणणें झाल्यावर कामिनी दचकून उठली

आणि म्हणाली, ' कोण ताई ? चल ऊठ ! हे गृहस्थ कुमुदिनीला ओळखतात ! तुला ओळखत नाहींत.'

त्यांनीं कामिनीला विचारले, ' ताई ताई !' ! असे तूं म्हणालीस ते कोणाला ? ताई कोण ?

कामिनी रागाचा आविर्भाव दाखवून म्हणाली, ' माझी ताई इंदिरा. कधी हे नाव आपल्या ऐकण्यांत नाहीं आले ना ? '.

इतके बोलून त्या द्वाड पोरीने दिवा मालविला आणि माझा हात धरून मला ओढीत नेले. मी तिच्या हातून सुटका करून घेतली. तिकडचे चित्त ~~अस~~ स्वस्थ झाल्यावर तेहि आमच्या मागोमाग येऊ लागले. पण अंधेर व अपरिचित वाट होती, यामुळे खिडकीची चौकट डोक्यास लागली व ठेचाहि खाल्ली. आम्ही जवळच होतो. दोघींनीं दोन्ही बाजूंनीं हातांस धरून उचलले. कामिनी स्वर बदलून म्हणाली, ' आम्ही विद्याधरी, तुमच्या रक्षणासाठीं तुमच्या पाठीशी असतो.'

असे बोलून स्वारीला उचलून माझ्या शय्यागृहात नेले. त्या ठिकाणीं दिवा होता. त्याच्या प्रकाशांत आमच्याकडे पाहून स्वारी आश्चर्याने म्हणाली, 'हे काय मी पाहतो ? ही तर कामिनी आहे, आणि ही कुमुदिनी !'

कामिनी रागारागाने म्हणाली, ' वाः ! खाशी ! समजली आपली बुद्धि! अशाच बुद्धीच्या जोरावर हजारो रुपयांचा कारभार करतां वाटते ! अहो ! ही कुमुदिनी नाही, ही इदिरा, बरे का ? आपल्या माणसाला सुद्धा ओळखतां येत नाही तुम्हांला अजून ! '

तेव्हां तिकडे इतका आनद झाला कीं बेसुमार ! त्यांनी त्या आनदाच्या भरांत मला उचलून कडेवर घेतलेच; पण कामिनीलाहि तसेच उचलून घेतलें. तेव्हां ती त्यांना हळूंच एक थप्पड मारून पळून गेली.

त्या दिवशींचा आनद कांहीं अवर्णनीय होता. आमच्या घरीं त्या निमित्ताने मोठा उत्सव करण्यांत आला. त्या रात्रीं कामिनी व ते यांच्यामध्यें शंभर वेळां तरी वाग्युद्ध झालें असेल. प्रत्येक वेळीं तिकडेसच हार खाण्याची पाळीआली होती.

प्रकरण एकविसावें.

मागल्या काळांत असें होतें.

कालादीघीच्या दरोड्यानंतर माझ्या दुर्दैवानें घडलेल्या गोष्टींची सगळी हकीकत मी या वेळीं तिकडे सांगितली. रमणबाबू व सुभाषिणी यांनीं खलबत करून स्वारीला कलकत्त्यास कसें नेलें तेंहि सांगितलें. त्यावरून तिकडे थोडासा राग आला, आणि म्हणणें झालें कीं ' मला येवढें फिरायला लावण्याचें काय कारण होतें?' काय प्रयोजन होतें तें मीं समजावून सांगितलें, तेव्हां तिकडे संतोष झाला. पण कामिनीचा संतोष झाला नाहीं. ती तिकडे म्हणाली, ' घाण्याच्या बैलासारखें तुम्हांला गरगर फिरायला लाविलें नाहीं, तसेंच सोडलें, हा आमच्या ताईचा दोष ! आतां पुनः ताईनें कांहीं हट्ट घेतला तर ऐकूं नका बरें का ? अहा रे पुरुष माणूस ! मेंदीनें हातपाय रंगविलेल्या आमच्यासारख्या स्त्रियांवांचून तुम्हांला अन्य गति नाहीं, असें असतां येवढी बढाई कशाला मिरवावी ? '–

तिकडून याचें लागलीच ' पण मीं ओळखलेंच कीं नाहीं? तुमच्याच्यानें कोठें ओळखणें झालें ?' असें उत्तर मिळालें.

कामिनी म्हणाली, ' आहे ठाऊक ! तुम्ही ओळखाल हें वाक्य ब्रह्मदेवानें तुमच्या कपाळीं लिहिलेलेंच नाहीं.' इतकें बोलून त्या अर्थाचें एक गाणेंहि तिनें म्हणून दाखविलें.

माझ्याच्यानें आतां हंसल्यावांचून राहवेना. तिकडून कामिनीला म्हणणें झालें कीं, ' जा बाई, उगाच त्रास देऊं नकोस.'

माझ्याकडे वळून ती म्हणाली, ' ताई ! एक काम कर—'

पुढें आणखी कांहीं ती बोलणार होती; इतक्यांत मीं तिला दाबलें व म्हटलें ' पुरें झाली ग तुझी थट्टा ! तुला कोणाशीं थट्टा करावी आणि कोणाशीं करूं नये हें सुद्धां कळूं नये ना ? तुला माझें पतिदैवतहि सारखें आणि दुसरीं माणसेंहि सारखींच वाटतात !'

कामिनी--हे देवता कधींपासून झाले ? आतां झाले असतील. एकूण इतके दिवस हे तुझ्याजवळ पिशाच म्हणून होते, असेंच कीं नाहीं?

मी--जेव्हां विद्याधरी गेली तेव्हां देवत्व आलें हो. आतां तरी नीट समजलीस ?

कामिनी--विद्येला धरण्याचा कर कर प्रयत्न केला तरी ती हातीं लागलीच नाहीं ! हें पहा जावईबुवा ! जी विद्या तुमच्या हातीं लागत नाहीं ती नसलेलीच बरी. जी धरतां येत नाहीं ती विद्या मोठीच असली पाहिजे!

मी--कामिनी ! तूं किती खरोखर फार वात्रट मुलगी आहेस !

उपेंद्र०--बोलूं दे तिला ! तिला कां पोरीला बोलायला हरकत करत्येस ? 'अमृतं बालभाषितम्.'

कामिनी--बरोबर. तुम्ही जेव्हां विद्याधरी शासितम्, तेव्हां तुमची बुद्धि नाशितम्. मी तेव्हां आसितम्--आई बोलावितम्.

इतकें बोलून ती उठून गेली. आईनें खरोखरीच बोलाविलें होतें.

आईकडे जाऊन आल्यानंतर कामिनी पुनः म्हणाली ' आईनें कां बोलाविलें तें जानितम् ? तुम्हांला आणखी दोन दिवस ठेवितम्, आग्रहानें ठेवितम्.'

आम्ही दोघे परस्परांच्या तोंडाकडे पाहूं लागलों.

कामिनी--केन परस्पर बोलितम् ?

उपेंद्र० --विचार करतम्.

कामिनी--घरीं गेल्यावर विचारितम्. आतां येथें आणखी दोन दिवस राहतम्, पाहतम्, खेळितम्, हासितम्, खुशीतम, नाचितम्, गायितम्.

उपेंद्र०--कामिनी, तूं आतां थोडें नाचून दाखीव पाहू ?

कामिनी--मी काय म्हणून नाचायचें ? तुम्हीच नाचा.

उपेंद्र०--मला आतांपर्यंत नाचविलें तें काय थोडें झालें ? आज तूंच नाच.

कामिनी--मीं नाचून दाखविलें तर तुम्ही राहाल ?

उपेंद्र०--हो. राहीन.

कामिनीला कबूल केल्यावरून नव्हे पण माझ्या आईच्या व बाबांच्या आग्रहावरून तिकडे एक दिवस आणखी राहणें झालें. तोहि दिवस मोठ्या आनंदांत गेला गांवांतल्या मुलींचे घोळके संध्याकाळीं येऊन माझ्या यजमानाच्या भोंवतीं घेरा घालून बसले होते. त्याच गांवांतल्या एका कोपऱ्यांतल्या घरांत दुसरीहि एक मुलींची मजलस झाली.

किती मुली आल्या होत्या त्यांची गणना नाहीं. सर्वच मुली आनंदानें नाचत बागडत होत्या; कोणी फुगड्या, कोणी टिचकीपाणी, कोणी लपंडाव, वगैरे खेळ खेळत होत्या; कोणी कानगोष्टी करीत होत्या; कोणी खेळणाऱ्या सोबतिणींना ओरडून उत्तेजन देत होत्या. त्याच झकपक पोपाख व चंचलता हीं पाहून स्वच्छोदकानें भरलेल्या सरोवरांत त्वरेनें धावणाऱ्या व चटकन् रंग पालटणाऱ्या लहान लहान माशांची आठवण होत असे. मुलींच्या काळ्याभोर केशकलापांतून त्यांची उज्ज्वल कांति 'महिषोदरतुल्य' काळ्या ढगांतून चमकणाऱ्या विद्युल्लतेसारखी प्रेक्षकांचे डोळे दिपवीत होती. विडा खाऊन रंगलेल्या त्या मुलींच्या ओठांवर त्यांच्या मोत्यांसारख्या शुभ्र दंतपक्तिचें पडलेलें तेज फार खुलून दिसत होतें. कांहीं प्रौढ वयाच्या मुलींच्या नाकांतल्या छुपकेदार नथेच्या पाशांत कंदर्प देव अडकून राहून तेथून आपलें शरसंधानकौशल्य दाखवूं लागला होता मुलींच्या पायांतल्या तोरड्या साखळ्यांचा रुम् झुम्, झुम झुम् असा नाद जणू काय भ्रमराच्या गुंजारवाचें अनुकरण करीत आहे असें वाटत होतें. सारख्या सारख्या वयाच्या मुली रांगेनें उभ्या होत्या त्या वेळीं जणू काय ही स्त्री—सैनिकांची पलटणच उभी आहे असें दिसत होतें. तिकडच्या स्वारीनें अनेक वेळां गोऱ्या पलटणींना लढाईत यश मिळवून दिलें होतें. पण ही स्त्रियांची पलटण पाहून त्यांच्या धैर्यानें ठाव सोडला, आणि आतां कोठें पळून जाऊं कीं काय करूं, असें त्यांना झालें होतें. तोफांतून निघणाऱ्या अग्निफूत्कारापेक्षां या पलटणीच्या नेत्रांतून बाहेर पडणारें तेज अधिक भयंकर होतें. तोफेतून निघून बाहेर वातावरणांत वेटाळीं घालीत जाणाऱ्या धुराच्या ऐवजीं येथें सुगंधि तेलांनीं माखलेले आणि नागफणीप्रमाणें डोक्यावर धारण केलेले सुंदरींचे केशकलाप

होते. संगिनीच्या खणखणाटाबद्दल येथें अंगावरल्या अलंकारांचा रुणझुण ध्वनि कानीं पडत होता. रणडंक्याचें काम स्त्रीसैनिकांच्या पायांतल्या नूपुरांनीं आपलेकडे घेतलें होतें. याप्रमाणें स्त्रीसैनिकांकडून लढाईची जय्यत तयारी करण्यांत आली होती. हें पाहून अनेक वार रण-क्षेत्रांत जाऊन आलेल्या आमच्या पतिराजांची घाबरगुंडी उडाली, मग इतरांची काय कथा ? या घोर रणक्षेत्रांत आपलें रक्षण करणारें कोणी असेल तर आपली पत्नीच अशी स्वारीची खात्री होऊन त्यांनीं मला इषारा केला. मी त्याचा अर्थ समजल्यें; पण शीख सेनापतीप्रमाणें मीं या वेळीं यजमानाशीं विश्वासघात केला, आणि जें साह्य करणें माझें कर्तव्य होतें तें मीं मुद्दाम केलें नाहीं.

सामान्यतः म्हणावयाचें म्हणजे अशा मजलिसा भरविणें गैर आहे. कारण, त्यांत पुष्कळ निर्लज्जपणाचे व्यापार चालत असतात. म्हणून मी व कामिनी दोघीहि मजलशीच्या जागीं गेलों नव्हतों; दुरून दारांतून डोकावून पहात होतों. पण तेथें निर्लज्जपणाचे व्यापार चालतात हें ठाऊक असून मी या मजलसीचें वर्णन यथें विस्तारानें कां केलें असें कोणी विचारील. त्याला उत्तर हें कीं, मी हिंदु स्त्री आहें. हिंदु स्त्रिया म्हणजे रुढीच्या दासी. आमच्या दृष्टीनें जरी हें अनीतीचें व निर्लज्जपणाचें कृत्य असलें तरी समाजांत आनंदोत्सवाच्या प्रसंगीं अशा मजलसी भरविण्याची चाल आमच्यांत एकदां फ्याशन म्हणून पडल्यावर तिच्यापुढें मान वांकवूं नये तर काय करावें ? पाश्चात्यांच्या दृष्टीनें पाहिलें तर मात्र या मजलसींत निर्लज्जपणा दिसणार नाहीं.

गाणें, नाच आणि विनोद यांनीं मजलसीला खूप रंग चढला होता. विनोदांत अर्थात् ग्राम्यपणाहि बराच होता. सुदैवानें ही मजलसीची चाल आतां मोडली आहे. नाहीं तर किती अश्लीलता, निर्लज्जपणा आणि कदाचित् अनीति यांचीं मुळें समाजांत खोल गेलीं असतीं !

प्रकरण बाविसावें.

उपसंहार.

मी दुसरे दिवशीं मेण्यांत बसून यजमानाबरोबर सासरच्या गांवाला जाण्यास निघालें. माझ्याबरोबर तिकडची स्वारी होती. हा मनाला एक मोठा धीर देणारा आधार होता. सुख वाटण्याला दुसरेंहि एक कारण होतें. जें आजपर्यंत मला केव्हांहि लाभलें नव्हतें तें प्राप्त करून घेण्याच्या आशेनें मी चाललें होतें. आतां मला जें कांहीं मिळालें तें मीं पदरांत पाडून घेतलें होतें. तें म्हणजे कवीचें काव्य आणि श्रीमंताचे धन. श्रीमंताचें धन आणि कवीचें काव्य यांची बरोबरी करतां येईल काय ? पैसा मिळविण्यांत ज्यांचा सारा जन्म गेला, व काव्यसुखाला जे अंतरले, ते सुद्धां असें म्हणत नाहींत. ते म्हणतात कीं फूल जोंपर्यंत झाडावर विराजमान असतें तोंपर्यंत मात्र त्याचें सौंदर्य ! तें तोडून हातांत घेतलें कीं त्याचें सौंदर्य नष्ट झालें. स्वप्न सुखकारक असतें. पण कोठपर्यंत ? तर आपण अर्धवट निद्रिस्त असतों तोंपर्यंत. पण स्वप्नांतलें सुख प्रत्यक्ष व्यवहारांत कधीं अनुभवाला येतें काय ? आपण आकाश निळें आहे म्हणतों; कारण, तें तसें दिसतें. पण तें निळें दिसलें तरी वस्तुत: तें तसें नाहीं. धनाचीहि गोष्ट अशीच आहे. धन सुखाचें साधन नाहीं. आपण तसें त्याला केवळ समजतों इतकेंच. खरें सुख काव्यांतच आहे. काव्य आशा आहे; धन भोग मात्र आहे. आणि तेंहि सर्वांच्या नशीबीं नसतें. पुष्कळ श्रीमंत लोक तिजोरीवरचे निवळ पाहारेकरी असतात.

मीं सुखाच्या आशेनें सासरीं चाललें होतें. या खेपेला तेथें निर्विघ्नपणें पोंचलें. माझ्या सासूसासऱ्यांना तिकडच्या तोंडून इत्थंभूत हकीकत कळली. रमणबाबूचीहि चिठ्ठी उघडून वाचण्यांत आली. त्यांनीं लिहिलेल्या गोष्टींशीं मीं सांगितलेल्या गोष्टींचा मेळ बसला. सासूसासऱ्यांना संतोष झाला. गांवांतल्या लोकांनाहि हळूंहळूं माझ्याविषयींच्या खऱ्या खऱ्या गोष्टी कळल्या. तेव्हां कोणी कुतर्क काढीनासे झाले.

मीं सुभाषिणीला पत्र लिहिलें त्यांत सगळ्या गोष्टी सविस्तर लिहिल्या होत्या. तिच्याकडे माझ्या प्राणांचा नेहमीं ओढा साहजिकच असतो. माझ्या आग्रहावरून इकडच्या स्वारीनें हाराणीला इनाम म्हणून देण्यासाठीं पांचशें रुपये रमणबाबूकडे पाठविले होते. सुभाषिणीकडून उत्तर आलें तें अर्थात आनंदानें परिपूर्ण होतें. पत्र लिहिलें होतें रमणबाबूंनीं, पण तोंडानें मजकूर सांगितला होता सुभाषिणीनें. हें पत्राचा मजकूर जुळविण्याच्या तिच्या विशिष्ट पद्धतीवरूनच दिसत होतें. तिनें आपल्या तिकडच्या बातम्या इत्थंभूत लिहिल्या होत्या. त्यांचा थोडासा मासला येथें देत्यें तिनें पत्रांत लिहिलें होतें, 'हाराणी प्रथम रक्कम घेईना. तिचें म्हणणें कीं अशानें माझा लोभ वाढेल. ज्याचा शेवट गोड ते सारेंच गोड या म्हणीप्रमाणें मीं जें केलें ते चांगलच असें आतां म्हणतां येईल; पण खरोखर पाहतां असले काम चांगलें नाहीं. पैशाच्या लोभानें असलें घाणेरडें काम करण्यास मी राजी झाल्यें असत्ये काय ? त्या काळतोंडीला (कुमुदिनीला) बजाविलें होतें कीं मी केरसुणीचा मार खाल्ला नसता तर तुझ्यानें हें काम कधीं झालें नसतें. झालें तें चांगलेंच झालें. याबद्दल बक्षीसाचें कारण नाहीं. पण मी नानाप्रकारें तिची समजूत घातली, तेव्हां तिनें ती रक्कम घेतली. आतां कोणतीं व्रतें व नियम धरावयाचे त्यांची एक यादी मी करीत आहे. तुझें खुशालीचें पत्र आलें नव्हतें तोंपर्यंत माझ्या मुद्रेवर हास्य म्हणून कधीं दिसलें नाहीं. पण आतां आमच्या वाड्यांतल्या लोकांना तुझी खरी हकीकत कळल्यापासून प्रत्येक जण हंसतां हंसतां बेजार होत आहे.'

स्वैपाकीण–काकूबाई–यांच्यासंबधानें सुभाषिणीनें पत्रांत असें लिहिलें होतें कीं 'तूं आपल्या यजमानाकडे गुपचूप पळून गेलीस त्या वेळेपासून थेरडीची तोंडाची टकळी सारखी सुरू होती. ती म्हणे मीं तिला ओळखून ठेविलें होतें कीं ही पोरगी कांहीं चांगल्या चालीची नाहीं. तुमच्यासारख्या थोरामोठ्यांच्या घरांत ठेवण्यासारखी ही दिसत नाहीं. हिला काढून द्याल तर बरें होईल. पण माझ्यासारख्या गरीब माणसाचें कोण ऐकणार ? सगळेजण कुमुदिनी, कुमुदिनी, म्हणून तिची उदोउदो करीत होते.' अशा

एक की दोन ? पुष्कळच गोष्टी सुभाषिणीच्या पत्रांत लिहिलेल्या होत्या. आणखी असेंहि लिहिलें होतें कीं, पुढें काकूबाईना जेव्हां कळलें कीं, तूं दुसऱ्या कोणाचा हात धरून गेली नाहींस तर आपल्या यजमानाबरोबरच गेलीस तेव्हां त्यांच्या बोलण्याचा रगहि तत्काळ पालटला ! त्या म्हणूं लागल्या, ' मीं तिला पाहतांच ओळखून ठेविल होतें कीं, ही मुलगी मोठ्या घरची आहे. गरीबाच्या मुलीची चालवलणूक आणि स्वभाव हीं कांहीं निराळींच असतात ! मोठ्यांचें वर्तन त्यांच्या मोठेपणाला साजेल असेंच असतें. चांगलें झालें. फार आनंद झाला. पण या आनंदाप्रीत्यर्थ तिनें मला कांहीं इनाम बिनाम पाठविलें आहे काय ?'

सुभाषिणीच्या सासूबाईसंबंधानें तिच्या पत्रांत असा मजकूर होता— ' त्यांना तुझी सारी हकीकत कळली, तेव्हां त्यांनीं फार आनंद प्रदर्शित केला; परंतु त्याबरोबर मला व तिकडे बराच ठपकाहि दिला. त्या म्हणाल्या कीं कुमुदिनी येवढ्या मोठ्या घरची मुलगी आहे हें तुम्हांला माहीत होतें तर तुम्हीं वेळींच तें मला सांगायचें असतें. म्हणजे तिच्या थोर योग्यतेप्रमाणें आपल्या घरीं बरदास्त ठेविण्याचा यत्न केला असता. तुझ्या यजमानाचीहि थट्टेथट्टेनें त्यांनीं बरीच निंदा केली. त्या म्हणाल्या, ' स्वतःची बायको असली म्हणून काय झालें ? आमच्या घरीं जर ती स्वैंपाकाला राहिलेली होती तर आमच्या परवानगीवांचून तिला गुपचूप नेली हें कांहीं त्यांनीं चांगलें केलें नाहीं.'

रामरामदत्तबाबूंविषयीं सुभाषिणीनें स्वतःच चार ओळी खरडल्या होत्या. त्या मोठ्या कष्टानें वाचतां आल्या. त्यांत लिहिलें होतें कीं, मामंजीनीं लटका रागाचा आविर्भाव आणून सासूबाईना म्हटलें, ' तुझ्या छळाला कंटाळून कुमुदिनी आपलें घर सोडून गेली, किंवा तूं तिला घालविलीस. सासूबाईना तें खरेंच वाटलें, आणि त्यांनीं ती गोष्ट मनाला लावून घेतली. त्या ज्या अंथरुणावर जाऊन पडल्या त्या सगळ्या दिवसभर निजून राहिल्या. मामंजींनीं चिडविण्यासाठीं थट्टा केली हें सुद्धां त्यांना कळलें नाहीं !'

म्हाताऱ्या काकूबाई व दुसरे किरकोळ नोकरचाकर यांतल्या प्रत्येकाला मीं कांहींना कांहीं तरी इनाम म्हणून पाठविलें हें सांगावयास नकोच.

त्यानंतर माझी व सुभाषिणीची एकदांच भेट झाली. तिच्या मुलीच्या लग्नाच्या वेळीं तिनें फारच आग्रह केला, तेव्हां इकडून मला बरोबर घेऊन जाणें झालें होतें. आम्ही सुभाषिणीच्या मुलीला उंची वस्त्रें आणि अलंकार यांनीं खूप सजविलें. सासूबाईनाहि त्यांच्या योग्यतेप्रमाणें उंची लुगडें दिलें. ज्याची जशी योग्यता त्याप्रमाणें त्याला देऊन सर्वांचा मान ठेविला व आदर केला. सर्वांशीं मोकळेपणानें बोललों चाललों. परंतु मला असें दिसून आलें कीं सुबीच्या सासूबाई माझ्यावर आणि तिकडच्यावर अप्रसन्न होत्या. कारण, मी गेल्यापासून त्यांच्या येथल्या मुलाबाळांना चांगलें अन्न पोटभर खाण्यास मिळालें नाहीं. म्हणून मी एके दिवशीं स्वतः स्वैंपाक करून तो रमणबाबूंला खाऊं घातला. पुनः कधीं त्यांच्या घरीं गेल्यें नाहीं. स्वैंपाक करावा लागेल या भयानें नव्हे तर सुबीच्या सासूबाईच्या मनाला होणाऱ्या दुःखामुळें.

सुबीच्या सासूबाई व रामराम दत्तबाबू हे दोघेहि पुष्कळ दिवसांपूर्वींच परलोकवासी झाले आहेत. पण सुभाषिणीकडे जाण्याचें माझें जमलें नाहीं. मी सुभाषिणीला विसरल्यें नाहीं. या जन्मीं तरी विसरणार नाहीं. सुभाषिणीसारखें माणूस या जगांत दुसरें माझ्या पाहण्यांत आलें नाहीं.

संपूर्ण.

सीताराम.

सीताराम.

खंड पहिला.

[दिवस–गृहिणी.]

प्रकरण पहिलें.

—:o:—

पूर्वीच्या काळीं पूर्व बंगाल्यांत भूषणा नांव ची एक नगरी होती. हिलाच संध्यां ' भूषणो ' म्हणतात. जेव्हां कलकत्ता हे एक क्षुद्र गांव होतं आणि तेथील लोकांना वाघाच्या भीतीने रात्रीं घराच्या बाहेर पडतां येत नसे, तेव्हां या भूषणा नगरींत एक फौजदार राहत असे. त्या वेळचे फौजदार म्हणजे स्थानिक गव्हर्नरच होते. हल्लींच्या स्थानिक मुख्य अधिकाऱ्यांपेक्षां त्यांना पगारहि मोठा असे. अर्थात् भूषणा ही स्थानिक राजधानीच होती हे सांगावयास नकोच.

सुमारें एकशेंऐशीं वर्षांपूर्वींची गोष्ट. एके दिवशीं रात्रीं भूषणा नगरींतल्या एका बोळांत एक मुसल्मान फकीर रस्त्यांत आडवा निजला होता, व त्यामुळें रस्ता बंद झाला होता. अशा वेळीं त्या रस्त्यानें जाणारा एक मनुष्य त्या जागीं येऊन पोंचला. तो मनुष्य मोठ्या त्वरेनें चालला होता. पण फकीरानें वाट अडविलेली पाहून तो खिन्न झाला, आणि तसाच उभा राहिला.

हा रस्त्याने जाणारा मनुष्य जातीनें हिंदु–कायस्थ आणि वयानें तरुण होता. त्याचें नांव गंगारामदास होतें. बिचारा मोठ्या सकटांत पडला;

होता. त्याची आई घरीं मृत्युशय्येवर पडली होती. तिला शेवटची घर-घर लागलेली होती. म्हणून तो लगबगीनें वैद्याकडे चालला होता. पण पाहतो तों वाट बंद !

त्या काळीं मुसलमान फकीरांना मोठा मान असे. खुद्द अकबर बाद-शहाच्या ठायीं इस्लाम धर्माविषयीं विशेषशी आस्था नव्हती तरी एका फकीराच्या आज्ञेंत तो वागत असे. हिंदुसुद्धां फकीरांना मान देत. त्यांना मान न देणारांना मनांतून भय वाटत असे. फकीराला ओलांडून पलीकडे जाण्याचें साहस गंगारामाच्यानें करवलें नाहीं तें यामुळेंच. तो म्हणाला, 'सलाम फकीर साहेब. मला वाट देण्याची मेहरबानी करतां काय ?'

शाह (फकीर) साहेब जागचे हलेनात. फार काय, पण उत्तरसुद्धां देईनात. गंगारामानें हात जोडले आणि म्हटलें, 'अल्ला तुमचें भलें करो. मी मोठ्या संकटांत आहें; मला वाट द्यावी.'

शाहसाहेब मुळींच कांहीं करीनात. गंगारामानें हात जोडले व नम्रपणानें विनवण्या केल्या; पण व्यर्थ ! फकीर जागचा हलेना, आणि बोलेहिना. शेवटीं निरुपायास्तव गंगारामाला त्याला ओलांडून जावें लागलें. ओलांडून जातांना गंगारामाचा पाय फकीराला लागला. पण हीसुद्धां फकिराचीच लबाडी असेल असें वाटतें. गंगाराम बिचारा घाबरून गेला. पण कांहीं न बोलतां तो वैद्याच्या घराकडे चालता झाला. फकीरहि उठला आणि काजी-च्या घराकडे जाण्यास निघाला.

गंगारामानें वैद्याची गांठ घेऊन त्याला आपल्या घरीं नेलें. वैद्यबुवा आले, त्यांनीं रोग्याची नाडी पाहिली, वैद्यकी ग्रंथांतला एक श्लोक म्हटला, औषधासंबंधाच्या दोनचार गोष्टी सांगितल्या आणि रोग्याला कांबळ्या-वर काढण्यास सांगून ते निघून गेले. अखेर कांबळ्यावर रामनामाचा उच्चार करतां करतां गंगारामाच्या आईचा प्राण गेला. नंतर गंगारामानें तिच्या अंत्यविधीसाठीं शेजारीपाजारी गोळा केले, आणि चार चौघांनीं मिळून ती सारी व्यवस्था पार पाडली.

स्मशानविधि झाला त्या दिवशीं तिसरे प्रहरीं गंगारामाची बहीण श्री व दुसरी कांहीं मंडळी गंगारामाच्या घरीं आली असतां दोन हत्यारबंद

शिपायांनीं येऊन गंगारामाला पकडलें. हे शिपाई डोंब जातीचे असल्यामुळें त्यांचा स्पर्श होतांच गंगारामाला चमत्कारिक वाटलें. त्या शिपायांच्या बरोबर रात्रींच्या फकीराला पाहून तो भयभीत झाला, आणि विचारूं लागला, ' मला कोठें नेतां ? मला कां पकडलें ? मीं कोणता गुन्हा केला आहे ? '

शाह म्हणाला, 'काफर ! हरामखोर ! बेतमीज कुठला ! चल, पुढें हो.'

शिपाईहि म्हणाले, ' चल. '

एका शिपायानें तर धक्का देऊन गंगारामाला पुढें ढकललें, आणि दुसऱ्यानें लायेचा तडाखा दिला. एकजण गंगारामाच्या मुसक्या बांधूं लागला आणि दुसरा गंगारामाच्या बहिणीला धरूं लागला. हा प्रकार पाहून तिच्या बरोबर आलेली इतर मंडळी घाबरून कोणीकडच्या कोणीकडे पळून गेली तें कोणाला कळलेंहि नाहीं. शिपायांनीं मारीत मारीत गंगारामाला काजीकडे नेलें. फकीरसाहेब दाढी हलवीत हलवीत व हिंदु लोकांच्या दुर्वर्तनासंबंधानें अतिशय दुर्बोध अशा फारशी व अरबी भाषेंत आपलें वक्तृत्व दाखवीत दाखवीत त्यांच्या बरोबर गेले.

गंगारामाला काजीकडे नेल्यावर त्याच्या चौकशीला प्रारंभ झाला. फिर्यादी शाहसाहेब, साक्षीदारहि शाहसाहेब आणि न्यायाधीशहि शाहसाहेबच ! काजीसाहेब त्यांना पाहतांच आसनावरून उठून उभे राहिले, आणि फकीराचें वक्तृत्व संपल्यावर कुराण, स्वतःचा चष्मा आणि शाहसाहेबांची लांब दाढी, यांचेकडे चांगलें पाहून अखेर त्यांनीं हुकूम सोडला कीं गुन्हेगाराला जिवंत पुरावें. हा शिक्षेचा हुकूम ज्यांनीं ज्यांनीं ऐकला त्यांच्या ...वर तर शहारेच उभे राहिले. गंगाराम म्हणाला, ' जें व्हायचें तें तर ...लेंच. मग आतां मनांत आलें तें करायला कां सोडा ? '

... गंगारामानें शाहसाहेबांच्या थोबाडावर एक लाथ मारली. ... तोबा ' म्हणत तोंडावर हात ठेवून फकीर जमिनविर ... त्याच्या तोंडांत जे दोनचार दांत शिल्लक होते त्यांनाहि ...र्शानें मुक्तिलाभ मिळाला ! इतक्यांत शिपाई धांवून ...गारामाला पकडून काजीच्या आज्ञेवरून त्याच्या

हातापायांत बेड्या ठोकल्या, आणि ज्यांचा कांहीं अर्थच करतां येणार नाहीं असे शब्द-प्रयोग उच्चारीत, शिव्या देत, आणि गचांड्या व लाथा-बुक्क्या मारीत मारीत ते गंगारामाला तुरुंगाकडे घेऊन गेले. संध्याकाळ झाल्यामुळें त्या दिवशीं आणखी कांहीं घडलें नाहीं. त्याला जिवंत पुरण्याचें काम दुसरे दिवसावर टाकावें लागलें.

प्रकरण दुसरें.

ज्या ठिकाणीं वृक्षाखालीं अंग टाकून अस्ताव्यस्त झालेले केस मातींत लोळत आहेत अशा स्थितींत गंगारामाची बहीण शोक करीत पडली होती, त्याच ठिकाणीं वरील बातमी तिला कळली. आपला भाऊ उद्यां जिवंत पुरला जाणार हें ऐकून ती तडकाफडकीं उठली, तिनें डोळ्यांतले अश्रु पुसले, आणि मोकळे सुटलेले केस बांधिले.

गंगारामाची बहीण श्री हिचें वय सुमारें पंचवीस वर्षांचें फार तर असेल. ती गंगारामाच्या पाठची होती.

गंगाराम, त्याची आई, आणि ही श्री येवढींच काय तीं त्याच्या कुटुंबांतलीं माणसें होतीं. पैकीं आई तर अगदीं शरपंजरी पडलेली [illegible] अर्थात् गृहकृत्यांचा सगळा भार श्रीवरच येऊन पडला होता [illegible] ष्ण होती खरी, पण दैवदुर्विलासानें पति [illegible]वेला अंतरली [illegible]

घरांत एक देव-शालिग्राम हा-होता. त्याची नि[illegible] करून थोडासा नैवेद्य दाखविण्यांत येई. श्री व तिची [illegible] शालिग्राम परमेश्वर आहे अशी पूर्ण श्रद्धा होती. श्रीनें [illegible]

देव—घराच्या बाहेर पडतां पडतां मनांत त्याला असंख्य प्रणाम केले. मग हात जोडून ती म्हणूं लागली, ' हे नारायणा ! हे परमेश्वरा ! हे दीन-बंधो ! अनाथांच्या नाथा ! मी आज जें साहसकृत्य करण्याचें योजिलें आहे त्यांत तूं मला साह्य कर. मी अबला—त्यांतून पापी—माझ्या हातून काय होणार ? तुलाच आमची काळजी असूं दे. '

इतकें बोलून श्री घराच्या बाहेर पडली. तिची एक शेजारीण होती. तिला ' पंचूची आई ' असें म्हणत. या शेजारणीशीं तिचा विलक्षण स्नेह जडला होता. ती श्रीच्या आईच्या फार उपयोगीं पडत असे. तिच्याजवळ जाऊन श्रीनें तिच्या कानांत कांहींसें सांगितलें, आणि नंतर त्या दोघी-जणी राजमार्ग ओलांडून अंधेरांत लहान लहान गल्ल्या व बोळ यांतून एका रस्त्यावर आल्या. त्या भागांत पक्क्या वीटबंद इमारती फारशा नव्ह-त्या; पण आतांच्या पेक्षां अधिक होत्या. मधून मधून कांहीं भव्य वाडेहि दिसत होते. या दोघीजणी चालत चालत एका मोठ्या वाड्याच्या समोर येऊन उभ्या राहिल्या. वाड्याच्या समोर पाण्याचें एक मोठें कुंड होतें व त्याला फरसबंदी घाट बांधलेला होता. या घाटावर दारींवरचे कांहीं पाहारेवाले पुरभय्ये बसले होते. यांतले कोणी भांग घोटीत होते; कोणी टप्पा गात होते आणि आपल्या देशच्या आठवणी काढण्यांत चूर झाले होते. त्यांच्यापैकीं एकाला हाक मारून पंचूची आई म्हणाली, 'पांडेजी ! अंमळ कोठावळे साहेबांना बोलावाना ?' तो म्हणाला, ' हम पांडे नहीं, हम मिशर होते हैं. '

पं. आईः—मला ठाऊक नव्हतें बेटा ! मिशर ब्राह्मण पांडे ब्राह्मणा-पेक्षां उच्च दर्जाचे असतात.

येवढ्यानें मिश्रदेव खुष झाले, आणि म्हणाले, 'तुम भांडारी लेके क्या करोगे ? '

पं. आः—दुसरें काय काम असणार ? माझ्या घरीं वेलाला भोपळे लागले आहेत आणि शेंगा वगैरे दुसऱ्या भाज्याहि झाल्या आहेत. म्हटलें उद्या ते कापून न्या असें त्यांना सांगून जावें.

पाहरेवालाः—आच्छा. हम् बोलेंगे तुम् घरपर जाव.

पं. आः—तुमच्या सांगण्यानें त्यांना माझ्या घराचा पत्ता कसा कळणार ? कोणाच्या घरीं जायचें म्हणून त्यांनीं समजावें ?

पाहारेवालाः—आच्छा तुमारा नाम बोलकर जाव.

पं. आः—बेटा ! दुर्दैवी दिसतोस. मी तुलाहि एखादा भोपळा देणार होत्यें; पण तुझ्या नशिबांत नाहीं.

पाहारेः—आच्छा. खडे रहो. हम भांडारीकों बुलाते हैं.

असें म्हणून मिशर भैया गाणें गुणगुणत वाड्यांत गेला आणि लवकरच जीवन नांवाच्या कोठावळ्याकडे जाऊन म्हणाला कीं एक भाजीवाली बाई आली आहे. ती मला कांहीं भाजी देणार आहे. तुम्हांलाहि कांहीं मिळेल. लवकर बाहेर येऊन तिला भेटा.

जीवनची उमर थोडीशी पोक्त होती. त्यानें कमरेला किल्ल्यांचा झुबका खोंविला होता. त्याची मुद्रा रुक्ष होती. लाभाच्या आशेनें तो चटकन् उठला आणि बाहेर येऊन पाहूं लागला, तों दोन बाया उभ्या असलेल्या दिसल्या. त्यानें विचारलें, ' मला कोणीं बोलाविलें ? '

पंचूची आई म्हणाली, ' माझ्या घरीं थोडीशी भाजी निघाली आहे, ती घेऊन जा हें सांगण्यासाठीं मी आल्यें आहें. थोडी तुम्ही घ्या, थोडी दिवाणजींला द्या आणि धनीसाहेबांनाहि थोडी द्या. '

जीवनः—तुमचें घर कोठें आहे तें सांगून जा. मी उद्यां येईन.

पं.आः—आणखी, ही एक दुःखी अनाथ पोर आली आहे. तिचें म्हणणें एकदां ऐकून घ्या.

तोंडावर गळ्यापर्यंत बुरखा घेऊन आणि भिंतीला टेकून श्री उभी होती. तिच्याकडे पाहून जीवन रुक्ष स्वरानें म्हणाला, ' हे पहा, भिक्षेभिक्षेबद्दलची गोष्ट यजमान साहेबापाशीं मी काढूं शकत नाहीं. '

यावर पंचूची आई अस्फुट स्वरानें म्हणाली, ' असें काय करतां ? तिला जें कांहीं मिळेल त्यांतलें अर्धें तुम्हांला मिळेल. '

हें ऐकून कोठावळे साहेबांची मुद्रा प्रसन्न झाली, आणि ते म्हणाले, ' काय बाई तुझें म्हणणें आहे ? '

भिक्षेकऱ्यांना त्या वाड्यांत मुक्तद्वार होतें. श्रीनें आपली भिक्षेची

इच्छा दर्शविली तेव्हां अर्थातच तिला यजमानाकडे नेणें कोठावळ्याचें कर्तव्यच होतें.

तिला यजमानापर्यंत पोंचवून जीवन धन्याच्या आज्ञेप्रमाणें चालता झाला. श्री दारापाशीं उभी राहिली. बुरख्याच्या आंत ती रडत होती. यजमानानें विचारलें, 'तूं कोण ?'

श्रीः—मी श्री.

' श्री ! तूं मला ओळखलें नाहींस वाटतें ? मला न ओळखतां इकडे आलीस ? मी कोण तें तुला ठाऊक आहे ना ? मी सीताराम राय. '

तेव्हां श्रीनें तोंडावरचा बुरखा काढला.आणि अश्रुपूर्ण व वर्षाकाळांतल्या पाण्यानें धुतलेल्या कमळासारखे तिचे नेत्र व अव्यंग सुंदर मुख, पाहून सीताराम म्हणाला, 'तूं श्रीच काय ? इतकी सुंदर !'

श्री म्हणाली, ' मी फार दुःखांत आहें. असें लावून बोलणें या वेळीं योग्य नाहीं.' असें म्हणून ती रडूं लागली.

सीताः०—फारा दिवसांनीं आतां कां आलीस ? आणि रडण्याचें कारण काय ?

हा प्रश्न ऐकून श्री रडूं लागली. पण कांहीं बोलेना. सीताराम म्हणाला 'जवळ ये.'

तेव्हां श्री अतिशय कोमल स्वरानें म्हणाली, 'मी बिछायतीला विटाळणार नाहीं. मी सुतकी आहें.'

सीता०—कोणाचें सुतक ?

सद्गदित कंठानें डोळ्यांत अश्रु आणून श्री म्हणाली, ' माझी आई आज वारली. '

सीता०—अशा संकटांत पडल्यामुळेंच कां तूं आज मजकडे आलीस?

श्रीः—नाहीं. आईचे दिवस मी कसे तरी करीन. त्यासाठीं आपणास तसदी द्यायाला मी आल्यें नाहीं. पण आज माझ्यावर दुसरेंच एक संकट आलें आहे.

सीता०—तें कोणतें ?

श्रीः—माझा भाऊ काजीसाहेबांच्या हुकुमावरून उद्या जिवंत पुरला जाणार आहे. तो सध्या कैदखान्यांत आहे.

सीता०—का बरें ? त्यानें असा कोणता गुन्हा केला आहे ?

यावर श्रीनें जें जें कांहीं ऐकलें होतें व स्वतः पाहिलें होतें तें तें हलक्या स्वरानें रडत रडत साग्र सांगितलें. ती हकीकत ऐकून सीतारामानें लांब उसासा टाकून विचारलें, 'मग यावर इलाज ?'

श्रीः—आतां इलाज आपणच. म्हणून तर इतक्या वर्षांनीं आज आल्ये-

सीता०—थाला मी काय बरें करावें ?

श्रीः—आपण काय करावें म्हणून विचारतां ? आपणावांचून दुसरें कोण करणार ? आपण मनावर घेतलें तर सर्व कांहीं होईल हें मी पुरतें-पणीं जाणत्यें.

सीता०—हा काजी दिल्लीच्या बादशहाचा नोकर आहे. त्या बाद-शहाशीं विरोध करण्याचें सामर्थ्य कोणाच्या अंगांत आहे ?

श्रीः—तर मग यावर कांहींच उपाय नाहीं असें का आपलें म्हणणें आहे ?

बराच वेळ विचार करून सीतारामानें उत्तर केलें, 'उपाय आहे. तुझ्या भावाला वांचवितां येईल. पण त्याच्यासाठीं मला माझे प्राण खर्ची घालावे लागतील.'

श्रीः—असें म्हणूं नका. जगांत अजून देव आहे, धर्म आहे, हें कांहीं मिथ्या नाहीं. दीन दुःखी प्राण्याचा जीव आपण वांचविला तर आपलें कधींसुद्धां अमंगल होणार नाहीं. हिंदूचें रक्षण हिंदूनें न केलें तर दुसरा कोण करणार ?

सीतारामानें यावर बराच वेळ विचार केला. मग तो म्हणाला, 'तुझें म्हणणें खरें आहे. हिंदूचें हिंदूनें रक्षण न केलें तर दुसरा कोण करील ? ठीक आहे. मी वचन देतों कीं गंगारामासाठीं मीं शक्य तेवढें सगळें करीन.'

हें ऐकून श्रीचा जीव स्वस्थ झाला, आणि तोंडावर बुरखा घेऊन ती चालती झाली.

सीतारामानें दाराला आंतून कडी घातली आणि नोकराला सांगितलें कीं मीं जोंपर्यंत दार उघडणार नाहीं तोंपर्यंत मला कोणी हाक मारूं नये. पुनः एकवार त्यानें आपल्या मनाशीं विचार केला. तो म्हणाला, 'श्री इतकी सुंदर असेल असें वाटलें नव्हतें. अगोदर तिचें काम करायचें मग बाकीच्या गोष्टी.' तो पुनः मनांत म्हणाला, 'हिंदूचें रक्षण हिंदूनें न केलें तर दुसरें कोण करणार ?'

प्रकरण तिसरें.

सीतारामाचा एक गुरु होता. त्याच्या अंगावर तसर जातीचें जाडें भरडें रेशमी वस्त्र होतें. त्याच्या काठांतून रंगीत धाग्यानें देवाची नामावली गुंफिली होती. डोकें तासून गुळगुळीत केलेलें होतें. मध्यें नांवाला मात्र रेफासारखी शेंडी होती. केसांची उणीव चंदनानें पूर्णपणें भरून काढली होती. इतर बाबतींत तो बाकीच्या ब्राह्मणांसारखाच होता. त्याचें नांव चंद्रचूड तर्कालंकार. सीतारामाचें तो अत्यंत हित चिंतणारा होता. जेथें सीताराम तेथेंच त्याचेंहि वास्तव्य असे. सध्यां तो भूषणा येथें राहत असे. सध्याच्या काळींसुद्धां आमच्या पाहण्यांत एक दोन असे अध्यापक आहेत कीं ते पाठशाळेंत व्याकरण–साहित्यादि विषय शिकाविण्यांत जसे कुशल, तसेच चांगलासा बंदोबस्त नसलेल्या ठिकाणीं दंगेधोपे करण्यांतहि चांगले पटाईत आहेत. चंद्रचूडगुरुजी याच वर्गांतले होते.

कांहीं वेळानें सीताराम घराबाहेर पडून आपल्या गुरुजीच्या घरीं गेला. तेथें गुरुजींशीं त्यानें एकांतांत कांहीं खलबत केलें. त्यांचें काय बोलणें

झालें तें येथें सविस्तर सांगण्याचें कारण नाहीं. त्यांच्या संभाषणाचें येवढें फळ दिसलें कीं ते दोघेही रात्रीं घराबाहेर पडले आणि शहरांतल्या पुष्कळ लोकांच्या गांठी त्या दोघांनीं घेतल्या. रात्र सरतां सरतां सीताराम घरीं परत आला, आणि आपल्या कुटुंबांतल्या सगळ्या माणसांना त्यानें एका विश्वासू माणसाबरोबर मधुमती नदीच्यापार एका ठिकाणीं पाठवून दिलें.

प्रकरण चौथें.

शहराबाहेर एका विस्तीर्ण पटांगणांत गंगारामासाठीं कबर तयार करण्यांत आली होती. बंदिवानाला तेथें आणण्यापूर्वींच लोक जमायाला लागले होते.

अतिशय पहाटेस--ज्यावेळीं अंधकार वृक्षांचा आश्रय करून राहिला होता आणि त्या अंधकाराच्या आश्रयापासून नक्षत्रें दूर झालीं नव्हतीं अशा वेळीं–जिवंत माणसाची समाधि पाहण्याच्या उत्सुकतेनें माणसांच्या झुंडींच्या झुंडी लोटत होत्या. जणूं काय माणसाचें मरण ही एक महापर्वणीच त्यांना वाटत होती ! सूर्योदयाच्या वेळेपर्यंत तर तें मैदान माणसांनीं बहुतेक भरून गेलें होतें, तरी अजून शहराच्या गल्लयांतून आणि रस्त्यांतून येणाऱ्या माणसांची मुंग्यांच्या सारखी रांग लागून गेली होती. शेवटीं त्या अफाट मैदानांतहि कोठें पाऊल ठेवण्याइतकी सुद्धां जागा रिकामी राहिली नाहीं. तेव्हां प्रेक्षक मंडळी जागोजाग झाडांवर माकडाप्रमाणें चढून बसलेली दिसली. पुच्छाचा अभाव येवढेंच काय तें एक

वैगुण्य होतें. कोठें झाडावर बसून लोक पाकोळ्यांसारखे झोके घेत होते. उजाडल्यावरहि त्यांचे झोके चालले होते येवढीच काय ती त्यांच्या ठायीं विशेष गोष्ट होती. शहरांतल्या पक्क्या वीटबंदी घरांच्या गच्चांवरून माणसांची इतकी गर्दी झालेली दिसत होती कीं कोठें तीळ ठेवायला जागा नव्हती. मातीच्या घराला शिड्या लावून त्यांच्या पायऱ्यांवरून चढून धाब्यांवर जाऊन लोक बसले होते. मैदानांत तर काळ्या डोक्यांचा समुद्रच भरलेला दिसत होता. जिकडे पहावें तिकडे गर्दी आणि ठेचाठेची ! लोक येताहेत, गर्दी करताहेत, जाताहेत, येताहेत, फिरताहेत, आणि गर्दीत मिसळताहेत, असें चाललें होतें. गलबला तर कांहीं विचारूं नका—अतिशयच भयंकर ! बंदिवानाला अद्याप आणिलें नाहीं म्हणून प्रेक्षक फारच अधीर झालेले दिसत होते. आरोळ्या, भांडणें, बडबड; मान्यामान्या, इत्यादिकांना सुरुवात झाली होती. हिंदू मुसलमानांना शिव्या देत होते, आणि मुसलमान हिंदूंवर अपशब्दांचा वर्षाव करीत होते. कोणी 'अल्ला अल्ला' म्हणत होते, तर कोणी रामनामाचा गजर करीत होते. कोणी म्हणत होते कीं 'आज नाहीं शिक्षा देत, आपण घरीं जाऊं या,' तर कोणी म्हणत 'तो पहा बंदिवान आला.' झाडांवर चढून बसलेले लोक हातापायांला कांहीं उद्योग नसल्यामुळें झाडाचीं पानें, फुलें किंवा लहान लहान डहाळ्या तोडून खालच्या माणसांच्या अंगावर टाकीत होते. कोणाचें तेवढ्यानें समाधान न होऊन ते वरून खालीं थुंकत होते. अशा कारणांनीं जेथें जेथें म्हणून झाडें होतीं तेथें तेथें झाडांवर बसलेले लोक आणि खालीं उभी असलेली मंडळी यांच्यांत भांडणें जुंपलेलीं दिसत होतीं. एका झाडाखालीं मात्र तसा कांहीं प्रकार दिसत नव्हता. त्या झाडाखालीं लोकांची विशेषशी गर्दीहि नव्हती. समुद्रांतल्या लहानशा निर्जन बेटाप्रमाणें हें स्थळ बहुतेक निर्जनच होतें. पांचचार माणसें तेथें होतीं, पण तीं गडबड करीत नव्हतीं. तीं अगदीं मुकाट्यानें उभीं होतीं. कोणी परकें माणूस तेथें आलें म्हणजे मात्र ते त्याला अर्धचंद्र देऊन तेथून घालवून लावीत होते. त्यांचीं धष्टपुष्ट शरीरें आणि हातांतले जाड सोटे पाहूनच

लोक मुकाटबानें तेथून चालते होत असत. त्या झाडाच्या मुळावर उभी राहून आणि हातानें एका फांदीचा आधार घेऊन एक स्त्री वर मान करून झाडावर बसलेल्या दुसऱ्या एका माणसाशीं बोलत होती. तिचे डोळे सुजले होते आणि अंगावरचीं वस्त्रें व केस हीं अस्ताव्यस्त झालेलीं दिसत होतीं. यावरून ती रात्रभर रडत होती असें दिसत होतें. या वेळीं ती रडत नव्हती. झाडावर बसलेल्या माणसाला ती म्हणत होती कीं ' महाराज ! अजून कांहीं दिसूं लागलें नाहीं ना ?

झाडावर बसलेला माणूस म्हणाला, ' नाहीं.'

स्त्री०—तर मग वाटतें कीं नारायणानें वांचविलें.

ही स्त्री म्हणजे श्री हें वाचकांनीं ताडलेंच असेल. झाडावर बसलेला माणूस म्हणजे चंद्रचूड तर्कालंकार हा होय. झाडाची फांदी हें स्थान त्यांच्यासारख्या माणसाला बसण्याला योग्य नव्हतें. पण त्यानें मनांत विचार केला कीं आपण धर्मकृत्य करणारे. धर्मासाठीं सगळें कांहीं करावें लागतें. श्रीच्या शब्दाला उत्तरादाखल तो म्हणाला, ' नारायण अवश्य रक्षण करील. माझी तर त्याच्यावर पूर्ण श्रद्धा आहे. तूं उतावीळ होऊं नकोस. पण अजून रक्षणाचा उपाय झाला नाहीं असें दिसतें. कांहीं लाल पगडीवाले आलेले दिसत आहेत. '

श्री०—लालपगडीवाले कोण ?

चंद्र०—दुसरे कोण ? फौजदाराचे शिपाई असावेत.

खरोखरच दोनशें सशस्त्र शिपाई गंगारामाला पकडून तेथें आणीत होते. त्यांना पाहतांच जमलेले असंख्य लोक एकदम स्तब्ध झाले. चंद्रचूडाच्या दृष्टीला जें जें कांहीं पडे तें तें तो श्रीला सांगत होता.

श्रीनें विचारलें, ' किती शिपाई आहेत ?

चंद्र०—दोनशें असतील.

श्री—आम्ही आपले गरीब-बापडे—आम्हांला कोणी साह्यकर्ता नाहीं. आम्हांला मारायला इतके शिपाई हवे होते कशाला ?

चंद्र०—पुष्कळ लोक जमले आहेत, तेव्हां न जाणो कांहीं दंगा-

फिसाद होईल अशी शंका येऊन फौजदारानें इतके शिपाई पाठविले असावेत असें वाटतें.

श्री--बरं, आणखी कांहीं घडलेलें दिसतें काय ?

चंद्र०--शिपाई येऊन रांगेनें कबरेपाशीं उभे राहिले आहेत. मध्यें गंगाराम उभा आहे. मागें खुद्द काजीसाहेब आहेत, आणि तो फकीरहि आहे.

श्री--दादा काय करतो आहे ?

चंद्र०--चांडाळांनी गंगारामाच्या हातांत हातकड्या आणि पायांत बेड्या घातल्या आहेत.

श्री--तो रडतो आहे काय ?

चंद्र०--नाहीं. अगदीं स्तब्ध उभा आहे. त्याची चर्या अगदीं गंभीर आणि सुंदर दिसत आहे.

श्री--मला नाहीं का हो पहातां येणार ? एकदां शेवटचें दर्शन घेतां आलें तर डोळ्याचें पारणें फिटेल.

चंद्र०--हो. पाहण्याची सोय आहे. तुला या खालच्या फांदीवर चढतां येईल ?

श्री०--मी पडल्यें बायको माणूस. झाडावर कोणाला चढतां येतें ?

चंद्र.--ही लाज धरण्याची वेळ नाहीं.

झाडाच्या बुंध्यापासून दोन हातांच्या उंचविर एक सरळ फांदी होती. ती वर उंच न जातां सरळ होऊन समोर गेलेली होती: हातभर अशी गेल्यावर ग तिला दोन फाटे फुटले होते. त्या दोन फाट्यांवर दोन पाय देऊन व जवळची एक फांदी हातानें धरून उभे राहण्याची चांगली सोय होती. चंद्रचूडानें ती श्रीला दाखविली. श्रीनेंहि या वेळीं लाजबीज सगळी गुंडाळून ठेवून चढण्याचा प्रयत्न केला. स्मशानांत कसली आली आहे लज्जाबिज्जा ?

प्रथम एक दोन वेळां प्रयत्न केला, तो फुकट गेला. चढतां येईना. म्हणून ती रडूं लागली. पण मागाहून तिनें काय खुबी केली कोण जाणे ! खुद्द श्रीलासुद्धां तें कळलें नाहीं. ती खालच्या फांदीवर चढली

आणि दोन फांद्यांवर दोन पाय ठेवून दुसरी एक फांदी हातानें धरून ताठ उभी राहिली.

इतक्यांत जमलेल्या लोकांत बरीच खळबळ उडाली. जेथें श्री उभी होती तेथें समोर पानांचा आड-पडदा नव्हता. त्यामुळें श्री असंख्य लोकांना आपल्या समोर उभी असलेली दिसत होती. एक अतिशय लावण्यवान् अशी कोणी स्त्री झाडाच्या फांदीच्या आधारानें त्या श्यामल-वर्ण पर्णराशींत विराजमान झालेली आहे येवढें त्यांना दिसलें. देवीच्या प्रतिमेप्रमाणें चोहीं बाजूंनीं झाडांच्या फांद्या, व पानें यांनीं ती वेष्टित होती. तिच्या डोक्यावर, खांद्यावर, वक्षःस्थळावर, केसांवर, जिकडे पहावें तिकडे पानेंच पानें लागलेलीं दिसत होतीं. खालीं दोन फांद्यांनी तिचे पाय झांकून टाकिले होते. त्यामुळें ही साक्षात् वनदेवता कशा-वर उभी आहे तें कोणाला दिसत नव्हतें. सोसाटयाच्या वाऱ्यानें खवळलेल्या समुद्राप्रमाणें तो जनसमूह या वेळीं दिसत होता.

श्रीच्या लक्षांत ती गोष्ट मुळींच आली नाहीं. आपण कोठें आहों व काय चाललें आहे या गोष्टीकडे तिचें लक्षच नव्हतें. ती डोळ्याचें पातें न लववितां एकसारखी टक लावून गंगारामाकडे पहात होती. तिच्या दोन्ही डोळ्यांतून सारख्या अश्रुधारा वाहत होत्या. इतक्यांत वरच्या फांदीवरून चंद्रचूड म्हणाला, 'इकडे बघ, इकडे बघ! घोड्यावर बसून कोण येत आहे!'

श्रीनें त्या दिशेकडे पाहिलें. निःशस्त्र असा एक वीर एका तेजस्वी घोडीवर बसून येत होता. पण लोकांच्या गर्दीमुळें त्याला पुढें जाता येईना. घोडी नाचत होती, डोलत होती, व मान वाकडी करीत होती पण तिचें पाऊल पुढें पडेना. हा तरुण स्वार सीताराम आहे असें श्रीनें ओळखलें.

इकडे गंगारामाला शिपाई कबरींत लोटीत होते. इतक्यांत सीता-रामानें दोन्ही हात वर करून त्यांना मना केलें. तेव्हां शिपाई स्वस्थ उभे राहिले. शाहसाहेब म्हणाले, ' क्या देखते हो ! काफिरको मट्टी देओ. '

काजी साहेब विचार करूं लागले. त्यांना त्या वेळीं तेथें येण्याचें कांहीं प्रयोजन नव्हतें. केवळ लोक जमले म्हणून मौजेखातर तेहि आले होते. ज्या अर्थी ते आलेच होते त्या अर्थी तेथें त्यांच्याच हुकुमाप्रमाणें साऱ्या गोष्टी चालल्या होत्या. ते म्हणाले, 'सीताराम मना करीत आहे त्याला कांहीं तरी कारण असलें पाहिजे. म्हणून तो येऊन पोंचेपर्यंत थांबा.'

यानें शाहसाहेबांची मर्जी गेली. पण करतात काय ? सीताराम येऊन पोहोंचेपर्यंत त्याना थांबावेंच लागलें. हा प्रकार पाहून गंगारामाच्या मनांत थोडासा आशेचा संचार झाला.

सीताराम काजीसाहेबाजवळ जाऊन पोहोंचला. त्यानें घोडीवरून उतरून प्रथम शाहसाहेबांना लवून सलाम केला, नंतर काजी साहेबांनाहि तसाच सलाम केला. मग काजीसाहेबांनीं विचारलें, 'रायसाहेब ! कसें काय आहे ? आपली मिजाज तर ठीक आहे ना ?'

सीता०—अलहम् दुल्ला इल्ला ! हुजूरची खुष मिजाज असल्याचें कळल्यानें हा बंदा कृतार्थ होईल.

काजी—खुदाची या दासावर कृपादृष्टी आहे म्हणून तर काळ्याचे पांढरे केस झाले आहेत; आपलें सर्व ठीकठाक आहे ना ?

सीता०—हुजूरची कृपादृष्टि असल्यावर अमंगल घडण्याचा संभवच नाहीं.

काजी—या वेळीं येथें येण्याचा हेतु काय ?

सीता०—हा गंगाराम दुर्दैवी, उर्मट कसाहि असला तरी तो माझा जातभाई आहे. त्यामुळेंच मोठ्या दुःखानें हुजूरपाशीं आलों आहें. याला जीवदान देण्याविषयीं हुकूम व्हावा.

काजी०—असें कसें होईल ?

सीता०—आपण मेहेरबान व दयाळु आहां. आपणाला करतां येणार नाहीं असें काय आहे ?

काजी—खुदा मालिक आहे. मला या विषयांत कांहीं करतां यावयाचें नाहीं.

सीता०—एकहजार मोहोरा दंडादाखल देतों. प्राणदान देण्याचा हुकूम व्हावा.

काजीसाहेब फकीराच्या तोंडाकडे पाहूं लागले. फकीरानें मान हलविली. काजी म्हणाला, ' तें कांहीं होणार नाहीं. काफरको कब्रमें डालो.'

सीता०—दोन हजार मोहोरा देतों. हात जोडून विनंति करतों. एवढी विनंति माझ्या खातर तरी ऐकावीच.

काजीनें पुन: फकीराच्या तोंडाकडे पाहिलें. फकीरानें 'नाहीं' म्हटलें. अर्थात् ती गोष्ट नामंजूर झाली. अखेर सीताराम चार हजार मोहोरा देण्यास तयार झाला. तरी नाहीं. पांच हजार मोहोरा कबूल केल्या तरी नाहीं. शेवटीं सीतारामानें गुडघे टेकले व हात जोडले आणि करुण स्वरानें म्हटलें, 'यावर माझ्याजवळ कपर्दिकहि नाहीं. तरी पण माझ्याजवळ इतर जें कांहीं आहे तें सारें—जमीन जुमला, जडजवाहीर, घरदार सर्व कांहीं—घ्यावें आणि याला सोडून द्यावें.'

काजीसाहेबांनीं विचारलें, ' याच्यासाठीं तुम्ही आपलें सर्वस्व द्यायला काढतां असा हा तुमचा कोण लागतो ?

सीता०—तो माझा कोणी असो कीं नसो. त्याचा प्राण बांचविण्याचें आश्वासन मी देऊन चुकलों आहें. तेव्हां आतां याच्यासाठीं सर्वस्व खर्चीं घालून याचे प्राण वांचविणें हा आमचा हिंदूचा धर्म आहे.

काजी०—हिंदुधर्म कसाहि असो, मुसलमानधर्म त्याहून थोर आहे. या माणसानें मुसल्मान फकीराचा अपमान केला आहे. याचा प्राण घेतलाच पाहिजे. काफराला प्राणदंडाहून अन्य दंड नाहीं.

हें ऐकून सीतारामानें गुडघे टेकून काजीसाहेबांच्या चोग्याचा पदर धरला आणि सद्गदित कंठानें म्हटलें, ' काफराचे प्राण ! मीहि पण काफरच आहें. माझ्या प्राणानें याच्या अपराधाचें मार्जन होणार नाहीं काय ? मी या कबरेंत उतरतों. माझ्यावर माती लोटावी. मी हरिनामाचा उच्चार करतां करतां वैकुंठलोकास जाईन. माझा प्राण घेऊन या दुःखी माणसाचा जीव बांचवावा. काजीसाहेब ! तुम्हांला शपथ आहे. तुमचा

जो अल्ला तोच आमचा वैकुंठनायक. धर्माचरण करा. मी मरायला तयार आहें. माझ्या प्राणाच्या मोबदल्यांत या माणसाचे प्राण वांचवा.'

हें त्याचें भाषण जवळपासच्या हिंदु प्रेक्षकांनीं ऐकून हरिनामाचा जयघोष केला, आणि टाळ्यांचा गजर करून ते म्हणूं लागले, 'धन्य रायसाहेब ! धन्य महाशय ! काजीसाहेब की जय ! गरीबाला सोडून द्या.'

ज्यांना वरील गोष्टी ऐकूं गेल्या नव्हत्या ते सुद्धां हरिनामाच्या या जयघोषांत सामील झाले. त्यामुळें एकच कल्लोळ झाला. काजीसाहेबांनींहि विस्मित होऊन सीतारामाला विचारलें, 'रायसाहेब ! हे लोक काय म्हणत आहेत ? ज्याच्यासाठीं आपण आपला प्राण देण्यास निघालांत असा हा कोण आहे ?'

सीता०—हा मला माझ्या बंधूपेक्षां, माझ्या पुत्रापेक्षांहि अधिक निकट संबंधी वाटतो. कारण हा मला शरण आलेला आहे. हिंदु-शास्त्राचा हा नियमच आहे कीं शरण आलेल्यासाठीं सर्वस्व द्यावें लागलें तरी बेहेत्तर आहे; पण त्याचें रक्षण अवश्य करावें. उशीनर राजानें स्वतःच्या शरिरांतलें मांस कापून देऊन एका पारव्याचें रक्षण केलें होतें. यासाठीं म्हणतों कीं माझा स्वीकार करा आणि याला सोडून द्या.

सीतारामाचें हें भाषण ऐकून काजीसाहेब थोडेसे प्रसन्न झाल्यासारखे दिसले. त्यांनीं शाहसाहेबाला एकीकडे नेऊन त्यांच्याशीं थोडा वेळ खलबत केलें. ते म्हणाले, 'हा मनुष्य दहा हजार मोहोरा देऊं इच्छितो. त्या घेतल्या तर सरकारी खजिन्यांत चांगली भर पडेल. दहा हजार मोहोरा घेऊन या दुर्दैवी माणसाला सोडून द्यायला कोणती हरकत आहे ?'

शाहसाहेब म्हणाले, 'माझी तर इच्छा आहे कीं या दोघांनाहि एकाच खड्डयांत लोटून समाधि द्यावी. आपलें काय म्हणणें आहे ?

काजी--तोबा ! तोबा ! हें माझ्या हातून घडणार नाहीं. सीतारामानें कांहीं एक अपराध केलेला नाहीं. शिवाय त्याची लोकांत मोठी मानमान्यता असून तो मोठा सदाचरणी आहे. छेः छेः ! तुम्ही म्हणतां ती गोष्ट कदापि होणार नाहीं.

इतका वेळपर्यंत गंगाराम कांहीं बोलला नव्हता. आतां आपली यांतून

सुटका होत नाहीं, हें तो मनांत जाणून होता. पण काजी व शहा यांच्यामध्यें एकीकडे खलबत्त चाललें आहे असें पाहून तो हात जोडून काजीसाहेबाला म्हणाला, 'दयावंत हुजूरची मर्जी काय आहे तें कळत नाहीं. पण या गरीबाच्या प्राणरक्षणाच्या संबंधांत या गरीबाची एक विनंति ऐकून घ्यावी. एकाच्या अपराधासाठीं दुसऱ्याचा जिव घेणें हा काय न्याय म्हणायचा ? सीतारामाचा जीव घेऊन मला प्राणदान करावयाचें असेल तर तें मला मुळींच नको. त्यापेक्षां या हातकडीनें मी आपला कपाळमोक्ष करून घेतों कसा !'

इतक्यांत त्या गर्दींतून कोणी ओरडून म्हटलें, 'हातकडीनें स्वतःचा कपाळमोक्ष करून घे. त्यामुळें मुसलमानांच्या हातून तरी तूं सुटशील.'

हें बोलणारा स्वतः चंद्रचूड हा होता. तो झाडावर नव्हता. एका जमादारानें त्याचे ते शब्द ऐकून म्हटलें, 'पकडा याला.' पण चंद्रचूडाला पकडणें ही कांहीं सोपी गोष्ट नव्हती. त्याला कोणीं धरलें नाहीं.

इकडे हातकडीनें कपाळमोक्ष करून घेण्याची गोष्ट ऐकून फकीराला थोडीशी भीति वाटली. तसें खरोखरच घडलें तर जिवत माणसाला पुरण्याच्या दर्शनसुखाला आपण मुकूं असें वाटून तो काजीला म्हणाला, 'आतां यांच्या हातकड्या ठेवण्याची अवश्यकता दिसत नाहीं. त्या काढण्याविषयीं हुकूम व्हावा.'

काजीसाहेबांनीं तसा हुकूम दिला. तेव्हां लोहारानें पुढें येऊन गंगारामाचे हात मोकळे केले. लोहाराला वस्तुतः तेथें येण्याचें कांहीं कारण नव्हतें. पण सरकारी बेड्या, हातकड्या, वगैरे सगळ्या त्याच्या जिम्मेस असत म्हणून तो या वेळीं तेथें हजर होता. शिवाय त्याच्या येण्यांत कांहीं अंतःस्थ हेतुहि होता. त्या दिवशीं उत्तर रात्रीं त्याला चंद्रचूडाकडून कांहीं दक्षिणा मिळाली होती.

नंतर फकीर म्हणाला, 'आतां विलंब कां ? याला पुरण्याचा हुकूम व्हावा.'

तें ऐकून लोहार म्हणाला, 'बेडी पायांत राहूं द्यायची काय ? सरकारी बेडी आहे. सरकारचें नुकसान नाहीं का होणार ? हल्लीं चांगलें

लोखंड दुर्मिळ झालें आहे, आणि बदमाषांची संख्या तर अलीकडे इतकी वाढली आहे, कीं मी बेडया पुरवितां पुरवितां बेजार झालों आहें.' हें ऐकल्यावर बेडया काढण्याचाहि काजी साहेबांनीं हुकूम दिला व त्याप्रमाणें बेडया काढण्यांत आल्या.

बेडयांतून सुटका झाल्याबरोबर गंगारामानें एकदा इकडे तिकडे पाहिलें आणि नंतर त्यानें एक अद्भुत गोष्ट केली. जवळच सीताराम उभा होता. त्याच्या हातांत घोडयाचा चाबूक होताच. झटकन् त्याच्या हातांतून तो चाबूक काढून घेऊन गंगाराम एक उडी मारून सीतारामाच्या रिकाम्या घोडेविर स्वार झाला, आणि त्यानें घोडीला एक जोराचा तडाखा दिला. त्या तडाख्यानें घोडी चवताळली आणि एका उडींत कबरेच्या पलीकडे जाऊन शिपायांतून लोकांच्या गर्दीतून वाट काढीत गेली. वीज चमकण्याला जितका वेळ लागतो तेवढयांत येवढें सगळें कृत्य उरकलें. हा प्रकार पाहून लोकांच्या समुदायांत हरिनामाचा गजर होऊं लागला. ' पकडो' असें म्हणत शिपाई त्याच्या मागोमाग धावले. परंतु त्यामुळें एकच गर्दी उसळली. घोडीला समोरून येतांना पाहून लोक भयानें बाजूला सरूं लागले, आणि गंगरामाला आयतीच वाट मिळाली. पण शिपायांना वाट मिळेना. लोक दाटी करून त्यांच्यापुढें उभे राहिले. तेव्हां लोकांवर हत्यार चालवून त्यांना आपली वाट काढावी लागली.

इतक्यांत त्यांच्या दृष्टीला एक विलक्षण प्रकार दिसला आणि त्यांना मोठा अचंबा वाटला. तो प्रकार हा कीं कृतांतासारखे कांहीं अत्यंत बळवान् हत्यारबंद पुरुष गर्दीतून एकेक बाहेर पडले व रांगेनें त्या शिपायांच्या समोर उभे राहून त्यांचा मार्ग अडवूं लागले. त्यांना आणखीहि कांहीं शिपाई येऊन मिळाले. हें पाहून ढालतलवार घेतलेले आणखीहि कांहीं हिंदु येऊन अडवणूक करूं लागले. या दोन्ही पक्षांच्या लोकांमुळें तेथें मोठाच दंगा उपस्थित झाला.

हा प्रकार पाहून काजीसाहेब क्रोधयुक्त नजरेनें सीतारामाकडे पाहून त्याला म्हणूं लागले, ' हा काय प्रकार आहे ?'

सीता०—मला तर यांतलें कांहींच कळत नाहीं.

काजी—कळत नाहीं कसें ? मला सगळें कळतें आहे. हा सगळा तुझा खेळ आहे.

सीता०—तसें असतें तर निःशस्त्र होऊन आपल्यापाशीं मृत्युभिक्षेची याचना करण्यास मी आलों नसतों.

काजी—या वेळीं तुझी ती प्रार्थना मंजूर करतों, आणि तुलाच या खड्ड्यांत पुरून टाकतों.

इतकें बोलून काजीनें लोहाराला फर्माविलें कीं 'याच्याच हातापायांत हातकडया व बेडया ठोक.' दुसऱ्या एका माणसाला त्यानें फौजदाराकडे पाठवून दिलें. फौजदारानें आणखी कांहीं शिपाई घेऊन स्वतः यावें असा निरोप घेऊन तो मनुष्य गेला. लोहारानें येऊन सीतारामाला धरलें. हा सगळा प्रकार श्री झाडावरून पहात होती.

इकडे गंगाराम मोठ्या कष्टानें निर्विघ्नपणानें घोडीवर बसून त्या गर्दींतून सुखरूप बाहेर पडला होता. कष्टानें म्हणण्याचें कारण जनसमूहांत मोठीच गडबड उडून गेली होती, आणि भयंकर कल्लोळ माजला होता. लोक धूम पळत सुटले होते. त्यामुळें घोडी भियरून जाऊन आवरेनाशी झाली होती. घोडयावर बसण्याच्या कामांत गंगाराम विशेषसा पटाईत नव्हता. घोडीला संभाळतां संभाळतां बिचाऱ्याला पुरे वाट झाली, आणि त्याची इतकी त्रेधा उडाली कीं इकडे तिकडे नजर फेंकून कोठें काय चाललें आहे तें त्याला पाहतां येईना. केवळ 'मारा मारा' येवढाच शब्द त्याच्या कानीं पडत होता.

या शब्दांचा आकाशांत, रस्त्यांत, झाडींत सर्वत्र प्रतिध्वनि उठत होता. जे लढत होते ते व लढत नव्हते तेहि तो शब्द करीत होते. चारी दिशांमधून हिंदूंच्या तोंडून 'मारा हाणा' हा शब्द निघत होता. आणखी जे हा शब्द करीत होते ते मधून मधून 'जय चंडी माते ! चंडी माता प्रकट झाली आहे' असें मोठ्यानें ओरडत होते. तें ऐकून त्याला विस्मय वाटला. त्याला वाटलें हा काय प्रकार आहे ! इकडे तिकडे नजर फेंकतां एका झाडावर पानांच्या गर्दींत त्याला देवीची मूर्ति दिसली. दोन फांद्यांवर

दोन पाय ठेवून डाव्या हातानें एक फांदी तिनें धरली होती आणि उजव्या हातानें वस्त्राचा पदर उडवून 'मारा! शत्रूला मारा!' असें ती मोठ्यानें म्हणत होती. तिचा पदर उडत होता. मोकळे सोडलेले केसहि वाऱ्यानें उडत होते. तिला चढलेल्या आवेशामुळें तिच्या पायांच्या भारानें खालच्या फांद्या हेलकावे खात होत्या. प्रत्येक हेलकाव्याबरोबर तिची सुंदर देहयष्टि वर खालीं होत होती. जणूं काय सिंहावर आरूढ होऊन ती देवी रणरंगानें नाचत होती, आणि असुरवधानें उन्मत्त होऊन, 'मारा! मारा! शत्रूला मारा' असा घोष करीत होती. श्रीला आतां लज्जा किंवा भय कांहीं वाटत नव्हतें. ती बेहोष झाली होती. तिला विश्रांति घेण्याची जरूरी वाटली नाहीं. 'मारा! शत्रूला मारा! देवांचे शत्रु! हिंदूंचे शत्रु! माझे शत्रु! यांना मारा' असें ती एकसारखी मोठ्यामोठ्यानें ओरडून सांगत होती. तिनें वर केलेला हात किती सुंदर दिसत होता! तिचा फुरफुरणारा ओठ, विस्फारलेलें नाक, विजेसारखे चमकणारे नेत्रकटाक्ष, घामानें डवडवलेलें कपाळ, आणि त्या कपाळावर चिकटून बसलेला तिचा केशकलाप किती शोभायमान दिसत होता! सगळे हिंदु तिच्याकडे पाहत होते, आणि 'जय चंडी माताकी जय' असा जयघोष करीत आवेशानें निघत होते. गंगारामाला प्रथम वाटलें कीं खरोखरच चंडी माता प्रकट झाली आहे. कांहीं वेळानें ती श्री आहे असें त्यानें ओळखलें, तेव्हां तो भयचकित झाला.

या चंडीच्या प्रोत्साहनामुळें आज हिंदूंचा जय झाला. चंडीनें त्यांच्या अंगांत बलसंचार केल्यामुळें त्यांचें तें बळ मुसलमानांना असह्य झालें, आणि ते तोबा तोबा करीत पळत सुटले. लवकरच तेथें एकहि मुसलमान राहिला नाहीं. इतक्यांत एक उंच जवान सीतारामाला खांद्यावर घेऊन चालला आहे, बाकीच्यांनीं त्याला घेरा घातला आहे, आणि सगळे त्या चंडीकडे चालले आहेत असें गंगारामाला दिसलें. आणखी, एक बर्चीवाला मनुष्य शहाशाहेबाचें कापलेलें मुंडकें बर्चीनें छिन्नविच्छिन्न करून बर्चीच्या टोंकावर उंच धरून चंडीकडे चालला आहे आणि त्याच्याभोंवतीं लोकांचा घोळका जमला आहे हेंहि त्याच्या दृष्टीस पडलें. या वेळीं श्री

एकाएकीं झाडावरून खालीं मूर्च्छित होऊन पडली. चंद्रचूडहि तेव्हां झाडावरून खालीं उतरला.

प्रकरण पांचवें.

ह्याच वेळीं एक अशी हूल उठली कीं दंगा करणारांचें पारिपत्य करण्यासाठीं फौजदार तोफा, बंदुका व फौज घेऊन येत आहेत. गोळ्यांच्या मारापुढें ढालतलवारींचें कायचालणार ? अर्थात् लवकरच लोकांचा सगळा जमाव अदृश्य झाला हें सांगावयास नकोच. जे निःशस्त्र वीर आतांपर्यंत आम्हीं लढाई जिंकली अशी प्रौढी मिरवीत कोलाहल करीत होते, ते आतां म्हणूं लागले कीं, ' आम्ही अगोदरच म्हणत होतों कीं लढाई करूं नका म्हणून. ' असें बोलून एकवारहि मागें दृष्टिक्षेप न करतां धापा टाकीत टाकीत ते घराकडे धाव घेत होते. ज्यांचा दंग्याशीं अर्थाअर्थी संबंध नव्हता ते गोम्याच्या अपराधासाठीं सोम्याला फांशीची शिक्षा होण्याचा संभव पाहून गंगाराम व सीताराम यांना नानाप्रकारें दोष देत व करुण स्वरानें आरडत ओरडत पलायन करूं लागले होते. थोडयाच काळांत तेथें कोणी चिट्पाखरूंसुद्धां राहिलें नाहीं. सभोंवतालचा प्रदेशहि पूर्ववत् जनशून्य झाला. नाहीं म्हणायला झाडाखालीं चंद्रचूड, सीताराम, गंगाराम आणि जमीनीवर मूर्च्छित होऊन पडलेली श्री येवढीं काय तीं माणसें तेथें राहिलीं होतीं.

सीताराम गंगारामाला म्हणाला, ' तूं माझी घोडी चोरून घेऊन गेलास तिचें काय केलेंस ? विकून खाल्लीस कीं काय ? '

गंगारामानें हंसत हंसत उत्तर केलें, ' नाहीं महाराज, मी तिला इयेंच मैदानावर मोकळी सोडली. धरून आणून देऊं का ? '

सीता०—धरून पुनः एकदा तिच्यावर स्वार होऊन पळून जा.

गंगा०—काय ? आपणाला सोडून पळून जाऊं ?

सीता०—आपल्या बाईणीविषयीं काळजी करूं नकोस.

गंगा०—आपणाला सोडून मी कोठेंहि जाणार नाहीं.

सीता०—तूं एकदाचा ती मोठी नदी उतरून जा. शामपूर ठाऊक आहे ना ?

गंगा०—तें कसें ठाऊक नसेल ?

सीता०—त्या गांवाला अतिशय त्वरेनें जा. तेथें तुझी व माझी गांठ पडेल. असें न केलें तर मात्र तुझी धडगत नाहीं.

गंगा०—मी आपणाला सोडून जाणार नाहीं.

सीतारामानें भिंवया चढविल्या. तें पाहून गंगाराम चूप बसला, आणि कदाचित् सीताराम पुढें धमकावून बोलेल या भीतीनें तो घोडीच्या शोधासाठीं निघून गेला.

चंद्रचूड सीतारामाचें इंगित ओळखून त्याच्या मागोमाग चालता झाला. इकडे श्री जरा शुद्धीवर आली आणि हलकें हलकें उठून बसून, तिनें तोंडावर बुरखा ओढून घेतला, आणि इकडे तिकडे पाहून उठून उभी राहिली.

प्रकरण सहावें.

सीताराम म्हणाला, ' श्री ! तूं आतां कोठें जाशील ? '

श्रीः—जाण्याला ठिकाण कोठें आहे ?

सीता०—कां बरें ? तुझ्या आईचें घर आहे ना ?

श्रीः—त्या घरांत कोण आहे ? तेथें कोण माझें रक्षण करील ?

सीता०—मग कोठें जाण्याची तुझी इच्छा आहे ?

श्रीः—कोठेंहि नाहीं.

सीता०—मग काय येथेंच राहणार ? हें तर उघडें मैदान आहे. येथें राहणें सुरक्षितपणाचें नाहीं.

श्रीः—कां बरें ? येथें माझें कोण काय करील ?

सीता०—तूं दंग्यांत होतीस. फौजदार तुला फाशीं देईल, मारून टाकील, किंवा अशीच दुसरी एखादी शिक्षा देईल.

श्रीः—फार चांगलें.

सीता०—मी शामपुराला जातों आहें. तुझा भाऊहि तेथेंच जाईल. तेथें तो घरदार करून राहण्याचा संभव आहे. तूंहि तेथेंच जा. तेथें किंवा तुला वाटेल तेथें तूं रहा.

श्रीः—पण तेथें कोणाबरोबर जाऊं ?

सीता०—मी एक माणूस तुझ्याबरोबर देतों.

श्रीः—त्या दुष्ट शिपायांपासून माझें रक्षण करील असा कोणता मनुष्य आपण माझ्याबरोबर देणार ?

सीताराम थोडा वेळ विचारांत पडला, आणि मग म्हणाला, 'चल, मीच तुला पोंचवायला येतों.'

तें ऐकतांच श्री तडकाफडकीं उठली. तिनें वर मान करून शिर

दृष्टीनें सीतारामाच्या तोंडाकडे निस्तब्धपणानें पाहिलें, आणि शेवटीं म्हणाली, 'इतक्या दिवसांनंतर आज असें कसें बोलणें झालें ?'

सीता०—ती गोष्ट समजावून सांगणें कठीण आहे. त्यानें तुझी समजूत पटली नाहीं तर ?

श्रीः—न पटली तर मी आपल्या बरोबर येणार नाहीं. आपण माझा त्याग केल्यावर मीं आपल्यां बरोबर कसें यावें ? यायला हरकत कोणती ? पण आपण माझ्यावर दया करून केवळ माझे प्राण वांचविण्यासाठीं एक दिवस मला आपल्या बरोबर न्यावें अशी आपली दया मला नको आहे. मी आपली धर्मपत्नी—आपल्या सर्वस्वाची अधिकारीण—आहें. आपली नुसती दया मीं कां घ्यावी ? जिचा दुसरा कांहीं हक्क नसेल तिनें आपल्या-दयेची अपेक्षा करावी. महाराज ! आपण जा. मी येत नाहीं. आपल्या-वांचून मी इतके दिवस काढले तसे आतांहि काढीन.

सीता०—बरें तर ये. मी तुला सगळें समजावून सांगतों.

श्री—काय समजावून सांगणार ? मी तुमची सहधर्मिणी: तुम्हांला आणखी दोन स्त्रिया असल्या तरी मी सर्वांत वडील आहें. मी धर्म-पत्नी आहे—कुलटा नाहीं कीं जातिभ्रष्ट नाहीं. आणखी, विवाहानंतर कांहीं दिवसांनीं माझा कांहीं अपराध नसतां आपण माझा त्याग केला. माझा अपराध कोणता तो देखील आपण कधीं मला सांगितला नाहीं. विचारलें तरी उत्तर दिलें नाहीं. इकडच्या अपराधाबद्दल स्वतः प्राणत्याग करावा, इकडच्या पापाबद्दल स्वतः प्रायश्चित्त भोगून आपणाला पापमुक्त करावें असें पुष्कळ दिवसापासून माझ्या मनांत आहे. त्याविषयीं आपल्याकडून कळल्याखेरीज मी येथून जायची नाहीं.

सीता०—तें सगळें मी तुला सांगेन. पण एक गोष्ट तूं अगोदर कबूल कर. ती ही कीं माझें म्हणणें ऐकून घेतल्यानंतर तूं मला सोडून जाणार नाहींस असें वचन दे.

श्री०—मी आपला त्याग करणार ?

सीता०—करणार नाहींस असें कबूल कर.

श्री०—हें काय बोलणें ? ऐकून घेण्याच्या अगोदरच मी वचन कसें देऊं ?

सीता०—पहा ! शिपायांच्या बंदुकींचे आवाज ऐकूं येत आहेत. जे पळून जात आहेत त्यांचा पाठलाग शिपाई करीत आहेत. अशा वेळीं तूं आलीस तर तुला शहराबाहेर घेऊन जातां येईल असें मला वाटतें. क्षणाचा विलंब झाला तर आपणा उभयतांचाहि नाश होईल.

तेव्हां श्री कांहीं एक न बोलतां मुकाट्यानें सीतारामाबरोबर गेली.

प्रकरण सातवें.

सीताराम शहराबाहेर पळून निर्विघ्नपणें नदीच्या तीरापाशीं जाऊन पोंचला. वाटेंत बरींच विघ्नें आल्यामुळें थोडासा विलंब झाला.

आतां रात्र झाली होती. सीतारामानें चांदण्यांत नदीच्या वाळवंटांत बसून श्रीला आपल्या जवळ बसण्यास सांगितलें. त्याप्रमाणें ती बसली. तेव्हां तो म्हणाला, 'आतां जें ऐकण्याची तुला इच्छा झाली आहे तें ऐक. तूं ऐकलें नसतेंस तर बरें होतें.'

'तुझ्याशीं माझा विवाह घडवून आणण्याचें जेव्हां निश्चित ठरलें, तेव्हां माझ्या वडिलांना तुझी पत्रिका पाहण्याची इच्छा झाली होती हें आठवतें कां तुला ? तुझी पत्रिका केलेली नव्हती. अर्थातच तुझ्याशीं माझा विवाह व्हावा या गोष्टीला त्यांनीं संमति दिली नाहीं. पण तुझ्या सौंदर्याकडे पाहून माझ्या आईनें तुलाच सून करून घेण्याचा हट्ट धरला आणि विवाह घडवून आणिला. विवाहानंतर सुमारें एका महिन्यानें आमच्या घरीं एक नामांकित ज्योतिषी आला होता. त्यानें आमच्या सर्वांच्या पत्रिका पाहिल्या.

त्याचें ज्योतिषविद्येंत नैपुण्य पाहून माझ्या वडिलांना फार संतोष वाटला. हरवलेल्या पत्रिका पुनः तयार करून देण्याची विद्या त्याला येत होती, म्हणून माझ्या वडिलांनीं तुझी पत्रिका करण्यास त्याला सांगितलें.

त्याप्रमाणें त्यानें पत्रिका तयार करून आणिली, आणि ती त्यानें बाबांना वाचून दाखविली, आणि त्या दिवसापासून तूं त्याज्य ठरलीस.'

श्रीश०—ती कां ?'

सीता०—तुझ्या पत्रिकेंत बलवान् चंद्र स्वस्थानीं अर्थात् कर्क-राशींत असून शनि तीस अंशांवर होता.

श्री—तसें असलें म्हणजे त्याचें फळ काय ?

सीता०—फळ हेंच कीं ती स्त्री पतीला प्राणघातक होते. अर्थात् ती आपल्या प्रियजनाचा वध करते! स्त्रीचा प्रिय जन म्हणजे अर्थात् तिचा पतिच समजावयाचा. तूं पतीचा घात करणारी म्हणून त्याज्य ठरलीस.

इतकें बोलून सीताराम कांहीं वेळ स्तब्ध राहिला. नंतर पुनः म्हणाला, "जोशीबुवा बाबांना म्हणाले, 'आपण या सुनेचा त्याग करा, आणि मुलाचें दुसरें लग्न करून द्या. कारण, हें पहा कीं जरी स्त्रीला साधारणतः पति प्रिय असतो, तरी एखादीला आपला पति प्रिय वाटत नसला तर पत्रिकेंतलें फळ तिच्या पतीला न भोगावें लागतां दुसऱ्या एखाद्या प्रिय माणसाला भोगावें लागतें. पतिपत्नीची गांठच पडली नाहीं म्हणजे त्यांच्यांत प्रेमहि उत्पन्न व्हावयाचें नाहीं, आणि तो तिला प्रिय वाटला नाहीं म्हणजे त्याचा वध घडण्याचाहि संभव नाहीं. म्हणून आपले चिरंजीव आणि सूनबाई यांचा एकत्र वास घडणार नाहीं आणि त्यांच्यांत प्रेमभाव उत्पन्न होणार नाहीं अशी व्यवस्था करावी.' बाबांना ही सल्ला पसंत पडली आणि त्यांनीं त्याच दिवशीं तुला तुझ्या माहेरीं पाठवून दिलें, आणि मला आज्ञा केली कीं तूं तिचा स्वीकार करूं नकोस किंवा तिच्या सहवासांत राहूं नकोस. या कारणामुळें तेव्हांपासून तुझा त्याग करण्यांत आला."

श्री उठून उभी राहिली. ती कांहीं बोलणार तोंच सीतारामानें तिचा हात धरून तिला बसविलें, आणि म्हटलें, ' अजून माझी गोष्ट संपली नाहीं. बाबा जोंपर्यंत जिवंत होते, तोंपर्यंत मला त्यांच्या आज्ञेंत राहावें लागलें. त्यांनीं केलें तसें होत गेलें.'

श्री—मग आतां ते स्वर्गस्थ झाले म्हणून काय आपण आतां त्यांच्या आधीन नाहीं ?

सीता०—वडिलांची आज्ञा सर्व काळींच मानिली पाहिजे हें खरें आहे, मग ते हयात असोत किंवा स्वर्गस्थ झालेले असोत. पण पित्यानें अधर्माचरण करण्याची आज्ञा केली तर ती थोडीच पाळायची असते ? पिता, माता व गुरू यांच्या आज्ञेनें सुद्धां अधर्म आचरतां येत नाहीं. कारण, आईबापांचाहि आईबाप आणि गुरूचाहि गुरु असा जो भगवान् परमेश्वर त्याची आज्ञा मोडल्यासारखें होईल. माणसानें निरपराधी स्त्रीचा त्याग करणें हा घोर अधर्म आहे. अर्थात् वडिलांची आज्ञा पाळल्यानें मी तो अधर्म करीत आलों आहें. लवकरच मी ही गोष्ट तुला सांगणार होतों. पण—

श्री पुनः उठून उभी राहिली, आणि म्हणाली, ' आपण माझा त्याग केला असूनहि माझ्यावर येवढी दया केली व माझ्या भावाचे प्राण वांचविले यांत आपले सारे गुण आले. आतां मी पुनः आपणास तोंड दाखविणार नाहीं. यापुढें माझें नांवसुद्धां आपल्या कानीं कधीं येणार नाहीं. जोशीबुवा कांहींहि म्हणोत, पतीवांचून स्त्रीला दुसरें कांहींहि प्रिय नसतें. पतीचा सहवास घडो वा न घडो, तो तिला प्रियच असतो. आपण मला सदोदित प्रियच वाटत आलां आहां ही गोष्ट छपविणें मला उचित नाहीं. आतां मी आपणापासून शंभर योजनें दूर राहणार आहें.

इतकें बोलून मागें वळून न पाहतां श्री तेथून तडक चालती झाली. अंधेरामुळें ती कोणिकडे गेली तें सीतारामाला कळलें नाहीं.

प्रकरण आठवें.

सीतारामाच्या मनांत, ती गोष्ट काय आज नव्यानें आली होती ? नाहीं. काल श्रीला पाहिल्यापासून ती त्याच्या डोक्यांत घोळतच होती. काल तरी ती प्रथमच त्याच्या ध्यानांत आली होती काय ? नाहीं कसें म्हणतां येईल ? सीतारामाशीं श्रीचा अगोदरचा परिचय कितीसा होता ? विवाहानंतर उगाच थोडेसें त्यांनीं परस्परांना पाहिलें असेल. तें पाहिलें न पाहिलें सारखेंच म्हणावयाचें. श्री त्यावेळीं अल्पवयस्क बालिका होती. तिच्या मागून सीतारामानें आणखी दोन बायका केल्या होत्या. या दोघी बायका म्हणजे नंदा व रमा या होत. एक वसंत ऋतूंतल्या शुष्क निकुंजांना प्रफुल्लित करणारी अल्प जलयुक्त गंगा आणि दुसरी वर्षा-ऋतूंत पाण्यानें तुडुंब भरून वाहणारी यमुना. या दोन नद्यांच्या संगमांत श्रीरूपिणी सरस्वती कोठें अदृश्य झाली तिचा पत्ताहि लागला नाहीं, यांत नवल काय ?

श्रीची आठवण सीतारामानें ठेवायला पाहिजे होती खरी. पण उचित कार्य असून त्याचें स्मरणहि कोणास राहत नाहीं असा प्रकार नेहमीं घडतो. चांगल्या गोष्टींचें स्मरण व्हावयाला देखील कांहीं निमित्त लागत असतें. रुपया–मोहोरांच्या राशींत लोळणाऱ्या माणसाला एखादी चवली पावली खिजगणतींतहि नसते. तसेंच एकीकडे रमा व दुसरीकडे नंदा यांच्या सहवासांत नेहमीं राहणाऱ्या सीतारामाला श्रीविषयीं वाटत असे. ज्याच्या एका बाजूस चित्रा व दुसऱ्या बाजूस चंद्र आहे त्याला काडवातीच्या प्रकाशाचें अस्तित्व कसें भासमान होणार ? रमा म्हणजे मूर्तिमंत सुख व नंदा म्हणजे मूर्तिमंत संपत्ति. ज्याच्या दोन्ही बाजूंस सुख व संपत्ति यांचा वास असे, त्या सीतारामाला विपत्तीची मूर्ति जी श्री तिचें स्मरण कसें व्हावें ?

तथापि त्या रात्रीं श्रीचा मुखचंद्रमा आणि अश्रुपूर्ण नेत्र दृष्टीस पडल्या-पासून सीतारामाच्या अंतःकरणांत खळबळ सुरू झाली होती. हा काय तिच्या रूपाचा मोह म्हणावा ? छेः ! तसें म्हणतां येत नाहीं. तिचें सौंदर्य, तिच्यावरचा दुःखप्रसंग आणि सीतारामाला स्वतःच्या अपराधा-बद्दलची झालेली जाणीव या तिन्ही गोष्टींचा मिळून तो परिणाम झाला होता. त्यानें शांतपणानें गतगोष्टी ध्यानांत आणुन, त्यासंबंधानें धर्माधर्म व कर्तव्याकर्तव्य याविषयीं निर्णय ठरवून, किंवा गुरू व पुरोहित यांनीं सांगितलेलें पित्राज्ञोल्लंघनाचें प्रायश्चित्त करूनहि असा परिणाम खास झाला नसता.

आदल्या रात्रीं श्रीला सीतारामानें प्रथम पाहिलें. तेव्हांपासूनच त्याचें मन त्याला खाऊं लागलें होतें कीं आपण वडिलांची आज्ञा पाळायला गेलों खरे; पण त्याबरोबर पत्नीत्यागासारखें अधर्माचरण आपल्या हातून घडलें ही फार वाईट गोष्ट झाली. आणि त्याच वेळीं त्यानें आपल्या मनांत निश्चित केलें कीं अगोदर श्रीच्या भावाचे प्राण वांचविण्याचा उद्योग करावयाचा, रमा आणि नंदा यांच्या मनाचें समाधान करावयाचें, आणि नंतर चंद्रचूड गुरुजींचा विचार घेऊन जें कांहीं करणें योग्य दिसेल तें करावयाचें. पण हा आदल्या रात्रींचा विचार दुसरे दिवशींच्या गड-बडींत कुणीकडल्या कुणीकडे वाहून गेला ! अंतर्यामीं उसळणाऱ्या प्रेमाच्या लाटांपुढें वाळूचा बांध कसा टिकाव धरणार ?

श्री एकाएकीं अंधेरांत दिसेनाशी होतांच सतिारामाच्या माथ्यावर जणूं काय वज्रप्रहार झाला!

थोड्या वेळानें तो उठला आणि जिकडे श्री गेली होती तिकडे वेगानें धांवत सुटला. पण अंधेरांत ती कोठेंहि त्याला दिसली नाहीं. त्या जंगलांत निबिड अंधकार होता. क्वचित् स्थळीं वृक्षाच्या खांद्या तोडल्या गेल्यामुळें किंवा कांहीं वृक्षांच्या फांद्यांच्या शुभ्रवर्णामुळें पांढुरका प्रकाश पडलेला दिसत होता. तो पाहून श्रीच तेथें उभी आहे असा भास होऊन सीताराम तिकडे धांव घेई; पण निराशा ही त्याच्या वांट्याला ठेविलेली असे. केव्हां केव्हां श्रीचें नांव घेऊन तो मोठ्यानें हाका मारी.

त्याच्या हाकेला उत्तर मिळे. पण कोणाकडून ? तर नदीकांठच्या वृक्ष-पंक्तीकडून प्रतिध्वनीच्या रूपानें मिळे. वेड्या सीतारामाला वाटे कीं श्रीनेंच आपल्या हाकेला उत्तर दिलें. म्हणून तो त्या प्रतिध्वनीच्या दिशेला जाई. पुनः हाक मारी; पुनः दुसरीकडून प्रतिध्वनि येई. तेव्हां तो तिकडे पळत सुटे ! पण श्री कोठेंहि दिसेना. तेव्हां हाय ! श्री ! हाय ! श्री ! करीत तळमळत असे. अशा रीतीनें सीतारामानें सारी रात्र तेथें काढली; पण श्रीची गांठ पडली नाहीं.

जिला हाक मारावी ती प्राप्त होऊं नये, जिचा शोध करावा ती सांपडूं नये, हलगर्जीपणामुळें सांडलेलें रत्न महत्प्रयासांतींहि पुनः हातीं लागूं नये, याचें कारण काय ? असें सीताराम आपल्या मनाला विचारूं लागला. आपली दृष्टी तर मंद झाली नाहींना ? पृथ्वीवरील निबिड अंधकारानें तर रत्न गिळलें नाहींना ? कां शोध करण्यांत आपलीच कांहीं चूक होत आहे ? अशा शंका त्याच्या मनाला येऊं लागल्या. पुनः शोध करावा, दुसरा काय उपाय आहे ? असें तो मनाशीं म्हणूं लागला. आतां एकट्या श्रीनें त्याच्या मनाचा पूर्ण कबजा घेतला होता. श्रीच्या अनुपम सौंदर्याची माधुरी त्याच्या अंतःकरणांत तरंगावर तरंग उठवीत होती. श्रीच्या अंगचे गुण त्याच्या हृदयांत आतां जागृति करूं लागले होते. वृक्षांवर आरूढ होऊन ज्या देवतेनें आपल्या वस्त्राच्या पदराच्या संचालनानें सैन्याची हालचाल करून रणभूमीवर जय मिळविला, त्या देवतेचें—श्रीचें—सहा मिळाल्यावर सीतारामाला काय अशक्य होतें ?

एकाएकीं सीतारामाला एका गोष्टीचें स्मरण होऊन त्याच्या चित्ताला थोडीशी स्वस्थता वाटली. श्रीचा भाऊ गंगाराम याला त्यानें श्यामपुराला जाण्यास सांगितलें होतें. त्याप्रमाणें तो गेला असेलच असें मनांत येऊन सीतारामहि तिकडे जाण्यास वेगानें निघाला. तेथें गंगाराम त्याची वाटच पाहत होता. गंगारामाला पाहतांच सीतारामानें त्याला अगोदर विचारलें, 'गंगाराम, तुझी बहीण कोठें आहे ?' गंगारामाला या प्रश्नाचा विस्मय वाटून त्यानें उत्तर केलें, 'भला काय ठाऊक ?' तें उत्तर ऐकतांच सीता-

राम खिन्न झाला, आणि म्हणाला, ' एकूण सगळा घोटाळा झाला तर ! ती इकडे आली नाहीं !'

गंगा०—नाहीं.

सीता०—तर मग तूं असाच तिच्या शोधाला जा. तिला पाहून काढल्याशिवाय येऊं नकोस. तोंपर्यंत मी येथेंच राहतों. तुला कांहीं ठिकाणीं हिंडण्याफिरण्यास भीति वाटत असली तर अशा ठिकाणीं दुसऱ्या माणसांना पाठीव. खर्चाकडे मुळींच पाहूं नकोस. माझ्याकडे लागला सगळा खर्च.

गंगाराम सीतारामाच्या बोलण्यांतला अवश्य तेवढा अर्थ समजला, आणि आपल्या बहिणीच्या शोधाला लागला. एक आठवडापर्यंत त्यानें शोध चालूं ठेविला, पण व्यर्थ. शेवटीं निराश होऊन हात हालवीत तो सीतारामाकडे परत गेला.

प्रकरण नववें.

मधुमती नदीच्या कांठीं श्यामपूर नांवाचें गांव होतें. तेथें सीतारामाची वडिलोपार्जित इस्टेट होती. तेथें तो आतां जाऊन राहिला. भूषणा येथील दंगा सीतारामामुळें झाला होता हें सांगावयास पाहिजे असें नाहीं. सीतारामाचे आश्रित, रयत, ऋणको वगैरे बरीच मंडळी भूषणा येथें होती. सीतारामानें दंग्याच्या आदले रात्रीं त्या सर्वांची भेट घेऊन त्यांच्याकडून दंग्याची सगळी तजवीज करून ठेविली होती. यांत त्याचा असा उद्देश होता कीं प्रत्यक्ष आपणांशीं लढाईचा प्रसंग न येतां परभारें दंगा होऊन त्या दंग्याचे गडबडींत गंगारामाला जीव घेऊन पळून जाण्यास मिळालें तर उत्तमच. तंट्यामांडणाचा प्रसंग आलाच तरी हरकत नाहीं. मुसलमान लोकांचा दुष्टपणा फार वाढला होता. त्याला आळा

बसला तर हवाच होता. चंद्रचूड ठाकुराच्या मनाची उडी तर याच्याहि पलीकडे गली होती. मुसलमानांचे अत्याचार इतक्या थराला जाऊन पोंचले होते कीं थोडया तरी मुसलमानांचीं डोकीं फुटल्यावांचून किंवा हातपाय मोडल्यावांचून राहतील ही गोष्ट चंद्रचूडाला अशक्यच वाटत होती. म्हणूनच सीतारामाच्या संमतीची वाट न पाहतां त्यानें दंग्याला आरंभ करून दिला होता. याचा परिणाम जो व्हावयाचा तोच झाला. मुसलमान फकीराचा वध म्हणजे कांहीं सामान्य गोष्ट नव्हती. तो घोर अपराध समजला जात असे. त्यामुळें भयभीत होऊन सीताराम कांहीं कालपर्यंत भूषणा सोडून श्यामपुरास येऊन राहिला होता. त्यां दिवशींच्या दंग्यांत जे सामील झाले होते त्यांना अशी भीति वाटत होती कीं आपण मोठा अपराध केला आहे. एखाद दिवशीं फौजदार आपणास पकडून नेऊन शिक्षा करील. या भीतिमुळें त्यांतले बरेचसे लोक श्यामपुरास सीतारामाच्या आश्रयाला तेथेंच घरें दारें बांधून राहूं लागले होते. सीतारामानें आपले आश्रित, अनुयायी, ऋणको वगैरे सर्वांना बोलावून आणून आपलेपाशीं ठेविलें होतें. यामुळें श्यामपूर हें गांव मूळचें लहान असतां या कारणामुळें तें भरमराटलेलें दिसत होतें.

लोकांना वस्तीला जागा पुरेना, तेव्हां गांवाचा विस्तार करण्याची सीतारामानें परवानगी दिली. जेथें वस्ती मोठी असते, तेथें व्यापारी, दुकानदार, सावकारप्रभृतींचा भरणा व्हावयाचाच. हळूहळू भूषणा येथील दुकानदार, कारागीर, अडत्ये, सावकार वगैरे लोक श्यामपुरास येऊन राहूं लागले. अशा रीतीनें श्यामपुराची वस्ती वाढत जाऊन तेथें बाजारपेठ, गंज, वाडया, हवेल्या, कचेऱ्या वगैरे गोष्टी हळूहळू निर्माण झाल्या. सीतारामापाशीं वडिलोपार्जित संपत्ति बरीच होती. तिचा पुष्कळसा भाग त्यानें नगर शृंगारण्यांत खर्च केला. लोकांची वस्ती वाढल्यामुळें त्याचें उत्पन्नहि वाढलें. होतां होतां सीतारामानें श्यामपुरमध्यें नवी हिंदु राजधानी स्थापन केली आहे असें जो तो म्हणूं लागला. हा लोकप्रवाद हां हां म्हणतां सर्वत्र पसरल्याबरोबर मुसलमानांच्या जुलुमास त्रासलेले, हिंदु धर्माच्या रक्षणासाठीं व्याकुळ झालेले, व हिंदु राज्यांतच राहूं इच्छिणारे, असे हजारों

लोक सीतारामाच्या झेंड्याचा आश्रय करून राहिले. त्यामुळें सीतारामाच्या उत्पन्नांत चांगलीच वाढ झाली. मग त्यानें स्वतःसाठीं एक भव्य राजवाडा, मोठालीं मंदिरें, घाट, तलाव, पक्क्या सडका वगैरे बांधून आपल्या नगराला शोभा व समृद्धि आणिली. हिंदूंचें राज्य स्थापन झालें म्हणून हिंदु प्रजेच्या मनाला मोठें समाधान वाटलें, आणि तिनें मुक्त हस्तानें सीतारामाला करभार दिला. कर भरण्यास ज्याचेजवळ द्रव्य नव्हतें तें शारीरिक श्रम करून नगर शोभिवंत करण्यासाठीं व राज्याचें रक्षण करण्यासाठीं मनोभावानें झटूं लागले.

सीतारामाची उद्योगशीलता आणि हिंदुराज्यस्थापनेविषयीं प्रजेच्या ठायीं असलेला उत्साह यांमुळें अल्पावधींत सगळ्या गोष्टी हव्या तशा घडून आल्या. तथापि सीतारामानें अद्याप ‘ राजा ’ ही पदवी धारण केली नाहीं. कारण, त्याला ठाऊक होतें कीं दिल्लीच्या बादशाहाचे हातून ‘ राजा ’ ही पदवी संपादन न करतां आपण स्वतःच ती पदवी आपल्या नांवामागें लावूं लागलों तर मुसलमान आपणास राजद्रोही समजतील आणि आपला समूळ उच्छेद केल्याशिवाय राहावयाचे नाहींत. आतांपर्यंत सीतारामानें कोणतेंहि राजद्रोही कृत्य केलें नव्हतें. गंगारामाच्या सुटकेसाठीं झालेल्या दंग्यांतहि त्यानें उघडपणें शस्त्र उचललें होतें किंवा उत्साहानें अंग ठेविलें होतें असें फौजदाराला वाटण्यास कांहीं कारण नव्हतें. अर्थात् त्याला राजद्रोही गणण्यास कांहींच पुरावा नव्हता. त्यानें स्वतःला राजा• म्हणवून घेतलें नाहीं इतकेंच नाहीं, तर दिल्लीच्या बादशाहाला सम्राटासारखा मान तो देत असे, वेळचे वेळीं खंडणीचा पैसा बादशाही खजिन्यांत भरीत असे व मुसलमानांशीं मित्रभावानें रहात असे. फार काय, पण त्यानें नवीन वसविलेल्या नगरीला महंमदपूर असें नांव मुद्दाम दिलें होतें. हिंदु आणि मुसलमान यांच्याशीं त्याचें वर्तन सारखेंच समतोल बुद्धीचें होतें. इतक्या गोष्टी असल्यावर मुसलमानांच्या डोळ्यांत तो सलूं लागण्यास अर्थातच कांहीं कारण मिळालें नाहीं.

तथापि त्याच्या रयतेची संख्यावृद्धि व भरभराट, त्याचें वाढतें कर्तृत्व, पराक्रम, कीर्ति आणि समृद्धि वगैरेच्या गोष्टी ऐकून फौजदार तोराबखां

मनांतल्या मनांत जळत होता. त्यानें विचार केला कीं कांहीं तरी निमित्त काढून महंमदपुरावर हल्ला करावा आणि लूटपाट करून त्याचा नाश करावा. निमित्ताला काय तोटा ! त्यानें सीतारामाला निरोप पाठविला कीं पुष्कळ राजद्रोही व बदमाष माणसें तुमच्या जमीदारींत येऊन राहिलीं आहेत. त्यांना पकडून इकडे पाठवून द्यावें. सीतारामानें उत्तर पाठविलें कीं अपराध्यांचीं नांवें कळवावीं म्हणजे त्यांना पकडून पाठविण्यांत येईल. त्यावरून फौजदारानें फरारी झालेल्या कित्येक माणसांच्या नांवांची यादी पाठविली. ती नावें त्या लोकांना कळलीं तेव्हां ते सगळे लोक नांवें बदलून तेथें राहूं लागले. त्यामुळें यादींतल्या नांवांपैकीं एकाहि नांवाचें माणूस आढळत नाहीं असा जबाब सीतारामानें फौजदाराला पाठविला.

त्यावरून भांडण उपस्थित झालें. दोघेहि परस्परांच्या मनांतला भाव आळखून होते. तोराबखानें सीतारामाच्या नाशार्थ सैन्याची तयारी चालविली. सीतारामहि आत्मसंरक्षणार्थ शहराच्या चारी बाजूंला दुर्लंघ्य गढ्या बांधणें, लोकांना शस्त्रास्त्रविद्या आणि युद्धरीति वगैरे शिकविणें, शस्त्रें व दारूगोळा यांचा संग्रह करणें वगैरे लढाईच्या तयारीस लागला.

या कामीं त्याला तिघांचें फार साह्य झालें. त्यांच्या साह्यामुळेंच हें अवघड काम अल्पावधींत बऱ्याच चांगल्या प्रकारें त्याला करतां आलें. हे तिघेजण म्हणजे चंद्रचूड तर्कालंकार, मृण्मय, व गंगाराम हे होत. चंद्रचूडाच्या अंगीं विलक्षण बुद्धिमत्ता, मृण्मयाच्या ठायीं साहस, आणि गंगारामाचे ठायीं चपलता, असे तिघांचे ठायीं तीन गुण होते. गंगाराम हा सीतारामाचा एकनिष्ठ अनुयायी असून कर्तृत्ववान् होता. तो अलीकडे महंमदपुरांतच राहत असे. याच वेळीं चांदशाह नांवाचा एक मुसलमान फकीर सीतारामाच्या दरबाराला जाणें येणें ठेवूं लागला होता. फकीर मोठा विद्वान्, निस्पृह, व हिंदू मुसलमानांकडे समदृष्टीनें पाहणारा होता. त्याच्याशीं सीतारामाचें विशेष संघट्टन झालें होतें, आणि नवाबाला खुष राखण्यासाठीं त्यानें आपल्या नगराला महमदपूर असें जें नांव दिलें त्याबद्दलची सल्ला या फकीरानेंच त्याला दिली होती.

फकीर येई आणि जाई. विचारलीच तर एखाद्या गोष्टीसंबंधानें त्याला योग्य दिसेल ती सल्ला देई. कोणी भांडणाची गोष्ट काढली तर त्याला समजुतीच्या चार गोष्टी सांगून शांत करी. सारांश, तूर्त तरी सगळें ठीकठाक चाललें होतें.

प्रकरण दहावें.

सीतारामाचे वर सांगितलेले असे तिघे साह्यकर्ते होते, तशी या मत्कार्यांत त्याचें परम शत्रुत्व करणारीहि एक व्यक्ति होती. ही व्यक्ति म्हणजे त्याची कनिष्ठ पत्नी रमा ही होय.

रमा अल्पवयस्क होती. जुईच्या फुलासारखी ती नाजूक प्रकृतीची होती. या जगांत जें जें कांहीं दुर्भेद्य व कठीण आहे त्या सर्वांचें तिला मोठें भय वाटे. भांडणाला तर ती फारच भीत असे. सीतारामाचें साहस व वीर्य पाहून ती अत्यंत भयभीत होत असे. मुसलमान हे प्रबळ राज्यकर्ते, त्यांच्याशीं भांडून आपल्या सारख्यांचा कसा निभाव लागणार? असें तिला वाटे. तशांत तिला एक भयंकर स्वप्न पडलें होतें. त्या स्वप्नांत तिने असें पाहिलें कीं मुसलमानांनीं युद्धांत सीतारामाचा पराभव केला आहे व सीतारामाला व आपणाला पकडून ते मार देत आहेत. हें स्वप्न पाहिल्यापासून दाढीवाल्या असंख्य मुसलमानांच्या मूर्ति तिच्या डोळ्यासमोर अहोरात्र फिरकूं लागल्या होत्या. त्या वेळीं त्यांच्या भयोत्पादक आरोळ्यांनीं तिच्या कानठाळ्या बसत असत, ती सीतारामाच्या वारंवार विनवण्या करी कीं तुम्ही मुसलमानांशीं वैर करण्याचें सोडून द्या, फौजदाराकडे जाऊन त्याचे पाय धरा, आणि क्षमा मागा; म्हणजे तो दया करील. सीतारामानें तिच्या बोलण्याकडे मुळींच कधीं लक्ष दिलें नाहीं. भीतीमुळें रमेनें आहार व निद्रा यांचा त्याग केला. सीतारामानें तिला पुष्कळ प्रकारें

समजावून सांगितलें कीं मीं मुसलमानांचा कांहीं एक अपराध केलेला नाहीं. पण रमेची समजूत पटेना. श्रावणमासांतल्या पर्जन्यधारेप्रमाणें तिच्या नेत्रांतून अहोरात्र अश्रुधारा वाहत होत्या. शेवटीं सीताराम तिच्या रडण्याला अगदीं कंटाळला, आणि त्यानें तिच्याकडे जाण्याचें सोडलें. अर्थातच ज्येष्ठ पत्नी नंदा हिला अकरावा बृहस्पति आला.

हा प्रकार पाहून घोरबुद्धि असलेल्या रमेच्या मनाला पक्कें वाटलें कीं मुसलमानांशीं जें भांडण उपस्थित झालें आहे, त्यांत आपला सत्यानास होणार. म्हणून ती उठून सीतारामाकडे गेली आणि रडून, सीतारामाच्या पायां पडून, त्याचा हात धरून, व डोकें फोडून नानाप्रकारांनीं त्याची विनवणी करूं लागली. सीतारामाला त्यामुळें इतका मनस्वी त्रास झाला कीं रमा जेथं असेल त्या प्रदेशांत तो फिरकेनासा झाला. तेव्हां नंदेकडे जाण्याच्या सीतारामाच्या वाटेवर ती लपून बसूं लागली. आणि त्याला वाटेत गांठून पूर्वींच्यासारख्या विनवण्या करू लागली. त्या करतांना तिच्या डोळ्यांतून सारख्या अश्रुधारा वाहत होत्या. त्या कधीं कधीं आषाढांतल्या मुसळधारेसारख्या जाड्या असत, तर कधीं कधीं कार्तिकांतल्या पर्जन्यधारेप्रमाणें सूक्ष्म असत. रमा एकच नाद घेऊन बसली होती. तो नाद म्हणजे हा कीं सीतारामानें मुसलमान अधिकाऱ्यांची पायधरणी करून त्यांना संतुष्ट ठेवावें. नाहीं तर कांहीं धडगत दिसत नाहीं. हा तिचा नाद पाहून सीतारामाच्या अंगाचा तिळपापड होई.

भूषणेपेक्षां महंमदपुरची वस्ती ज्यास्त झाली, ती नगरी राजधानीसारखी वैभवशाली दिसूं लागली, तिच्या बंदोबस्तासाठीं गुढ्या बांधल्या गेल्या, तटबंदी करण्यांत आली, तिच्यावर तोफा चढविण्यांत आल्या, आणि शस्त्रें व दारूगोळा यांचा संग्रह कोठारांत होऊं लागला. हें जव्हां रमेला दिसलें, तेव्हां तर तिची छातीच फाटून गेली आणि तिनें अंथरूण धरलें. त्या दुखण्याच्या स्थितींत ती देवाची पूजा करण्यापुरती मात्र उठत असे. ती हात जोडून देवाची प्रार्थना करी कीं, 'हे प्रभो! महंमदपूर उध्वस्त करून टाक व आम्ही पुनः मुसलमानांचे अंकित राहून सुखानें दिवस काढूं असें कर. सध्यांच्या संकटांतून आमचें रक्षण करणारा तूंच समर्थ

आहेस.' सीतारामाची व तिची कधीं गांठ पडलीच, तर त्याच्या देखत देखील ती परमेश्वराची हीच प्रार्थना करी!

रमेच्या अशा प्रकारच्या वर्तनानें ती सीतारामाच्या दृष्टीला नकोशी झाली होती. तो मनांत म्हणूं लागला, 'हाय! अशा वेळीं मला साह्य करायला श्री जवळ असती तर किती बहार झाली असती!' त्याला रात्रं दिवस श्रीचा ध्यास लागून राहिला होता. तिचीच एकटीची मूर्ति त्याच्या दृष्टीपुढें सदोदित उभी असे. पण रमा व नंदा यांना आपल्या मनांतले इंगित कळलें तर उगाच त्यांना वाईट वाटेल, म्हणून तो त्यांच्या देखत श्रीचें नांव मुखावाटे कधीं काढीत नसे. इतका तो जपत असे, तरी एकदां रमेच्या वर्तनामुळें क्रोधाविष्ट होऊन तो चुकून बोलून गेला कीं 'हाय! श्रीचा त्याग करून मीं काय मिळविलें? ती तरी रमेसारखी माझी पत्नीच ना!'.

रमेच्या कानीं हे शब्द पडतांच ती रागानें उसळून म्हणाली, 'तिला परत घरांत आणायला कोणीं आपले हात धरले आहेत?'

सीतारामानें दीर्घ निश्वास टाकून म्हटलें, 'आता तिचा शोध कोठें लागणार?' हे शब्द रमेला अतिशय झोंबले. रमेचा कांहींहि अपराध असो; येवढी गोष्ट खरी कीं तिच्या हातून ज्या चुका घडत त्या पति व पुत्र यांच्या विषयींच्या तिच्या निरतिशय प्रेमामुळें घडत असत. त्यांच्यावर कांहीं विपत्ति येणार नाहीं ना? या विचारानें तिचें चित्त सदोदित व्याकुळ असे. सीतारामाला हें कळत नव्हतें असें नाहीं. कळत असूनहि रमेविषयीं त्याचें मन विशेषसें प्रसन्न नसे. याचें कारण तिचें रडणें. तिच्या अश्रुधारा या त्याच्या महत्कृत्याला विघ्न करणाऱ्या होत्या. स्त्रीपुरुषांचें परस्परांचें नुसतें प्रेम असलें म्हणजे दांपत्य-सुख लागतें असें नाहीं. त्यांच्या अंतःकरणांचें मीलन झालें पाहिजे व उभयतांच्या ठायीं सहृदयता पाहिजे. यालाच दांपत्यसुख म्हणावयाचें. रमेला वाटे कीं माझा कांहीं अपराध नसतां मी त्या सुखाला व्यर्थ आंचवल्यें आहे. इकडे सीताराम म्हणे, 'देवा! रमेच्या प्रेमापासून माझें रक्षण कर.'

रमेच्या दोषामुळें सीतारामाच्या हृदयांत वास करीत असलेला चित्र-पट दिवसेंदिवस जास्तच उज्ज्वल प्रभा धारण करूं लागला होता. सीतारामानें पुष्कळदां मनांत निश्चय केला कीं राज्यस्थापनेशिवाय दुसऱ्या कोणत्याहि विषयाला मनांत थारा द्यावयाचा नाहीं. पण आतां श्रीनें त्याच्या अंतःकरणांत प्रविष्ट होऊन त्यांतल्या सिंहासनावरची अर्धी जागा हक्कानें पटकावली होती.' सीताराम मनांत म्हणत असे कीं श्रीच्या संबंधानें आपल्या हातून जो अपराध घडला त्याबद्दलची शिक्षा रमेच्या हातून मिळत आहे.

पण सीतारामाच्या हृदयमंदिरांत श्रीच्या मूर्तीची स्थापना घडवून आणण्याचें कामीं रमा ही एकटीच कारण झाली नव्हती. नंदेचेंहि साह्य त्या कामीं झालें होतें. नंदेला मुसलमानाचें भय वाटत नव्हतें. सीताराम खंबीर असल्यावर तिला घाबरण्याचें कारण काय ? ती म्हणे, ' ती गोष्ट बरी कीं वाईट याचा विचार करण्याचा अधिकार आपल्या पतीचा आहे. त्याला जी गोष्ट चांगली वाटते तिच्याबद्दल आपण काय म्हणून शंका घ्यावी ? म्हणून ती अशा गोष्टीचा विचारच न करतां कायावाचा-मनेकरून पतिसेवेला नेहमीं तत्पर असे. तिच्याकडून सीतारामाला माते-सारखें प्रेम, कन्येसारखी भक्ति, व दासीसारखी सेवा मिळत असे. पण सहधर्मिणी कोठें आहे? त्याच्यासारखी उच्च प्रतीच्या आकांक्षा बाळगणारी, हृदयांतल्या आकांक्षांची वांटेकरीण, कठीण कार्यांतली साह्यकर्ती, संकटाच्या वेळची सल्लागार मंत्री, विपत्काली धैर्य देणारी व यशाच्या प्रसंगीं आनंदाची मूर्ति अशी जी सहधर्मिणी ती कोठें आहे ? म्हणूनच नंदेचें पतीवर उत्कृष्ट प्रेम होतें तरी खवळलेल्या सैन्याला इच्छेनुरूप हालचाल करावयास लावणाऱ्या श्रीची आठवण त्याला पदोपदीं होत होती. 'मारा ! ठोका ! शत्रूला झोडा ! देशाचे शत्रु ! हिंदूंचे शत्रु ! आपले शत्रु ! ठोका यांना ' हे तिचे शब्द त्याला वारंवार स्मरत, आणि तो त्या हृदयस्थ चंडीची मानसपूजा करीत असे.

प्रेम म्हणजे काय असतें तें आम्हांला ठाऊक नाहीं. दृष्टादृष्ट होतांच एकदम तन्मयता झालेली, विचार करायलसुद्धां फुरसत नाहीं, असा शीघ्र

भस्मसात् करणारा दावानल आम्हीं जगांत पाहिला नाहीं. प्रेमाविषयींच्या गोष्टी पुस्तकांतून वाचण्यांत येतात खऱ्या; पण जगाच्या रहाटींत प्रीति व स्नेह यांशिवाय प्रेमासारखी कांहीं चीज पाहण्यास मिळत नाहीं. अर्थात् न पाहिलेल्या वस्तूचें वर्णन आम्ही कसें करणार ? पुस्तकांतून वर्णिलेलें प्रेम ही आकाशकुसुमाप्रमाणें तरुण स्त्रीपुरुषांच्या मनोरंजनार्थ कवींनीं निर्माण केलेली कल्पनासृष्टि आहेसें दिसतें. तथापि एक गोष्ट कबूल केली पाहिजे. प्रीति म्हणा, स्नेह म्हणा, ज्याचा जगांत येवढा आदर होत असतो तें जुन्या पूर्ण परिचयाच्या वस्तुवर जडतें; नव्याविषयीं तें उत्पन्न होत नाहीं. ज्यांच्याशीं पुष्कळ दिवसांचा संसर्ग असतो, संपत्काळीं, विपत्काळीं, भल्या बुऱ्या दिवसांत, ज्यांच्या अंगच्या गुणांचा परिचय परस्परांना होऊन चुकलेला असतो, आणि सुखदुःखांच्या बंधनानें ज्यांचीं अंतःकरणें परस्परांशीं बद्ध झालेलीं असतात, त्यांच्याच मध्यें प्रीति किंवा स्नेह उत्पन्न होतो. आणखीहि एक नवी पण आदरणीय वस्तु त्यांना प्राप्त होते. त्या वस्तूच्या गुणाचें ज्ञान नसलें तरी लक्षणांवरून त्या विषयीचें अनुमानकरता येतें. जें अनुभवसिद्ध तें सीमाबद्ध असतें; पण जें केवळ अनुमित असतें त्याची सीमा ठरविणें हें माणसाच्या मनाच्या अवस्थेवर अवलंबून असते म्हणूनच नवीनच परिचय घडलेल्या माणसाच्या अंगच्या गुणांची नक्की मर्यादा ठरवितांना पुष्कळ वेळा हातून चुका घडत असतात; आणि त्या गुणांना मर्यादा नाहीं अशी समजूत होऊन त्या नव्या माणसाविषयींची आवड अनावर होते: यालाच जर प्रेम म्हणावयाचें असेल तर तें या जगांत आहे. तें मोठें उन्माद आणणारेंहि आहे. तें नवीनांनाच प्राप्य असतें. अनेक वेळां पुरातनहि त्याच्या लोंढ्याबरोबर वाहत गेलेले आढळते. श्रीशीं सीतारामाचा नवाच परिचय होता. साहजिकच तिच्याविषयींच्या उन्मादक प्रेमानें सीतारामाचें मन काबीज केलें होतें. त्या प्रेमाच्या प्रवाहांत बिचाऱ्या रमा व नंदा कोणीकडे वाहत गेल्या त्याचा पत्ताहि नव्हता !

नूतन ! हाय हाय ! तूंच कां सुंदर ? नाहीं. जुनेंच सुंदर. तूं नवीन, तूं अनंताचा एक अंश आहेस. त्या अनंताच्या थोडयाच भागाशीं आमचा परिचय आहे. व त्याच थोडयाला आम्ही जुनें म्हणतों. अनंताचा बाकीचा सगळा

भाग आम्हांला नवाच वाटतो. अनंतापैकीं जें आम्हांला अज्ञात तेंहि अनंतच ! नूतन ! तूं अनंताचा अंश म्हणूनच तूं इतकें उन्मादकर आहेस. श्री आज सीतारामाला अनंताचा अंशच वाटत होती.

हाय ! तुम्हां आम्हांला काय नवें प्राप्त होणार नाहीं ? तुम्हां आम्हांला काय श्री मिळणार नाहीं ? ज्या दिवशीं समळें जुनें टाकून देऊं त्याच दिवशीं नव्याची प्राप्ति होईल. अनंताच्या समोर आपण जाऊन उभे राहूं, आणि डोळे मिटले कीं श्री मिळेल. तो दिवस येईपर्यंत वाचकहो ! धीर धरून आपण देवाचें नामस्मरण करूं या. नामस्मरणानें अनंताची प्राप्ति होते.

प्रकरण अकरावें.

'हीच ती वैतरणी. हिच्या पार होण्यानें सर्व दुःखांचें शमन होतें असें म्हणतात. माझें दुःख या उपायानें शमेल काय ?'

वैतरणी नदीच्या वाळवंटांत एकटी उभी राहून श्रीनें वरील शब्द उच्चारले होते. तिच्या मागच्या बाजूस फार दूर नीलवर्ण मेघाप्रमाणें-नीलगिरि-पर्वत्-शिखरांचा समुदाय दिसत होता. समोर नदीचा नीलवर्ण जलप्रवाह चांदीप्रमाणें लखलखणाऱ्या विस्तृत वाळवंटांतून वक्रगतीनें वाहत होता. नदीच्या पार काळ्या पाषाणांनीं बांधून काढलेला घाट होता. घाटाच्या पायऱ्या चढून गेल्यावर सप्तमातृकांचा शोभायमान मंडप दिसत असे. त्या ठिकाणीं सप्त मातृकांच्या पाषाणमूर्तिहि किंचित् दृग्गोचर होत होत्या. गजसदृश वैभवानें युक्त असलेली इंद्राणी, मधुररूपिणी वैष्णवी, कौमारी, ब्रह्माणी, बीभत्स-रूप-धारिणी यममाता छाया, नानालंकार-भूषित प्रशस्त कर, चरण, व स्तन असलेली, शंखासारखा आंदोलन करणारा हार कंठांत धारण करणारी, लंबोदरी, रेशमी वस्त्र परिधान केलेली

वराहवदना वाराही, अस्थिचर्म-मात्रा-वशिष्टा, पलित केशा, नग्नवेशा, खंडमुंडधारिणी भीषण चामुंडा, इ. च्या मूर्ति तेथें दिसत होत्या. त्य मूर्तींवर चंदन, फुलें. बिल्वपत्रें इत्यादिकांच्या राशींच्या राशी पडून त्यांच्य भाराखालीं त्या मूर्ति दडपल्या गेलेल्या दिसत होत्या. त्यांच्यामागं विष्णूचा उंच सभामंडप होता. पलीकडे नीलवर्ण अशा दगडी स्तंभावर आकाशांत उंच जागीं पक्षिराज गरुड बसलेला होता अतिशय दू अंतरावर उदयगिरि व ललितगिरी या दोन पर्वतांचे विशाल नीलवर्ण देह आकाशप्रदेशांत दिसत होते. हा सगळा सृष्टीचा देखावा पाहून श्री म्हणाली, ' हाय! हीच ती वैतरणी ! ही उतरून गेल्याने माझ्या दुःखाचा दाह शमेल. नाहीं काय ?'

'ही ती वैतरणी नाहीं—

यमद्वारें सहा घोरें तसा वैतरणी नदी—

अगोदर यमद्वारापाशीं जाऊन पोहोंच, मग तुला ती वैतरणी दिसेल.'

अशा प्रकारचे शब्द तिच्या प्रश्नाच्या उत्तरादाखल मागून आलेले तिनें ऐकले. म्हणून तिनें मागें वळून पाहिलें. तों एक जोगीण तिला दिसली

श्री म्हणाली, 'माताजी ! यमद्वार वैतरणीच्या या पार आहे कीं त्या !

जोगीण हंसून म्हणाली, ' वैतरणी ओलांडून गेल्यावर यमद्वाराल जातां येतें. पण अगोदर तूं मला हें सांग कीं असा प्रश्न विचारण्याचे तुल कारण काय ? तुला या पार असतांनाच यम-यातना भोगाव्या लागत आहेत कीं काय ?' '

श्री—यमयातना दोन्ही तीरांवर आहेत असें दिसतें.

जोगीण—नाहीं, बाळ! सगळ्या यमयातना या तीरावरच आहेत. त्या तीरावरच्या माणसाच्या कानीं यमयातना हा शब्द सुद्धां कधीं पडाव याचा नाहीं. तेथें तो शब्द आपण या तीरावरूनच आपल्या बरोब नेत असतो. या जन्मींच्या पापपुण्याचें गांठोडें बांधून नावाड्याच्या स्वाधीन करून त्याला फुटकी कवडीसुद्धां न देतां वैतरणीपार होतां येतें. पुढें यमसदनीं गेल्यावर तें गाठोडें सोडून स्वस्थपणानें एकेका कृत्याचें फळ माणसें भोगतात.

श्री—तर मग मातुःश्री ! गाठोडें या पार ठेवून पलीकडे जाण्याला कांहीं उपाय आहे काय ? असला तर मला दाखवा. म्हणजे मी इकडची लवकर व्यवस्था लावून वेळींच पार जाईन. राग करण्याचें कारण दिसत नाहीं.

जोगीण—येवढी त्वरा कां? अजून तुझ्या आयुष्यांतली सकाळ आहे.

श्री—उशीर झाला तर तुफान व्हायचें एखादें !

जोगीण—तुफानाची वेळ अजून दूर आहे.

श्री अल्पवयी होती म्हणूनच तिला अशी गोष्ट बोलण्याचें धैर्य झालें. जोगिणीनेंहि त्यावर तसेंच उत्तर दिलें. ती म्हणाली, ‘ तुफानाचें तुला भय वाटतें होय ? कां बरें. ? तुला अजून कोणी कुशल नावाडी मिळाला नाहीं का ? ’

श्री—मिळाला. पण त्याच्या नावेंत मी बसल्यें नाहीं. त्याच्या नावेंत आपलें ओझें टाकून तिला उगाच जड कशाला करूं ?

जोगीण—मग तूं वैतरणीच्या कांठीं बसून काय शोधीत होतीस ?

श्री—त्याच्याहून कुशल असा दुसरा एखादा नावाडी पाहत होत्यें. मी ऐकलें आहे कीं श्रीक्षेत्रांत तो रहात असतो. होय ना ?

जोगीण—मी सुद्धां त्याच नावाड्याच्या शोधांत आहें. चल तर, मग आपण बरोबरच जाऊं. पण काय गे! तू आज एकटी कशी? त्या दिवशीं सुवर्णरेखानदीच्या तीरावर तुला पाहिलें होतें. त्या वेळीं तर तुझ्या बरोबर पुष्कळ लोक होते. मग आज अशी एकटी कशी ?

श्री—माझें आतां कोणी नाहींत. तसें पाहिलें तर पुष्कळ आहेत; पण मी स्वच्छेनें सर्वांचा त्याग केला आहे. कांहीं यात्रेकरू श्रीक्षेत्राला जायला निघाले होते. पण त्यांच्याबरोबर जो तीर्थोपाध्याय होता तो माझ्यावर कृपादृष्टि ठेवीत असल्याचीं कांहीं लक्षणें मला दिसूं लागलीं. तेव्हां त्याच्या हातून आपल्याशीं दुष्टपणाचें वर्तन घडण्याचा संभव दिसल्यावरून मी काल रात्रीं त्या यात्रेकरूंची संगत सोडून निघाल्यें.

जोगीण—मग पुढें ?

श्री—पुढें काय ? वैतरणीच्या कांठीं येऊन विचार करीत बसल्यें

आहे. वाटतें की वैतरणी दोन दोनदां उतरून जाण्याचें कारण नाही एकदाच गेलेलें बरें. पाणी पुष्कळ आहे.

जोगीण --आतांच तो विचार नको. आपण दोघीजणी दोन दिवस विचार करून पुढचे बेत ठरवूं. वैतरणी तुला भिऊन कुठें पळून तर जात नाहींना ! कसें काय ! माझ्या बरोबर येत्येस ना !

श्रीचें मन वळलें. तिच्यापाशीं एकसुद्धा पैसा नव्हता. यात्रेकरूंची संगत सोडून निघाल्यापासून तिनें कांहीं खाल्लें नव्हतें. तिला आता कळून चुकलें होतें कीं भिक्षा किंवा मृत्यु यांशिवाय आपणास आतां अन्य गति नाहीं. जोगिणीच्या संगतीनें कांहीं अन्य उपाय सांपडला तर सांपडे असें तिला वाटलें. पण त्याविषयींहि तिला शंका वाटूं लागली. म्हणून तिनें म्हटलें, 'माताजी ! एक गोष्ट विचारूं काय ? तुम्ही आपली खाण्यापिण्याची काय व्यवस्था करतां ?'

जोगीण--भिक्षेवर निर्वाह करत्ये.

श्री--माझ्यानें तें होणार नाहीं. वैतरणी उतरून जाणें हे काम त्या पेक्षां सोपें आहे अशी माझी समजूत आहे.

जोगीण--तुला नको मागायला भिक्षा. मीच तुझ्यासाठीची मागत जाईन. मग झाले ना !

श्री--पण बाई ! तुम्ही माझ्यापेक्षा वयानें लहानच असाल--मोठ्या तर नाहींच. आणखी तुमचें अपूर्व लावण्य--

जोगीण फारच सुंदर-श्रीपेक्षांहि सुंदर-होती. आपल्या अंगचें लावण्य झाकण्यासाठीं तिनें सर्व अंगाला विभूति चर्चिली होती. पण त्या योगानें अहितच घडलें. घासून पुसून स्वच्छ केलेल्या कंदिलाच्या आंतल्या दीप ज्योतीप्रमाणें तिच्या लावण्याची ज्योत त्या विभूतीमुळें अधिकच उज्ज्वल दिसूं लागली.

श्रीच्या प्रश्नाला जोगिणीनें उत्तर केले, मी विरक्त झाल्ये आहे. संसाराचा त्याग केला आहे. आतां मला कशाचें भय उरले आहे ! धर्मच माझा आतां रक्षण करणारा आहे

श्री---तुमची गोष्ट ठीक आहे. तुम्ही जोगीण आहां, तेव्हां निर्भय आहां. पण वेलाच्या पानावरच्या किड्याप्रमाणें मी तुमच्याबरोबर कसें फरावें ? तुम्ही तरी हा तुमच्या बरोबर हिंडणारा कीटक कोण म्हणून सांगणार ? ही माशी सहज उडत उडत येऊन माझ्या अंगावर बसली. असें तुम्ही लोकांना सांगणार काय ?

हे ऐकून जोगीण हंसली. आभ्राच्छादित आकाशांत विजली जशी चमकते, त्याप्रमाणें भस्म चर्चिलेल्या त्या शरीराच्या कांतीची माधुरी तिच्या ओठावरच्या मधुर हास्यानें द्विगुणित झाली.

जोगीण म्हणाली, 'तूंहि असा जोगिणीचा वेष कां घेत नाहींस ?'

ते ऐकून श्रीच्या अंगावर रोमांच उभे राहिले. ती म्हणाली, 'काय म्हणतां ? मी जोगीण होऊं ?'

जोगीण---तू हो असें मी म्हणत नाहीं. मी प्रपंचाचा त्याग केला आहे असें तू म्हणालीस, तेव्हां तुझ्या मनांत अर्थातच पापाचा लेशहि नसला पाहिजे. मग जोगीण झालीस तर काय बिघडणार आहे ? पण ते तूर्त असो. आतांच त्याविषयीं मी कांहीं तुला म्हणत नाहीं. पण वेषातर म्हणून हा वेष घ्यायला कोणती हरकत आहे ?

श्री---दुसरी कोणती हरकत असणार ? मुंडनाची. मी सवाष्ण आहे. मुंडन कसें करावें ?

जोगीण---मुंडन नको करायला. मीं कोठें केलें आहे ?

श्री---मग काय जटा वाढवायच्या ?

जोगीण---नको. तेंहि करायला नको. केसांना तेल लाविलें नाहीं, तेलाबद्दल राख चोपडली कीं त्यांच्या आपोआप जटा वळतात.

श्री---केसांची जाळीं झालीं आहेत. म्हणून वाटते कीं त्यांना राख न चोपडतां तेल लावून व विंचरून अंबाडा बांधावा म्हणजे झालें.

जोगीण---पुढचा जन्म माणसाचा मिळाला तर त्या जन्मीं तुझी हौस पुरी होईल. पण आतां तुला जोगिणीचा वेष देऊं का ?

श्री---फक्त केसांना राख चोपडली म्हणजे झालें काय ?

जोगीण---नाहीं. भगवीं वस्त्रें, रुद्राक्षांच्या माळा, भस्मलेपन, हीं सर्व

स्वीकाराव्री लागतील. माझ्या झोळींत सगळी तयारी आहे. काढून देऊं का ?

श्रीनें कांहीं वेळ घुटमळून अखेर संमति दिली. मग एकीकडे एका झाडाखालीं बसून त्या सुंदर जोगिणीनें आपल्या सारखीच दुसरी एक सुंदर जोगीण सजविली. तिनें श्रीच्या केसांना राख चोपडली, तिला भगवे वस्त्र नेसविलें, गळ्यांत व हातांत रुद्राक्षांच्या माळा घातल्या, सर्वांगाला भस्म चर्चिलें, आणि कपाळीं गोपीचंदनाचा टिळा लाविला. त्रिभुवन जिंकण्याची आकांक्षा धरून मधु (वसंत) आणि मन्मथ (मदन) जसे निघाले होते, तशा या दोघी जोगिणी बरोबर निघून वैतरणी ओलांडून गेल्या, आणि पलीकडच्या तीरावर एका देवळाजवळच्या धर्मशाळेंत रात्रीं मुक्कामाला राहिल्या.

प्रकरण बारावें.

दुसरे दिवशीं प्रातःकाळीं नदीवर यथाविधि स्नानादि आन्हिक कृत्यें उरकून आणि विभूति, रुद्राक्षमाला इत्यादि धारण करून शोभायमान दिसणाऱ्या त्या दोघीजणी चालत्या बोलत्या दीपज्योतीप्रमाणें आपल्या कांतीनें रस्त्यावर प्रकाश पाडीत पाडीत श्रीक्षेत्राकडे जाण्यास निघाल्या. त्या प्रांतांतल्या लोकांना त्या रस्त्यानें यात्रेकरूंना जातां येतांना पाहण्याचे प्रसंग नेहमींच येत; तथापि इतके दिवसपर्यंत त्यांच्या दृष्टीला विस्मित करण्यासारखें कांहीं दिसलें नव्हतें. पण आज या दोघींना पाहून सगळे आश्चर्यचकित झाले होते. कोणी म्हणत होते कीं स्वर्गलोकच्या अप्सरा असतील. कोणी म्हणाले कीं अप्सरा कां ! प्रत्यक्ष देवताच आहेत! कोणी येऊन त्यांच्या पायां पडले. कोणी त्यांच्यापुढें पैसासुपारी ठेवून आशीर्वाद मागूं लागले. त्यांच्यांत एक मोठे पंडित होते. ते म्हणाले,

भलतेंच ! रुक्मिणी व सत्यभामा यांची ही जोडी बरोबर स्वामी-दर्शनाला जात आहे. ' दुसरे कांहीं लोक म्हणूं लागले कीं रुक्मिणी व सत्यभामा या तर श्रीक्षेत्रांतच आहेत. त्यांना तिकडे जाण्याचें प्रयोजन काय ? तेव्हां खात्रीनें या गोपी–राधा व चंद्रावली–असल्या पाहिजेत, आणि म्हणूनच त्या पायीं चालल्या आहेत. एक दुष्ट बाई म्हणाली ' हो हो ! त्या ना ? राक्षसिणी आहेत. संभाळा हो ! नाहीं तर त्या तुम्हांला मारून खाऊन टाकतील !'

इकडे या राधा–चंद्रावली गोपी परस्परांशीं गोष्टी बोलत बोलत जात होत्या. जोगीण विरक्त होती. तिनें प्रपंचत्याग केला होता. बरेच दिवसांत तिला मैत्रीण मिळालेली नव्हती. आज तिच्याच वयाची व तिच्याच सारखी विरक्त झालेली मैत्रीण प्राप्त झाल्यामुळें तिचें मन प्रफुल्लित झाले होतें. तिचा जीवनस्रोत जरासुद्धां सुकून गेलेला नव्हता. श्रीचा मात्र सुकला होता. कारण उघड आहे. दुःख काय असतें तें श्रीनें अनुभविलें होतें. जोगिणीसारख्या विरक्त माणसाला दुःख काय असणार ?

त्या दोघी बोलत चालल्या होत्या. त्यांच्या संभाषणांत पुष्कळ गोष्टींची चर्चा निघाली होती. त्या सगळ्या गोष्टी येथे देण्याचें प्रयोजन नाहीं; पण एक दोन गोष्टी वाचकांना कळविणें अवश्य आहे.

जोगीण—तूं म्हणतेस कीं तुझे यजमान आहेत, आणि तुझ्या-बरोबर सुखानें प्रपंच करण्याचीहि त्यांची इच्छा आहे, मग तूं घरदार कां सोडलेंस ? असा प्रश्न साहजिकच उद्भवतो. पण मी तुला तो प्रश्न विचारीत नाहीं. कारण, तुझ्या घरच्या गोष्टी ऐकून मला काय करावयाचें आहे ? पण एक गोष्ट मात्र तुला विचारावीशी वाटते. ती ही कीं आपण परत घरीं जाऊन संसार करावा अशी इच्छा तुला आहे कीं नाहीं?

श्री—तुम्हांला हात पाहून सांगतां येतें काय ?

जोगीण—नाहीं. हातावरून तें कसें कळणार ?

श्री—तुम्हांला हात पाहतां येता, तर मीं तो तुम्हांला दाखविला

असता, कांहीं विचारलें असतें, आणि त्याच्या धोरणानें पुढचा विचार नक्की केला असता.

जोगीण—मला स्वतःला हात पाहता येत नाहीं. पण सामुद्रिक क्रियेंतच काय पण सान्याच विद्यांत निष्णात अशा एका जाणत्या माणसाकडे पाहिजे तर तुला घेऊन जातां येईल.

श्री—तो जाणता माणूस कोठें असतो?

जोगीण—या ललितगिरि पर्वताच्या हस्तीगुंफेत एक योगी राहतो त्याच्याचविषयीं मी बोलत्यें आहें.

श्री—ललितगिरी येथुन किती दूर आहे?

जोगीण—आपण प्रयत्न केला तर संध्याकाळपर्यंत तेथें पोहोंचता येईल.

श्री—तर मग चला, जाऊ या.

इतकें बोलणें होऊन दोघीजणी त्वरेनें तिकडे जाण्यास निघाल्या. कोणी ज्योतिष्यानें त्यांना पाहिलें असतें तर त्यानें म्हटलें असतें कीं बृहस्पति आणि शुक्र यांची युति होऊन म्हणजे ते एका राशीला येऊन शीघ्रगतीनें चालले आहेत.

प्रकरण तेरावें

एका तीराला उदयगिरि, दुसऱ्या तीराला ललितगिरि, आणि मध्ये स्वच्छ पाण्यानें तुडुंब भरून समुद्राकडे धांव घेत चाललेला विरूपा नदीचा खळखळ वाहणारा प्रवाह असे दिसत होते. या दोन पर्वतांच्या माथ्यावरून पाहणाराच्या दृष्टीला तर फार मौज दिसे. खालीं हजारों तालवृक्षांचीं वनें लागून राहिलीं आहेत. हिरव्या गार पिकांनीं आच्छादिलेलीं शेतें भुईवर आंथरलेल्या चित्रविचित्र रंगांच्या गालिच्याप्रमाणें नयनमनो

र दिसत आहेत. लहान मूल आईच्या मांडीवर खेळत असलें म्हणजे त्याला त्याची आई सौंदर्याची पुतळी दिसत असते. त्याप्रमाणें पर्वताच्या माथ्यावरून खालीं पृथ्वीकडे पाहणाऱ्याला ती सर्वांगसुंदर दिसते. उदयगिरीवर दाट झाडी होती. यामुळें तो वृक्षादिकांनीं आच्छादित दिसे. पण ललितगिरीवर झाडाचें नांव नव्हतें. नुसती फत्तरांची प्रचंड रास ! एके काळीं या पर्वताचें शिखर व आसमंतातचा प्रदेश विशाल इमारती, उच्च स्तूप, व भव्य बौद्धमंदिरें यांनीं सुशोभित दिसत होता. आतां त्या शोभेपैकीं काय राहिलें आहे ! तर माथ्यावर काय थोडेसे चंदनवृक्ष असतील ते, पडलीं झडलेलीं मातीचीं घरें, विटांचे तुकडे, आणि भंगून पडलेल्या मूर्तींचे ढीग ! यातल्या पाचचार मूर्ति कलकत्त्यासारख्या शहरांतल्या मोठमोठ्या इमारतींत नेऊन ठेविल्या असत्या तर त्या इमारतींना कांही शोभा तरी आली असती ! हाय हाय ! सध्यांच्या काळीं हिंदूंच्या मुलांना मूर्ति बनविण्याचें शिल्पकाम उद्योगशाळांतून का शिकवीत नाहींत ? कुमारसंभव सोडून आमच्या मुलांना स्विनबर्नची कविता वाचावी लागते. गीतेच्या ऐवजीं मिल्लचा पाठ करावा लागतो, आणि प्राचीन काळच्या लेण्यांतलीं अप्रतिम कारागिरीचीं कामें पाहून त्यांचें कौतुक करण्याच्या ऐवजीं चिनी मातीच्या भावलीचें आम्ही कौतुक करतों! भारतभूच्या कपाळीं आणखी काय काय लिहिलें आहे कोणास ठाऊक !

आम्ही प्रत्यक्ष पाहिलेलेंच वर्णन करून वर लिहिलें आहे. तें उदयगिरीचें चित्र आमच्या नेत्रांसमोर चिरकाल राहील. चारी दिशांना अनेक योजनेंपर्यंत एकसारखीं धान्याचीं पिकलेलीं शेतें लागलेलीं होतीं. जणू काय वसुंधरादेवी पिंवळी पैठणीच नेसली होती ! तिनें आपल्या अंगावर सहस्रावधि तालवृक्षांच्या रांगा रत्नहाराप्रमाणें धारण केल्या होत्या. शेतामधून नील-पीत पुष्प-मय विरूपा नदीचा प्रवाह वाहत होता. तें पाहून असें वाटे कीं जणु काय गालीच्यावर कुशल चित्रकारानें नदीचें चित्रच काढलें आहे ! ललितागिरीवर जिकडे पहावें तिकडे मृत महात्म्याची कीर्ति पसरलेली दिसत होती. दगड जे इतके गुळगुळीत व नक्षीकित केलेले दिसत होते. ते आमच्यासारख्या हिंदूंनींच केले अस-

तील काय ! पुष्पावांचून जे एकाशीं एक जोडले होते, ते आमच्या सारख्या हिंदूंनीं जोडले असतील काय ! या पुष्पाभरणांनीं विभूषित, सर्वांगसुंदर, पौरुष आणि लावण्य यांचें योग्य संमेलन ज्यांत झालें आहे अशा या दिव्य मूर्ति ज्यांनीं कोरल्या ते आमच्यासारखे हिंदूच होते काय ! कोप, प्रेम व अभिमान इत्यादि भाव ज्यांच्या स्फुरित अधरावर उत्तम प्रकारें व्यक्त झाले आहेत, ज्यांच्या अंगावर एकच जीर्ण वस्त्र आणि गळ्यांत तरल रत्नहार आहे, ज्यांचीं शरीरें पुष्ट स्तनांमुळें व यौवनभारामुळें किंचित् वांकलीं आहेत आणि

तन्वी श्यामा शिखरिदशना पक्वबिंबाधरोष्ठी
मध्ये क्षामा चकितहरिणी प्रेक्षणा निम्ननाभिः ।

असें वर्णन ज्यांना उत्तम प्रकारें लागू पडेल अशा स्त्रीमूर्ति ज्यांनीं घडविल्या ते हिंदूच होते काय ! हिंदूंच्या स्मरणाबरोबर उपनिषदें, गीता, रामायण, महाभारत, कुमारसंभव, शाकुंतल, पाणिनी, कात्यायन, सांख्य, पातंजल, वेदांत, वैशेषिक इत्यादिकांचीहि आठवण झाली. हिंदूंनीं असे असे जंगी पराक्रम करून जी अतुल कीर्ति संपादन केली, तिच्यापुढें या मूर्तींच्या शिल्पकौशल्याची काय मोठीशी मातब्बरी ! असें मनांत येऊन अशा हिंदूंच्या कुळांत देवानें आपणांस जन्मास घातल्यानें आपल्या जन्माचें सार्थक झालें अशी धन्यता वाटूं लागते.

त्याच ललितगिरीच्या पायथ्यापाशीं विरूपा नदीच्या कांठीं पर्वताच्या आंत हर्चगुंफा नांवाची एक गुहा होती. 'होती' असें कां म्हटलें ! गुहा कोठें नाहींशी होत असते ! असा प्रश्न कांहीं जण विचारतील. त्यांना उत्तर हेंच कीं काल विन्मुख झाला म्हणजे सर्व कांहीं नष्ट होतें. आतां ती गुहा नाहीं, तिच्यावरचें छत पडलें, खांब मोडले व जमीनीवर गवत माजलें आहे. जेथें सर्वच नष्ट झालें तेथें गुहेसाठींच इतकी हळहळ वाटण्याचें कारण नाहीं.

गुहा फार सुंदर होती. तिचे खांब डोंगरांतूनच कोरून काढलेले होते. तिच्या भिंती मजबूत व सुंदर होत्या. चारी बाजूंना दगडावर कोरलेल्या मूर्तींमुळें फार शोभा दिसत होती. त्या मूर्तींपैकीं दोनचार अजूनहि आहेत.

पण त्यांच्या वरचा भाग पडला आहे, रंग उडाला आहे, कोणाचें नाक मोडलें आहे, कोणाचा हात तुटला आहे, कोणाचा पाय मोडला आहे, अशी त्यांची स्थिति आहे. आधुनिक हिंदूंप्रमाणें त्यांच्या मूर्तीहि अंगहीन झाल्या आहेत.

पण त्या गुहेची अशी दुर्दशा अलीकडेच झालेली आहे. आम्ही ज्या वेळची कथा लिहीत आहों त्या काळीं अशी स्थिति नव्हती. सगळी गुहा अगदीं शाबूद होती. तिच्यांत परम श्रेष्ठ योगी महात्मा गंगाधर स्वामी हे राहत होते.

योग्य वेळीं जोगीण श्रीला आपल्याबरोबर घेऊन तेथे गेली. पाहिलें तर स्वामी ध्यानस्थ होते. म्हणून कांहीं न बोलतां त्या दोघीजणी त्या गुहेपाशींच रात्रभर राहिल्या.

पहाटेस समाधि उतरून स्वामी उठले आणि नदींत स्नान करून त्यांनीं आपलीं आन्हिक कृत्यें उरकलीं. ते परत गुहेपाशीं येतांच जोगिणीनें त्यांना वंदन केलें. श्रीनेंहि तसेंच केलें.

स्वामी श्रीशीं कांहीं एक बोलले नाहींत. ते जोगिणीशींच गोष्टी बोलूं लागले. दुर्दैवाची गोष्ट की त्यांचें सगळें संभाषण संस्कृत भाषेंत चाललें होतें, आणि श्रीला तर त्यांतलें एक अक्षरहि कळत नव्हतें. म्हणून त्यांच्या संभाषणांतला जो भाग वाचकांना कळवायला पाहिजे तो येथें प्राकृत भाषेंत देतों.

स्वामी—या बाई कोण आहेत?

जोगीण—एक वाटसरू आहेत.

स्वामी—येथें कां आल्या?

जोगिण—आपले नशिबीं काय आहे तें कळण्यासाठीं आल्या आहेत. आपण हात पाहावा असें त्यांच्या मनांत आहे. यांना जें कांहीं सांगणें योग्य दिसेल तें सांगावें.

आपल्या संबंधाचें बोलणें निघालेलें पाहून श्री थोडी जवळ गेली आणि नमस्कार करून उभी राहिली. स्वामी तिच्या तोंडाकडे पाहत म्हणाले 'तुमची कर्करास आहे काय?'

श्रीनें कांहींच उत्तर केलें नाहीं.

' तुमचा जन्म पुष्यनक्षत्रावर झाला आहे ?

तरीं श्री स्तब्ध राहिली.

' गुहेच्या बाहेर या पाहूं ? तुमचा हात पाहूं द्या. '

इतकें म्हटल्यावर स्वामी बाहेर आले व त्यांनीं श्रीच्या डाव्या हातावरच्या सगळ्या रेषा पाहिल्या, आणि खडूनें कांहीं आंकडे मोडून जन्मशक, दिवस, वार, तिथि, पळें वगैरे सगळीं कांहीं सांगितलीं. नंतर जन्मकुंडली मांडून आणि गुहेंत ठेविलेलीं ताडपत्रावरचीं जुनीं पंचांगें काढून त्यांच्या आधारानें कुंडलीच्या बारा गृहांत सगळ्या ग्रहांना त्यांच्या त्यांच्या स्थानीं बसविलें. मग ते श्रीला म्हणाले, ' तुमच्या कुंडलींत स्वक्षेत्रस्थ पूर्णचंद्र आणि सप्तम स्थानीं बुध, गुरु, व शुक्र हे तीन शुभ ग्रह आहेत. असें असून बाई तुम्ही जोगिण बनलां हे कसें ? तुम्ही तर राणी व्हावें असा तुमच्या ग्रहांचा योग आहे ?'

श्री--तिकडे राजपद प्राप्त झालें असल्याचें कळतें. मीं अजून प्रत्यक्ष पाहिलें नाहीं.

स्वामी--नसेल प्रत्यक्ष पाहिलें. हें अगदीं संभवनीय आहे. तुमचे ग्रहच तसे आहेत. सप्तम स्थानीं नीचीचा गुरु आहे आणि तिन्ही शुभ ग्रहांवर पापग्रहांची दृष्टि आहे. अर्थात् तुमच्या नशीबीं राज्यभोग नाहीं.

श्रीला स्वामीच्या बोलण्यांतलें कांहीं कळलें नाहीं. ती आपली स्तब्ध उभी होती. थोडया वेळानें तिनें पुनः विचारलें, 'आणखी कांहीं माझ्या नशीबीं लिहिलें आहे काय ?

स्वामी—शनीच्या त्रिंशांशगत चंद्र आहे.

श्री—त्याचें काय फळ ?

स्वामी—तुम्ही आपल्या प्रियजनाच्या घातास कारण व्हाल.

हें ऐकून तर श्री उठून एकदम चालतीच झाली. स्वामींनीं तिला खूण करून परत बोलाविलें, आणि म्हटलें, ' थांबा ! तुमच्या नशिबांत एक पुण्यकृत्य आहे. त्याचा काळ अजून आला नाहीं. पण तो आला म्हणजे तुम्ही पतीच्या भेटीला जाल. '

श्री--तो काळ येणार तरी केव्हां ?

स्वामी---तें आतांच सांगतां येत नाहीं. त्याला बरेंच गणित करावें लागेल. तो काळहि जवळ नाहीं. तुम्ही आतां कोठे जायला निघाल्या आहां?

श्री---पुरुषोत्तमाचें दर्शन घ्यावें हा हेतु आहे.

स्वामी---जा. पुढच्या वर्षी पुनः मला भेटा म्हणजे तुम्हांस जी वेळ कळावी अशी इच्छा आहे ती सांगेन.

जोगिणीलाहि स्वामीनें निरोप दिला. नंतर संभाषण बंद करून स्वामी पुनः ध्यानस्थ बसले, आणि दोघी जोगिणी त्यांना नमस्कार करून चालत्या झाल्या.

प्रकरण चौदावें.

त्या दोघी जोगिणी वर सांगितल्याप्रमाणें श्रीक्षेत्राकडे चालल्या होत्या. रस्त्यांत जे लोक भेटत ते त्यांच्याकडे टकमका पाहत राहत- कोणी त्यांच्या पायांपाशीं लोटांगण घालून माझें अमकें काम होऊं द्या, माझी तमकी इच्छा पूर्ण होऊं द्या, अशी प्रार्थना करीत. त्यांना आशिर्वादानें संतुष्ट करीत करीत त्या आपला मार्ग काढीत चालल्या होत्या.

श्री झपाट्यानें चालणारी होती. तिचा वेग कमी करण्यासाठीं जोगीण म्हणाली. ' गडे ! जरा सावकास चाला. घाईनें पळत सुटल्यानें अदृष्टांत असलेलें चुकवितां येईल असें थोडेंच आहे ! '

अशा गोड भाषणामुळें श्रीचें मन स्नेहार्द्र झालें. दोन दिवसांच्या सहवासानें श्रीच्या मनांत जोगिणीविषयीं प्रेमभाव उत्पन्न झाला होता. त्यांच्यांत विशेष संघट्टन आहे असें दर्शविणारी भाषा त्या परस्परांसंबंधानें बोलतांना योजीत होत्या. श्री जोगिणीला पूज्य समजत होती. ती जोगीण श्रीला ' ताई ' म्हणूं लागली. त्यावरून हिच्याहि मनांत आपलेविषयीं प्रेमभाव वागत आहे हें श्रीला कळून आलें.

जोगीण म्हणाली, " याउपर मी तुला दुसऱ्या कांहीं नांवानें हाका

मारणार नाहीं. 'ताई' म्हणेन. आपण दोघीजणी सारख्याच वयाच्या बहिणी सारख्याच आहों.'

श्री—तुम्हींसुद्धां माझ्यासारखा दुःखामुळेंच प्रपंचाचा त्याग केला आहे काय?

जोगिण—मला स्वतःचें सुखदुःख कांहींच ठाऊक नाहीं. तुझ्या दुःखाची कहाणी मला ऐकूं दे. तुझें नांव काय याची सुद्धां चौकशी मीं आतांपर्यंत केली नाहीं. पण आतां तें सारें मला ऐकूं दे. तुला कोणत्या नांवानें हांक मारतात?

श्री—माझें नांव श्री. तुमचें नांव काय?

जोगीण—माझें नांव जयंती. मला आपली तूं याच नांवानें हाक मारीत जा. बरें पण, मी तुला एक गोष्ट विचारत्यें. स्वामींनीं सांगितले तें तूं ऐकलेंस ना? तुला पुनः घरीं जावेंसें वाटत नाहीं असें दिसते. दिवस काढायला दुसरा उपाय नाहीं. दिवस कसे काढायचे? कसचा येवढा विचार करीत आहेस?

श्री—कसलाहि नाहीं. पण इतके दिवस मीं कसे तरी काढलेना?

जयंती—कसे काढले?

श्री—मोठ्या दुःखानें. असें माझ्यासारखें दुःख पृथ्वीच्या पाठीवर दुसऱ्या कोणालाहि भोगावें लागलें नसेल असें वाटतें.

जयंती—या दुःखांतून सुटका करून घेण्याला एक उपाय आहे. दुसऱ्या कशांत तरी आपलें मन गुंतवावें म्हणजे झालें.

श्री—कशांत गुतवावें?

जयंती—येवढें अवाढव्य जग पडलें आहे! त्यांत मन गुंतविण्यासारखी एकहि गोष्ट सांपडणार नाहीं असें का तुला वाटतें?

श्री—कशांत मन गुंतवावयाचें? पापांत?

जोगीण—नाहीं. पुण्यकृत्यांत.

श्री—स्त्रियांचें पुण्यकृत्य म्हणजे पतीची सेवा. तिलाच सोडून मी आल्यें. तेव्हां आतां मला कोणतें पुण्यकृत्य राहिलें आहे?

जयंती—तुझ्या स्वामीचाहि कोणी स्वामी आहे कीं नाहीं?

श्री—आहे. पण तो पतीचा स्वामी. माझा नाहीं. माझे स्वामी

म्हणजे माझे पति हेच. त्याशिवाय अन्य कोणी नाहीं.

जयंती--जो तुझ्या पतीचा तोच तुझाहि स्वामी. परमेश्वर सगळ्यांचाच धनी आहे.

श्रीः--मी ईश्वराला ओळखीत नाहीं. माझे पति तेवढे जाणत्यें.

जयंतीः--ईश्वराला जाणलेंस तर तुला इतकें दुःख भोगावें लागणार नाहीं.

श्रीः--नाहीं. पतीला सोडून ईश्वरसुद्धां मला नको आहे. पतीचा त्याग केल्यामुळें माझ्या मनाला होणारें दुःख आणि ईश्वराच्या प्राप्तीपासून होणारें सुख यांची जर तुलना केली तर पतीच्या विरहाचें दुःखच मला अधिक आवडेल.

जयंतीः--तुझें पतीवर जर इतकें प्रेम आहे तर त्याचा त्याग कां केलास ?

श्रीः--माझ्या जन्म-पत्रिकेंत काय लिहिलें आहे तें आहेना ठाऊक ! तें मीं ऐकलें होतें म्हणून.

जयंती--पतीवर तुझें इतकें प्रेम कशामुळें जडलें ?

यावर श्रीनें आपलें इत्थंभूत पूर्ववृत्त थोडक्यांत तिला सांगितलें. तें ऐकून जयंतीचे डोळे पाण्यानें भरून आले. ती म्हणाली, 'तुझी आणि तुझ्या पतीची प्रत्यक्ष गांठ बहुतेक नाहींच पडली म्हणायची. मग त्याच्यावर तुझें इतकें प्रेम कसें जडलें ?'

श्रीः--तुमचें ईश्वरावर प्रेम आहे ना ? तुम्ही त्याला प्रत्यक्ष कधीं पाहिलें होतें ?

जयंती--पाहिलें नसलें तरी मी रात्रंदिवस मनांत त्याचें चिंतन करीत असत्यें.

श्रीः--माझ्या पोरपणांत त्यांनीं माझा त्याग केल्यादिवसापासून मीहि रात्रंदिवस त्यांचें चिंतन करीत आहें.

हें ऐकून जयंतीच्या अंगावर रोमांच उभे राहिले. श्री म्हणाली,'आम्ही दोघे एकत्र राहून संसार करूं लागलों असतों तर असा प्रकार घडताच ना. मनुष्यमात्राच्या ठायीं गुण आणि दोष दोन्ही असतातच. तिकडच्या

ठायींहि दोष असतील हें संभवनीय आहे. नसले तरी माझ्या दृष्टि-दोषामुळें त्यांच्या ठायीं ते मला दिसले असतील. केव्हां केव्हां बोलण्याच्या ओघांत अशा कांहीं गोष्टी निघाव्या कीं त्यामुळें माझें मन विरक्त व्हावें. तसें झालें म्हणजे माझ्या हृदयांतली आग तितकी भडकत नसे. मी त्यांची मूर्ति मनांतल्या मनांत घडवून इतकीं वर्षें तिची पूजा करीत आल्यें. गंध उगाळून मी तें भिंतीला लावावें आणि 'मनांत भावना करावी कीं मी तें तिकडच्या अंगाला लावीत आहें. बागेंतून फुलें चोरून आणावीं आणि दिवसाचीं सारीं कामें बाजूला ठेवून अगोदर मोठ्या मेहनतीनें त्या फुलांचा हार मनासारखा गुंफावा, आणि तो तिकडच्या गळ्यांत मी घालते आहें अशी मनाची भावना करून फुलझाडाच्याच एखाद्या डहाळीला तो अर्पण करावा. अंगावरचे दागिने विकून चांगलें सामानसुमान आणावें, पुष्कळ मेहनत करून त्याचीं उत्तम उत्तम पक्वान्नें आपल्या हातानें तयार करावीं आणि आपण तीं तिकडच्या पानावर वाढीत आहों अशी मनाची भावना करून नदीप्रवाहांत सोडून द्यावी. देवाला नमस्कार करतांना आपण देवाला नमस्कार करीत आहों असें माझ्या मनाला कधींच वाटलें नाहीं; तर आपण पतीच्या चरणकमळाचें वंदन करीत आहों हीच माझ्या मनाची भावना असे. पुढें—पुढें काय ?—त्यांना सोडून मी आल्यें. त्यांनीं बोलाविलें तरी मी परत न जातां त्यांना सोडून निघाल्यें. '

पुढें श्रीच्यानें बोलवेना. पदरानें तोंड झांकून घेऊन ती ओक्साबोक्शीं रडूं लागली.

जयंतीच्याहि डोळ्यांत अश्रूंचा पूर लोटला. अशा प्रकारची ही जोगीण. जोगीण कसली ! असें तिला वाटलें.

खंड दुसरा

[संध्याकाळ—जयंती.]

प्रकरण पहिलें.

सीतारामानें आरंभापासूनच श्रीच्या शोधार्थ नाना तऱ्हेचे यत्न चालविले होते. महिन्यामागून महिने आणि वर्षामागून वर्षे गेलें. या अवधींत सीतारामानें हरएक तीर्थी व प्रत्येक नगरींत श्रीच्या शोधासाठीं माणसें पाठविलीं. पण व्यर्थ ! दुसऱ्यांनीं कोणीं तिला पाहिलें नव्हतें म्हणून शोध लागत नसेल अशी शंका येऊन खुद्द गंगारामाकडचें सरकारी काम कांहीं दिवस काढून घेऊन त्याची योजना या शोधाच्या कामीं करण्यांत आली होती. तोहि पुष्कळ देशांतून हिंडून अखेर हात हलवीत परत आला.

शेवटीं श्रीबद्दलचा विचार मनांतच आणावयाचा नाहीं,राज्यस्थापनेच्या कार्यांतच मन गुंतवावयाचें, असा सीतारामानें निश्चय केला. अद्याप तो वस्तुतः राजा झाला नव्हता. कारण कीं, त्याला दिल्लीच्या बादशहाकडून तशी सनद मिळालेली नव्हती. ती सनद मिळविण्याची त्याला इच्छा झाली आणि त्यासाठीं लवकरच स्वतः दिल्लीस जावयाचें त्यानें ठरविलें.

पण काळ मोठा कठीण आला होता. हिंदूंच्या ठायीं हिंदुत्वाचा अभिमान वर डोकें काढूं लागला होता ही गोष्ट मुसलमानांना असह्य वाटूं लागली होती. महंमदपुरांत देवालयांचीं उंच शिखरें पुष्कळ दिसूं लागलीं होतीं. आसपासच्या शहरांतून, गावांतून, खेड्यांतून, फार काय

पण प्रत्येक घरांतून, देवांची स्थापना, उत्सव, नृत्यगीत, कथापुराण, भजन इ० चळवळी दिसूं लागल्या होत्या. याच वेळीं मुर्शिदाबादेच्या मसनदी-वर मुर्शिदकुलीखांसारखा पापी नराधम आरूढ होऊन बंगालच्या सुभ्यावर—विशेषतः त्या प्रांतांतल्या हिंदूंवर—जोरजुलूम करूं लागला होता. तसा अत्याचार केल्याचें इतिहासांत दुसरें उदाहरणच आढळणार नाहीं. इतर सर्वत्र हिंदूंची सत्ता धुळीला मिळाली आहे, महंमदपुरासच काय तें त्यांचें थोडेंसें प्रस्थ माजलें आहे, असें पाहून सीतारामाचा नाश करण्या-विषयीं मुर्शिदअलीनें तोराबखाँला हुकूम केला होता. त्यावरून भूषणा येथें तत्संबंधाची तयारी चालली होती. पण सीतारामाचा नाश करा असा नुसता शाब्दिक हुकूम सोडण्यानें होण्यासारखें तें काम नव्हतें. सुभेदारानें नुसता हुकूम सोडला, पण त्यासाठीं फौज पाठवावयास पाहिजे होती ती पाठविली नाहीं. यांत म्हणजे तोराबखांविषयीं कांहीं अविचाराचें वर्तन सुभेदारानें केलें होतें असें नाहीं. मुसलमान राज्यकर्त्यांची अशी रीतच होती कीं सामान्यतः शांतिरक्षणासाठीं फौजदारानें आपल्या खर्चानें फौज ठेवावी, आणि कांहीं विशेष कारण पडेल तेथें तेवढें बादशाही सैन्य त्याच्या साह्यार्थ जावें. सीतारामासारख्या यःकश्चित् जमिदाराचें शासन करणें ही अगदीं सामान्य गोष्ट गणिली जाई. म्हणून सुभेदारानें या कामासाठीं फौज पाठविली नव्हती. इकडे फौजदाराला असा विचार येऊन पडला कीं सीतारामानें आपल्या अंमला-खालच्या प्रदेशांतल्या वयांत आलेल्या सर्व पुरुषांना शिपाईगिरीचें शिक्षण दिलें आहे असें ऐकतो; तेव्हां आपल्या पांच चारशें शिपायांच्या हिंमतीवर महंमदपुरावर चाल करणें उचित नाहीं. मग काय करावयाचें? म्हणून त्यानें प्रथम सैन्यांत नवे शिपाई भरती करण्याचा उद्योग चालविला. हें काम कांहीं एक दोन दिवसांत होणारें नव्हतें. दुसरीहि एक अडचण होती. तो पश्चिमभागांतला मुसलमानभाई पडला; देशी लोकांच्या शिपाई-गिरीचा त्याला अगदी भरंवसा वाटेना. म्हणून मुर्शिदाबाद, बहार, किंवा पश्चिमेकडील मुलूख यांतून लष्करी शिक्षणांत तरबेज झालेले पठाण शिपाई आणण्याचा त्यानें विचार केला. हा विचार ठरविण्याला विशेष कारण हें

झालें कीं सीतारामानें युद्धकलेत निष्णात असे पुष्कळ रजपूत व भोजपुरी (बहार प्रांतीय) शिपाई गोळा केले आहेत अशी वार्ता तोराबखाँनें ऐकिली होती. अर्थात् तोडीस तोड ठरण्यासारखें सैन्य जमविल्याशिवाय सीतारामावर चालून जाणें व्यर्थ आहे हें तो जाणून होता. म्हणून तयारीला थोडासा विलंब लागला, आणि मध्यंतरीं जो प्रकार चालला होता त्या संबंधानें त्यानें डोळ्यांवर कातडें ओढिलें.

तोराबखाँनें हा सगळा उद्योग गुप्तपणें चालविला होता. सीतारामाला आपल्या मोहिमेची गंधवार्ताहि न कळूं देतां एकदम फौजेनिशीं त्याच्यावर चाल करून जावें असा त्याचा बेत होता. पण फौजदाराच्या खटपटीची इत्थंभूत बातमी सीतारामाला व चंद्रचूडाला लागली होती. गुप्त हेरांशिवाय राज्यकारभार चालत नाहीं. येवढा प्रजारंजनतत्पर राजा दाशरथी राम, पण त्याच्यापाशीं सुद्धां दुर्मुखासारखे गुप्त हेर होतेच ! चंद्रचूडाचे गुप्त हेर खुद्द भूषणानगरींतच होते. त्यांच्याकडून, सुभेदाराकडून आलेला हुकूम आणि फौजदारानें चालविलेली तयारी यांविषयींची बित्तंबातमी चंद्रचूडाला कळलेली होती.

याप्रमाणें सर्व तयारी करून मग सीताराम थोडेंसें द्रव्य आणि रक्षणार्थ थोडेसे शिपाई घेऊन दिल्लीला जाण्याला निघाला. मागें राज्यरक्षणाचा सर्व भार त्यानें चंद्रचूड, मृण्मय आणि गंगाराम या तिघांवर सोंपविला होता. मुत्सद्देगिरीचीं व खजिन्याचीं कामें चंद्रचूडाकडे, सैन्याचा अधिकार मृण्मयाकडे, आणि नगररक्षणाची जबाबदारी गंगारामाकडे, अशीं तीन कामें त्या तिघांत वांटून देण्यांत आलीं होतीं. अंतःपुरासंबंधाचा सर्व कारभार नंदेकडे देण्यांत आला होता. रमा रडेल पडेल आणि गोंधळ करील म्हणून सीताराम निघायचे वेळीं तिचा निरोपसुद्धां घेण्यास गेला नाहीं. अर्थातच रमेनें रडून आकांत करून दशदिशा दणाणून सोडल्या.

प्रकरण दुसरें

आक्रोश थांबल्यावर रमा एकटीच विचार करीत बसली. तेव्हां तिला दिसून आलें कीं या वेळीं सीताराम दिल्लीला गेला हे फार चांगले झालें. आतां मुसलमान चालून आले आणि त्यांनी सर्वांची कत्तल केली तरी त्याचे जीव वांचतील. रमेला मोठी भीति सीतारामाच्याच जिवाची होती. ती अशा प्रकारें दूर झाली. तिला स्वतःच्या जिवाचें काय होईल याची मुळींच फिकिर वाटत नव्हती. तिला वाटे कीं मुसलमान आपलें फार फार तर काय करतील ? बर्ची आपल्या अंगांत भोसकतील. तरवारीने आपल्या शरीराचे तुकडे तुकडे करतील, किंवा गोळी घालून ठार मारतील. फार झालें तर आपले केस धरून वरून खालीं फेकतील. जे काय करतील तें करोत, त्याची ती बिलकुल क्षिती बाळगीत नसे. सीताराम दिल्लींस सुखरूप राहिला म्हणजे झालें. पतीची व आपली गाठ पुनः या जन्मीं पडणार नाहीं, येवढेंच ना ? या जन्मीं नाही तर नाहीं; पुढच्या जन्मीं तरी पडेल ना ? पण गाठ पडायची ती कोठे ? महंमदपुरांत तर ती आतां पडणे शक्य नाही. न पडो, पति खुशाल असले म्हणजे झालें, असें ती मनात म्हणे.

या सगळ्या गोष्टी एक वर्ष अगोदर घडल्या असत्या, तर येवढ्यावरच रमा थांबली असती. पण एक वर्ष झालें, रमेला एक मुलगा झाला होता. पुत्राचें मुख सीतारामाला पुनः दिसणार नाहीं या बद्दलचें मनाला वाटणारें दुःख स्वतः पुत्रमुखाकडे पाहून ती कसें तरी सहन करीत होती. तिच्या मनांत अगोदर सीतारामाविषयींचा विचार आला, आणि ती मरायला सुद्धां तयार झाली. पण मागून मुलाविषयींचा विचार ती करू लागली, तेव्हां तिला काळजी वाटूं लागली कीं आपल्यामागें आपल्या मुलाचें कसें होईल ? आपण मारले गेलों तर मुलाचे संगोपन कोण

करील ? त्याला सवतीच्या स्वाधीन करावें असें एकदां वाटे. पण पुनः ती म्हणे, 'छेः ! तसें करूं नये. कारण सावत्र आई कितीहि चांगली झाली तरी सख्ख्या आईची सर तिला थोडीच येणार आहे ! बरें, आपणाला ठार मारणारे मुसलमान आपल्या सवतीला तरी काय म्हणून जिवंत ठेवतील ! सारांश, आपणहि मारले जाणार आणि आपली सवतहि मारली जाणार, मग मुलाकडे कोण पाहणार ? कोणाच्या स्वाधीन त्याला करावयाचें हा अर्थातच तिला विचार पडला.

असा विचार करतां करतां एकाएकीं रमेच्या शिरावर जणूं काय वज्राघात झाला. तिच्या मनांत एक भयंकर विचार आला. मुसलमान मुलाला तरी कसे जिवंत ठेवतील ? हाय ! हाय ! सर्वनाश होणार ! हा विचार मनांत येतांच तिचें मन गोंधळून गेलें. सिताराम दिल्लीस कशासाठीं गेला असेल बरें ? पण हें विचारायचें कोणाला ? न विचारावें तर मन कोठें स्वस्थ बसूं देत आहे ? तिला स्वतःला कांहीं तर्क करतां येईना. शेवटीं तें विचारण्यासाठीं ती नंदेकडे गेली.

नंदेकडे जाऊन रमा तिला म्हणाली, 'ताई ! मला भारी भय वाटतें. स्वारी दिल्लीला कशासाठीं गेली आहे ?'

नंदा—ज्याचें काम त्यालाच ठाऊक. आपल्याला तें काय कळणार ?

रमा—इतक्यांत मुसलमान आपल्या शहरावर चालून आले तर कसें बाई होईल ? शहराचें रक्षण कोण करील ?

नंदा—त्याची काळजी करणारा परमेश्वर आहे. तोच रक्षण करील. तो नाहीं करणार तर कोण करील ?

रमा—मुसलमान काय सगळ्यांना मारून टाकतील ?

नंदा—बोलून चालून ते शत्रु ! ते का दयामाया दाखवायला बसले आहेत ?

रमा—आम्हांला मारतील तर मारोत. पण बालबच्च्यांवर तरी दया करतील कीं नाहीं ?

नंदा—या गोष्टीचा विचारच कशाला करत्येस, ताई ! सटीनें कपाळीं लिहिलें असले तसें घडेल. आपल्या कपाळीं शुभ लिहिलें असेल

तर शुभ होईल. आपण देवाचा कांहीं एक अपराध केलेला नाहीं. मग आपलें अशुभ कां होईल ? पण हा विचारच तूं कां मनांत आणतेस ? आणि जिवाला व्यर्थ त्रास कां करून घेत्येस ! यापेक्षां आपण सोंगट्याचा एखादा डाव खेळूं ये. पहा ! आज तुझ्या नथेंतला नवा लोलक मी जिंकून घेणार आहें. '

असें बोलून रमेचें मन दुसऱ्या कशांत तरी गुंतवावें म्हणून नंदेनें सोंगट्यांचा डाव मांडला. रमा एक डाव नंदेच्या आग्रहास्तव खेळली; पण खेळण्याकडे तिचें चित्त लागेना. नंदेनें बळेंच आपलेवर बाजू ओढून घेतली; त्यामुळें रमेच्या नथेंतला लोलक बचावला. पण रमा पुढें खेळली नाहीं. एक डाव संपतांच ती उठून गेली.

रमेनें विचारलेल्या प्रश्नाचें उत्तर तिला नंदेकडून मिळालें नाहीं आणि म्हणूनच तिचें खेळाकडे चित्त लागलें नाहीं. अंमळशानें दुसऱ्या कोणाला तरी ती गोष्ट विचारून माहिती काढली पाहिजे अशा विचारांत ती होती. रमा परत आपल्या महालांत आली आणि आपल्या म्हाताऱ्या दाईला विचारूं लागली, ' काय ग ? मुसलमान काय मुलांना मारून टाकतात? '

म्हातारी—ते कोणाला मारीत नाहीत ? ते गाईचें मांस खातात, निमाज पढतात, मग पोरांना मारायला कां कमी करतलि ?

तें ऐकून रमेची छाती धडधडायला लागली. पुढें ती जें कोणी भेटेल त्याला तीच गोष्ट विचारूं लागली. लहान असो, वृद्ध असो, कोणीहि मनुष्य भेटो, त्याला तोच प्रश्न ती विचारी. सर्वांनाच मुसलमानांचें भय वाटत होतें. त्यांना चांगलें म्हणणारें कोणीच नव्हतें. सर्वांनीं बहुधा म्हातारीसारखेंच उत्तर दिलें. तेव्हां आतां आपला पुरता नाश खास होणार असें रमेच्या मनानें घेतलें. ती मुलाला पोटाशीं घेऊन निजली आणि सारखी रडूं लागली.

प्रकरण तिसरें.

इकडे जेव्हां तोराबखाँला खबर कळली कीं सीताराम महंमदपुरांत-नसून दिल्लीला गेला आहे, तेव्हां त्याला वाटलें कीं ही चांगली संधी आहे. ही साधून घेऊन महंमदपुराला बेचिराख करून टाकावें. म्हणून तो लागलीच त्या तयारीला लागला.

हीहि बातमी महंमदपुराला जाऊन पोंचली, तेव्हां तेथें शहरांत मोठीच गडबड उडाली. नागरिक वाट फुटेल तिकडे पळूं लागले. कोणी मामाच्या गांवीं, कोणी मावशीच्या, कोणी सासऱ्याच्या, कोणी जांवयाच्या, कोणी मेहुण्याच्या गांवाला सहकुटुंब, सहपरिवार, पेट्या, वस्त्रपात्र, भांडीं, दप्तरें, पेटारे, तक्तपोष, वगैरे जेवढें सामान नेतां आलें तेवढें घेऊन गेले. दुकानदार दुकानांतला माल घेऊन पळून जाऊं लागले. वाणी–उदमी धान्याधुन्याचीं कोठारें विकून टाकून नगद पैसा घेऊन जाण्यास निघाले. कारागीर व शिल्पी आपापलीं हत्यारें डोक्यावर घेऊन घराबाहेर पडले. असा एकच गोंधळ तेथें माजला.

नगरसंरक्षणाचें काम गंगारामाकडे होतें. तो चंद्रचूडाची सल्ला मसलत विचारण्यासाठीं त्याच्याकडे गेला, आणि शहरांत असा गोंधळ उडाला आहे, याचा बंदोबस्त कसा काय करावयाचा, तें त्याला विचारूं लागला.

चंद्रचूड म्हणाला, ‘ म्हातारींकोतारीं माणसें, बाया, व लहान मुलें यांना खुशाल जाऊं द्या. त्यांना कोणी मना करू नका. इतकेंच नाहीं, तर त्यांनीं जावें यांतच आपलें हित आहे. ईश्वर करो आणि तसें न होवो, पण ईश्वराचीच अवकृपा झाली आणि तोराबखाँ आपल्या शहराला वेढा घालून बसलाच, तर गडावर खाणारीं माणसें जितकीं कमी असतील तितका दोनचार महिने अधिकपर्यंत किल्ल्यांतल्या शिपाई लोकांना कोठीं-

तला दाणागोटा पुरेल. मात्र, ज्यांनीं युद्धकलेचें शिक्षण घेतलें आहे अशा एकाहि माणसाला जाऊं देऊं नका. जे कोणी पळून जाण्याचा प्रयत्न करतील त्यांना बेलाशक गोळी घाला. शस्त्रें वगैरे शहराबाहेर अगदीं जाऊं देऊं नका. त्याचप्रमाणें एक मूठभरसुद्धां धान्य बाहेर जाणार नाहीं अशी तजवीज करा.'

सेनापति मृण्मय हाहि त्याचप्रमाणें चंद्रचूडाशीं मसलत विचारण्यासाठीं गेला होता. तो म्हणाला, 'येथें पडून सडून मार खाण्यांत काय अर्थ आहे ? त्यापेक्षां तोराबखाँ चाल करून येतच आहे त्याअर्थीं अर्ध्या वाटे-तच त्याला गांठून चोप देऊन परत लावावा हें बरें नाहीं काय ?'

चंद्रचूड म्हणाला, 'येथे आपणाला नदीची मोठी मदत होणारी आहे. ती हातची काय म्हणून सोडावी ? अर्ध्या वाटेवर जाऊन तुम्हीं शत्रूला तोंड दिलें आणि समजा त्यांत तुम्हीं हरला, तर मग उभे राहायला जागासुद्धां मिळणार नाहीं ! पण तेच जर तुम्ही येथें नदीच्या अलीकडे बंदुका व तोफा यांनीं रोख धरून राहिलांत तर शत्रूची काय बिशाद आहे कीं तो नदी उतरून अलीकडे येईल ? या नदीला येथें पायउतार नाहीं. तो कोठें आहे त्याचा शोध ठेवा. त्या ठिकाणीं सैन्य तयार ठेवा. म्हणजे मुसलमानांना नदी उतरून या तीराला येतां येणार नाहीं. सगळी तयारी ठेवा. पण मला कळविल्यावांचून चालून मात्र जाऊं नका.'

चंद्रचूड गुप्त हेराची वाट पाहत होता. तोराबखाँची फौज केव्हां कोणत्या मार्गानें चाल करून येणार आहे याविषयींची बातमी हेरामार्फत यावयाची होती. ती आली म्हणजे त्या धोरणानें आपल्या इकडचा बंदो-बस्त ठेवावयाचा असा त्याचा विचार होता.

इकडे अंतःपुरांत बातमी जाऊन थडकली कीं तोराबखाँ महंमदपूर लुटण्यासाठीं सैन्यासह येत आहे. बाहेरच्या लोकांपेक्षां अंतःपुरांतल्या माणसांच्या कानीं जाणाऱ्या बातम्या पराचा कावळा केलेल्या असावयाच्या हें ठरलेलें आहे. त्याप्रमाणें 'येत आहे' या शब्दांचा अर्थ बाहेरचे लोक 'येण्याच्या तयारींत आहेत' असा समजले. पण अंतःपुरांत त्याचा अर्थ 'बहुतेक येऊन पोंचला आहे' असा घेण्यांत आला, आणि मग तेथें

जो आकांत आणि गोंधळ झाला त्याचें वर्णन कोणीं करावें ? नंदेचें काम त्यामुळें फार अवघड झालें. ती एकटी कोणाकोणाची समजूत घालील ? आणि कोणा कोणाला थांबवून धरील ? एकट्या रमेलाच आवरतां आवरतां तिला पुरें पुरें झालें. रमा वरचेवर मूर्च्छित होऊन पडे. नंदा आपल्या मनाशीं म्हणाली, ' सवत मेली तर एकदाची पीडा टळेल हें खरें; पण ज्याअर्थीं अंतःपुरांतली सगळी व्यवस्था पाहण्याविषयींची तिकडून मला आज्ञा झाली आहे त्याअर्थीं वेळेस स्वतःचे प्राण खर्चीं घालून सुद्धां सवतीचें रक्षण मला केलें पाहिजे.' यासाठीं बाकीचीं सगळीं कामें सोडून ती रमेची सेवा मोठ्या आस्थेनें करीत होती.

इकडे बाया नंदेला सल्ला देऊं लागल्या कीं 'बाईसाहेब, आतां एक काम करा. सर्वांचे प्राण वांचवा. लढाई न करतां मुकाट्यानें मुसलमानांच्या हातांत शहर देऊन मोकळ्या व्हा. सर्वांच्या प्राणांची भिक्षा मागा. आपण स्त्रिया, त्यांतून बंगाली. लढाई बिढाई करणें आपलें काम नाहीं. प्राण वांचले म्हणजे सगळें मिळविलें. पहा ! सर्वांचे प्राण आतां आपल्या हातांत आहेत. आमचें म्हणणें ऐकण्याची बुद्धि देव आपणास देवो, आणि आपलें कल्याण होवो. '

नंदेनें त्यांना पुष्कळ समजाविलें. ती म्हणाली, ' अशा भितां काय म्हणून ? पुरुषांपेक्षां तर तुम्ही अधिक शहाण्या नाहींना ? कांहीं भय नाहीं, अगदीं भिऊं नका, असें जर ते म्हणत आहेत, तर तुम्हांला येवढें घाबरून जाण्याचें काय कारण आहे ? पुरुषांना नाहीं का स्वतःच्या जिवांची व तशीच आपल्या बायकांच्या जिवांची काळजी ?'

यानंतर रमा पुनः मूर्च्छित झाली नाहीं. ती उठून बसली. तिच्या मनाला या वेळीं कोठून धीर आला तें पुढें सांगण्यांत येईल.

प्रकरण चौथें.

गंगारामाकडे नगररक्षणाचें काम होतें. अशा कठीण प्रसंगीं रात्रीं शहरभर हिंडण्याचें काम तो विशेष दक्षतेनें आणि काळजीपूर्वक करीत होता हें सांगावयास नकोच. ज्या दिवशींची गोष्ट मागें सांगितली त्याच रात्रीपासून, नगराची स्थिति प्रत्यक्ष कळावी म्हणून तो रात्रीं मुद्दाम अगदीं साध्या पोषाखानें व गुप्त रीतीनें एकटा शहरांतून फिरूं लागला. तीन प्रहर रात्र उलटून गेल्यावर मग तो थकून भागून घरीं जाण्याच्या इच्छेने तिकडे वळला होता. इतक्यांत कोणी मागून त्याचा पदर ओढिला.

गंगारामानें चट्कन् मागें वळून पाहिलें तेव्हां एक स्त्री त्याच्या दृष्टीस पडली. काळोखी रात्र. रस्त्यांत कोणी माणूस फिरकत नव्हतें. अशा वेळीं आणि अशा ठिकाणीं ही एकटी स्त्री पाहून तो चकित झाला. अंधेरांत स्त्रीची आकृति व तिचा वेष येवढीं त्याला ओळखतां आलीं. पण यापलीकडे त्याला कांहीं दिसलें नाहीं. त्यानें विचारलें, ' कोण तुम्ही ?' स्त्रीनें उत्तर केलें, 'कोणी कां असेना ? त्याच्याशीं आपल्याला काय करायचे आहे ? मला काय हवें आहे तेवढें विचारावें म्हणजे झालें. '

हें बोलणाऱ्या स्त्रीच्या शब्दावरून तिचें वय फारसें नव्हतें असें दिसलें. तरीच तिच्या बोलण्यांत एक प्रकारचा आवेश होता. गंगाराम म्हणाला, 'बाकीच्या गोष्टी राहूं द्या; पण अगोदर मला हें सांगा कीं तुम्ही बायकोमाणूस असून अशा अपरात्रीं, एकट्या, या राजमार्गांत हिंडतां फिरतां आहां, तें कां ? आजकाल कसा प्रसंग येऊन बेतला आहे त्याची कांहीं खबर तुम्हांला नाहीं वाटतें ?'

स्त्री म्हणाली, 'अशा अपरात्रीं या इमरस्त्यावर मी एकटी हिंडत्यें आहे ती दुसऱ्या कशासाठीं नाहीं, तर केवळ आपल्या शोधासाठीं.'

गंगा०—खोटी गोष्ट. मी कोण आहें हेंच तुम्हांला अगोदर कोठे ठाऊक आहे ?

स्त्री०—मीं आपणाला ओळखलें आहे. आपण दास महाशय—नगर-रक्षक.

गंगा०—ठीक ! ओळखलें खरें. पण माझी गांठ यावेळीं येथें पडेल हें तुम्हांला कसें कळलें ? मी या वेळीं येथें येईन हें माझें मला सुद्धां अगोदर ठाऊक नव्हतें !

स्त्री०—मी बराच वेळ आपणांला शोधीत शोधीत गल्ल्यांतून व बोळांतून हिंडल्यें, आणि आपल्या घरींहि शोध केला.

गंगा०—कशासाठीं ?

स्त्री०—तें आपण अगोदरच विचारायला पाहिजे होतें. एक मोठें धाडसाचें काम करायचें आहे. आपल्याच्यानें होईल काय ?

गंगा०—कोणतें ?

स्त्री०—मी आपणाला एके ठिकाणीं नेणार आहें. आत्तांच येतां का?

गंगा०—कोठें यायचें ?

स्त्री०—तें मी नाहीं आपणांला सांगणार आणि आपणहि विचारूं नये. आहे कां हिंमत ?

गंगा०—बरें. तें नसेल सांगायचें तर नका सांगूं. पण दुसऱ्या दोन तीन गोष्टी विचारतों, त्या तर सांगाल ? तुम्ही कोण ? काय करतां ? आणि मला काय करायला सांगतां ?

स्त्री०—माझें नांव मुरला आहे. या पलीकडे मी स्वतःसंबंधानें कांहीं सांगत नाहीं. आपणाला माझ्याबरोबर येण्याची हिंमत करवत नसली तर येऊं नका. पण येवढीहि हिंमत करवत नसली तर मुसलमानांच्या हातून या नगराचें रक्षण आपण कसें करणार ? मी बायकोमाणूस असून जेथें जाण्याची हिंमत करत्यें तेथें इतकें बोलण्याची वेळ न येतां आपल्यासारख्या नगर-रक्षकाला जातां येऊं नये हें आश्चर्यच म्हणायचें; नाहीं काय ?

इतकें बोलणें चालणें झाल्यावर गंगारामाला त्या स्त्रीबरोबर जावेंच लागलें. मुरला पुढें आणि गंगाराम तिच्या मागें याप्रमाणें तीं दोघें चालूं लागलीं. थोडें दूर गेल्यावर गंगारामाला समोर एक मोठी हवेली दिसली. ती पाहून तो म्हणाला, ' हा तर राजवाडा !'

मुरला---मग ? काय बिघडलें ?

गंगा०---मुख्य दरवाज्यांतून आण्यांत कांहीं दोष नाहीं. पण ही तर खिडकी आहे ! हिच्यांतून अंतःपुरांत मला नेणार कीं काय ?

मुरला---कां बरें ? तेथें येण्याची हिंमत होत नाहीं वाटतें ?

गंगा०---नाहीं. तेथें येण्याला खरोखरच माझी हिंमत होत नाहीं. हें आमच्या राजाचें अंतःपुर आहे. हुकुमावांचून मला तेथें पाऊलसुद्धां ठेवतां येत नाहीं.

मुरला---तुम्हांला कोणाचा हुकूम पाहिजे ?

गंगा०---राजेसाहेबांचा.

मुरला---पण स्वारी तर येथें नाहीं ! राणीसाहेबांचा हुकूम चालेल काय ?

गंगा०---हो चालेल.

मुरला---या तर. मी तुम्हांला राणीसाहेबांचा हुकूम सांगत्यें.

गंगा०---पण पाहारेवाला तुम्हांला कसा जाऊं देईल ?

मुरला---देईल.

गंगा०---तुम्हांला त्यानें जाऊं दिलें तरी ओळख दिल्यावांचून तो मला आंत सोडणार नाहीं आणि सध्याच्या स्थितींत मी त्याला आपली ओळख देऊं इच्छित नाहीं.

मुरला---ओळख देण्याची जरूरीच नाहीं मुळीं. मी आपणाला नेत्यें आहें ना?

दारावर पाहारेकरी उभा होता. मुरलेनें त्याच्याजवळ जाऊन विचारलें, ' कसें काय पांडे ठाकुर ? दार उघडेंच ठेविलें आहे ना ?'

पाहारे०---हो, बाई. पण हें कोण ?

हें बोलतांना पाहारेकऱ्याची दृष्टि गंगारामाकडे लागली होती. मुरला म्हणाली, ' हे माझे भाऊ आहेत.'

पाहा०---पुरुषांना आंत जातां येत नाहीं. तसा हुकूम नाहीं.

मुरला दांत ओंठ चावीत म्हणाली, 'काय म्हटलेंस ? बोल पाहूं पुन्हां ? तुला हुकूम पाहिजे आहे काय ? कोणाचा रे हुकूम पाहिजे ? माझ्या हुकुमा-

शिवाय आणखी कोणाचा हुकूम तुला पाहिजे ? खबरदार गडबड करशील तर ! चांगली कणीक मऊ करीन आणि दाढी उपटून हातांत देईन, ठाऊक नाहीं !'

हें ऐकतांच पाहारेवाल्याची पांचावर धारण बसली. त्याचें तोंडच बंद झालें. मुरला गंगारामाला घेऊन अंत:पुरांत माडीवर गेली. तेथें एक दिवाणखाना दाखवून ती गंगारामाला म्हणाली, ' या दिवाणखान्यांत जा. मी बाहेर जवळच उभी आहें. मला आंत जायचें नाहीं.'

गंगाराम चकित होऊन आंत प्रविष्ट झाला. तो बहुमोल वस्तूंनीं उत्तम प्रकारें शृंगारलेला होता. चांदीच्या पलंगावर एक स्त्री बसली होती. दिव्याच्या प्रज्वलित ज्योतीच्या प्रकाशाचे स्निग्ध किरण तिच्या मुखावर पडले होते. ती चिंताग्रस्त होऊन खालीं मान घालून बसली होती. तेथें दुसरें कोणी नव्हतें. तिला पाहून गंगाराम मनांत म्हणाला ' असें सौंदर्य पृथ्वीत कोठेंहि निर्माण झालें नसेल!' ही स्त्री म्हणजे रमा.

प्रकरण पांचवें.

गंगाराम यापूर्वीं सीतारामाच्या अंत:पुरांत कधीं गेला नव्हता, किंवा नंदा आणि रमा यांना त्यानें कधीं पाहिलें नव्हतें. 'त्या महालांतल्या अमूल्य शृंगारावरून हा एखाद्या राणीचा महाल असला पाहिजे व तेथें बसलेली स्त्री एक राणी असावी असा त्यानें तर्क केला होता. दोघी राण्यांत नंदेपेक्षां रमेचाच सौंदर्याबद्दल विशेष लौकिक होता. त्यावरून ही धाकटी राणी रमा असावी असें त्यानें अनुमान काढलें, आणि त्याव-रून त्यानें प्रश्न केला कीं ' महाराणी साहेबांनीं मला कशासाठीं पाचारण केलें ? काय हुकुम आहे ? '

रमेनें उठून गंगारामाला प्रणाम केला आणि म्हटलें, ' तुम्ही माझे दादा-वडील भाऊ-आहां. तुम्हांला जशी श्री तशीच मी आहें असें

समजा, आणि म्हणून अशा रात्रीच्या वेळीं मी तुम्हांस बोलाविलें याबद्दल मनांत कांहीं शंका आणूं नका.'

गंगा०—आपला हुकुम होईल तेव्हां हा सेवक हजर आहे. आपण आमचे मालक—

रमा—मुरला म्हणत होती कीं उघडपणें तुम्हांला माझ्याकडे येण्याची हिंमत व्हायची नाहीं. ती आणखीहि कांहीं म्हणाली. तें मी तुम्हांला कसें सांगूं ? तिच्या मेलीच्या जिभेला कांहीं हाड तरी आहे काय ? पण दादासाहेब ! मी अतिशय भीतीमुळें हें साहस केलें आहे. तुम्हीच आतां माझें रक्षण करणारे आहां.

बोलतां बोलतां रमा रडूं लागली. तिचा तो आक्रोश पाहून गंगारामाचें अंतःकरण कळवळलें. तो म्हणाला, ' काय झालें ? आणि काय करायला हवें आहे ?'

रमा—काय झालें म्हणून काय विचारतां ? मुसलमान लोक महंमदपूर लुटायला आले आहेत, आणि सर्वांची कत्तल करून शहर जाळून पोळून जाणार आहेत या गोष्टी काय तुम्हांला ठाऊक नाहींत ?

गंगा०—आपणांला हें भय कोणीं दाखविलें ? मुसलमान येऊन शहराची जाळपोळ करतील तर मग आम्ही कशाला आहों ? आपलें अन्न आम्ही फुकटच खातों आहों म्हणायचें !

रमा—तुम्ही पुरुष धीट असतां. तुम्हांला असल्या गोष्टींचें भय वाटत नाहीं. तुम्हीं जर आमचें रक्षण न केलें तर आमचें कसें होईल ?

यावर रमा पुनः रडूं लागली.

गंगा०—माझ्या मनगटांत जोर आहे तोंपर्यंत मी आपलें रक्षण करीन. आपण निश्चिंत रहा.

रमा—आपण करालच. पण समजा, आपल्या अंगांत तेवढें सामर्थ्य नसलें, तर ?

गंगा०—तर काय ? मरेन.

रमा—छेः छेः ! असें भलतेंच कांहीं करूं नका. माझी गोष्ट ऐकून घ्या. आज सगळी मंडळी मोठ्या महाराणीसाहेबांकडे जाऊन म्हणत

होती कीं मुसलमानांशीं वैरभाव न ठेवतां त्यांना आदरपूर्वक बोलावून आणून हें शहर त्यांच्या स्वाधीन करा, आणि आपणा सर्वांसाठीं प्राणांची भिक्षा मागा. पण मोठ्या महाराणीसाहेबांनीं तिकडे लक्ष दिलें नाहीं. हें त्यांचें लक्षण मला फारसें चांगलें वाटत नाहीं. यासाठीं तुम्हांला मुद्दाम बोलाविलें. आतां बोला. तुमच्या हातून यावर कांहीं इलाज होण्यासारखा आहे कीं नाहीं ?

गंगा०—मीं काय करावें असा आपला हुकूम आहे ?

रमा—हे मी माझे सारे दागदागिने आणि माझेपाशीं आहे नाहीं तो सारा पैसाअडका तुमच्या स्वाधीन करत्यें. तुम्ही कोणाला कांहीं न कळू देतां तो घेऊन मुकाट्यानें मुसलमानांच्याकडे जा, आणि त्यांना सांगा कीं आम्ही आपले हवालीं राज्य करतों. आपण येवढी कृपा करा कीं कोणाच्याहि जिवाला अपाय करूं नका. त्यांनीं ही गोष्ट जर कबूल केली तर मग काय ? हें शहर तुमच्याच हातांत आहे. तुम्ही त्यांना गुप्त रीतीनें आंत घ्या म्हणजे सर्वांचे प्राण वांचतील.

हे ऐकून गंगारामाच्या अंगावर शहारे आले. तो म्हणाला, ' महाराणीसाहेब ! अशा गोष्टी आपण माझ्यापुढें बोललांत त्या बोललांत. पण दुसऱ्या कोणापुढें पुनः बोलूं नका. माझा प्राण गेला तरी बेहेत्तर आहे; पण असें नीच कर्म माझे हातून कधीं घडणार नाहीं. इतकेंच नाहीं, तर दुसरा कोणी तें करील तर या समशेरीनें त्याची गर्दन उडविल्याशिवाय हा गंगाराम कधीं राहणार नाहीं.'

रमेची शेवटची एक आशा अशा रीतीनें निष्फळ झाली, तेव्हां ती धाय मोकलून रडूं लागली. ती म्हणाली, ' आतां माझ्या बाळाची दशा कशी होईल हो !' तिचा तो आक्रोश पाहून गंगाराम घाबरून गेला आणि म्हणाला, ' महाराणीसाहेब ! कृपा करून गप बसा. आपला हा आक्रोश ऐकून जर कोणी धावून आले, तर तें आपणां दोघांनाहि संकटच ! आपल्या मुलाविषयींचीच आपणांस भीति वाटत आहे ना ? त्याच्या रक्षणाची कांहीं तरी तजवीज करतां येईल. हें स्थान सोडून दुसरीकडे जाण्याची आपली मर्जी आहे काय ?'

रमा--मला माझ्या माहेरीं नेऊन पोंचवीत असाल तर मी आईन. पण मोठ्या महाराणीसाहेब मला कशा जाऊं देतील ? गुरुजीहि कसे जाऊं देतील ?

गंगा०--चोरून जावें लागेल. पण आतांच दुसरीकडे जाण्याची अवश्यकता मला दिसत नाहीं. तशीच वेळ आली तर मी स्वतः येऊन आपणांस घेऊन जाईन आणि सुरक्षितपणें पोंचवून येईन.

रमा--पण मला आपल्याकडून निरोप कसा पोंचेल ?

गंगा--मुरलेमार्फत तें करतां येईल. पण मुरला अगदीं गुप्तपणें मला भेटेल अशी तजवीज झाली पाहिजे.

रमा पुनः एक लांब सुस्कारा टाकून रडूं लागली. ती म्हणाली, ' तुम्ही आमचे प्राण वांचविलेत तर त्या उपकाराबद्दल मी तुमची दासी होऊन राहीन. देव तुमचें कल्याण करो.'

इतकें सांगून रमेनें गंगारामाला निरोप दिला. मुरला त्याला बाहेर-पर्यंत पोंचवून आली.

कोणाच्याहि मनांत कांहीं किल्मिष नव्हतें . पण एकंदर प्रकार झाला तो वाईटच--लोकांनीं नांवें ठेवण्यासारखा--झाला. रमा आणि गंगाराम या दोघांच्याहि मनांत ही शंका आली होती. गंगाराम मनांत म्हणाला, ' यांत माझ्याकडे काय दोष आहे !' रमाहि तशीच आपल्या मनाशीं म्हणाली, ' मला तरी ही गोष्ट करण्यावांचून दुसरा काय उपाय होता ? प्राणावर येऊन बेतलें आहे ना !' मुरला मात्र आपले ठायीं संतुष्ट होती.

गंगारामाला तितकी बारीक दृष्टि असती तर या साऱ्या प्रकारांत एक छपून बसलेला चोर त्याला दिसला असता.

जें भक्ताच्या मनांत तेंच देवाच्याहि मनांत होतें.

चंद्रचूडानें एका गुप्त हेराच्या हातीं तोराबखांला निरोप पाठविला कीं ' आम्हीं किल्ला, शिलेखाना वगैरे सुद्धां हें सगळें राज्य आपणांस विकत दिल्यास आपण किती रकम द्याल ? पैशानें जर काम होत असलें तर त्यासाठीं लढाई कशाला पाहिजे !'

चंद्रचूडानें ही गोष्ट मृण्मय व गंगाराम या दोघांनाहि सांगितली. तेव्हां मृण्मय रागानें डोळे गरगरां फिरवून म्हणाला, 'काय हें केलेंत ? पाहिजे होतें कशाला मुसलमानांची येवढी प्रतिष्ठा ठेवायला !'

चंद्रचूड म्हणाला, 'माझा हेतु तुमच्या लक्षांत नाहीं आला. अशींच कांहीं तरी बोलणीं चालवून दोन महिनेपर्यंत कालहरण करावें, तोंपर्यंत राजेसाहेबांची स्वारी येऊन पोंचेलच, ही त्यांतली खुबी होती.'

गंगारामाला काय वाटलें तें सांगतां येत नाहीं. तो कांहींच बोलला नाहीं.

प्रकरण सहावें.

त्या दिवशीं गंगारामाच्यानें कांहीं काम करवलें नाहीं. रमेच्या मुखाचें सौंदर्य आणि त्यावर पडलेल्या दिव्याच्या प्रकाशामुळें दिसणारी विलक्षण शोभा यांचें वारंवार स्मरण करण्यांतच त्याचा तो दिवस निघून गेला. दिव्याच्या प्रकाशानेंच इतकी शोभा दिसत होती काय ? तसें असेल तर माणसें रात्रंदिवस दिव्याच्या प्रकाशांतच कां बसून राहत नाहींत ? काय तें रमेच्या केसांचें सौंदर्य ! काय तो तिचा वर्ण ! त्या भिवयां ! ते डोळे ! आणि ते ओंठ ! आणि किती सुंदर तिच्या शरीराचा बांधा ! कशाकशाचें चिंतन गंगारामानें करावें ! सगळेंच कांहीं अप्सरांना सुद्धां दुर्लभ अशा प्रकारें सुंदर होतें. गंगाराम मनाशीं म्हणाला, 'मनुष्यजातींत इतकें सौंदर्य आढळेल अशी माझी कल्पना नव्हती. आजच्या सौंदर्यदर्शनानें जन्माचें सार्थक झालेंसें वाटतें. त्याच्या नुसत्या चिंतनानेंच मला राहिलेले आयुष्याचे दिवस सुखानें काढतां येतील.'

अरे मूर्खा ! असें कोठें झालें आहे ? एकदां पाहून माणसाला इतका आनंद झाल्यावर तो पुनः एकदां त्या सौंदर्याच्या दर्शनाची इच्छा कर-

नाख ! दुपारच्या वेळीं गंगारामाच्या मनाला वाटलें कीं एकदां जें कांहीं पाहिलें त्याच्या चिंतनानें आयुष्याचीं कित्येक वर्षें सुखानें काढतां येतील. पण संध्याकाळीं त्याचें त्यालाच वाटलें कीं ' पुनः एकदां तें सौंदर्य पाहाण्याचा योग येईल काय ? ' दोन चार घटका रात्रीच्या सुमाराला तो मनांत म्हणूं लागला ' आज पुनः मुरळा येईल काय ? ' एक प्रहर रात्रींनंतर मुरलेनें त्याला एकांतांत गांठलें.

गंगारामानें तिला विचारलें, ' काय खबर आहे ? '

मुरला—आपली काय खबर आहे ?

गंगाराम—कशासंबंधाची ?

मुरला—माहेरीं जाण्यासंबंधाची ?

गंगाराम—त्याची जरूरी पडणार नाहीं असें दिसतें. राज्याचें रक्षण होईल.

मुरला—हें कशावरून आपण म्हणतां ?

गंगाराम—तें मी तुम्हांला कसें सांगूं ?

मुरला—तर मग मी हेंच जाऊन राणीसाहेबांना सांगूं काय ?

गंगा—सांगा.

मुरला—मला त्यांनीं पुनः पाठविलें तर कोठें भेटाल ?

गंगा—काल आपली जेथें गांठ पडली तेथेंच पुनः पडेल.

मुरलेनें जाऊन राणीसाहेबांना तें सांगितलें. गंगारामानें खुलासेवार कांहींच सांगितलें नव्हतें. अर्थात् रमेला त्यापासून कांहींच बोध झाला नाहीं. त्यामुळें तिचें चित्त पुनः अस्वस्थ झालें. पुनः मुरलेनें गंगारामाची गांठ घेऊन तिसऱ्या प्रहर रात्रीं त्याला रमेच्या महालांत नेऊन सोडलें. दारावर पूर्वींचाच पाहारेकरी होता. त्यामुळें मुरलेचा भाऊ समजून त्यानें गंगारामाला आंत सोडलें.

गंगारामानें रमेशीं झालेल्या भेटीच्या वेळीं तिला जें काय सांगितलें त्याचा अर्थ त्याला स्वतःलाच कळलेला नव्हता. मग रमेला तो कोठून कळणार ? खरी गोष्ट ही होती कीं गंगारामाचें डोकेंच ठिकाणावर नव्हतें. कुसुमचाप हातीं धरणाऱ्या वीरानें त्याचें डोकें केव्हांच उडवून नेलें होतें !

दोन डोळे आणि दोन कान येवढे काय ते राहिले होते. त्यामुळें त्यानें डोळे भरून तिच्याकडे पाहिलें आणि कान भरून तिचे शब्द ऐकले. पण तेवढ्यानें त्याची तृप्ति झाली नाहीं.

गंगारामाला अजून थोडीशी शुद्धि राहिली होती. त्यामुळें चंद्रचूडाची मुत्सद्दीगिरीची मसलत् वगैरे गोष्टी त्यानें तिला सांगितल्या नाहींत. तो रमेला कांहीं सांगावें म्हणून आलाच नव्हता. तिला पुनः पाहण्यास मिळावें येवढ्याच इच्छेनें तो आला होता. त्याप्रमाणें त्यानें रमेचें दर्शन घेतलें आणि देवीपुढें पैसासुपारी ठेवतात त्याऐवजीं तो तिला आपलें चित्त अर्पण करून आला. याहि खेपेला मुरला त्याला बाहेरच्या दरवाज्यापर्यंत पोंचवून परत गेली. जातांना तिनें गंगारामाला विचारलें, ' पुनः याल ना ! '

गंगा०—कां ?

मुरला म्हणाली, ' याल असें दिसतें तर खरें ! '

गंगारामानें केवळ नेत्रसंकेत करून मागच्या मार्गांत पाऊल टाकलें, पण तो कांहीं बोलला नाहीं.

इकडे तोराबखाँनें चंद्रचूडाच्या निरोपावर उत्तर पाठविलें कीं ' थोड-कीशी रक्कम घेऊन राज्य स्वाधीन करीत असलां तर त्या गोष्टीला मी तयार आहें. पण एक अट आहे. ती ही कीं सीतारामाला धरून आमच्या हवालीं केलें पाहिजे. '

चंद्रचूडानें उत्तर पाठविलें कीं सीतारामालाहि धरून स्वाधीन करतां येईल. पण हें काम लहानशा रकमेनें होणार नाहीं. यावर, किती रक्कम लागेल ? असें तोराबखाँनें विचारलें. चंद्रचूडानें मोठी रक्कम सांगितली. तोराबखाँनें तिच्यांत काहीं कमी केलें. पुनः चंद्रचूडानें थोडेंसें नमतें घेतलें. त्यावरहि तोराबखाँचें कांहीं म्हणणें निघालें. अशी हुजत चालून चंद्रचूड कालहरण करूं लागला.

प्रकरण सातवें.

काळतोंडी मुरला जें म्हणाली होती तसेंच घडून आलें. गंगाराम पुनः रमेकडे गेला. त्याच्यानें गेल्याशिवाय राहवेना. रमेनें त्याला बोलाविलें नव्हतें. केवळ काय खबर आहे तें कळण्यासाठीं म्हणून रमा मुरलेला मधून मधून त्याच्याकडे पाठवीत असे. पण गंगाराम तिच्याजवळ कांहीं सांगेना. राजकारणासारख्या गुप्त गोष्टी मला तुझ्यासारख्याजवळ सांगतां येत नाहींत; एखादे दिवशीं मीच जाऊन महाराणीसाहेबांना सांगेन असें तो मुरलेला म्हणत असे. अर्थात्‌च त्याला पुनः बोलावणें रमेला जरूरच वाटलें.' कारण, मुसलमानांची स्वारी केव्हां होणार आहे याविषयींची खबर न कळली तर रमेचे प्राण व्याकुळ होत असत. त्याचा काय नेम ! ऐन दुपारीं आपल्या जेवण्याखाण्याच्या वेळेला मुसलमान पोंचले तर ! अशी भीति तिला वाटे.

अर्थात्‌च गंगाराम पुनः रमेकडे गेला. या खेपेला त्यानें धीर न देतां उलट भीति वाटण्यासारखें भाषण केलें. पुनः आपणाला बोलाविलें पाहिजे अशा धोरणानें तो बोलत होता. आपलें हृदय रमेपाशीं बोलून दाखविण्याइतकें धैर्य त्याच्या ठायीं नव्हतें. रमा सरळ स्वभावाची असल्यामुळें तिच्याहि लक्षांत तें बिलकूल येईना. गंगारामानें जें रमेकडे जाणें येणें ठेविलें होतें तें तिच्याशीं प्रेमालाप करण्यास मिळावें या बुद्धीनें नव्हे. तो मार्ग आपणास बंद आहे हें तो जाणून होता. रमेचें दर्शन घडावें आणि तिच्याशीं चार दोन शब्द बोलायला मिळावे यांतच त्याला मोठा आनंद वाटे.

याला कांहीं प्रेम म्हणतां येणार नाहीं. प्रेम असतें तर रमेला भय वाटण्यासारख्या गोष्टी बोलून तिच्या मनाला यातना करण्याचा प्रयत्न त्याच्या हातून घडलाच नसता. असली वृत्ति म्हणजे अगदीं अधम-

पणाची. ती ज्याच्या हृदयांत प्रवेश करते त्याचा सत्यानाश करून सोडते याला प्रमाण याच पुस्तकांत सांपडेल.

भय दाखवून गंगाराम चालता झाला. रमेच्या मनांत तेव्हां माहेरीं जाण्याचें होतें. पण सध्यां तसें करण्याची सोय नाहीं असें सांगून गंगाराम चालता झाला, तेव्हां रमा दोन दिवस थांबली, आणि नंतर पुनः तिनें गंगारामाला बोलावणें पाठविलें. तिनें बोलवावें आणि त्यानें जावें असें चाललें होतें.

पाण्यांतले मासे धरावयाचे म्हणजे पाण्यांत हात घातलाच पाहिजे; नाहीं म्हणून चालावयाचें नाहीं. रमेची गांठ गंगारामानें चार चौघा-लोकांदेखत पन्नास वेळां घेतली असती तरी त्याला कोणीं नांवें ठेविलीं नसतीं. कारण कीं रमेचें मन अगदीं स्वच्छ व पवित्र होतें. पण असें भीत भीत, गुप्तपणें, तिसऱ्या प्रहरीं रात्रीं भेटी घेणें चांगलें नाहीं. अशा भेटीचा परिणाम दुसरा कांहीं न झाला तरी परस्परांविषयीं आदर वाढतो, मोकळ्या मनानें गोष्टी बोलतां येतात, व दोन मनांचा मिलाफ घडतो येवढें खरें. रमेच्या बाबतींतहि असेंच झालें. रमेच्या ध्यानांत ती गोष्ट अगोदर आली नाहीं. पण मुरलेनें सांगितलेली एक गोष्ट सहज तिच्या कानीं पडली. एके दिवशीं मुरलेबरोबर पाहारेधाला पांडे यासंबंधानेंच कांहीं बोलत होता. त्यानें विचारलें, ' मुरला ! तुझा भाऊ नेहमीं रात्रीचा येऊन जनान-खान्यांत जात असतो तो कशासाठीं ?

मुरला—मेल्या चाहटळा ! हें विचारतांना तुझ्या मनाला कांहीं संकोच नाहीं वाटत ?

पांडे—वाटतो. पण प्राणाचेंहि भय त्याबरोबर आहेच कीं नाहीं ?

मुरला—तुला प्राण तरी किती आहेत ? मी नाहीं का तुझा एक प्राण ?

पांडे—पण तूं सोडून गेलीस तर मी कांहीं मरायचा नाहीं ! पण माझे प्राण गेले तर माझ्या दृष्टीनें जगांत सगळा अंधेर होईल. आतां यापुढें तुझ्या भावाला मी आंत सोडणार नाहीं.

मुरला—तूं त्याला न सोडलेंस तर मी तुला सोडीन का ? यावर काय बोलतोस पाहूं !

पांडे—हें पहा, तो मनुष्य तुझा भाऊ दिसत नाहीं. तो कोणी तरी मोठा मनुष्य असला पाहिजे. त्याचें येथें काय काम आहे ? कांहीं कळत नाहीं. कळण्याचीहि मला जरूरी नाहीं. कोणाला ठाऊक ! तो जनानखान्याच्या बंदोबस्तासाठीं कदाचित् येत असेल. तरी पण ज्या अर्थी हा येथें येण्याची सक्त मनाई असून जात येत असतो त्या अर्थी आम्हां लोकांना कांहीं इनाम मिळालें पाहिजे. तुला मिळालेंच असेल. त्यांतला अर्धा वांटा मला मिळाला पाहिजे. तर मी कांहीं बोलणार नाहीं.

मुरला—त्यांनीं मला कांहीं एक दिलें नाहीं. मला मिळाल्यावर तुला देईनच.

पांडे—अर्धा हिस्सा माझा, बरें का ?

मुरलेनें विचार केला कीं ही एक चांगली गोष्ट यानें सुचविली. रमाराणीसाहेबांकडून तिला दागदागिने व वस्त्रें मिळालीं होतीं, पण गंगारामाकडून कांहीं प्राप्ति झाली नव्हती. म्हणून तिनें क्षणभर डोकें चालवून एक युक्ति योजिली आणि पाहारेवाल्याला म्हटलें, ' ठीक आहे. आतां पुनः तो येईल तेव्हां त्याला आंत सोडूं नकोस. मीं सांगितलें तरी सोडूं नकोस. असें केलेंस तर कांहीं मिळेल.'

त्यानंतर एके दिवशीं गंगाराम अंतःपुरांत जाण्यासाठीं आला. पण पाहारेवाल्यानें त्याला आंत सोडलें नाहीं. मुरलेनें त्याला पुष्कळ धमकावण्या दाखविल्या व त्याच्या विनवण्या करून पाहिल्या, पण व्यर्थ ! कशाचाहि उपयोग झाला नाहीं. तेव्हां आपण कोण आहों तें त्याला उघड करून सांगावें असा गंगारामानें विचार केला. त्याला वाटलें कीं तें सांगितल्यावर मग पाहारेवाला हरकत घेणार नाहीं. त्यानें आपला विचार हळूच मुरलेच्या कानांत सांगितला. तेव्हां ती म्हणाली कीं, 'तो हरकत घेणार नाहीं, पण बोभाटा करील. माझ्या भावाचें येणें जाणें आहे असें तो सांगत फिरला तर त्याच्याबद्दलचा दोष माझ्यावर येईल.'

गंगाराम म्हणाला, 'तेंहि खरेंच.'

मग गंगारामानें विचार केला कीं या पाहारेवाल्याला येथल्या येथें ठार करावें, म्हणजे झालें. पण त्यापासून आणखी नसती भानगड उपस्थित व्हावयाची, आणि जाण्याचा आपला मार्ग कायमचाच बंद व्हावयाचा. म्हणून तेंहि न करतां तो स्वस्थ राहिला. पाहारेवाल्यानें त्याला सोडलें नाहीं म्हणून गंगाराम परत घरीं आला.

मुरला दासी एकटी परत आलेली पाहून राणीनें विचारलें, ' ते आज कां आले नाहींत ?'

मुरला—आले होते, पण पाहारेवाल्यानें त्यांना आंत सोडलें नाहीं.

राणी—रोज सोडतो, मग आज न सोडण्याचें कारण काय ?

मुरला—त्याला कांहीं शंका आली असावी.

राणी—कशाची शंका ?

मुरला—ती ऐकून आपणाला काय करायचें आहे ? आपल्या देखत तिचा उच्चार माझ्या जिभेनें करवत नाहीं. कांहीं इनाम देऊन त्याला वश करून घेतलें तर चांगलें होईल.

जो स्वतः अपवित्र असतो तो पवित्र माणसाला आपल्याच सारखा समजून त्याच्याशीं वागत असतो. त्याला हें समजत नाहीं कीं पवित्र माणसें या जगांत आहेत, आणि त्यांच्या कार्याचा नाश आपल्यामुळें होतो. मुरलेनें सांगितलेलें ऐकून रमेच्या अंगाला घाम सुटला. घाम सुटतां सुटतां ती कांपूं लागली. कांपतां कांपतां ती मटकन् खालीं बसली; बसल्या बसल्या डोळे जड होऊन झोंप लागली आणि झोंपेंतच ती बेशुद्ध झाली. रमेला असें कधीं झालें नव्हतें. ती इतकी घाबरून गेली होती कीं तिनें वर मान केली नाहीं. आतां तर तिच्यावर वज्राघात झाला होता ! ती मनांत म्हणूं लागली कीं आपल्या हातून घोर अपराध घडला आहे. रमा बुद्धीची जड होती. तरी स्त्रीजातीच्या—विशेषतः हिंदु स्त्रियांच्या अंगीं अशी कांहीं बुद्धि असते कीं तिचा एकदां उदय झाला म्हणजे तिला सगळ्या गोष्टी आरशाप्रमाणें स्वच्छ दिसूं लागतात. आतांपर्यंत झालेल्या गोष्टींवरून तिला कळून चुकलें कीं आपले हातून मोठा अपराध घडला आहे खरा. तेव्हां आतां विष खाऊन तरी मरावें किंवा स्वतःचा गळा

कापून घ्यावा हेंच उचित आहे. असें केल्यानें सगळ्या पापांची निष्कृति होईल आणि मुसलमानांचें भयहि उरणार नाहीं. पण मग आपल्या मागें आपल्या मुलांचें काय होईल ? हा प्रश्न तिच्या मनांत उभा राहिला. शेवटीं तिनें आपल्या मनाशीं ठरविलें कीं राजेसाहेबांची स्वारी आल्यावर स्वतःचा गळा कापून घ्यावा. ते मुलाचा कांहीं तरी बंदोबस्त करतीलच. पण तोंपर्यंत तरी मुसलमानांच्या हातून प्राण् वांचायला पाहिजेत ना ? मुसलमानांच्या हातून जगणें कठीण हें तर खास. तरीपण गंगारामाला बोलवायचें नाहीं कीं त्याच्याकडे निरोप पाठवायचा नाहीं असा तिनें निश्चय केला. तिनें स्वतःहि त्याच्याकडे निरोप पाठविला नाहीं आणि मुरलेलाहि जाऊं दिलें नाहीं.

मुरला पुनः कधीं आली नाहीं, आणि राणीसाहेबांकडून आतांशा बोलावणेंहि नाहीं हें पाहून गंगारामाचें मन अस्थिर झालें. आहार व निद्रा हीं दोन्हीं बंद झालीं. तो आतां मुरलेच्या शोधार्थ फिरूं लागला. पण मुरला राजवाड्यांतली दासी. रस्त्यांत, किंवा घाटावर थोडीच दिसणार होती ! ती वाड्याच्या बाहेर सहसा पडत नसे. राणीसाहेबांच्या आज्ञेवरून गंगारामाच्या शोधापुरती बाहेर पडत असे. गंगारामाला मुरलेचा शोध लागेना. अखेर त्यानें एक दूतिका तिच्याकडे पाठविली, आणि तिला बोलाविलें. रमेकडे दूतिका पाठविण्याचें धैर्य त्याला झालें नाहीं.

मुरला आली. मला कशासाठीं बोलाविलें ? असा तिनें साहजिकच त्याला प्रश्न केला.

गंगा—आजकाल खबर विचारायला कोठें येत नाहींस ती ?

मुरला—खबर विचारली तरी तुम्ही सांगतां कोठें ? माझ्यावर तर तुमचा विश्वास नाहीं !

गंगा०—बरें असो. पण मला एकदां राणीसाहेबांची समक्ष भेट नाहीं का घेता येणार ?

मुरला—त्यांची समक्ष भेट कशाला घ्यायची ? देवाला दुरून नैवेद्य दाखविलेलाच अधिक चांगला.

गंगा—म्हणजे ?

मुरला—धाकट्या महाराणीसाहेबांची प्रकृति आतां बरी आहे.

गंगा—त्यांना काय झालें होतें ?

मुरला—त्यांतलें तुम्हांला कांहींच कळलें नाहीं वाटतें ?

गंगा—नाहीं.

मुरला—बाईसाहेबांना वात होऊन भ्रम झाला होता !

गंगा—तो कसा काय ?

मुरला—सांगत्यें ना भ्रम झाला होता म्हणून ? तसें नसतें तर तुमचा प्रवेश अंतःपुरांत झाला असता काय ?

गंगा—कां बरें ?

मुरला—तुमची तेथें जाण्याची योग्यता आहे काय ?

गंगा—मग मी आहें तरी कोणत्या स्थळाला योग्य ?

मुरला—मी सांगूं ? या फाटक्या पदराच्या. माहेरीं घेऊन जायचें तर मला तरी न्या ? फारा दिवसांत मला आईबाप भेटले नाहींत.

इतकें बोलून हंसत हंसत मुरला चालती झाली. गंगाराम समजला कीं येथें आतां आशा धरतां येत नाहीं. पण आशा धरण्यांत अर्थ नाहीं ही गोष्ट मनाला कळते कोठें ? जोंपर्यंत अंगांत पापें करण्याची शक्ति असते तोंपर्यंत पाप्याला आशा वाटतच असते. 'या पृथ्वींत जेवढीं म्हणून पापें असतील तेवढीं सगळीं करीन; पण रमेला सोडणार नाहीं' असा संकल्प करून कृतघ्न गंगाराम रमेचा व सीतारामाचा नाश कसा करतां येईल याचा आतां विचार करूं लागला.

प्रकरण आठवें.

बरेच दिवसानंतर आज श्री व जयंती या दोघीजणी ललितगिरि पर्वताच्या पायथ्यापाशीं विरूपानदीच्या तीरावर पुनः आल्या होत्या. महापुरुषानें त्यांना येण्याची आज्ञा केली होती हें वाचकांच्या लक्षांत असेलच.

महापुरुषानें जयंतीचीच भेट घेतली, श्रीची घेतली नाहीं. जयंती [illegible] हत्तीगुंफेच्या आंत गेली. श्री विरूपानदीच्या तीरीं इकडे तिकडे फिरत राहिली. कांहीं वेळानें ती एका गिरिशिखरावर चढून गेली आणि तेथें एका चंदनवृक्षाखालीं बसून खालीं नदीच्या तीरावर तालवृक्षांचें बन होतें त्याची अपूर्व शोभा पाहूं लागली.

नंतर जयंती त्या ठिकाणीं आली.

महापुरुषानें काय सांगितलें वगैरे गोष्टींची चौकशी न करतां श्री म्हणाली, '.पक्ष्यांचा शब्द कानांला किती मधुर लागतो ! त्यानें कान कसे भरून गेले आहेत !

जयंती—पतीच्या कंठस्वराप्रमाणेंच ना ?

श्री—नदीच्या गद्‌गद् शब्दाप्रमाणें.

जयंती--पतीच्या कंठस्वराप्रमाणेंच ना ?

श्री—फार दिवसांत तिकडचा शब्द मला ऐकायला मिळाला नाहीं. त्यामुळें कांहीं सांगतां येत नाहीं.

हाय ! सीताराम !

जयंतीला तें ठाऊक होतेंच. तथापि स्मरण करून देण्यासाठीं तिनें तो प्रश्न मुद्दामच केला होता. तिनें विचारलें, ' आतां जर तो ऐकायला मिळाला तर तो गोड नाहीं का लागणार ? '

यावर श्री कांहींच बोलली नाहीं. थोड्या वेळानें वर मान करून तिनें जयंतीच्या तोंडाकडे पाहिलें आणि विचारलें, ' गुरुमहाराजांनीं मीं पतिदर्शनाला जावें या गोष्टीला रुकार दिला काय ? '

जयंती—तुला तर जावेंच लागणार आहे. मीहि तुझ्याबरोबर जावें अशी त्यांची आज्ञा आहे.

श्री—कां बरें ?

जयंती—कल्याण होईल येवढेंच ते म्हणाले.

श्री—गडे ! आतां माझें शुभाशुभ आणि सुखदुःख काय व्हावयाचें राहिलें आहे ?

जयंती—तुझ्या नाहीं का लक्षांत आलें ? अजूनसुद्धां तुला अशा गोष्टी समजावून सांगाव्या लागतात ना ?

श्री—खरेंच. नाहीं माझ्या लक्षांत आलें.

जयंती—अग, तुझ्या शुभाशुभाची गोष्ट असती तर गुरुमहाराजांनीं तुला जाण्यास सांगितलें नसतें. स्वार्थाच्या मागें लागण्याविषयीं ते कधींच कोणाला उपदेश करीत नसतात. या गोष्टींत तुझें शुभाशुभ कांहीं नाहीं.

श्री—आतां समजलें. मी येथून गेल्यानें तिकडचें शुभ होण्याचा संभव आहे असाच ना याचा अर्थ ?

जयंती—तें कांहीं त्यांनीं स्पष्ट सांगितलें नाहीं. इतकी फोड करून ते बोलले नाहींत. माझ्याशीं ते फारसें बोलूं इच्छित नाहींत. त्यांच्या बोलण्यांतलें येवढेंच तात्पर्य मला कळलें. आणि इतके दिवस माझ्याजवळ तूं जें कांहीं शिकलीस त्यावरून तुझ्याहि लक्षांत हेंच तात्पर्य आलें असेल.

श्री—तुम्हांला जाण्याचें काय कारण ?

जयंती—तें त्यांनीं कांहीं सांगितलें नाहीं. त्यांची आज्ञा म्हणूनच केवळ मी जाणार आहें. नाहीं कसें म्हणावयाचें ? तू जाणार ना ?

श्री—मी त्याचाच विचार करत्ये आहें.

जयंती—आतां विचार कसला करत्येस ? पश्चिमेकडल्या भविष्याची आठवण झाली वाटतें ?

श्री—नाहीं. आतां मला त्याची भीति वाटत नाहीं.

जयंती—कां बरें ? तें मला सांग. म्हणजे तें कळल्यावर मग मी तुझ्याबरोबर जाण्याचें नक्की ठरवीन.

श्री—आई ! कोण कोणाचा घात करीत असतें ! सर्वांचा मारता त्राता एकच आहे. सगळे मरायचेच आहेत. माझ्या हातून म्हणा कीं दुसऱ्याच्या हातून म्हणा, तिकडे मृत्यु यायचाच आहे. मी केव्हांहि जाणून बुजून त्यांचा घात करणार नाहीं हें सांगायला नकोच. पण या जगाच्या सूत्रधारानें अशीच कांहीं योजना केली असली कीं माझ्याच हातून या संसारयातनांतून त्यांची मुक्तता व्हावी, तर ती पालटण्याला कोण समर्थ आहे ! मी रानां-वनांतून फिरेन. समुद्राच्याहि पार जाईन. गुरुमहाराजांच्या आज्ञेपुढें मान वाकविलीच पाहिजे. आपण आपल्याकडून खबरदार राहून धर्माचरण करीत असावें. त्यापासून त्यांच्यावर जर कांहीं विपत्ति आली तर तिच्या-विषयींचें सुखदुःख मानण्याचें आपणाला मुळींच कारण नाहीं.

हाय ! सीताराम ! कोणासाठीं तूं आतां भटकतो आहेस !

जयंती मनांत खुष झाली. ती म्हणाली' 'असें आहे तर मग विचार कसला करत्येस !'

श्री—विचार येऊन पडला आहे तो हा कीं मीं गेल्यें आणि त्यांनीं मला परत येऊं दिले नाहीं, तर काय करायचें ?

जयंती—जर तुला पत्निकेची भीति वाटत नाहीं, तर नाहीं येऊं दिलें म्हणून काय बिघडलें ? आणि मग तूं तरी कशाला येशील ?

श्री—मी आतां महाराजांच्या वामभागीं बसण्यास कोठें योग्य आहें ?

जयंती—पूर्वीपेक्षां हजारपटींनीं अधिक योग्य झाली आहेस. जेव्हां मी तुला सुवर्णरेखेच्या किंवा वैतरणीच्या तीरीं प्रथम पाहिलें तेव्हांपेक्षां तुझें रूप आतां किती तरी पटीनें वाढलें आहे हें तुला ठाऊक नाहीं.

श्री—छिः ! छिः ! काय हें बोलणें ?

जयंती—तुझे गुणहि तसेच किती तरी पटींनीं वाढले आहेत ! तें-हि तुला ठाऊक नाहीं. तुझ्याइतकी गुणवान् कोणती राणी आहे दाखीव बरें !

श्री—पण अगोदर माझें म्हणणें तुम्ही नीट समजून घेतलें का ? तुमच्या व माझ्या मनांच्या मध्यें उगाच आडवा बांध का घालतां ? मी तें कां म्हणत होत्यें ? मी असें म्हणत होत्यें कीं ज्या श्रीला परत फिरवि-

ज्यासाठीं त्यांनीं यातायात केली ती श्री आज राहिली नाहीं. तुमच्याच हातून तिचा सोक्षमोक्ष झाला. आतांची श्री तुमची शिष्या आहे. तुमच्यासारख्या जोगिणीच्या शिष्यिणीला घेऊन महाराजाधिराज सीतारामराय यांना कसें सुख लागेल ! तुमच्या शिष्यिणीलाहि तसें केल्यानें कसें सुख लागेल ? राणीसाहेबाची पदवी व तत्संबंधींचीं कर्तव्यें तुमच्या शिष्यिणीच्या योग्यतेचीं नाहींत.

जयंती—माझ्या शिष्यिणीला आतां सुखदुःख कसचें ! (हंसून) अशा शिष्यिणीला धिक्कार असो !

श्री—मला स्वतःला सुखदुःखाचा विधिनिषेध नाहीं; पण त्यांना आहे ना ! त्यांना जेव्हां कळेल कीं आपली श्री मेली, आणि एक जोगीण कपटानें तिचा देह धारण करून फिरत्ये आहे, तेव्हां त्यांना नाहीं का दुःख होणार !

जयंती—कदाचित् होईल, कदाचित् होणार नाहीं. पण त्या गोष्टींचा विचार आपण करा कशाला ? प्रभूच्या चरणारविंदीं चित्त लीन झालें आहे आणि त्या चरणांवांचून दुसऱ्या कशालाहि चित्तांत स्थान मिळत नाहीं अशी स्थिति ज्या माणसाची होते त्याचें कामकाज सुरळीतपणें चालतें. तुझ्या यजमानाचें असो कीं दुसऱ्या कोणाचें असो, आपणाला हित साधावयाचें आहे, तर तिकडे आपणांस आत्ताच गेलें पाहिजे. चल, आपण जाऊं.

जयंती हें जेव्हा बोलत होती, तेव्हां तिच्या हातांत दोन त्रिशूळ होते. श्रीनें विचारलें, ' हे त्रिशूळ कशाला ?'

जयंतीनें उत्तर केलें, ' महापुरुषानें आपणांला भैरवीचा वेष घेऊन जाण्याची आज्ञा केली आहे व हे त्रिशूळ दिले आहेत. हे मंतरलेले असावे असें दिसतें. '

नतर दोघींनीं भैरवीचा वेष धारण केला, आणि दोघी पर्वतावरून उतरून विरूपानदीच्या कांठाकांठानें गंगेकडे जाऊं लागल्या. वाटेनें दोन्ही बाजूंस वनें लागलीं. त्या वनांतून त्यांनीं नानाप्रकारचीं वन्य पुष्पें तोडून आणिलीं. त्यांच्या पाकळ्या, पराग, रेणु यांचें अवलोकन करीत

व त्या पुष्पांच्या निर्माणकर्त्या प्रभूच्या कौशल्याची आणि गुणांची प्रशंसा करीत करीत त्या चालल्या होत्या. त्या अवधींत सीतारारामाच्या नांवाचा उच्चार एकदां सुद्धां कोणी केला नाहीं. असल्या कपाळकरंट्यांना देव रूप आणि तारुण्य देतो तरी कशाला तें एक परमेश्वराला ठाऊक किंवा ज्याच्या नांवाची जपमाळ जपणाऱ्या त्या वेड्या मूर्ख सीतारामाला ठाऊक ! वाचक तर त्या दोघींचीहि गणना डाकिणींमध्येंच करतील. प्रस्तुत लेखकाचेंहि तसेंच मत आहे.

प्रकरण नववें.

भूषणा येथील बंदेअली नांवाच्या एका हलक्याशा मुसलमानानें एका मोठ्या घराण्यांतली मुलगी काढून नेऊन तिच्याशीं निका लाविला होता. तिचा नवरा बलात्कारानें नेलेल्या आपल्या बायकोला परत मिळविण्याच्या खटपटींत होता. बंदेअली त्या मुलीला घेऊन महंमदपुरांत येऊन राहिला होता. गंगारामाची व त्याची पूर्वीपासून ओळख होती. त्याच्याच कृपेनें बंदेअली सीतारामाच्या फौजेंत शिपाई म्हणून भरती झाला होता. तो गंगारामाच्या फार विश्वासांतला होता. गंगारामानें त्याला गुप्तपणें तोराबखांकडे पाठविलें, आणि त्याच्या हातीं सांगून पाठविलें कीं चंद्रचूड ठाकुर हा मोठा लबाड आहे. पैसे दिले म्हणजे आम्ही तुमच्या हवालीं राज्य करूं असें जें त्यानें आपणास कळविलें आहे ती केवळ लबाडी आहे. कोणीकडून तरी कालहरण करावें हा त्याचा कावा आहे. जेणेंकरून सीताराम लवकर येऊन पोंचेल अशा गोष्टी तो करीत असतो. शहरहि त्याच्या हातांत नाहीं. त्यानें तें देण्याचें मनांत आणिलें तरी त्याला तें देतां येणार नाहीं. तें माझ्या हातीं आहे. मी होऊन दिल्याशिवाय तें कोणाच्याहि हातीं लागणार नाहीं. फार काय

पण सीतारामालाहि तें मिळणार नाहीं. मीं मनांत आणिलें तर फौजदाराच्या स्वाधीन तें करूं शकेन. पण त्याबद्दल ज्या कांहीं गोष्टी मला बोलावयाच्या आहेत त्या मी समक्षच सांगण्याची इच्छा करीत आहें. त्यावांचून हें कार्य व्हावयाचें नाहीं. पण मी तर फरारी झालेला इसम आहें. जिवाच्या भीतिमुळें आपलेकडे येण्यास मी धजत नाहीं. फौजदार साहेब अभय-वचन देतील तर मी येऊं शकेन.

गंगारामाच्या सुदैवानें त्याचा एक वशिलाहि लागला. बंदेअलीची बहीण व तोराबखाँची बायको मताहिया बेगम ही होती. साहजिकच तोराबखाँची भेट घेणें बंदेअलीला कठीण नव्हतें. त्यानें भेट घेतली, बोलणेंचालणें ठीक झालें आणि गंगारामाला पाहिजे होतें तें आश्वासनाहि मिळालें. तोराबनें आपल्या हातानें गंगारामाला पुढील मजकुराचें पत्र लिहिलें— ' तुमचा सगळा गुन्हा माफ करण्यांत आला आहे. उद्यां रात्रीं हुजुरांत हजर व्हावें. '

बंदेअली भूषणाहून लागलीच माघारा फिरला. ज्या नावेंत बसून तो नदीपार झाला त्याच नावेंत चांदशहा फकीरहि होता. तो बंदेअलीशीं बोलूं लागला. तुम्ही कोणीकडे गेलां होतां ? असें फकीरानें विचारलें. तेव्हां बंदेअलीनें भूषणास गेलों होतों असें सांगितल्यावरून फकीरानें त्यास तेथली हालहवाल विचारली. बंदेअली नुकताच फौजदाराला भेटून आला होता, यामुळें तो गर्वानें चढला होता. फकीरानें त्याला तेथील कोतवाल, बक्षी, मुनशी, कारकून इत्यादि सगळ्या बारीक सारीक नोकरांच्या संबंधानें सुद्धां खबर विचारली. फकीर सीतारामाचा हित-चिंतक होता. तो मनांत म्हणाला, ' आपण आतां याच्या पाळतीवर राहिलें पाहिजे.'

प्रकरण दहावें.

गंगारामानें फौजदाराची अगदीं एकांतांत गांठ घेतली. फौजदारानें त्याला भय वगैरे कांहीं दाखविलें नाहीं. मुख्य प्रश्नासंबंधाचें बोलणें ठीक ठीक झालें. फौजदाराचें सैन्य महंमदपुरच्या किल्ल्याच्या समोर येऊन पोंचलें कीं त्या सैन्याला किल्ल्याचा दरवाजा उघडून देण्याचें गंगारामानें कबूल केलें. पण फौजदारसाहेब म्हणाले कीं किल्ल्याच्या दरवाजापुढें सैन्य येऊन पोंचल्यावर तर तुम्ही दरवाजा उघडून द्यालच. पण मृण्मयाच्या ताब्यांत पुष्कळ फौज आहे. त्या फौजेनें वाटेंतच आम्हांला गांठलें तर लढाईचा प्रसंग येणार आणि लढाई म्हटली म्हणजे तींत एका पक्षाला जय तर दुसऱ्याला पराजय हा व्हावयाचाच. आमचा जय झाला तर तुमच्या साह्यावांचून आम्हांला किल्ला हस्तगत करतां येईल. जर आमचा पराजय झाला तर तुमचें सैन्य आमच्या काय उपयोगीं पडणार ! या गोष्टीचा विचार काय केला आहे !

गंगा०—भूषणेहून महंमदपुराला जाण्याला दोन वाटा आहेत. एक दक्षिण दिशेनें व दुसरी उत्तरेकडून. दक्षिणच्या बाजूनें गेल्यास नदीला दूर अंतरावर उतार आहे. उत्तरेकडून गेल्यास किल्ल्याच्या समोर नदी उतरावी लागेल. आपण महंमदपुरावर चालून याल तेव्हां दक्षिणच्या बाजूनें यावें. किल्ल्याच्या समोर नदी उतरणें कठीण किंबहुना अशक्य आहे. तेव्हां तुमचें सैन्य दक्षिणेकडूनच येईल असें साहजिक मृण्मयाला वाटेल आणि तो आपली फौज तिकडे नेईल. ही संधी साधून तुम्ही आपली फौज उत्तरेकडून आणून एकदम किल्ल्यासमोर नदी उतरून यावें. त्या वेळीं किल्ल्यांत बहुधा फौज नसेलच; असली तरी फार थोडी असेल. तेव्हां आपणाला अनायासें नदी उतरतां येईल, आणि खुल्या दरवाजानें किल्ल्यांत प्रवेश करतां येईल.

फौज०—पण दक्षिणेच्या मार्गानें फौज नेत असतां जर मृण्मयाला कळलें कीं आमची फौज उत्तरेकडून येत आहे तर तो अर्ध्या वाटेंतून परत फिरेल. मग कसें ?

गंगा०—आपण अर्धें सैन्य दक्षिणेच्या आणि अर्धें उत्तरेच्या मार्गानें पाठवावें. उत्तरेच्या मार्गानें आपण फौज पाठवीत आहां ही खबर आगाऊ कोणाला न कळली पाहिजे. ही फौज रात्रीं रवाना करावी आणि नदीच्या तीरापासून थोड्याशा अंतरावर तिनें दबा धरून बसावें हें चांगलें. मृण्मय आपली फौज घेऊन थोडें अंतर चालून गेल्यावर नदीपार झाला म्हणजे आपलें काम निर्विघ्नपणें पार पडेल. मृण्मयाचेंहि सैन्य दक्षिणेच्या व उत्तरेच्या अशा दोन्ही मार्गांच्या मध्यें कचाट्यांत धरलें जाईल. मग तिचा नाश व्हायला काय उशीर आहे !

गंगारामाची ही मसलत फौजदाराला पसंत पडून तो खुष झाला, आणि म्हणाला, ' उत्तम. तुम्ही आमचें हित चिंतणारे आहां खरे; कांहीं तरी इनाम मिळविण्याच्या इच्छेनें तुम्ही या कार्याला उद्युक्त झालां असाल तर बोला तुम्हांला काय इनाम पाहिजे ! '

गंगारामानें आपली इच्छित वस्तु मागितली. ती म्हणजे रमा !

संतुष्ट होऊन गंगाराम चालता झाला, आणि रात्रींच्या रात्रीं महंमद-पुराला दाखल झाला. चांदशहा फकीर आपल्या मागेंच होता हें त्याला कळलें नाहीं.

प्रकरण अकरावें.

रात्रीं चंद्रचूडाच्या गुप्त हेरांनीं बातमी आणिली कीं मुसलमान फौजदाराचें सैन्य दक्षिणेच्या मार्गानें महंमदपुरावर चाल करून येत आहे. तेव्हां चंद्रचूडानें मृण्मय व गंगाराम यांना बोलाविलें. कर्णोपकर्णीं

विचारानें ठरलें कीं मृण्मयानें सैन्य घेऊन त्याच रात्रीं तिकडे जाण्यास निघावें, आणि मुसलमान नदी उतरून अलीकडे येणार नाहींत अशी व्यवस्था करावी.

इकडे लढाईची तयारी जोरानें चालू झाली. मृण्मयाची पूर्वीपासूनच तयारी होती. तो फौज घेऊन रात्रीं निघाला. किल्ल्याच्या रक्षणासाठीं त्यानें फार थोडे लोक ठेविले होते, आणि ते गंगारामाच्या आज्ञेंत होते.

या गडबडींत बिचाऱ्या रमेची काय स्थिति झाली होती तिकडे वाचकांचें लक्ष जाईल काय ? मुसलमानांचा हल्ला येणार ही बातमी सर्वांच्या तोंडून तिनें ऐकली, तेव्हां मुरला म्हणाली, 'महाराणीसाहेब ! आतां आपण माहेरीं जाण्याची कांहीं तजवीज केली पाहिजे.

रमा म्हणाली, ' मरायचेंच, तर मग येथेंच कां मरण येईना ! तोंडाला काळें लागेल असें तरी करूं नये. पण एकदा तूं गंगारामाकडे जा. मी स्वतः मरणाची भिती बाळगीत नाहीं. मला येथें मरण आलें तरी चालेल. पण माझ्या बाळाचें रक्षण करण्याचें गंगारामानें पत्करलें आहे. तेव्हां त्याला त्या गोष्टीची आठवण दे. म्हणजे तो वेळींच येऊन रक्षणाची तजवीज करील. आतां माझी समक्ष भेट पुनः होणार नाहीं हेंहि त्याला सांग. '

चित्ताला थोडीशी शांति मिळावी म्हणून रमा जंमळ नंदेकडे जाऊन बसली. त्या रात्रीं शहरांत कोणालाहि झोप आली नाहीं.

मुरला आज्ञेप्रमाणें गंगारामाकडे गेली. तो रात्रींच्या वेळीं घरांत एकटा विचारांत निमग्न होऊन बसला होता. रत्नप्राप्तीच्या आशेनें समुद्रांत उडी टाकण्यास तो प्रवृत्त झाला होता. पोहून परतीर गांठतां येईल कीं नाहीं ! या प्रश्नावर त्यानें पुष्कळ विचार करून पाहिला; पण त्याच्या मनाचा कांहीं ठाम निर्णय होईना. पुष्कळ विचार करूनहि ज्यांच्या मनाला कांहीं एक निश्चित गोष्ट ठरवितां येत नाहीं त्यांचा अखेर भरंवसा परमेश्वरावर असतो. ' परमेश्वर करील तें खरें ' असें ते म्हणतात. पण गंगारामाच्या तोंडून हे सुद्धां शब्द निघेनात. पापकर्म करण्यास प्रवृत्त झालेल्यांना वाटतें कीं ईश्वर आपल्याविरुद्ध आहे. त्यांच्या मनाचा भित्रं असा

जो परमेश्वर तो आपला शत्रु आहे अशी त्यांची समजूत असते. गंगारामाचीहि तशीच समजूत होऊन तो त्यामुळें खिन्न व विचारमग्न होऊन बसला होता.

अशा वेळीं मुरला तेथें जाऊन पोहोंचली व तिनें रमेचा निरोप त्याला कळविला.

गंगाराम म्हणाला, ' तर मग आतां जाऊन मुलाला घेऊन ये. '

मुरला—तें होणार नाहीं. मुसलमान नगरांत प्रवेश करूं लागतील तेव्हां तुम्हीच तिकडे जाऊन रक्षण करावें असें महाराणीसाहेबांचें म्हणणें आहे.

गंगा—ऐनवेळीं काय होईल त्याचा नेम कोणीं सांगावा ? मुलाचें रक्षण व्हावें अशी इच्छा असली तर त्याला आत्तांच आणून माझ्या स्वाधीन करावयास पाहिजे.

मुरला—मी राजपुत्राला घेऊन येऊं ?

गंगा०—नको. मी स्वतःच येतों. आपसांतहि कांहीं गोष्टी बोलावयाच्या आहेत.

मुरला—तें पाहतां येईल.

इतकें बोलून मुरला हंसत हंसत निघून गेली. पण गंगारामाच्या घरांतून बाहेर पडून ती रस्त्याला लागते न लागते तों तिचें हंसणें एकदम मावळलें, आणि भीतीनें तिची चर्या काळवंडली.

समोरच हमरस्त्यावर प्रभातकाळच्या शुक्राच्या चांदणीप्रमाणें चमकणाऱ्या व हातांत त्रिशूळ धारण केलेल्या दोन भैरवी मूर्ती तिच्या दृष्टीस पडल्या. या देवींच्या दूतिकाच असल्या पाहिजेत अशा भावनेनें मुरलेनें त्यांना साष्टांग नमस्कार केला व हात जोडून त्यांच्या पुढें ती उभी राहिली.

एका भैरवीनें तिला विचारलें, ' तूं कोण आहेस ?'

भीतीमुळें कापऱ्या स्वरानें मुरलेनें उत्तर केलें, ' मी मुरला. '

भैरवी—मुरला कोण ?

मुरला—धाकट्या महाराणीसाहेबांची दासी.

भैरवी—नगररक्षकाच्या घरीं इतक्या रात्रीं तुझें काय काम होतें ?

मुरला—महाराणीसाहेबांनीं मला पाठविलें होतें.

भैरवी—समोर हें देवाचें मंदिर दिसतें ना ? तेथें आमच्या बरोबर चल.

मुरला—जशी आपली आज्ञा.

दोन बाजूंनीं दोघी भैरवींनीं त्रिशूळाचें टोंक मुरलेच्या अंगाकडे धरून तिला मंदिरांत नेलें.

प्रकरण बारावें.

चंद्रचूड तर्कालंकाराला त्या रात्रीं झोंप कशी ती ठाऊक नव्हती. त्यानें सारी रात्र शहरांत हिंडून घालविली, पण शहराच्या रक्षणाची कांहीं तजवीज केलेली त्याला दिसली नाहीं. त्यानें गंगारामाला विचारलें तेव्हां गंगारामानें त्याला दुरुत्तरें करून घुडकावून लाविलें. त्यावरून चंद्रचूडाच्या मनाला अतिशय पश्चात्ताप होऊन तो कुशासनावर बसून सर्वांचें रक्षणकर्ता आणि संकटहर्ता जो सर्वशक्तिमान् प्रभु त्याचें चिंतन करूं लागला. इतक्यांत चांदशहा फकिरानें येऊन गंगाराम भूषणेला गेला होता वगैरे हकीकत सांगितली. ती ऐकून चंद्रचूडाच्या अंगावर रोमांच उभे राहिले. एकदा त्याच्या मनांत आलें कीं थोडेसे शिपाई बरोबर घेऊन जावें आणि गंगाराला पकडून अटकेंत ठेवावें व नगररक्षणाचें काम दुसऱ्या कोणाकडे तरी सोंपवावें. पण पुनः त्याला वाटलें कीं शिपाई आपला हुकूम ऐकणार नाहींत; गंगारामाचा ऐकतील, आणि आपला हेतु सिद्धीस जाणार नाहीं. मृण्मय असता तर कांहीं भानगड झाली नसती. शिपायांनीं त्याचा हुकूम ऐकला असता. मृण्मयाला आपण बाहेर पाठविल्यामुळें हें संकट उपस्थित झालें आहे हें मनांत येतांच त्याला आपल्या कृत्याबद्दल अतिशय पश्चात्ताप झाला, आणि निश्चेष्ट होऊन तो परमे

श्वराचें चिंतन करूं लागला. इतक्यांत एकाएकीं त्रिशूळ धारण केलेल्या दोन भैरवी मूर्ती त्याच्यापुढें येऊन उभ्या राहिल्या.

त्यानें विस्मित होऊन विचारलें, ' मातुश्री ! आपण कोण आहां ! "

जयंती—बाबा ! शत्रु जवळ येऊन पोंचला आहे. असें असून या शहराच्या रक्षणाची कांहीं तजवीज केलेली दिसत नाहीं, हें कसें ? हें विचारण्यासाठींच आम्ही आलों आहों.

हा प्रश्न ऐकून चंद्रचूड अधिकच विस्मित होऊन म्हणाला, ' मातुश्री ! तुम्ही आमच्या नगरदेवता आहां काय !

जयंती—आम्ही कोणीहि असूं देत. माझ्या प्रश्नाचीं उत्तरें द्या म्हणजे झालें. नाहीं तर तुमचें कल्याण होणार नाहीं.

चंद्र—आम्हांला दुसरें कांहींहि नको आहे. आमच्या राजानें नगर-रक्षणाचें काम ज्याच्याकडे सोंपविलें आहे तो तें करीत नाहीं. सैन्यांतले शिपाई माझा हुकूम ऐकणार नाहींत. अशा स्थितींत मी काय करावें त्या विषयीं आज्ञा व्हावी.

जयंती—नगररक्षकाविषयींची कांहीं खबर तुम्हांला आहे काय ! तो मनुष्य विश्वासाला पात्र नाहीं असें दाखविणारा कांहीं प्रकार तुमच्या कानीं नाहीं का आला ?

चंद्र०—हो, आला आहे. तो तोराबखाँकडे गेला होता असें ऐकतों. शत्रूच्या स्वाधीन शहर करण्याचा त्याचा रंग दिसतो. मी दुर्बुद्धिवश होऊन त्याचा कांहीं बंदोबस्त आतां पर्यंत केला नाहीं. मातुश्री ! आपण आमच्या नगरदेवता आहां आणि माझ्यावर दया करून भैरवीच्या रूपानें आपण दर्शन दिलें आणि या दासाला कृतार्थ केलें असें मी समजतों. मातुश्री ! माझी येवढीच प्रार्थना आहे कीं आपण आपल्या प्रभावानें या शहराचें रक्षण करावें.

इतकें बोलून चंद्रचूडानें हात जोडून भक्तियुक्त अंतःकरणानें जयंतीला नमस्कार केला.

' ठीक आहे. मी या शहराचें रक्षण करत्यें ' असें म्हणून जयंती तेथून चालती झाली. चंद्रचूडाच्या मनाला यामुळें धीर आला.

जयंतीची आशा अपेक्षेच्या बाहेर फलद्रूप झाली. श्री बाहेर उभी होती. तिला बरोबर घेऊन जयंती गंगारामाच्या घराकडे निघाली.

प्रकरण तेरावें.

मुरला चालती झाल्यावर गंगारामाला चोहींकडे अधिकच अंधकार दिसूं लागला. जिच्यासाठीं येवढ्या विपत्तिसागरांत आपण उडी घेत आहों तिच्या ठायीं तर आपणाविषयीं कांहींच अनुराग दिसत नाहीं! आपण डोळे मिटून समुद्रांत उडी मारीत आहों पण आपल्या हातीं रत्न लागेल काय ! का उगीचच मृत्युमुखीं पडूं ! अशा विचारांत त्याचें डोकें भ्रमण करीत होतें. अंधार ! सर्वत्र अंधार ! यांतून कोणी त्याचा उद्धार करील अशी आशा त्याला दिसेना.

एकाएकीं गंगाराम दचकला. पहातो तों प्रभातकाळच्या नक्षत्राप्रमाणें उज्ज्वल कांति असलेली व हातांत त्रिशूळ धारण केलेली भैरवीची मूर्ति समोर उभी ! तिच्या शरीराच्या तेजापुढें दिव्याच्या ज्योतींचें तेज फिकें दिसूं लागलें. साक्षात् देवीच या भूलोकीं अवतरली कीं काय असें वाटून मुरलेप्रमाणें त्यानेंहि तिला साष्टांग नमस्कार घातला आणि दोन्ही हात जोडून तो तिच्यापुढें उभा राहिला. त्यानें विचारलें, ' मातुश्री ! काय आज्ञा आहे ! '

जयंती॰—बेटा, तुझ्याजवळ मी एक भिक्षा मागायला आल्यें आहें.

गंगा॰—आपण मागाल तें देईन. आज्ञा व्हावी.

जयंती॰—मला गाडीभर दारूगोळा व एक चांगला गोलंदाज पाहिजे आहे.

हें ऐकून गंगारामाच्या चित्ताची चलबिचल होऊं लागली. तो मनांतल्या मनांत विचार करूं लागला कीं ही कोण बरें असेल ! मा

उघडपणें त्यानें जयंतीला म्हटलें, ' मातुश्री ! आपणाला दारूगोळा घेऊन काय करायचें आहे ?'

जयंती०—देवाचें कार्य.

गंगाराम मोठ्या घोटाळ्यांत पडला. तो मनांत म्हणूं लागला कीं ही खरोखर देवी असेल तर हिला दारू गोळ्याचें काय काम आहे ! ही जर मनुष्य असली तर हिला दारू गोळा कसा द्यावा ? ही कोणाची हेर तर नसेल ?अशी शंका मनांत येऊन त्यानें विचारलें, 'तुम्ही कोण आहां ?'

जयंती०—कोणी का असेना ? मुरला आणि रमा यांचें झालेलें संभाषण मला कळलें आहे. तसेंच तुम्ही भूषणेला गेलां होतां ती गोष्ट आणि तेथें घडलेली सारी हकीकत मला कळली आहे. मी जें मागत आहें तें आत्तांच्या आतां द्या; नाहीं तर या त्रिशूळाच्या प्रहारानें या क्षणीं मी तुमचा वध करीन.

इतकें बोलून त्या तेजस्वी भैरवीनें हातांतला त्रिशूळ उगारला.

गंगाराम एकदम थंडच पडला ! 'या, देतो,' असें म्हणून तो भैरवीला बरोबर घेऊन अस्त्रागारांत गेला. जयंतीला जें जें पाहिजे होतें तें तें सगळें त्यानें दिलें, आणि प्यारेलाल नांवाचा एक गोलंदाजहि तिच्या दिमतीस दिला. जयंतीची रवानगी केल्यावर किल्ल्याचा दरवाजा बंद ठेवा व माझ्या परवानगीवांचून कोणालाहि बाहेरून आंत किंवा आंतून बाहेर सोडूं नका असें त्यानें पहारेवाल्यांना बजाविलें.

जयंती व श्री दारू गोळा घेऊन किल्ल्याच्या बाहेर पडल्या आणि राजघाटापाशीं जाऊन पोंचल्या. तेथें एक चांगला धष्टपुष्ट व कांतियुक्त शरीराचा पुरुष बसलेला त्यांना दिसला.

त्या दोघींपैकीं एकजण दारूगोळ्याची गाडी व गोलंदाज यांना घेऊन दूर अंतरावर जाऊन उभी राहिली, आणि दुसरीनें त्या पुरुषाजवळ जाऊन त्याला विचारलें, ' तुम्ही कोण ?'

तो म्हणाला, ' मी आहें कोणी तरी. पण तुम्ही कोण ?'

जयंती म्हणाली, ' जर तुम्ही वीर–पुरुष असाल तर हा दारूगोळा येथे आणिला आहे. त्याच्या साह्यानें या नगराचें रक्षण करा. '

त्या माणसाला विस्मय वाटला. जयंतीला देवता समजून त्यानें नमस्कार केला. कांहीं वेळ विचार करून मग त्यानें दीर्घ निःश्वास सोडला, आणि म्हटलें—

' मला त्यापासून काय लाभ होणार आहे ?'

जयंती—तुम्हांला काय पाहिजे आहे ?

पुरुष—नगराचें रक्षण केल्यानें मला जें पाहिजे तें मिळेल काय ?

जयंती—होय. मिळेल.

इतकें बोलून जयंती एकाएकीं अदृश्य झाली.

प्रकरण चौदावें.

चंद्रचूड०ठाकुराला त्या रात्रीं झोंप आली नाहीं हें मागें सांगितलेंच आहे. मोठ्या पहाटेस उठून तो राजवाड्याच्या उंच गच्चीवर गेला आणि तेथून चोहींकडे लांबवर पाहूं लागला. तेव्हां त्याला दिसलें कीं समोर नदीच्या पैलतीरावर पुष्कळ नौका गोळा झाल्या आहेत, आणि लोकहि पुष्कळ जमले आहेत. पण अद्याप चांगलें उजाडलें नसल्यामुळें हे लोक कोण होते त त्याला स्पष्ट दिसलें नाहीं. म्हणून त्यानें गंगारामाला बोलावणें पाठविलें.

गंगारामहि त्या उंच गच्चीवर जाऊन पोहोंचला. चंद्रचूडानें त्याला विचारलें, ' नदीच्या पैलतीरावर इतक्या नौका कां बरें गोळा झाल्या आहेत ?'

गंगाराम त्या पाहून म्हणाला, ' कोण जाणें !'

चंद्र०—नदीच्या तीरावर लोकहि पुष्कळ जमलेले दिसत आहेत. माणसांची व नावांची इतकी गर्दी कशासाठीं झाली असेल !

गंगा०—कांहीं सांगतां येत नाहीं.

बोलतां बोलतां चांगलें उजाडलें. तेव्हां ही सगळी फौज आहे असें स्पष्ट कळून चुकलें. चंद्रचूड म्हणाला, ' गंगाराम ! घात झाला ! आमच्याच माणसानें आमचा गळा कापला. अथवा तो स्वतःहि कदाचित् फसला असेल. आम्ही दक्षिणेकडच्या मार्गानें सैन्य पाठविलें, पण शत्रु तर या दुसऱ्या वाटेनें आले. घात झाला ! आतां काय करायचें ! आतां कसें रक्षण करायचें !'

गंगा०—मी आहेंना ! पाहतों आमचें कोण काय करतें तें !

चंद्र०—तुम्ही एकटे थोडक्याशा शिपायांसह येवढ्या मोठ्या फौजेशीं कसे लढणार ! तुम्हीहि किल्ल्याच्या रक्षणाची कांहीं तजवीज केलेली दिसत नाहीं. काल मीं याबद्दल तुम्हांला म्हटलें होतें. पण तुम्ही रागारागानें कठोर शब्द बोललांत. पण आतां ही जबाबदारी घ्यायला कोण पुढें होतो आहे पाहूं !

गंगा०—इतकें भिण्याचें कारण नाहीं. पलीकडच्या तीरावर फौज दिसत आहे ती कांहीं अगणित नाहीं. शिवाय या थोडक्याशा नावांतून किती शिपाई नदी उतरून येऊं शकतील ! मी आपली फौज घेऊन अलीकडल्या तीरावर जाऊन उभा राहतों. शत्रूनें या तीरावर पाय ठेवतांच त्यांना कापून काढतों पहा.

गंगारामाचा उद्देश हा होता कीं सैन्य घेऊन बाहेर पडावयाचें, पण आतांच नाहीं; तर मुसलमानाची फौज निर्विघ्नपणें नदी उतरून या तीराला आल्यावर. किल्ल्याचे दरवाजे उघडून बाहेर पडलों. म्हणजे अनायासेंच मुसलमानांना मुक्तद्वार होईल आणि ते आंत घुसतील. तो शत्रूला मुळींच अडथळा करणार नव्हता. त्यानें आदले दिवशीं पाहिलेल्या मूर्ति किती भयंकर होत्या ! पण त्या पुनः आज कशा दृष्टीस पडल्या नाहींत !

चंद्रचूडाच्या लक्षांत हा सगळा प्रकार येऊन चुकला होता. तरी तो म्हणाला, ' लवकर जा, आणि फौजेनिशीं बाहेर पडा. आतां अगदीं विलंब करूं नका.'

गंगाराम घाईघाईनें खालीं उतरला. चंद्रचूड शत्रूच्या हालचालीचें निरीक्षण करीत होता. तो भयभीत झाला होता. कारण कीं, सुमारें पन्नास

नावांत मिळून सरासरी सहाशें शिपाई नदीपार होण्यासाठीं निघालेले दिसले. गंगाराम फौज घेऊन केव्हां बाहेर पडतो या गोष्टीकडे तो अतिशय अधीरपणानें पाहत होता. शिपाई तयार होत होते, फिरत होते, रांगेनें उभे राहत होते, पण बाहेर पडले नव्हते. तेव्हा चंद्रचूड मनांत म्हणाला, ' हाय ! हाय ! केवढी चूक मीं केली ! मी गंगारामावर विश्वास ठेविला ! आतां सर्वस्वी घात झाला ! ती तेजःपुंज स्त्री आमची नगरदेवताच होती खास. तिनें सुद्धां फसवेगिरी केली काय ?' गंगारामाच्या पाळतीवर राहण्याच्या उद्देशानें चंद्रचूड वाड्याच्या गच्चीवरून आतां खालीं उतरत होता. इतक्यांत गुडुम् असा तोफेचा एक आवाज त्यानें ऐकला. तो आवाज मुसलमानांच्या नावा होत्या तिकडून आला असे दिसेना. कारण, त्यांच्या बरोबर तोफा असल्याचें दिसत नव्हतें. चंद्रचूडाने बारकाईनें पाहिले तेव्हा त्या नौकांपाशीं धुराचें कांहीं चिन्ह दिसले नाहीं. तोफेचा आवाज झाल्या बरोबर मुसलमानांची एक नाव पाण्यांत बुडाली हे पाहून चंद्रचूडाला विस्मय वाटला. बुडालेल्या नावेवरचे शिपाई पाण्यात पोहत पोहत जाऊन दुसऱ्या नौकांवर चढण्याच्या प्रयत्नांत होते.

चद्रचूडाला असेंहि दिसून आलें कीं आपल्या फौजेतला एकहि शिपाई अद्याप किल्ल्यातून बाहेर पडला नाहीं. त्याचप्रमाणें किल्ल्याच्या तटबंदीवर जेथे जेथें म्हणून तोफा ठेविलेल्या होत्या, तेथेंहि एक सुद्धां शिपाई नव्हता. तेव्हां मग ही तोफ कोणीं सोडली !

कोणत्या तरी.दिशेला धूर दिसतो आहे कीं नाहीं हे पाहण्यासाठीं चद्रचूडानें चारी दिशांकडे बारीक नजर फिरविली. तेव्हां त्याला दिसलें कीं वाड्यासमोर राजघाटावर धुराचे कल्लोळ उठले आहेत व ते वाऱ्याच्या प्रवाहाबरोबर हवेंत पसरत आहेत.

तेव्हां चद्रचूडाला स्मरण झालें कीं त्या घाटावर झाडाखालीं एक तोफ आहे. शत्रूची नौका घाटाला येऊन लागूं नये म्हणून सीतारामानें तेथें ती तोफ ठेविली होती. त्या तोफेला कोणीं तरी सरबत्ती दिली असावी हें आतां निश्चित झालें. पण सरबत्ती देणारा कोण ? कोणी शिपाई असेल म्हणावें तर अद्याप एकहि शिपाई बाहेर पडला नव्हता. दरवाजा बंद होता. मृण्

याचे शिपाई तर बरेच दूर गेले होते. मृण्मयानें आपल्या फौजेंतले शिपाई या तोफेसाठीं ठेविले असतील ही गोष्ट संभवनीय नव्हती. कारण, किल्ल्याच्या रक्षणाबद्दलची सारी जबाबदारी गंगारामावर होती. कोणी तरी भलत्याच माणसांनीं तोफ सोडली असेल असें म्हणावें, तर त्यांच्यापाशीं दारूगोळा कोठून आला ? आणखी इतका बिनचूक नेम चांगल्या पटाईत गोलंदाजाशिवाय दुसऱ्या भलत्या सलत्या माणसाला मारतां आला नसता. मग हे काम कोणाचे ? चंद्रचूड असा विचार करीत होता इतक्यांत पुनः त्या तोफेचा वज्रनादासारखा गंभीर व चारी दिशा व्यापून टाकणारा शब्द झाला. पुनः धुराचा लोट उठून नदीवरच्या वायूच्या थरांतून मार्ग काढीत काढीत वर आकाशाकडे चालत असलेला तो दिसूं लागला. पुनः पूर्वी प्रमाणें मुसलमान शिपायांनीं भरलेली एक नौका पाण्यांत बुडाली.

हें पाहून ' धन्य ! धन्य ! ' असे प्रशंसापर उद्गार चंद्रचूडानें काढले आणि आनंद-प्रदर्शक टाळया वाजविल्या. त्याची खात्री झाली कीं खास हें त्या देवीचेंच कृत्य. तीच सदय होऊन प्रत्यक्ष अवतरली आहे. तो देवी, लक्ष्मी-नारायण, आणि नगर-देवता यांच्या नांवांनीं जयजयकार करूं लागला. इतक्यांत त्याच्या भयभीत दृष्टीला असें दिसून आलें कीं शत्रूच्या कांहीं नावा बऱ्याच पुढें आल्या आहेत, आणि आपल्या बंदुकीच्या गोळ्या तीरावर जाऊन पोंचण्यास हरकत नाहीं, असें पाहून शत्रुकडचे शिपाई तीरावर नेम धरून गोळ्या सोडूं लागेल आहेत. एकाएकीं नदीच्या पात्रावर धुराचे लोट दिसूं लागले. बंदुकांचे आवाजहि कानीं येऊं लागले. तेव्हां चंद्रचूडाला वाटले कीं जर आमचें संरक्षण देवी करीत असेल तर यांनीं कितीहि गोळ्यांचा वर्षाव केला तरी त्या गोळ्यांनीं तिला काय अपाय होणार आहे ? पण जर देवी नसून मनुष्य असेल तर या गोळ्यांच्या वर्षावापुढें त्याचा कसा टिकाव लागेल ? या भडिमारापुढें एकहि मनुष्य वांचणें कठीण आहे.

पुनः तोफेचा आवाज झाला. त्यानें दशदिशा कांपूं लागल्या, धुराची वेटाळ्यांवर वेटाळीं उठून वर वर जाऊं लागलीं, आणि नदींतल्या नावेनें शिपायांसह जलसमाधि घेतली.

एका पक्षास एकच तोफ आणि दुसऱ्या पक्षास शेकडो शिपाई यांच्या मध्यें आतां चांगलीच लढाई जुंपली होती. तोफेच्या आणि बंदुकीच्या आवाजांपुढें दुसऱ्या कशाचाहि शब्द ऐकूं येत नव्हता. इंद्रानें स्वहस्तानें टाकलेल्या वज्रासारखी तोफेची गंभीर, तीव्र व भयंकर गर्जना मधून मधून ऐकूं येत होती. नदीचें पात्र चांगलें प्रशस्त होतें,, तरी तें सगळें इतकें आच्छादित झालें होतें कीं चंद्रचूडाला राजवाड्याच्या गच्चीवरून धुराशिवाय कांहीं दिसत नव्हतें. तोफेच्या त्या भयंकर गर्जनेवरून चंद्रचूडाच्या मनाला वाटलें कीं हिंदुधर्माची रक्षणकर्त्री देवी अद्याप जागृत आहे. चंद्रचुड त्या धुरांतून बारीक दृष्टीनें पाहूं लागला. या आश्चर्यकारक युद्धाचा अखेर परिणाम काय झाला तें लवकरच कळेल.

हळूं हळूं आवाज कमी होत गेला. वाऱ्याच्या झोतानें धुराचे लोट हि उडून गेले, आणि नदीचें पात्र स्पष्टपणें दृग्गोचर होऊं लागलें. तेव्हां छिन्नविच्छिन्न होऊन बुडालेल्या नौका उलथ्या पालथ्या होऊन नदीच्या प्रवाहाबरोबर वाहत चाललेल्या दिसल्या. मृत व जीवित शिपायांचीं शरीरें नदींच्या प्रवाहांत वादळ शांत झाल्यानंतर वाहत चाललेलीं होतीं. त्यामुळें नदीचा प्रवाह पत्रपुष्पांनीं आच्छादलेल्या उद्यानाप्रमाणें दिसत होता. कोणाच्या हातांतलें शस्त्र, कोणाचें वस्त्र, कोणाचें वाद्य, कोणाचें पागोटें, कोणाचें प्रेत, या प्रमाणें वाहत चाललीं होतीं. कोणी पोहत जाऊन नदीचें तिर गांठण्याच्या खटपटींत होते. कोणी नक्राच्या मुखांत अचानक पडत होते ! राहिलेल्या नौकांचे नावाडी शिपायांना पैलतीराला नेऊन सोडण्याच्या कामीं जिवापाड मेहनत करीत होते. इंद्राच्या वज्राच्या एका तडाख्यानें असुरांची सेना जशी हतबल होत असे, त्याप्रमाणें या वेळीं मुसलमानांच्या फौजेची स्थिति होऊन ती रणांगणांतून पळ काढूं लागली होती.

हा प्रकार पाहून चंद्रचूडानें हात जोडले आणि वर आकाशाकडे पाहून सद्गदित कंठानें डोळ्यांत अश्रु आणून म्हटलें, ‘ जय जगदीश ! जय दैत्यदमन, भक्ततारण धर्मरक्षक परमेश्वरा ! तुझी आज मोठीच कृपा समजली पाहिजे ! आज तूं स्वतः जातीनें युद्ध करायला आलास, किंवा या

नगरीची देवताच युद्ध करण्यासाठीं मूर्तिमंत प्रकट झाली असें म्हटलें पाहिजे. अथवा तुझा दासानुदास सीताराम हा तरी आला असला पाहिजे. तुझ्या त्या भक्ताशिवाय असलें युद्ध करण्याची हिंमत दुसऱ्या कोणत्याहि माणसाच्या ठायीं नाहीं.'

नंतर लवकरच चंद्रचूड गच्चीवरून खालीं उतरला.

प्रकरण पंधरावें.

तोफेचे व बंदुकांचे आवाज ऐकून गंगाराम मनांत म्हणूं लागला कीं हा काय प्रकार आहे ! लढाई कोण करीत आहे ! ती डाकिनी तर करीत नसेल ! ती देवता आहे कीं काय !

कोण लढाई करीत आहे तें पाहून येण्यासाठीं त्यानें एका जमादाराला पाठविलें. तो त्यासाठीं दरवाजा उघडून बाहेर गेला. त्या दिवशीं याच वेळीं किल्ल्याचा दरवाजा प्रथम उघडण्यांत आला होता.

जमादारानें थोडेंसें हिंडून चौकशी केली आणि परत जाऊन सांगितलें कीं मुसलमान लढत आहेत.

गंगाराम त्रासिक स्वरानें म्हणाला, 'तें खरें रे ! पण ते लढत आहेत कोणाशीं !'

जमादार म्हणाला, 'कोणाशीं नाहीं.'

गंगाराम हंसून म्हणाला, 'काय बेटा मूर्ख आहे ! अरे ! तोफ कोण चालवीत आहे !'

जमादार०—कोणी नाहीं.

गंगाराम फार रागावला आणि म्हणाला, 'तोफेचा शब्द तुला ऐकूं येतो ना !'

जमा०—हो. येतो खरा.

गंगा०---मग ! ती तोफ कोणी तरी डागत असला पाहिजे हें खरें ना ? तो तोफ डागणारा कोण आहे !

जमा०---तें मला दिसलें नाहीं.

गंगा०---तुझे डोळे तेव्हां कोठें गेले होते ?

जमा०---हुजूर ! माझे डोळे तर माझ्याबरोबरच होते !

गंगा०---मग तुला कसें दिसलें नाहीं म्हणतोस ?

जमा०---मीं एक तोफ पाहिली. आणि ती म्हणजे आपली घाटावरची तोफ.

गंगा०---बरें, तिच्यांतून आवाज कोण काढीत होते ?

जमा०---झाडाच्या खांद्या !

गंगा०---तुला वेड तर नाहीं लागलें ? झाडाच्या खांद्या कोठें तोफ डागीत असतात काय ?

जमा०---तेथें कोणीच माणूस दिसलें नाहीं. झाडाच्या खांद्यांनीं व पानांच्या डाहाळ्यांनीं तोफ तेवढी झाकून टाकलेली दिसली म्हणून मीं तसें म्हटलें.

गंगा०---तर मग त्या खांद्या आणि डहाळ्या मुद्दाम तशा बांधून त्यांच्या आडून कोणी तरी तोफ डागीत असलें पाहिजे. तो मनुष्य मोठा बुद्धिमान् असला पाहिजे यांत शंका नाहीं. शत्रूकडच्या शिपायांना त्यामुळें त्याच्यावर नेम धरतां येत नाहीं; पण त्याला मात्र झाडाच्या आडून नेम धरतां येतो. असा मनुष्य कोण आहे तें पाहून येतोस काय ?

जमा०---त्या ठिकाणीं जाण्याची मुळींच सोय नाहीं.

गंगा०---कां बरें ?

जमा०---तेथें गोळ्यांचा सारखा पाऊस पडत आहे !

गंगा०---तुला गोळ्यांचें इतकें भय वाटतें तर लष्करी पेशांत तूं कशाला शिरलास ?

गंगारामानें एका माणसाकडून त्या जमादाराची पगडी, पोषाख वगैरे सगळीं काढून घेतलीं. युद्ध जुंपण्याचा संभव दिसूं लागतांच मृण्मयानें किल्ल्याच्या रक्षणाच्या कामावर कित्येक चांगल्या तरुण हिंमतवान् पुरुष-

त्यांची नेमणूक केली होती. त्यांतल्या चौघांना गंगारामानें हुकूम केला कीं तुम्ही घाटावर जाऊन तोफ डागणारांना पकडून आणा.

ते चौघे शिपाई तोफेपाशीं जाऊन पोंचले, तेव्हां युद्ध थांबलें होतें, आणि जगलें वांचलेले मुसलमान शिपाई पळ काढूं लागले होते. हे चौघे शिपाई तोफेजवळ जाऊन पाहतात तों तोफेजवळ एक मनुष्य मरून पडलेला त्यांना दिसला. दुसरा एक जिवंत मनुष्य हातांत बत्ती घेऊन बसला होता. तो अगदीं तरणाबांड असून त्यानें नेसलेल्या धोतराचा काचा मारलेला होता. हनुवटी खालून गालांवरून दोन्ही बाजूंनीं वर डोक्यापर्यंत रुमालाची पट्टी बांधली होती व सर्व अंग दारूनें भरल्यामुळें काळें झालें होतें. शिपायांनीं येऊन त्याला धरलें व विचारलें ' तूं कोण आहेस ? '

तो म्हणाला, ' कां बरें ? '

शिपाई---येथें बसून तोफ कां चालविलीस ?

तो--कारे बाबा ? त्यांत माझ्या हातून कोणता अपराध घडला सांग ? तुम्ही मुसलमानांना मिळालेले तर नाहीं ना ?

शिपाई--अरे ! मुसलमान चालून आले असते तर, आम्ही त्यांना टाकून लाविलें असतें. तूं काय म्हणून येवढी तसदी घेतली ? चल, तुला हुजूरकडे गेलें पाहिजे.

तो--कोणाकडे ?

शिपाई--कोतवाल साहेबांच्या हुकुमावरून आम्ही तुला त्यांच्याकडे घेऊन जाणार आहों.

तो--अच्छाभाई ! अगोदर ते नोडगे जाऊं देत. जोंपर्यंत त्यांचा एक मनुष्यसुद्धां त्या तीरावर दिसत राहील तोंपर्यंत तुम्हीचसे काय, पण तुमचे कोतवालसाहेब स्वतः आले तरी मी येथून हलणार नाहीं,समजलेत ? तो पहा मरून पडलेला मनुष्य. त्याला तुम्ही ओळखीत असाल ?

शिपाई--हो. याला तर आम्ही चांगलें ओळखतों. हा आमचा गोलंदाज प्यारेलाल ! हा येथें कसा आला ?

तो--तर मग अगोदर याला किल्ल्यांत घेऊन जा. मागून मीहि येतों.

शिपाई आपापसांत कांहीं गोष्टी करूं लागले. ते म्हणाले, ' हा मनुष्य म्हणतो तें खरेंच ! तोफेच्या जवळ जो सांपडेल त्याला पकडून न्यायचा आपणाला हुकूम आहे. हा मुडदा तोफेच्याजवळ पडलेला आहे. तेव्हां अलबत् याला नेणें जरूर आहे.'

हिंदु शिपाई प्रेताला शिवायचे नाहींत ! तेव्हां एक शिपाई महाराला शोधून आणायला गेला आणि बाकीचे तिथे त्याची वाट पाहात बसले.

इकडे दारूनें काळें अंग झालेला मनुष्य पाहूं लागला तों सगळे मुसलमान निघून गेलेले आहेत असें आढळून आलें. तेव्हां तो शिपायांना म्हणाला, ' चला बाबांनो ! तुमच्या कोतवालसाहेबांना सलाम करून मग जाईन. ' शिपाई त्या माणसाला धरून घेऊन गेले.

युद्धासाठीं पोषाख वगैरे घालून सज्ज झालेले सैन्यांतले शिपाई—यांत युद्धाचें नांव काढतांच ज्यांचे अंगांत कांपरे भरलें होतें असे बरेच नागरिकहि मुंग्यांच्या रांगेप्रमाणें रांग धरून उभे होते—ज्या ठिकाणीं होते त्याच ठिकाणीं शिपायांनीं या माणसाला नेऊन उभें केलें.

त्याला पाहतांच एकदम जयघोष झाला व त्यानें सगळें आकाश व्याप्त करून टाकिले. त्याबरोबर सगळे शिपाई व नागरिक यांनींहि 'महाराजाधिराज की जय ' 'जय सीताराम महाराज की जय, ' ' जय लक्ष्मीनारायण की जय ' असा गर्जनायुक्त जयघोष केला.

चंद्रचूडानें त्वरेने येऊन त्या धरून आणिलेल्या पुरुषाला आलिंगिलें. त्या पुरुषानेंहि चंद्रचूडाला नम्रपणानें वंदन केले. चंद्रचूड म्हणाला, ' चाललेलें युद्ध पाहूनच तुम्ही आला आहां असा मीं तर्क केला होता. इतकें बिनचूक नेम मारण्याचें कौशल्य दुसऱ्या कोणाच्याहि अंगीं नाहीं. असो. आतां दुसऱ्या गोष्टी मागाहून होतील. अगोदर गंगारामाला बांधून आणण्याचा हुकूम व्हावा.'

सीतारामानें त्याप्रमाणें हुकूम दिला. सीतारामाला पाहतांच गंगाराम पळून गेला होता. पण लवकरच त्याला पकडून सीतारामाच्या आज्ञेवरून कारागृहांत टाकण्यांत आलें.

प्रकरण सोळावें.

किल्ल्याच्या तटबंदीजवळच्या सगळ्या तोफांपाशीं व इतर जागजागीं बंदोबस्तासाठीं शिपाई बसवून आणि मृण्मयाच्या शोधासाठीं माणसें पाठवून मग सीताराम स्नान वगैरे आन्हिक कृत्यें करण्यासाठीं गेला. तीं कृत्यें उरकल्यानंतर चंद्रचूडाशीं त्यानें कांहीं गुप्त गोष्टी केल्या. चंद्रचूड म्हणाला, ' महाराज ! आपण केव्हां आलां तें आम्हांला कळलें नाहीं. आपण एकटेच कां आलां ? आपल्याबरोबरचा लवाजमा व शिपाईप्यादे कोठें आहेत? वाटेत कांहीं विपत्तिचा प्रसंग तर आला नाहीं ना ?'

सीता०—बरोबरच्या मंडळीला वाटेंतच सोडून मी पुढे एकटा आलों. माझ्या पश्चात् येथली व्यवस्था कशी काय चालली आहे तें पाहण्यासाठीं मी मुद्दाम एकटा, रात्रीच्या वेळीं, वेषांतर करून आलों. पाहिलें तर येथें नगराच्या बंदोबस्ताची कांहींच तजवीज केलेली नव्हती ! असें कां याचा मी शोध केला. तेव्हां कांहीं थोडीशी गुणगुण माझ्या कानीं आली. नंतर किल्ल्यांत प्रवेश करायला पाहूं लागलों तर किल्ल्याचा दरवाजा बंद होता. पहाट होण्याला थोडासा अवकाश होता म्हणून नदीच्या कांठीं गेलों. पाहिलें तर मुसलमानांच्या नावा शिपाई भरून नदी उतरत होत्या. किल्ल्यावरच्या शिबंदीचे लोक स्वस्थ होते. त्यांची कांहीं हालचाल दिसली नाहीं. तेव्हां अशा स्थितींत मला जेवढें करणें शक्य होतें तेवढें मी केलें.

चंद्र०—आपण म्हणूनच इतकें केलें. दुसऱ्याच्यानें इतकें खास झालें नसतें. पण मी विचारतों कीं आपणाला दारूगोळा कोठें मिळाला ?

सीता०—एका देवतेनें सहाय होऊन दारूगोळा व एक गोलंदाज मिळवून दिला.

चंद्र०—काय म्हणतां देवीनें या गोष्टी दिल्या ! हो. मला[illegible] तिचें

दर्शन घडलें होतें. ती आपली नगरदेवताच असली पाहिजे. नंतर ती कोठें गेली !

सीता०—दारूगोळा वगैरे सामान देऊन ती अदृश्य झाली. बरें, माझ्या पश्चात् घडलेल्या गोष्टी मला सांगा पाहूं ?

यावर चंद्रचूडानें त्याला माहित होत्या त्या साऱ्या गोष्टी सीतारामाला अनुक्रमानें सांगितल्या, आणि शेवटीं म्हटलें, 'पण आपण ज्या कामासाठीं दिल्लीस गेलां होतां त्यांत आपणास कितीसें यश आलें तें ऐकण्याची इच्छा आहे.'

सीता०—कार्यसिद्धि झाली. कांहीं कामांत मी बादशहाच्या उपयोगीं पडलों. त्यावरून मर्जी प्रसन्न होऊन बारा संस्थानिकांचें आधिपत्य व महाराजाधिराज ही पदवी दिल्याबद्दलची सनद मला बहाल करण्यांत आली आहे. हल्लीं फौजदाराशींच विरोध करण्याचा प्रसंग आला आहे ही मोठी दुर्दैवाची गोष्ट म्हटली पाहिजे. कारण, फौजदार हा सुभेदाराच्या हाताखालीं असतो, आणि सुभेदार म्हणजे बादशहाचा नोकर. तेव्हां फौजदाराशीं विरोध करायचा म्हणजे खुद्द बादशहाशीं विरोध केल्यासारखें होणार. ज्यानें माझ्यावर येवढा अनुग्रह केला त्याच्याविरुद्ध शस्त्र उचलणें हें निखालस कृतघ्नपणाचें कृत्य आहे. आत्मरक्षण करणें हें प्रत्येकाचें कर्तव्यच आहे. पण त्याशिवाय इतर कांहीं कारणांसाठीं फौजदाराशीं युद्ध करणें मला योग्य नाहीं. म्हणून हा सध्याचा विरोध म्हणजे एक मोठें दुर्दैव असें मी समजतों.

चंद्र०--मी म्हणतों हें आपलें—आपलेंच कां ! प्रत्येक हिंदूचें—सुदैवच होय. कारण कीं, आपण मुसलमानांसंबंधानें संतुष्ट राहिलां तर हिंदूंचें रक्षण कोण करील ? आणि हिंदुधर्म तरी कशाच्या आधारावर उभा राहील? आपलें स्वतःचेंहि तें सुदैवच मी समजतों. कारण, जो हिंदुधर्माचा पुनरुद्धार करील तोच मनुष्यजातींत खरा कर्तृत्वशाली आणि भाग्यवान् म्हटला पाहिजे.

सीता०—मृण्मयाकडची खबर कळेपर्यंत पुढें काम करावयाचें त्या संबंधानें कांहीं बोलतां येत नाहीं.

संध्याकाळानंतर मृण्मयाकडची खबर आली. पीरबक्षखां नांवाचा फौजदाराचा एक सेनापती अर्धी फौज घेऊन गेला होता. अर्ध्या वाटेवर मृण्मयाशीं त्याची गांठ पडून त्यांचें युद्ध झालें. मृण्मयाचें असामान्य धैर्य आणि युद्धकौशल्य यांमुळें पीरबक्षखांचा पराभव होऊन तो रणभूमीवर पडला, आणि मृण्मयाला विजयश्रीनें माळ घातली. मृण्मय आतां सैन्यासह परत फिरला आहे.

ही खबर ऐकून चंद्रचूडानें म्हटलें, ' महाराज ! आतां एक गोष्ट केली पाहिजे. विजयी सैन्य घेऊन नदी उतरून भूषणा हस्तगत करावी. '

प्रकरण सतरावें.

जयंती म्हणाली, ' श्री ! हें पहा. आतांच तूं पतीला जाऊन भेट.'

श्री—त्यासाठीं का मी आल्यें आहें !

जयंती—तसें नाहीं ग ! पण राजर्षींची पदवी सर्व माणसांत श्रेष्ठ आहे. तेव्हां राजाला राजर्षी कां करीत नाहींस ?

श्री—पण मला तें कसें करतां येईल ?

जयंती—मला तर वाटतें कीं तुझ्या हातून हें महत्कार्य घडेल. म्हणून म्हणत्यें कीं तूं जा आणि राजाला वंदन कर.

श्री—बुचाचें लांकूड पाण्यावर तरंगतें खरें, पण त्याला दोरीनें दगड बांधला तर तें हलकें लांकूड सुद्धां पाण्यांत बुडतें. तसें मीं बुडून मरावें असें तुझें म्हणणें आहे काय ?

जयंती—युक्तिबाज मनुष्य मरत नाहीं. पाणबुडे समुद्रांत बुड्या मारतात. ते कोठें मरतात ? ते समुद्रतळींचीं रत्नें वर काढून आणतात

श्री--मला तें साधेल असें माझें मलाच वाटत नाहीं. म्हणून आतांच मी राजाच्या भेटीला जाऊं इच्छित नाहीं. कांहीं दिवस येथेंच राहून आपल्या स्वतःच्या मनाची नीट ओळख करून घेईन म्हणत्यें. जर असें दिसून आलें कीं, माझें मन अद्याप माझ्या कह्यांत नाहीं तर राजाची भेट न घेतांच देशत्याग करायचा असा माझ्या मनाचा निश्चय आहे.

म्हणून श्रीनें राजाची भेट घेतली नाहीं.

खंड तिसरा.

रात—डाकिनी !

प्रकरण पहिलें.

युद्धात सीताराम विजयी झाला. भूषणा नगरी हस्तगत झाली. तोराबखाँ मृण्मयाच्या हातून मारला गेला. या इतिहासप्रसिद्ध गोष्टी आहेत. आतां आम्हांला थोडेच सांगावयाचे राहिले आहे आणि त्याचेहि विस्ताराने वर्णन देण्यांत आम्ही कालक्षेप करू इच्छित नाहीं. कादबरीकाराला हृदयाविष्करण करावयाचे असते. इतिहासाशी संबंध ठेवण्याची त्याला फारशी जरूरी नाहीं.

भूषणा हातीं आलीच होती. बादशाही सनदेने आणि स्वपराक्रमानें सीतारामाने बाग मांडलिकावर आधिपत्य स्थापन केले आणि स्वतः 'महाराज' ही पदवी धारण करून तो आता आपला अंमल गाजवू लागला.

गगारामाला काय शिक्षा करावयाची याबद्दलचा प्रश्न मागेच उपस्थित झाला होता. त्याच्याविरुद्ध पुष्कळ पुरावा होता. पतीला जीव कीं प्राण समजणाऱ्या आणि स्वतः अपराधी असलेल्या रमेनें सगळी हकीकत निष्कपटपणाने सीतारामाला सांगितली होती. बाकीच्या गोष्टी मुरला व चांदशहा फकीर यांनीं उघडकीस आणिल्या होत्या. आतां केवळ गंगारामाची जबानी तेवढी घ्यावयाची राहिली होती. इतक्यांत या गोष्टी-वरून थोडीशी भानगड उपस्थित झाली.

रमेनें अंतःपुरांत सीताराम जवळ असतांना डोळ्यांत अश्रु आणून जेव्हां हकीकत सांगितली तेव्हां तिच्या भाषणांतल्या एकाहि अक्षरावर त्यानें

अविश्वास केला नाहीं. त्याला ठाऊक होतें कीं रमा ही अत्यंत सरळ मनाची व निरपराधी आहे. ती या भानगडींत सांपडली याचें कारण केवळ पुत्रस्नेह. ही सीतारामाची समजूत झाली. पण इतर लोक तसें समजत नव्हते. गंगारामाला कैद कां केलें ? या एका गोष्टीवरून कित्येकांनीं मोठालीं वादळें उठविलीं. कोणी मुरलेच्या चुकीमुळें, तर कोणी पाहारेवाल्याच्या सांगण्याच्या झोंकावरून रमेचें नांव या प्रश्नाशीं जोडून देत होते. कोणी म्हणत कीं गंगाराम मोंगलांना राज्य विकत द्यायला निघाला; कोणी म्हणत कीं धाकट्या महाराणीसाहेबांच्या महालांत तो पकडला गेला; कोणी म्हणत कीं दोन्ही गोष्टी खऱ्या आहेत आणि मोंगलांकडून पैसे घेऊन राज्य त्यांच्या हवालीं करण्यांत धाकट्या राणीचेंहि अंग आहे. राजाच्या कानापर्यंत या सगळया गोष्टी गेल्या नव्हत्या; पण राणीच्या कानीं गेल्या होत्या. बायकाबायकांत अशा गोष्टी सहज पसरतात. दोघी राण्यांना या गोष्टी कळल्या होत्या. रमेनें तर त्या ऐकून अंथरुणच धरलें. तिनें रडून रडून सगळी उशी ओली चिंब करून टाकिली. तिला वाटलें कीं गळ्याला फास लावून कोठें तरी पाण्यांत बुडून मरावें. नंदेनें मात्र खऱ्या शहाण्या स्त्रीप्रमाणें वर्तन केलें. उशींत तोंड खुपसून रमा रडत होती आणि गळ्याला फास लावून मरावें किंवा तळ्यांत जीव द्यावा यांतली कोणती गोष्ट चांगली याचा विचार करीत होती, अशा वेळीं ती तिच्यापाशीं गेली, आणि म्हणाली, ‘ तूं एक वाईट घाणेरडी गप्प उठलेली ऐकलीस काय ? ’ रमेनें केवळ मान हालवून ‘ हो, ऐकली ’ असें सुचविलें. आतां तर तिच्या नेत्रांतून अश्रु जास्तच जोरानें वाहूं लागले.

नंदेनें तिचे डोळे पुसून प्रेमभावानें म्हटलें, ‘ रडल्यानें कां कोठें कलंक दूर होणार आहे ? ताई ! अशी रडूं नकोस. हा कलंक ज्यामुळें दूर होईल असें कांहीं तरी केलें पाहिजे. हें पहा ! तूं आतां नीट उठून बैस, आणि मला नीट स्वस्थपणानें व मोकळेपणानें हकीकत सांग. तुझी सवत विचारत्ये आहे हें तूं मनांत आणूं नकोस. तूं खरीच अपराधी अस, अगर नको असूं, पण त्यापासून तिकडच्या जिवाला फार त्रास होत आहे हें ध्यानांत घे. ते तुझेहि स्वामी आहेत; माझेहि आहेत. तुझ्यावर आलेला

आळ आमच्यापेक्षां तुला अधिक लाजिरवाणा आहे असें समजूं नकोस. महाराजांनीं जातांना अंतःपुरासंबंधाची सगळी जबाबदारी माझ्यावर टाकिली होती; त्यांच्या कानीं हा आळ गेला तर त्यावर मी काय बरें जबाब देऊं?'

रमा म्हणाली, 'जें जें कांहीं घडलें तें मी सगळें तिकडच्या कानांवर घातलें आणि माझ्या शब्दांवर विश्वास ठेवून मला क्षमा करावी असें सुद्धां मीं म्हटलें माझ्याकडे कांहीं अपराध नाहीं.'

नंदा—असें म्हणतां येणार नाहीं. जर तूं निर्दोषी आहेस तर माझ्यापाशीं ती गोष्ट सांगायला तुला इतकें दुःख कां होतें? मला सगळी हकीकत सांगत्येस ना?

रमा—सांगायला कोणाची ना आहे? मी ती सर्वांना सांगेन पाहिजे तर. असें बोलून रमेनें डोळे पुसले आणि उठून बसून सगळी हकीकत खरोखर जशी घडली होती तशी नंदेला सांगितली.

नंदेचा त्या हकीकतीवर पूर्ण विश्वास बसला. ती म्हणाली, 'जर तूं आपलें इंगित यत्किंचित् तरी कळविलें असतें आणि मग जें काय करायचें तें केलें असतें, तर इतकी भानगड कशाला उपस्थित झाली असती? असो. झालें तें झालें. आतां त्या गोष्टीबद्दल खेद करण्यांत काय अर्थ आहे? आतां जेणेंकरून आपली अब्रू कायम राहील असें केलें पाहिजे.

रमा—ताई! तुम्हीं जर येवढें न केलें, तर मीं खास सांगत्यें कीं मीं पाण्यांत बुडून जीव देईन, नाहींतर गळ्याला फास तरी लावून घेईन. मी राजाची राणी आहें. कंगाल भिकाऱ्याच्या पोरी प्रमाणें हा अपवाद सहन करून कसे दिवस काढावे तुम्हींच सांगा बरें?

नंदा—जीव द्यायला नको. पण दुसरे एक मोठ्या धाडसाचें काम आहे. तें तुझ्यानें होईल? तें जर झालें तर मग तुझ्याविषयीं कोणाच्याच मनांत कांहीं किंतु राहणार नाहीं अशी माझी समजूत आहे.

हा आलेला आळ जावा म्हणून तुम्ही सांगाल तें करायला मी तयार आहें. काय करूं? सांगा.

नंदा—माझ्या पासून कोणतीहि गोष्ट चोरून न ठेवतां सरळपणानें

व स्पष्टपणानें जशी सगळी गोष्ट तूं मला सांगितलीस, तशी ज्या कोणाला तूं सांगशील त्याचा तुझ्या म्हणण्यावर विश्वास बसला पाहिजे याविषयीं मला बिलकुल शंका नाहीं. जर या नगरचे सगळे लोक तुझ्या तोंडून सारी हकीकत ऐकतील तर तुझ्यावरचा कलंक कदापि राहणार नाहीं.

रमा---पण हें घडावें कसें ?

नंदा---मी महाराजांना सांगून दरबार भरावेल्यें. ते जाहिरनामा काढून सर्व नागरिकांना त्या दरबारला बोलावतील. तेथें गंगारामाच्या आणि नागरिकांच्या समक्ष तूं आपली हकीकत सांग. आपण राण्या ! सूर्याच्या सुद्धां दृष्टीला आपलें नखाग्र पडावयाचें नाहीं. मग इतक्या नागरिकांच्या समक्ष बाहेर येऊन मोकळेपणानें आपली हकीकत तुला कोठून सांगतां येणार ? पण जर सांगितलीस तर सगळ्या कलंकापासून आपण मुक्त होऊं.

एखाद्या सिंहिणीसारखी गर्जना करून रमा म्हणाली, ' ताई ! सगळे नागरिकच काय, पण पृथ्वीवरची सारी दुनिया जरी जमा झाली तरी तिच्या देखत खरी हकीकत सांगायला मीं भ्यायची नाहीं.

नंदा---सांगशील ?

रमा---हो. सांगेन--तसें मीं न केलें तर जीव देईन.

नंदा---ठीक आहे. तर मग मी महाराजांकडे जाऊन त्यांना सांगून दरबार भरविण्याची व्यवस्था करत्यें. तूं आतां अशी रडूं नकोस.

नंदा उठून गेली. रमाहि उठली आणि डोळे पुसून मुलाला मांडीवर घेऊन त्याचे मुके घेऊं लागली. इतका वेळ हें सुद्धां करण्याचें तिला सुचलें नव्हतें.

नंदेनें राजाकडे जाऊन लोकांत उठविलेली कंडी व रमेशीं झालेलें संभाषण वगैरे सगळ्या गोष्टी त्याला सांगितल्या, आणि नंतर म्हटलें, ' आम्ही दोघीजणी आपल्या हातांपायां पडून नम्रभावानें चरणांपाशीं विनंति करतों कीं, आतां आमची अब्रू राखणें आपल्या हातांत आहे. आमच्यावरचा येवढा कलंक दूर करावा. नाहींपेक्षां आम्ही दोघीजणी आत्महत्या करून मरू. '

राण्यांच्या अब्रूला लागलेल्या कलंकामुळें म्हणा किंवा नंदेच्या वरील भाषणामुळें म्हणा, पण राजा फार खिन्न झाला आणि म्हणाला, ' राणी-साहेबांना अंतःपुराच्या बाहेर भर दरबारांत येण्यास मी कसा लावूं ? सामान्य कुलटेप्रमाणें राणीची चौकशी करण्यासाठीं तिला मी कशी उभी करूं ?'

नंदा—आपण जसें समजतां तसें आम्ही समजत नाहीं. पण बाहेर येणें ही अधिक लाजिरवाणी गोष्ट आहे कीं असा लोकापवाद सहन करीत राहणें अधिक शरमेचें आहे ?

सीता०—राजघराण्यांत असा लोकापवाद सीतेच्या काळापासून चालत आला आहे. उगाच गडबड न करतां सीतेप्रमाणें आमचा त्याग करणें रमेलाहि श्रेयस्कर आहे. तो केला म्हणजे कोणाला बोलायला जागाच राहाणार नाहीं.

नंदा०—महाराज ! निरपराधी स्त्रीचा त्याग करावयाचा, पण तिच्या हातून खरोखर अपराध घडला आहे कीं काय हें पहावयाचें नाहीं, हाच का आपला राजधर्म ? रामचंद्रानें सीतेचा त्याग केला म्हणून आपणहि करणार कीं काय ? जो स्वतः पूर्णब्रह्म त्याला त्याग व अंगीकार या दोन्ही गोष्टी सारख्याच होत्या. पण महाराज ! आपणाला तसें करणें शोभतें काय ?

सीता०—माझी सगळी प्रजा, शत्रु, मित्र आणि इतर सभ्य लोक यांच्या देखत आपल्या राणीला कुलटेप्रमाणें चौकशीसाठीं उभी करतांना माझें अंतःकरण विदीर्ण होणार नाहीं काय ? मी पाषाणहृदयी नाहीं.

नंदा०—महाराज ! जेव्हां पन्नास हजार लोकांसमक्ष श्री झाडाच्या फांदीवर उभी राहून हर्षानें नाचली तेव्हां तर आपलें अंतःकरण प्रसन्न झालें होतें ?

सीतारामानें नंदेकडे क्रुद्ध दृष्टीनें पाहिलें, आणि म्हटलें, ' नंदे ! तेव्हां तसें झालें होतें खरें ! पण आतां तसें होत नाहीं याचेंच मला मोठें दुःख वाटतें. वर सांगितल्याप्रमाणें सीतारामाला चांगला टोमणा मारल्या-वर नंदेनें हात जोडून क्षमेची याचना केली. हात जोडल्यानें अखेर ती

विजयी झाली. सीतारामानें दरबार भरविण्याचें कबूल केलें. नंदेच्या म्हणण्याप्रमाणें केलें नाहीं तर रमेचा त्याग करावा लागेल व ती तर निरपराधी आहे, तेव्हां दरबार भरविण्यावांचून गत्यंतर नाहीं हें आतां त्याच्या गळीं उतरलें.

राजानें खिन्न मुद्रेनें चंद्रचूडाकडे जाऊन दरबार भरविण्याविषयींची गोष्ट त्याला सांगितली. त्या ब्राह्मणाची पडदा—पद्धतीसंबंधानें विशेषशी श्रद्धा नसल्यानें त्याचीहि संमति मिळाली. रमेला आपली हकीकत निर्भयपणें सांगतां येईल कीं नाहीं येवढीच भीति त्याला वाटत होती. सीतारामालाहि ती भीति होतीच.

प्रकरण दुसरें.

गंगारामाची भर दरबारांत चौकशी करण्यांत येईल असें सीतारामानें जाहिर केलें. ठरलेल्या दिवशीं सहस्रावधि नागरिक दरबारांत येऊन हजर झाले. दिल्लीच्या बादशहाचें अनुकरण करून सीतारामानेंहि 'आमदरबार' (खुला दरबार) भरविण्याचा उपक्रम केला होता. आजकाल सीतारामाचा दरबार मोठा थाटाचा असे. दिल्लीच्या बादशहाप्रमाणें त्याच्या तख्तावर चांदीसोन्याचीं आस्मानागिरी (चांदणी) व मोत्यांच्या झालरी लाविल्या नसल्या तरी छत उंची रेशमी वस्त्राचें असून त्यावर जरतारीचें सुबक नक्षीकाम केलें होतें. खांबावरहि रेशमी वस्त्राचें वेष्टन असून त्यावर उत्कृष्ट प्रकारची नक्षी केलेली होती. सभास्थानीं खालीं चित्रविचित्र रंगांचा मऊ गालिचा अंथरला होता. त्याच्या चारी बाजूंला विचित्र पोशाखाचे हत्यारबंद शिपाई रांगेनें उभे होते. बाहेर घोडेस्वार बंदोबस्तासाठीं फिरत होते. दरबारच्या दिवाणखान्याच्या मध्यभागीं पांढऱ्या संगमरवरी पाषाणाचा एक चबुतरा होता व त्यावर राजाचें रौप्यनिर्मित व सुवर्णखचित

सिंहासन ठेविलें असून त्या सिंहासनाला मोत्यांची झालर लाविलेली होती.

हळूहळू किल्ला लोकांनीं गच्च भरून गेला. सभामंडपांत केवळ उच्च दर्जाच्याच लोकांना स्थान मिळालें. खालच्या दर्जाचे हजारों लोक सभामंडपाच्या बाहेर भोंवतालीं गराडा घालून उभे होते.

हा येवढा जनसंमर्द जमलेला नंदेनें आपल्या महालाच्या खिडकींतून पाहिला, आणि रमेला बोलावून आणून तिला तो दाखविला. तिनें विचारलें, ' आतां कसें काय ? येवढ्या जनसमाजापुढें उभे राहून बोलण्याला तुझें धैर्य होईल ना ? '

रमा०—पतीच्या चरणांचे ठायीं माझी एकनिष्ठतेची भक्ति असेल तर खात्रीनें मला बोलण्याचें धैर्य येईल.

नंदा०—तुझ्याबरोबर कोण येईल बरें ? मी येऊं कां ?

रमा०—ताई ! तुम्ही कां उगाच माझ्याबरोबर मानखंडनेच्या समुद्रांत उडी टाकायला येतां ? कोणीहि येऊं नका. एक गोष्ट मात्र करा. ती ही कीं जेव्हां माझ्यावर बोलण्याची पाळी येईल तेव्हां कोणी तरी माझ्या बाळाला घेऊन माझ्या जवळ उभ्या रहा. म्हणजे बाळाच्या तोंडाकडे पाहून खरें सांगायला मला धैर्य येईल.

नंदेनें तें कबूल करून म्हटलें, ' आतां दरबारांत जाण्याची वेळ होत आली. पोषाख वगैरे नीट घालून तयार रहा. '

तें ऐकून रमा आपल्या महालांत गेली. तिनें आंतून दार लावून घेतलें आणि जमीनीवर बसून हात जोडून देवाची प्रार्थना केली कीं ' जय जगदीश ! आजच्या दिवस मला जें काहीं बोलावयाचें आहे तें बोलण्याचें सामर्थ्य मला दे. उद्यां तूं मला मुकी केलेंस तरी चालेल. येवढी माझी तुला प्रार्थना आहे. आजच्याच दिवस मी सभेंत आपली कहाणी सांगावी, पुनः कधीं ती सांगण्याचा या जन्मीं प्रसंग येऊं नये, हें मी तुझ्याजवळ मागत्यें. आज मला चांगलें मुखबळ दे. त्यानंतर मरण आलें तरी मला त्याचें दुःख वाटणार नाहीं, '

नंतर वस्त्रांतर करण्याचें तिला स्मरण झालें. दासीकडून एक अगदीं

मुसलमान चालून आले, त्याच्या आदले रात्रीं गंगाराम तोराबखाँकडे गेला होता. त्यासंबंधाची जी हकीकत फकीराला ठाऊक होती ती त्यानें सांगितली. तेव्हां राजानें गंगारामाला विचारलें, 'यावरहि तुझें कांहीं उत्तर आहे काय?'

गंगाराम म्हणाला, 'मी त्या रात्रीं तोराबखाँकडे गेलों ही गोष्ट खरी आहे. पण कशासाठीं? मी घरभेद्या आहें असें त्याला दाखवून त्याचा विश्वास संपादावा, व त्याला फुसलावून गडाखालीं आणिल्यानंतर त्याचा यथेच्छ समाचार घ्यावा अशासाठीं मी गेलों होतों.'

राजा—त्यासाठीं तोराबखाँपाशीं तूं कांहीं इनाम मागितलेंस कीं नाहीं?

गंगा०—हो. मागितलें. तसें केलें नसतें तर त्याचा माझ्यावर विश्वास बसला नसता.

राजा—काय इनाम मागितलेंस?

गंगा०—अर्धें राज्य.

राजा—आणखी कांहीं?

गंगा०—कांहीं नाहीं.

राजानें चांदशहा फकीराला विचारलें, 'तुम्हांला यांतली कांहीं माहिती आहे?

चांद०—होय आहे.

राजा—काय माहिती आहे?

चांद०—मी मुसलमान फकीर आहें. तोराबखाँकडे माझें जाणेंयेणें आहे. तेहि माझा आदर ठेवतात. पण मी इकडच्या गोष्टी तिकडे किंवा तिकडच्या इकडे कधीं सांगितल्या नाहींत; म्हणून मला कोणताच पक्ष नाहीं. तोराबखाँ मारला गेला, नाहींतर त्यानें या गोष्टीची साक्ष दिली असती. मधुमतीच्या तीराहून त्यानें कूच केलें त्याच दिवशीं वाटेंत त्याची व माझी गांठ पडली होती. गंगारामाच्या दगलबाजपणाबद्दल त्याच्या व माझ्या तेव्हांच गोष्टी झाल्या होत्या. तुम्हांला त्याच्या फस-वेगिरीच्या गोष्टींवरून बोलतां बोलतां तोराबखाँनें आपण होऊन याच्या

गोष्टी मला सांगितल्या. गंगारामानें इनामादाखल अर्धे राज्य मागितलें, ही गोष्ट खरी आहे. पण त्याला दुसरें एक इनाम पाहिजे होतें. तथापि त्याचा हुजूरसमोर उच्चार करण्यास मला फार भय वाटतें. अभयाचें आश्वासन मिळेल तर सांगेन.

राजा—खुशाल सांगा, भिऊं नका.

चांद०—दुसरें इनाम म्हणजे धाकट्या महाराणीसाहेब होत.

हें ऐकून दरबारी मंडळींत मोठेंच गडबड झाली. प्रत्येकजण गंगारामाला शिवीगाळ करूं लागला. शांतता ठेवण्याचें काम मोठें कठिण झालें. गंगाराम म्हणाला, ' ही अतिशय असंभवनीय गोष्ट आहे. मी कुटुंबवत्सल मनुष्य आहें हें महाराजांस विदितच आहे. तशांत नगररक्षणाचें काम माझ्याकडे होतें. मीं स्त्रियांवर पापी नजर ठेविली असती तर मला कांहीं एक दुष्प्राप्य नव्हतें. मी धाकट्या महाराणीसाहेबांना कधीं डोळ्यांनीं पाहिलेंसुद्धां नाहीं, मग त्यांच्याविषयींचा अभिलाष कसा धरीन !

राजा—असें जर होतें तर मग रात्रींचें कुत्र्याप्रमाणें अंतःपुरांत प्रवेश करण्याचें तुला काय कारण होतें ?

गंगा०—मी अंतःपुरांत केव्हांहि गेलों नाहीं.

यावर पाहारेवाला पांडे ठाकुर याला बोलावण्यांत आलें. तो दाढी हलवीत हलवीत म्हणाला, ' गंगाराम रोज मोठ्या रात्रीं मुरलेचा मी भाऊ आहें असें सांगून तिच्याबरोबर जनानखान्यांत जात येत असे. '

तें ऐकून गंगाराम म्हणाला, ' महाराज ! ही गोष्ट संभवनीय नाहीं. मुरलेच्या भावाला तरी यानें कां आंत सोडलें ? '

पांडे ठाकुर म्हणाला ' मी गंगारामाला चांगलें ओळखलें होतें. पण कोतवालाला मज्जाव कसा करावयाचा ? म्हणून मी ओळखलें होतें तरी न ओळखल्यासारखें वागलों. '

आतां आपली बाजू अधिकच घसरत चालली आहे असें गंगारामाला दिसून आलें. तरी अजून त्याच्या मनाला एक भरंवसा वाटत होता. तो हा कीं मुरला ही गोष्ट स्वतः कधीं उघड करणार नाहीं; कारण, ती तसें

करील तर स्वतःच शिक्षेला पात्र होईल. तिला आपल्या जिवाची भीति नाहीं काय ? असें त्याला वाटत होतें. म्हणून तो म्हणाला, ' मुरलेला बोलावून विचारावें म्हणजे सगळा खुलासा होईल. '

त्या बिचाऱ्याला हें ठाऊक नव्हतें कीं मोठ्या महाराणीसाहेबांनीं अगोदरच मुरलेला आपल्या हाताखालीं घातली होती. नंदेनें तिला अगोदरच समजावून ठेविलें होतें कीं महाराज कधीं स्त्रीहत्त्या करायचे नाहींत. तेव्हां तुला मरणाची भीति वाटायला नको. ते स्त्रियांना शारीरिक शिक्षाहि कधीं करीत नाहींत. तेव्हां तुला कडक शिक्षेलाहि भ्यायला नको. थोडीशी शिक्षा तुला होईल यांत शंका नाहीं; पण तूं जर आपल्या जबानींत खरें खरें सांगितलेंस तर तुला थोडी शिक्षा होईल. तिलाहि ती गोष्ट पटली. आणि तिनें सगळी हकीगत बरोबर घडली होती त्याप्रमाणें सांगितली. एका अक्षरांतसुद्धां फरक केला नाहीं.

मुरलेच्या जबानीनें गंगारामाच्या कपाळावर वज्राघातच केला. तथापि अजून त्यानें उमेद सोडली नव्हती. तो म्हणाला, ' महाराज ! ही स्त्री दुर्वर्तनी आहे. मी हिला शहरामध्यें अनेक वेळां पकडून शिक्षाहि केली आहे. तोच सूड ती आतां खोट्यानाट्या गोष्टी सांगून माझ्यावर उगवून घेत आहे. '

राजा—प्रत्येकाला तूं अप्रामाणिक म्हणणार, मग विश्वास तरी कोणावर ठेवायचा ? खुद्द धाकट्या राणीसाहेब तरी तुझ्या मतें विश्वासाला पात्र आहेत कीं नाहींत ?

गंगारामाला आतां स्वर्ग हातांत आल्यासारखा आनंद झाला. त्याला खात्री होती कीं रमाराणीसाहेब कधीं दरबारांत यायच्या नाहींत, आणि आल्या तरी असल्या गोष्टी बोलायच्या नाहींत. म्हणून तो म्हणाला, 'अलबत्! त्यांच्या जबानीवरून जर मी अपराधी ठरलों तर आपण मला योग्य शिक्षा खुशाल करावी. '

राजानें अंतःपुराकडे पाहिलें. तेव्हां गंगारामाच्या दृष्टीला एक विस्मय करण्यासारखी गोष्ट दिसली. मलिन वस्त्रें धारण केलेली व तोंडावरून बुरखा घेतलेली अशी एक स्त्री मोठ्या धीरानें एकेक पाऊल टाकीत दर-

बारांत येऊन उभी राहिली. जें रूप गंगारामाच्या प्रत्येक हाडाहाडांत प्रतिबिंबित झालें होतें तें पाहतां बरोबर त्यानें ओळखलें, आणि तो फार शंकित झाला. प्रेक्षकसमाजांतहि गडबड उडून गेली. शांततारक्षकांनीं ती गडबड शांत केली.

रमेनें दरबारांत येतांच प्रथम राजाला व नंतर गुरु चंद्रचूड याला दुरून जमीनीपर्यंत लवून नमस्कार केला,आणि तोंडावरचा बुरखा काढून ती राजसभेपुढें उभी राहिली. तिच्या मलिन वस्त्रांतूनहि तिचें लावण्य उसळी मारून बाहेर पडत होतें. चंद्रचूडानें पाहिलें कीं राजा खालीं मान घालून बसला आहे आणि त्याच्यानें बोलवत नाहीं, तेव्हां तो रमेला म्हणाला, 'महाराणीसाहेब ! येथें या गंगारामाच्या चौकशीचें काम चाललें आहे. हा मनुष्य आपल्या अंतःपुरांत कधीं गेला होता कीं नाहीं ? जर गेला असेल तर याचें व आपलें काय संभाषण झालें तें साग्र निवेदन करा. खरें असेल तेंच सांगा अशी महाराजांची व गुरु म्हणून माझी तुम्हांला आज्ञा आहे.'

रमेनें मान करून म्हटलें, ' राजाच्या राणीला खोटें बोलणें ठाऊक नसतें. मी जर असत्य भाषण करणारी असत्यें तर हें सिंहासन यापूर्वी कधींच भंग पावलें असतें. '

प्रेक्षक मंडळींतून ' जय महाराणी की जय ' असा जयध्वनि निघाला.

रमेला त्यामुळें अधिकच स्फुरण आलें आणि ती म्हणाली, ' गुरु-महाराज ! काय सांगूं ? मी राजाची राणी आहें. महाराजांचे नोकर ते माझेहि नोकर आहेत. माझी आज्ञा त्यांना पाळणें भाग आहे. मी राज-कार्यासाठीं कोतवालाला बोलावणें पाठविलें होतें; व तो येऊन माझी आज्ञा ऐकून गेला. त्याची आतां चौकशी कशाला हवी ? आणि मी तरी अधिक काय सांगणार ?'

रमेच्या तोंडचे हे शब्द ऐकल्यावर श्रोतृसमाजांतून जयघोष निघाला नाहीं. पुष्कळ तर खिन्न होऊन बसले. कांहीं जण म्हणाले कीं ' तिनें कबुलीजबाब दिला ! '

चंद्रचूडानें रमेला विचारलें, ' असें कोणतें मोठें राजकार्य होतें कीं त्यासाठीं रात्रीं कोतवालाला बोलावणें पाठविण्याचें कारण पडलें ! '

तेव्हां रमा म्हणाली, ' तर मग सगळी हकीकत ऐकावी. ' इतकें बोलून तिनें एकदां आपल्या मुलाकडे पाहिलें. तो चांगला पोषाख घालून दाईच्या कडेवर बसला होता. त्याच्या तोंडाकडे पाहून रमेच्या अंगीं धैर्य आलें, आणि तिनें सविस्तर कथा सांगण्यास सुरुवात केली.

दुरून ऐकूं येणाऱ्या संगीतध्वनीप्रमाणें प्रथम ती अगदीं सावकाश आणि हलक्या स्वरांत बोलत होती. त्यामुळें सर्वांना तिचें शब्द ऐकूं गेले नाहींत. तेव्हां श्रोतृसमाजांतून मोठ्यानें बोलण्याविषयीं विनयपूर्वक सूचना करण्यांत आल्यावरून ती मोठ्याने व अधिक स्पष्टपणें बोलूं लागली. आपल्या पुत्रावर येणाऱ्या संकटाच्या भीतीनें आपण हें साहसकर्म केलें ही गोष्ट जेव्हां ती श्रोत्यांना समजावून सांगायला लागली व पुनः पुनः पुत्राच्या मुखाकडे पाहूं लागली, तेव्हां तिच्या नेत्रांतून अश्रूंच्या धारा वाहूं लागल्या व तिच्या अंतःकरणांत मातृस्नेहाच्या ऊर्मींवर ऊर्मी उठूं लागल्या. श्रोतृसमाजाच्या कानांला तिचे शब्द अप्सरांच्या गायनाहूनहि मधुर व मनाला मुग्ध करून सोडणारे लागले. नंतर एकाएकीं रमेनें आपल्या मुलाला दाईच्या कडेवरून उचलून घेऊन सीताराम महाराजाच्या चरणांवर त्याला घातलें आणि दोन्ही हात जोडून म्हटलें, ' महाराज ! आपणाला आणखी संतति आहे. पण माझी संतति ही येवढीच. आपलें राज्य आहे पण माझें राज्य हेंच. महाराज ! आपणास धर्म, कर्म, यश, स्वर्ग सर्व गोष्टींची अनुकूळता आहे. पण मी अगदीं मोकळ्या मनानें सांगत्यें कीं माझा धर्म, कर्म, यश, स्वर्ग सगळें कांहीं हा पुत्रच आहे. महाराज ! मी अपराधी म्हणून आपल्या पुढें उभी आहे. शिक्षेची आज्ञा व्हावी. '

हे रमेचे शब्द ऐकल्यावर श्रोते मंडळीच्या डोळ्यांत अश्रु उभे राहिले, आणि ते वरचेवर जयघोष करूं लागले. पण लोकांत बरे आणि वाईट असे प्रकार असतातच. जेव्हां पुष्कळ लोक जयघोष करूं लागले, तेव्हां कित्येकांनीं त्या जयघोषांत आपला सूर मिळविला नाहीं. गडबड शांत

झाल्यावर ते अर्धवट स्पष्ट स्वरानें म्हणूं लागले, ' आमचा तरी बुवा या शब्दांवर विश्वास बसत नाहीं. ' एक म्हातारी म्हणाली, ' जळलें मेलीचें तोंड ! आपण होऊन रात्रींच्या वेळीं पुरुषमाणसाला बोलावून न्यायचं, आणि पुनः पतिव्रता म्हणून तोंन्यानं मिरवायचं! ' कोणी म्हटलं, ' राजेसाहेब या भुलथापांला भुलतील तर भुलोत, आपण तर बुवा असे भुलणार नाहीं.' कोणी म्हणाले, ' राणीसाहेबांसारखीं माणसें असें कृत्य करूं लागल्यावर आमच्यासारख्या दुःखी गरीबांनीं केलें तर काय नवल ? '

या सगळ्या गोष्टी सीतारामाच्या कानापर्यंत पोंचत होत्या. म्हणून त्यानें रमेला म्हटलें, 'प्रजाजनाचा तुमच्या बोलण्यावर विश्वास बसत नाहीं.'

रमा कांहीं वेळ खालीं मान घालून उभी राहिली. तिच्या नेत्रांतून अश्रुधारा जोरानें वाहूं लागल्या. रमेनें आपलें मन आवरून धरलें, आणि वर मान करून म्हटलें, ' महाराज ! माझ्या शब्दांवर लोकांचा विश्वास ज्या अर्थी बसत नाहीं, त्या अर्थी आतां मला एकच उपाय राहिला आहे. आपल्या या राजधानीला कलंक लावणारे माझें हें रूप आणि जीवन आतां मला ठेवतां येत नाहीं. चिता पेटविण्याची आज्ञा व्हावी, मी सर्वांच्या देखत अग्निकाष्ठ भक्षण करीन. मला त्याबद्दल अगदीं दुःख वाटत नाहीं. लोकांनीं मला कलंकिनी म्हटल्याचें दुःख माझ्या मरणानेंच नाहींसें होणार आहे. पण महाराज ! एक प्रार्थना आहे. आपणसुद्धां माझा अविश्वास धरतां काय ? तसें असेल तर--(या वेळीं रमेच्या डोळ्यांतून खळखळा अश्रु वाहत होते.) मी आतां जगण्यांत अर्थ नाहीं. अग्नींत जळून मरावें हेंच उत्तम. माझ्या शब्दांवर आपला अविश्वास नाहीं असें आपण या सगळ्या लोकांसमक्ष म्हटलंत तर ही चिता म्हणजे प्रत्यक्ष स्वर्गच असें मी समजेन. महाराज ! परलोकाची प्राप्ति व उद्धार करून देणारे या भूलोकचे देवच असे जे हे गुरुमहाराज समोर आहेत, त्यांच्या देखत कुलदेवतेला साक्षी ठेवून मी सांगतें कीं मी विश्वासाला अपात्र नाहीं. जे गुरुमहाराजापेक्षांहि मला अधिक पूज्य, मनुष्य असूनहि देवापेक्षां मला अधिक पूज्य असे माझे पति आपण आहां. त्या पतिदेवतेला साक्षी ठेवून मी म्हणतें कीं मी विश्वासाला अपात्र नाहीं. महाराज!

मी खोटें सांगत असेन तर स्त्रीजन्माला हेऊन मी आजपर्यंत जी कांहीं देवसेवा, ब्राह्मण-सेवा, दानें, व्रतें, नियम इ. केलीं आहेत त्यांचें फळ मला मिळणार नाहीं. स्त्रीला पतिसेवेसारखें पुण्यकृत्य नाहीं. मीं कायावाचामनेंकरून पतीच्या चरणांची जी सेवा केली आहे ती आपणास विदितच आहे. मी खोटें सांगत असेन तर ती माझी सेवा निष्फळ होईल. या जन्मीं माझ्या ज्या कांहीं आशा, भरवंसा, इच्छा व जे कांहीं बेत असतील ते मी खोटें सांगत असल्यास सगळे विफल होतील. महाराज ! स्त्रीजन्मांत पतिदर्शनाच्या तोडीचें दुसरें पुण्य नाहीं, व सुखहि नाहीं. जर मी खोटें सांगत असेन तर मी त्या सुखाला चिरकाळ अंतरेन. ज्या पुत्रासाठीं मी हा कलंक जाहिर केला, ज्याच्याशीं तुलना करायला मला या जगांत दुसरें कांहीं दिसत नाहीं, तें पुत्रमुख मी सत्याचा अपलाप करीत असेन तर पुनः मला कधीं दिसणार नाहीं. महाराज ! फार काय सांगूं ? मी जर खोटें सांगत असेन तर मला पुनः पुनः स्त्रीजन्म प्राप्त होऊन त्या प्रत्येक जन्मांत पति व पुत्र यांच्या मुखाचें दर्शन मला कधींहि होणार नाहीं.'

रमेच्यानें अधिक कांहीं बोलवेना. तोडून टाकिलेल्या कोमल लतेप्रमाणें मूर्च्छित होऊन ती त्या राजसभेंत धाडकन् पडली. दासींनीं लगबगीनें येऊन तिला उचलून अंतःपुरांत नेलें. तो प्रकार पाहून दाईच्या कडेवरचा मुलगा रडूं लागला. दरबारांतल्या सर्वांनाच तो अत्यंत हृदयद्रावक देखावा पाहून रडें येऊं लागलें. गंगारामाच्या हातकड्या व पायबेड्या झन् झन् नाद करूं लागल्या. वाऱ्याच्या जोराच्या प्रवाहामुळें समुद्राच्या पाण्यांत जसे कल्लोळ उठतात तसे श्रोतृसमाजांत उठूं लागले. शांततारक्षणाचें काम फार कठीण झालें.

यावर गंगारामाचें काय म्हणणें आहे? हें सगळें खोटें असें म्हणण्यास तो तयार आहे काय ? असेल तर त्याला फाडून तुकडे तुकडे करून फेकून देऊं अशा तऱ्हेचे उद्गार सर्वत्र ऐकूं येऊं लागले. लोकांचीं मनें क्षुब्ध झालीं आहेत, आतां जर त्यांच्या मनांत परिवर्तन घडवून आणिलें नाहीं तर आपला जीव तरी सुरक्षित राहील कीं नाहीं अशी गंगारामाला

भीति वाटूं लागली. तो बुद्धिमान् होता. त्यामुळें त्याच्या ध्यानांत आलें कीं आतां लोकमत जिकडे वळेल तिकडेच राजाच्या मनाचाहि कांटा झुकेल. म्हणून राजाला उद्देशून पण लोकांच्या मनाला झुलविण्यासारखें भाषण तो करूं लागला. तो म्हणाला—

'महाराज ! मला येवढेंच विचारावयाचें आहे कीं नायकांच्या बोलण्यावर आपण विश्वास ठेवाल कीं माझ्या सांगण्यावर ? महाराज ! आपलें हें राज्य स्त्रियांनीं स्थापिलें आहे कीं आमच्यासारख्या पुरुषांच्या बाहुबळानें स्थापन केलें आहे ? महाराज ! सगळ्याच स्त्रियांसंबंधानें दुर्मार्गगामी होण्याची भीति असते तशी राजाच्या राणीसंबंधानेंहि असते. राणी दुराचारी निघाली तर अशा वेळीं तिचा त्याग करणें हेंच राजाचें कर्तव्य असतें. खरा प्रामाणिक सेवक कधीं दुर्वर्तन करीत नाहीं. आपल्या दुर्वर्तनाबद्दलच्या दोषाचें खापर नोकराच्या डोक्यावर फोडायचें काम स्त्रीजातीला सहज करतां येतें. या राणीसाहेबांनीं रात्रीं दुसऱ्या कोणाची तरी गांठ घेतली असेल आणि त्याचा दोष त्या माझ्या माथीं मारूं पाहत आहेत. महाराज ! अशा वेळीं आपणच माझें रक्षण केलें पाहिजे. आपणच तें करण्यास समर्थ आहां.'

गंगारामानें आपल्या भाषणाचे शेवटीं अतिशय भयभीत होऊन 'महाराज ! आपणच या वेळीं माझें रक्षण करण्यास समर्थ आहां' अशी अतिशय काकुळतीनें प्रार्थना केल्यानंतर तो कांहीं काळ अगदीं स्तब्ध राहिला. तो थरथर कांपत आहे आणि सभाजन भीतियुक्त विस्मितचित्तानें त्याच्याकडे पाहत आहेत, इतक्यांत एक चमत्कारिक प्रकार घडून आला. डोक्यावर जटा आणि अंगावर भगवीं वस्त्रें धारण केलेली एक अपूर्व तेजःपुंज मूर्ति आंत जाण्यास प्रतिबंध असतांहि एकाएकीं दरबारांत येऊन सर्वांच्या पुढें उभी राहिली. तिला पाहतांच साक्षात् देवीच अवतरली आहे कीं काय असें लोकांना वाटलें. तिच्या हातांत त्रिशूळ होता व त्याचें टोंक गंगारामाच्या पुढें अंगाकडे तिनें रोखून धरलें होतें. तिला पाहतांच खवळलेल्या समुद्राप्रमाणें क्षुब्ध झालेला जनसमुदाय एकदम भिस्मित होऊन स्तब्ध झाला. गंगारामानें एके रात्रीं त्या मूर्तीला पाहिलें होतें.

पुनः तीच मूर्ति आपल्यावरच्या अशा संकटसमयीं—आपण खोट्यानाट्या गोष्टी सांगून रमेच्या घाताला उद्युक्त झालों आहों अशा वेळीं—एकाएकीं उपस्थित झालेली पाहून गंगाराम घाबरला. त्याला वाटलें कीं आपण निरपराधी रमेचा छळ करीत आहों हें पाहून तिचा कैवार घेऊन आपला वध करण्यासाठीं प्रत्यक्ष देवीच राजसभेंत आली आहे. तिला पाहतांच 'माझें रक्षण करा, माझें रक्षण करा!' असे घाबरे घाबरे उद्गार त्याच्या तोंडून निघाले.

राजा व चंद्रचूड यांना सुद्धां त्या मूर्तीकडे पाहून असें वाटलें कीं ती आपल्या नगराची राज्यलक्ष्मीच असली पाहिजे. म्हणून ते तिच्या सत्कारार्थ घाईघाईनें उठले. तें पाहून दरबारची सगळीच मंडळी उभी राहिली.

जयंतीनें इकडे तिकडे न पाहतां थेट गंगारामापाशीं जाऊन हातांतल्या मंत्रपूत त्रिशूळाचें अग्र त्याच्या छातीवर ठेविलें, आणि म्हटलें, 'आतां बोल पाहूं!'

गंगारामाच्या अंगाला त्या त्रिशूळानें स्पर्श केला न केला तोंच त्याच्या अंगांतली शक्ति पार नाहींशी झाली. याला वाटलें कीं आतां खोटें बोलण्याची सोय नाहीं. एक शब्द खोटा सांगितल्याबरोबर हा त्रिशूळ आपल्या छातीचा भेद करून जाईल. म्हणून त्यानें भयभीत होऊन सगळा खरा खरा वृत्तांत नम्रपणानें सांगण्यास सुरवात केली. त्याचे भाषण संपेपर्यंत जयंतीनें त्याच्या छातीवर टेकलेला त्रिशूळ काढला नाहीं. रमा कशी निर्दोषी आहे, आपणास तिच्या रूपाचा कसा मोह पडला, लोभाला वश होऊन आपण फौजदाराच्या भेटीला कसे गेलों, इत्यादि सगळ्या दगलबाजीच्या गोष्टी आतां गंगारामानें यथातथ्य व सविस्तर सांगितल्या.

इतकें झाल्यावर जयंतीनें आपला त्रिशूळ काढून घेऊन तेथून प्रयाण केलें. ती जाऊं लागली तेव्हां सर्व सभाजनांनीं शिरें लववून तिला प्रणाम केला, आणि वाट दिली. तिला कांहीं विचारण्याचें किंवा तिच्या मागोमाग जाण्याचें धैर्य कोणाच्यानेंहि करवलें नाहीं. ती कोणत्या दिशेनें व कोठें गेली यांचा शोध कोणीं केला नाहीं.

जयंती निघून गेल्यावर राजा गंगारामाला म्हणाला; 'तूं आतांच

आपल्या तोंडानें सगळा अपराध कबूल केला आहे. अशा कृतघ्न माणसाला देहांत शासनाशिवाय अन्य योग्य शिक्षा नाहीं. म्हणून तुला मी वधाची शिक्षा देत आहें. ती भोगण्यास तूं तयार रहा.'

यावर गंगाराम कांहीं बोलला नाहीं. शिपाई त्याला घेऊन गेले. गंगारामाला वधाची शिक्षा झालेली ऐकून सर्व मंडळी चकित झाली. कोणी कांहीं बोलले नाहींत. मुकाट्यानें सगळी मंडळी घरोघर निघून गेली. त्यानंतर ती त्रिशूळधारी स्त्री साक्षात् राज्यलक्ष्मीच होय असे उद्गार निघालेले घरोघर ऐकण्यांत येत होते. रमेवरचा कलंक आतां साफ निघून गेला होता.

प्रकरण चौथें.

मुरलेची धिंड काढून तिला नगराहेर हाकून द्यावें असा राजानें हुकूम फर्माविला व तो ताबडतोब अंमलांतहि आला. तिची धिंड निघत असतां गांवांतलीं पोरेंसोरें आणि टारगट खुशालचंद लोक आनंदानें टाळ्या वाजवीत आणि गाणीं गात त्या मिरवणुकीच्या मागून चालले होते.

गंगारामासारख्या कृतघ्न माणसाच्या अपराधाला त्या काळच्या दंडनीतींत देहांतशासनाशिवाय अन्य शिक्षा सांगितली नव्हती. म्हणून तीच शिक्षा त्याला सांगण्यांत आली होती. तथापि या शिक्षेच्या हुकुमाची बजावणी कांहीं कालपर्यंत थांबवून धरावी लागली. कारण कीं राजाला लवकर राज्याभिषेक व्हावयाचा होता. सीतारामानें स्वतःच्या कर्तृत्वाच्या जोरावर हिंदुराज्य स्थापना करून राज्यपद प्राप्त करून घेतलें होतें. पण यथाशास्त्र राज्याभिषेकविधि अद्याप व्हावयाचा होता. हिंदुधर्मशास्त्राच्या नियमाप्रमाणें तो व्हावयास पाहिजे होता. तो करण्याची गोष्ट चंद्रचूडानें काढली होती आणि तिला राजानें संमति दिली

होती. राज्याभिषेकाचा समारंभ थाटानें केल्यास प्रजाजनांस संतोष वाटेल व त्यांचे ठायीं राजभक्तीची भावना अधिक दृढ होईल अशा विचारानें सदर अभिषेकोत्सवसमारंभ मोठ्या थाटामाटानें करण्याचें ठरलें होतें. नंदाराणी व चंद्रचूड या दोघांजणांनीं या वेळीं गळ घातली कीं राज्याभिषेकासारखें मंगल कार्य करण्याचें आपण योजिलें आहे; अशा वेळीं गंगारामाच्या वधासारखें अशुभ कृत्य करणें उचित नाहीं. त्याला न्यायानें दिलेली शिक्षा अंमलांत आणण्यापासून राज्याला कांहीं अशुभ होणार नसलें तरी प्रजेच्या आनंदाला त्यामुळें थोडासा कमीपणा येईल. ती गोष्ट राजाला पसंत पडली. राजानें तिला संमति दिली. यांतलें खरें इंगित हें होतें कीं गंगारामाला सुळावर चढविण्याची राजाची खरी मनापासून इच्छा नव्हती. केवळ राजधर्मपालनासाठीं व राज्यशासनासाठीं अवश्य कर्तव्य म्हणून ती गोष्ट करण्याचें त्यानें ठरविलें होतें. गंगारामाचा वध करण्याची खरी इच्छा नसण्याचें कारण तो श्रीचा भाऊ होता हें होय. सीताराम श्रीला अद्याप विसरला नव्हता. पुष्कळ दिवसपर्यंत तिचा शोध केला तरी तिचा पत्ता लागेना, तेव्हां निराश होऊन आपल्या नित्य व्यवसायांत चित्त गुंतविल्यानें तरी तिचा विसर पडेल अशी मनाची समजूत करून घेऊन तो आतां राज्यकारभाराचें काम पाहूं लागला होता. त्यामुळेंच त्यानें दिल्लीला बादशाहाच्या दरबारीं जाऊन, व त्याला प्रसन्न करून घेऊन मोठ्या उत्साहानें राज्याच्या सनदा आणण्याची येवढी यातायात केली होती. त्यासाठींच घोर युद्ध करून भूषणा शहरहि त्यानें नुकतेंच हस्तगत केलें होतें, आणि दक्षिण बंगाल प्रांतीं आधिपत्य मिळाविलें होतें. तथापि अद्याप त्याच्या हृदयाचें पूर्ण स्वामित्व श्रीकडेसच होतें. त्यामुळें गंगारामाच्या शिक्षेची अंमलबजावणी तहकूब राहिली.

इकडे राज्याभिषेकाच्या तयारीची मोठी धामधूम चालली होती. जितका समारंभ मोठा त्या मानानें तयारीची धामधूमहि मोठीच असावयाची. या समारंभासाठीं दूरदूरच्या देशचे लोक मुद्दाम आले होते व त्यांनीं सारें शहर गजबजून गेलें होतें. संस्थानिक, राज्यांतले अधिकारी, ब्राह्मण, पंडित, अध्यापक, ज्योतिषी, व इतर आमंत्रित सभ्य लोक, त्याचप्रमाणें निबळ

खातमी ऐकतांच धावून आलेले आगंतुक, भिक्षुक, संन्यासी, साधु, बैरागी आणि भामटे सुद्धां राजधानीकडे इतके लोटले कीं अतिशय गर्दी झाली आणि शहरांत राहण्याला जागा मिळण्याची मुष्कील झाली. या असंख्य लोकांना रोज लागणारे आहारविहाराचे जिन्नस दुर्मिळ झाले. सर्पणा-च्या पायीं राज्यांतल्या जंगलांचा नाश झाला, आणि रात्रंदिवस चाललेल्या वादन, गीत, नृत्यादिकांचा हळूहळू प्रत्येकाला वीट येऊं लागला.

राज्याभिषेकोत्सवाचें एक महत्त्वाचें अंग दानधर्म हें असतें. अभिषे-काच्या दिवशीं कोणाला स्वहस्तें, तर कोणाला अधिकाऱ्यांच्या हातून, स्वतः-च्या देखरेखीखालीं सुवर्ण, रौप्य, ताम्र इ. धातूंचीं नाणीं व वस्त्रपात्रें यांचें दान करण्याचें काम दिवसभर चाललें होतें. दानें घेणारांची इतकी संख्या लोटली होती कीं तीं देण्यास दिवस पुरला नाहीं. म्हणून रात्रीं १२ वाजेपर्यंत तें काम चालूं ठेवावें लागलें होतें. तेव्हां इतर लोकांच्या बिदाग्या देण्याचें काम कारभारी मंडळीवर सोंपवून राजा विश्रांतीसाठीं अंतःपुरांत गेला. जातां जातां अंतःपुराच्या दाराशीं ती त्रिशूळधारिणी दिव्य राज्यलक्ष्मीची मूर्ति पाहून सीतारामाला विस्मय व भीति वाटली.

राजानें तिला भक्तिभावानें साष्टांग वंदन करून म्हटलें, 'मातुश्री ! आपण कोण आहां हें कृपा करून सांगावें.'

जयंती म्हणाली, ' महाराज ! मी एक भिकारीण आहें. आपलेपाशीं एक याचना करण्यासाठीं आल्यें आहें.

राजा—माताजी ! माझ्यापासून कां लपवितां ? मी आपणास ओळखलें आहे. आपण प्रत्यक्ष देवी आहां. माझ्यावर आपली कृपादृष्टि असावी.

जयंती—महाराज ! तसें नव्हे. मी सामान्य मनुष्य आहें. तसें नसतें तर आपल्यापाशीं भिक्षा मागण्यास आल्यें नसल्यें. आपण आज इच्छादान मांडलें आहे असें मीं ऐकलें. माझी आशा मोठी आहे. पण येवढा मोठा दानधर्म करणारापाशीं ती विफल होणार नाहीं अशी खात्री मनाला वाटल्यावरून आल्यें आहें.

राजा म्हणाला, ' आपणास देतां येणार नाहीं असें माझ्यापाशीं कांहीं नाहीं. आपण एकदां माझ्या राज्याचें आणि दुसऱ्यांदा माझ्या कुळाच्या

अब्रूचें रक्षण केलें आहे. आपण देवी असा कीं मनुष्य असा, आपण मागाल तें मी देईन. काय पाहिजे त्याविषयीं आज्ञा व्हावी.'

जयंती—महाराज! गंगारामाला वधाची शिक्षा आपण फर्माविली आहे. सुदैवानें ती अद्याप अंमलांत आलेली नाहीं. तेव्हां त्याला जीवदान द्यावें अशी प्रार्थना करण्यासाठीं मी आल्यें आहें.

राजा—गंगाराम म्हणजे एक क्षुद्र प्राणी! त्याची येवढी दया आपल्यासारख्याला यावी हें आश्चर्य आहे!

जयंती—आश्चर्य कसलें महाराज? आम्हां भिकाऱ्यांना काय? सगळीं माणसें सारखींच वाटतात!

राजा—पण त्याच्या छातीवर त्रिशूळाचें टोंक धरून आपणच नव्हतां का त्याला मारायला तयार झालां? आपल्यामुळेंच तर दोन कपटकृत्यांबद्दल त्यानें कबुलीजबाब दिले. काय सांगूं? आपण धाकट्या राणीसाहेबासंबंधानें दया केली नसती तर त्यानें आपला गुन्हा कबूल केला नसता, आणि त्याला शिक्षाहि झाली नसती. असें असतां आपण आतां त्याच्या उलट करायला मला सांगतां, हें कसें?

जयंती—इतक्या सगळ्या गोष्टींना मी कारण झाल्यें म्हणूनच त्याच्यासाठीं मी जीवदान मागत आहें. 'परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम्! धर्मसंरक्षणार्थाय' अधर्माचरण करणाऱ्याचा त्रिशूळानें प्राणघात करण्यांत कोणताहि दोष नाहीं. पण धर्मरक्षण झालें आहे. राणीसाहेबांचाहि माथा उजळ झाला आहे. दुष्ट गंगाराम आतां मेल्यापेक्षांहि मेला झाला आहे. आता त्याला वधाची शिक्षा भोगण्यास लाविल्यानें व्यर्थ प्राणिहत्येचें पाप मला लागणार आहे. या विचारानें माझें मन व्याकुळ झाल्यामुळें मी त्याच्यासाठीं जीवदानाची भिक्षा मागायला आल्यें आहें.

राजा—आपली इच्छा मी पूर्ण करतों. गंगाराम आतांच मोकळा होईल. पण माझी एक विनंति आहे. आपणास मी कांहीं दान द्यावें अशी माझी योग्यता नाहीं. म्हणून गंगारामाचे प्राण मीं आपणास विकत देतों. त्याचें मोल आपण दिलें पाहिजे.

जयंती—(किंचित हंसून)—कोणतें मोल? आपल्या भांडारांत अशी

कोणती वस्तु उणी आहे कीं ती माझ्यासारख्या भिकारणीला देतां येईल !

राजा---मला धन नको; जीवन पाहिजे आहे. आपण मधुमतीच्या कांठीं घाटावर तोफेपाशीं उभे राहून आशिर्वाद दिला होता कीं तूं जें शोधतो आहेस तें तुला मिळेल. तें आज आपण मला गंगारामाच्या प्राणाचें मोल म्हणून द्यावें.

जयंती---अशी कोणती अमूल्य वस्तु आहे महाराज ! राज्य तर आपणास प्राप्त झालेंच आहे.

राजा---ज्याच्यासाठीं राज्याचासुद्धां मी आनंदानें त्याग करीन अशी ती वस्तु आहे.

जयंती---महाराज ! अशी कोणती ती वस्तु !

राजा---माझी ज्येष्ट राणी श्री ही मला प्राणांहून प्रिय आहे---तीच माझें जीवन आहे. आपण देवी--सर्व कांहीं देण्यास समर्थ आहां. तें माझें जीवन मला देऊन त्याच्या मोबदल्यांत गंगारामाचें जीवन आपण घ्यावें.

जयंती---महाराज ! असें कसें होईल ! आपल्यासारख्या धर्मात्म्या राजाधिराजाचें जीवन आणि त्या पापात्म्या नराधमाचे जीवन यांचा मोबदला कसा होईल ! कवडीच्या मोलानें रत्नांची खाण कोठें मिळत असते काय !

राजा---आई मुलाला जितकें देत्ये तितकें आईला परत देण्याचें सामर्थ्य मुलाच्या ठायीं कोठें असतें !

जयंती---बरें तर . महाराज ! आज आपण अंत:पुराचे दरवाजे खुले ठेवावे, आणि ज्याच्या हातांत असा त्रिशूळ असेल त्याला विचारपूस न करतां आंत सोडण्याविषयीं पाहारेवाल्यांना हुकूम देऊन ठेवावा. आपणास शय्यागृहांतच गंगारामाच्या प्राणांची किंमत मिळेल. त्याच्या मुक्तेबद्दलचा हुकूम व्हावा.

राजानें हर्षित होऊन 'त्याला सोडलें' असें म्हटलें व त्याप्रमाणें अधिकाऱ्यांना आज्ञा केली.

जयंती---मी आतांच या शिपायाबरोबर गंगारामाच्या बंदीखान्यांत जाऊं काय !

राजा—आपल्या इच्छेस येईल तसें करावें. आपणास कोण मनाई करणार आहे !

प्रकरण पांचवें.

अयोध्येच्या जागेंत कूपाप्रमाणें खोल, ओल असलेल्या, आणि वारा येणार नाहीं अशा प्रकारच्या तुरुंगांतल्या कोठडींत गंगारामाला अडकवून ठेविलें होतें. तेथें तो एकटा असुन त्याच्या हातापायांत शृंखला होत्या. तेथें रात्रींच्या वेळींसुद्धां त्याला झोंप येत नसे. सुळावरची शिक्षा झालेल्या त्याच्यासारख्या माणसाला झोंप कशी यावी ! त्याचे आहारनिद्रादिक व्यापार सगळे बंद होते. एका झटक्यासरशीं माणसाला मृत्यु आला तर ती मृत्यूची शिक्षा इतकी असह्य होत नाहीं; पण कारागृहांत एकटा बसलेल्या माणसाच्या डोळ्यांपुढें अहोरात्र यमदंडाचें चित्र उभें राहिल्यामुळें त्याच्या मनाची जी स्थिति होते तिच्यापेक्षां अधिक भयंकर शिक्षा दुसरी कोणतीहि नसेल. प्रतिक्षणीं आपण सुळावर चढलों आहों असें गंगारामाला वाटत होतें. प्रत्यक्ष शिक्षेला आणखी काय शिंगें असतात ! विचार करकरून त्याच्या चित्तवृत्ति अगदीं जड होऊन गेल्या होत्या. मन अंधकारांत बुडाल्यासारखें झालें होतें. क्लेश सहन करण्याची शक्तिच उरली नव्हती. दोनच गोष्टी अद्याप त्याच्या मनांत वास करीत होत्या. भैरवीचें भय ही त्यांतली एक आणि रमेविषयींचा अनुराग ही दुसरी. भयापेक्षां ही दुसरीच अधिक प्रबळ होती. रमेविषयीं त्याच्या ठायीं आतां आसक्ति नव्हती. रमेला त्याच्याशिवाय अंतरिक शत्रु दुसरा कोणी नव्हता.

रमा आतां गंगारामाला समोर दिसली असती तर त्यानें नखानें तिच्या शरीराचें विदारण केलें असतें. गंगाराम आतां मृत्यूच्या द्वारांत उभा होता. तरी मरणाच्या अगोदर तिचा सत्यानाश कसा करतां येईल याच गोष्टीचा

विचार त्याच्या डोक्यांत घोळत होता. आपण सुळावर चढण्यापूर्वी कोणते अश्लील शब्द तिच्यासंबंधानें उच्चारावे याचाहि विचार केव्हां केव्हां तो करीत असे. इतर वेळीं मातीच्या गोळ्यासारखा जडबुद्धि होऊन तो बसत असे. मधून मधून एखादे वेळीं राज्याभिषेकोत्सवासंबंधाची गडबड त्याच्या कानीं येई. जो मनुष्य त्याला खाण्यासाठीं मीठभाकर आणून देत असे, त्याच्याकडून उत्सवासंबंधाच्या गोष्टी त्याला कळत असत. बाकीचे सारे लोक उत्सवाच्या आनंदांत निमग्न आहेत आणि आपणच एकटे या अंधकूपांत उंदीर, घुशी, कीट, पतंग, डांस इ. च्या संगतींत असे शृंखलाबद्ध होऊन पडलों आहों हें वरचेवर मनांत येऊन रमेची अशीच गत केव्हां होईल या गोष्टीचें चिंतन तो करूं लागला.

ज्याप्रमाणें गाढ अंधेरांत एकाएकीं वीज चमकावी, त्याप्रमाणें गंगारामाच्या मनांत एकाएकीं एक कल्पना आली. श्री जिवंत असेल काय ? तिनें एकदां सीतारामाचें मन वळवून आपले प्राण वांचविले होते, तशी तिनें पुनः एकवार माझ्या प्राणांची भिक्षा राजाजवळ मागितली तर ती तिला मिळूं शकणार नाहीं काय ! मी कितीहि दुष्ट असलों तरी तिचा भाऊ आहें. ती माझा त्याग खास करणार नाहीं. पण ती माझी बहीण तरी कोठें आहे ! तीहि मेली !

दोन प्रहर रात्रीं घड्याळाचे ठोके पडल्यावर गंगारामाच्या कोठडीच्या दाराच्या कडीचा आवाज झाला. त्याबरोबर गंगाराम दचकला. इतक्या रात्रीं दाराची कडी कोणीं काढली ? आणखी एखादें संकट आपल्यावर येतें कीं काय ? अशी भीति त्याला वाटूं लागली.

इतक्यांत अधिकारी कंदिल घेऊन आले. त्यांना पाहून गंगाराम चकित झाला आणि त्यांच्याकडे टकमका पाहूं लागला. पण त्यांना विचारण्याचें धैर्य त्याला होईना. अधिकाऱ्यांच्या मागोमाग जयंतीहि आली. तिला पाहतांच गंगाराम मोठ्यानें ओरडून म्हणाला, ' माझें रक्षण करा ! माझे प्राण वांचवा ! मीं काय अपराध केला आहे !'

जयंती—काय अपराध केला आहे तें आपल्या मनालाच विचार.

तथापि घाबरूं नकोस. तुला जीवदान मिळेल. श्रीची आठवण तुला आहे काय ?

गंगा—श्री ! आज जर ती जिवंत असती—

जयंती—ती जिवंत आहे. तिच्याच आग्रहावरून मीं आतां महाराजापाशीं तुला जीवदान देण्याविषयीं याचना केली, आणि त्यांनीं ती भिक्षा मला घातली. तुझी मुक्तता करण्यासाठींच मी आल्यें आहें. आतां येथून चालता हो. उद्यां सकाळीं तुझें तोंड येथें न दिसले पाहिजे. जर दिसलें तर तुझे प्राण राहणार नाहींत, आणि तुला वांचविण्यास पुनः कोणी देणार नाहीं, हें ध्यानात ठेव.

गंगारामाला तिच्या शब्दांचा अर्थ कळला कीं नाहीं याची शंकाच आहे. त्याचा तिच्या शब्दांवर विश्वास बसला नाहीं हे मात्र खास आहे. पण लवकरच अधिकाऱ्यांच्या हुकुमानें त्याच्या बेड्या काढण्यांत आल्या, तेव्हां त्याला तें खरें वाटलें.

बंधनमुक्त होतांच त्याने सुंबाल्या केला. त्या रात्रीच्या रात्रीं तो ते नगर सोडून दुसरीकडे चालता झाला.

प्रकरण सहावें.

गंगारामाच्या सुटकेचा हुकूम देऊन व जयंतीच्या सांगण्याप्रमाणें अंतःपुराचा दरवाजा खुला ठेवण्याविषयीं सांगून राजा आपल्या शय्यागृहांत गेला, आणि पलंगावर निजून राहिला. नंदा येऊन त्याची पदसेवा करूं लागली. राजानें विचारलें, ' रमेचें आतां कसें आहे ? '

रमेच्या दुखण्यासंबंधानें पुढें सांगण्यांत येईल. नंदा म्हणाली, 'म्हणजे तिचें कांहीं दुखतें खुपतें आहे असें कांहीं दिसलें नाहीं ! '

राजा म्हणाला, ' आतां इतक्या रात्रीं तिच्या समाचाराला मला जातां येत नाहीं. मला थकवा वाटत आहे. यासाठीं तूंच माझ्याबरची

तिच्याकडे जा आणि मी जें बोललों असतों व उपचार केले असते, ते सगळे आतां तूंच कर. '

हें वाचून वाचक सीतारामाचा धिक्कार करतील. पण सीताराम आतां पूर्वीचा सीताराम राहिला नव्हता. ज्या सीतारामानें हिंदूंचें साम्राज्य स्थापण्यासाठीं सर्वस्वावर पाणी सोडण्याचा संकल्प केला होता तोच सीताराम आतां प्रजेच्या पालनाचें आपलें कर्तव्य सोडून केवळ श्रीच्या शोधार्थ व्यग्रचित्तानें वणवण फिरत होता. ज्या सीतारामानें शरण आलेल्या गंगारामाचे प्राण वांचविण्यासाठीं स्वतःचे प्राण सुद्धां खर्ची घालण्यास मागें पुढें पाहिलें नव्हतें, तोच सीताराम आतां स्वतः केलेले कायदे श्रीच्या लोभानें मोडून गंगारामासारख्या घोर अपराध्याला शिक्षा न करतां मोकळा सोडूं लागला होता. जो प्रजावत्सल म्हणून प्रसिद्ध होता तोच आतां इतका आत्मवत्सल झाला होता.

नंदेनें ताडलें कीं पतीला आतां एकांत पाहिजे आहे. म्हणून कांहीं न बोलतां ती तेथून चालती झाली. सीताराम पलंगावर पडून श्रीची मार्गप्रतीक्षा करूं लागला.

सीतारामाला सगळ्या दिवसभर व रात्रीं दोन प्रहरपर्यंत श्रम झाले होते. त्यामुळें तो थकला होता. दुसऱ्या एखादे दिवशीं असा शीण त्याला झाला असता तर अंथरुणावर पडल्याबरोबर त्याला लागलीच झोप लागली असती. पण आजची गोष्ट निराळी होती. जिच्यासाठीं राज्यसुख व राज्यकारभाराचें काम सोडून तो इतका वेळ पर्यंत देशोदेशीं व नगरानगरांतून हिंडत फिरला व जिच्या चिंतनाचा वन्हि अहोरात्र त्याच्या हृदयाचा दाह करीत होता, तिची आज प्रत्यक्ष भेट व्हावयाची होती. म्हणून सीताराम जागा राहिला होता.

पण निद्रादेवी सर्वांना वश करून घेणारी आहे. मनुष्य कितीहि संकटांत पडलेला असला तरी केव्हां ना केव्हां तरी ती आपला पगडा त्याच्यावर बसवितेच. सीतारामावर आतां कोणतेंहि संकट आलेलें नव्हतें. भावी सुखाच्या आशेंत तो निमग्न झाला होता. सीतारामाचे डोळे जड होऊं लागले. पण मनाच्या चंचलतेमुळें त्याची ती तंद्रा फार वेळ टिकली नाहीं. क्षणांत त्याच्या निद्रेचा भंग झाला. डोळे उघडून पाहतांच

भगवीं वस्त्रें व रुद्राक्षमाळा धारण केलेली व मोकळे केश सोडलेली एक रमणीय स्त्रीमूर्ति त्याच्या पुढें उभी असलेली त्यानें पाहिली.

ती जयंती आहे असें प्रथम सीतारामाला वाटलें. म्हणून तो विचारूं लागला, ' श्री कोठें आहे !' परंतु इतक्यांत त्याची चूक त्याला उमगली. ती जयंती नसून श्री आहे असें त्याला आढळून आलें.

तिला ओळखल्यावर ' श्री ! श्री ! माझी श्री ' अशा हाका तो तिला मारूं लागला. आणि जागचा उठून तिला कवटाळण्यासाठीं हात पसरूं लागला. पण इतक्यांत त्याच्या डोक्यांत कांहीं विकार उत्पन्न होऊन त्यानें डोळे मिटून घेतले आणि तो स्वस्थ पडून राहिला. क्षणभरानें त्याची मूर्च्छा आपोआप दूर झाली.

मग सीताराम वर मान करून टक लावून पाहूं लागला. कितीहि पाहिलें तरी त्याच्या नेत्रांची तृप्तिच होईना. त्यानें तोंडांतून एक शब्दसुद्धां काढला नाहीं. नयनांची तृप्ति जेथें झाली नाहीं तेथें शब्दांची स्फूर्ति कोठून होणार ? पाहतां पाहतां त्याचें आनंदानें प्रफुल्लित झालेलें मुखमंडल एकदम म्लान दिसूं लागलें. त्यानें एक लांब उसासा टाकिला. ' माझी श्री ' म्हणून त्यानें हाक मारली खरी; पण पहातो तों त्याची श्री नाहीं. तिच्या जागीं निश्चल उभी असलेली, अलौकिक धैर्यसंपन्न, अश्रुबिंदुशून्य उज्ज्वल कांतियुक्त, तेजस्वी अशी देवीची मूर्ति त्याला दिसली. तो समजला कीं आपली श्री ही नव्हे.

हाय ! वेडा सीताराम राणीच्या शोधांत होता—देवीला घेऊन तो काय करणार !

प्रकरण सातवें.

राजानें सांगितलेल्या सगळ्या गोष्टी श्रीनें ऐकल्या. तिच्याहि तोंडून राजानें सगळ्या गोष्टी ऐकल्या. सर्वस्वाचा त्याग करून आपण श्रीसाठीं कसे देशोदेशीं हिंडत होतों तें त्यानें सांगितलें. मात्र कांहीं गोष्टी सांगितल्या, कांहीं सांगितल्या नाहींत.

याप्रमाणें बराच वेळ गोष्टी झाल्यावर श्रीनें विचारलें, 'आतां मीं काय करावयाचें ?'

तिचा तो प्रश्न ऐकून सीतारामाच्या नेत्रांत अश्रु उभे राहिले. दीर्घ काळानंतर आज दोघांची भेट झालेली, आणि या पहिल्याच भेटींत श्रीनें असा प्रश्न करावा हें सीतारामाला रुचलें नाहीं. ' एका आडव्या तुळईला एक दोरीचा फास टांग म्हणजे मी तो आपल्या गळ्याला लावीन ' अशा प्रकारचें संतापाचें उत्तर त्याच्या अगदीं ओठापर्यंत आलें होतें. पण त्यानें आपलें मन आवरून धरलें, आणि म्हटलें, ' मी आज पांच वर्षें राणीचा शोध करीत आहें. आतां तूंच राणी होऊन या राजधानीला प्रकाशित कर. '

श्रीः—महाराज ! नंदेची प्रशंसा मीं पुष्कळांच्या तोंडून ऐकली आहे. आपण खरोखर भाग्यवान् म्हणून असें स्त्रीरत्न आपणांस लाभलें आहे. आतां दुसऱ्या राणीविषयींची इच्छा आपण कां करतां ?

सीता०—तूं सर्वांत वडील राणी आहेस म्हणून. नंदा कितीहि चांगली असली तरी तुझें पद तूं घ्यावेंस हें योग्य आहे. तें कां घेत नाहींस ?

श्री०—एक काळ असा होता कीं त्या वेळीं आपल्या राणीचें पद मिळाल्यावर वैकुंठांतल्या लक्ष्मीच्या पदाचीहि मीं इच्छा केली नसती. पण तो काळ गेला !

सीता०—कां बरें !

श्रीः०—मी आतां प्रपंचाचा त्याग करून जोगीण बनलें आहें.

सीता०—पण पति ह्यात असतां जोग घेतां येत नाहीं. पतिसेवा हाच सुवासिनीचा धर्म आहे.

श्री:—जिनें कर्माचा त्याग केला आहे, तिचा तो धर्म नाहीं. फार काय, पण देवसेवा हा सुद्धां तिचा धर्म नाहीं.

सीता—सर्व कर्माचा त्याग करणें कोणालाच शक्य नाहीं. तुलाहि नाहीं. मला आतां तूं येऊन भेटलीस हें देखील तुझ्या हातून कर्मच घडलें नाहीं काय ? गंगारामाचा जीव तूं वांचविलास तेव्हां तें तरी कर्मच तुझ्या हातून घडलें ना ?

श्री:—होय. त्यामुळें मी जोगिणीच्या धर्मापासून भ्रष्ट झाल्यें खरी; पण एकदां धर्मभ्रष्ट झाल्यें म्हणून चिरकाल धर्मभ्रष्टच राहावें कीं काय ?

सीताः०—पतीचा सहवास घडणें म्हणजे धर्मभ्रष्टता हें तुला कोणीं सांगितलें ? बरें तें राहो. मी तुझा पति आहें. अर्थात् माझा तुझ्यावर हक्क आहे. त्या अधिकाराच्या जोरावर मी आतां तुला येथून जाऊं देणार नाहीं.

श्री:—आपण माझे पति, त्यांतून राजे, आणि पुनः उपकारकर्ते ! मी उपकारबद्ध आहें. तेव्हां आपल्या परवानगीवांचून मला जातां येत नाहीं.

सीता०—असें कां म्हणत्येस ? त्यापेक्षां माझें तुझ्यावर प्रेम असल्यामुळें माझ्या परवानगीवांचून तुला जातां येत नाहीं असें कां म्हणत नाहींस ? प्रेमरूपी सुवर्णशृंखला तुझ्यानें कशी तोडवेल ?

श्री:—महाराज ! तो भ्रम आतां दूर झाला आहे. आतां मला हें कळून चुकलें आहे कीं जो प्रेम करणारा असतो त्याचा प्रेम हाच धर्म असतो. तेंच त्याचें सुख. पण ज्याच्यावर तो प्रेम करतो त्याला त्याचें काय ? आपण मातीची देवाची मूर्ति करून तिला गंधफुलें वाहतों. तो आपला धर्म आहे, व सुखहि आहे. पण त्याचें त्या मूर्तीला काय ?

सीता०—काय मलतेंच बोलत्येस हें !

श्री:—महाराज ! हें मलतें सलतें नाहीं. अमृतासारखें गोड भाषण आहे असें समजा. ईश्वर भूतमात्राच्या ठायीं आहे. ईश्वरावर प्रीति करणें

हा प्राणिमात्रांचा धर्म व सुख आहे. म्हणूनच प्राणिमात्रावर प्रेम केलें पाहिजे. पण ईश्वर निर्विकार आहे, त्याला सुख नाहीं आणि दुःखहि नाहीं. सर्व जीवांच्या ठायीं असणारा आत्मा हा ईश्वराचाच अंश असल्यामुळें त्यालाहि सुखदुःख नाहीं. तेव्हां माझ्यावर कोणीं प्रीति केल्याने मी सुखी होईन असें मानणें हा केवळ मायेचा खेळ म्हटला पाहिजे.

सीता०—श्री ! तूं कोणा तरी भोंदू साधूच्या नादीं लागून आपल्या स्त्रीबुद्धीला अनुसरून कांहीं भलत्या सलत्या गोष्टी पाठ करून ठेविल्या आहेस असें दिसतें. स्त्रीजातीला हें बरें नाहीं. स्त्रीला कोणतें बरें आहे तें मी आतां सांगतों ऐक. मी तुझा पति. माझा सहवास हाच तुझा धर्म. त्याशिवाय तुला अन्य धर्म नाहीं. मी राजा आहें. सर्वांना आपापल्या धर्मानें चालण्यास लावावें, हें राजाचें कर्तव्य आहे. त्याचप्रमाणें स्त्रीचें मन धर्माकडे वळविणें हें पतीचेंहि कर्तव्य आहे. म्हणून तुझी प्रवृत्ति धर्माचरणाकडे होईल असें मी करीन. मी तुला जाऊं देणार नाहीं.

श्री—म्हणून तर मीं अगोदरच सांगितलें कीं आपण माझे पति, राजे आणि उपकारकर्ते असल्यामुळें आपली आज्ञा मला शिरसावंद्य आहे. पण येवढेंच सांगून ठेवत्यें कीं माझ्यापासून आपणाला सुख लागणार नाहीं.

सीता०—तुझ्या केवळ दर्शनानेंसुद्धां मी सुखी होईन.

श्री०—आणखी अशी एक विनंति आहे कीं, जर मला येथें राहावेंच असलें तर निदान या वाड्यांत तरी मला ठेवूं नये. माझ्यासाठीं एक वेगळी झोपडी बांधावी. मी जोगीण आहें. राजवाड्यांत मलाहि सुख लागणार नाहीं आणि लोकहि आपणास हंसतील.

सीता०—आणि महाराणीला झोपडींत ठेवल्यानें नाहीं कां लोक हसणार ?

श्री—मी महाराणी आहें हें कोणालाहि कळणार नाहीं.

सीता०—कां बरें ? तुझ्या व माझ्या भेटी नाहीं का व्हायच्या ?

श्री—ती आपल्या मर्जीची गोष्ट आहे.

सीता०—मी तुला भेटत जाईन आणि तुझ्याशीं बोलेन चालेन. पण मग लोक तुला महाराणी समजणार नाहींत. काय समजतील तें आहे का तुला ठाऊक ?

श्रीः—आहे ठाऊक ! लोक मला रखेली समजतील येवढेंच ना ! महाराज ! मी बोलून चालून जोगीण आहें. जोगिणीला कुठली आली आहे मानापमानाची चाड ! लोक कांहीं कां म्हणेनात ? माझा मान-अपमान सगळा आपल्याच हातांत आहे.

सीता०—तो कसा ?

श्रीः—मी आपली धर्मपत्नी आहें. माझ्याशीं आपण धर्मानें वागावें. अधर्माचरण करूं नये. धर्माव्यतिरिक्त इंद्रियांची परितृप्ति हा अधर्मच आहे. विषयवासनेची तृप्ति ही पशुवृत्ति आहे. या पशुवृत्तीसाठीं देवांनीं विवाहाची पद्धति माणसांना घालून दिलेली नाहीं. विवाह हा केवळ धर्मासाठींच करावयाचा असतो. पूर्वींच्या काळीं राजर्षि चित्तशुद्धि झाल्याखेरीज केव्हांहि पत्नीसमागम करीत नसत. इंद्रियवश होणें हें पापच आहे. आपण जेव्हां निष्पाप होऊन शुद्ध चित्तानें माझ्याशीं भाषण करण्यास समर्थ व्हाल तेव्हां मी या भगव्या वस्त्रांचा त्याग करीन. जोंपर्यंत मीं त्यांचा त्याग केला नाहीं तोंपर्यंत महाराज आपणास पृथक् आसनावर बसलें पाहिजे.

सीता०—मी तुझा स्वामी आहे ना ? बस तर. येथें माझ्याच इच्छे-प्रमाणें सगळें घडलें पाहिजे.

श्रीः—एकवार घडेल. कारण, आपण सत्ताधारी आहां. पण माझ्याहि ठायीं एक प्रकारचें बळ आहे. मी वनवासिनी आहें. वनांत नाना प्रकारचीं संकटें ओढवतात. ज्यांच्यांतून सुटका होण्याला मार्ग नसतो अशींहि संकटें येतात. अशा वेळीं स्वतःच्या रक्षणासाठीं आम्ही जवळ विष बाळगतों. माझ्याजवळ विष आहे. वेळ येईल तेव्हां मी तें खाईन.

हाय ! ही श्री सीतारामाची श्री नव्हे.

प्रकरण आठवें.

सीतारामाला वरील भाषण समजलें असून उमजलें नव्हतें. त्याच्या मनाला त्यांतला कांहीं बोध झाला नव्हता. ज्याच्या प्रेमाचें मनुष्य मरतें तोच त्या मृत देहाजवळ बसून राहतो. आपलें मनुष्य मेलें या गोष्टीवर त्याचा कांहीं काळपर्यंत विश्वास बसत नाहीं. सीताराम श्रीची मानस-मूर्ति घडवून तिची इतकीं वर्षें पूजा करीत आला होता. बाहेरची श्री कशीहि असो, त्याच्या अंतर्यामींची श्री होती तशीच होती. बाहेरच्या श्रीलाच सीतारामानें आपल्या हृदयांत स्थापिलें होतें. ती बाहेरची श्री बाहेरच होती. मग ती हृदयस्थ श्री तरी भिन्न कशी असणार? ती भिन्न आहे असें सीतारामाला केव्हांहि वाटलें नाहीं. लोकांची श्रद्धा कांहींहि असो, मनुष्य जसा असेल तसाच तो राहतो. मनुष्य किती वेळां मरतो तें आम्हांस ठाऊक नाहीं. एकाच देहांत तो किती वेळा पुनर्जन्म घेतो तेंहि आम्ही पाहत नाहीं. पूर्वीची श्री मेली आहे आणि तिनें त्याच देहांत पुनर्जन्म घेतला आहे हें सीतारामाला कळलें नाहीं. त्याला वाटलें कीं जी आपली श्री तीच ही. म्हणून श्रीच्या कठोर शब्दांचें मर्म त्याच्या ध्यानांत आलें नाहीं. तें कळण्याची विशेषशी पात्रताहि त्याच्या ठायीं नव्हती. श्रीचा त्याग करायचा म्हणजे त्याला सर्वस्वाचा त्याग करायला पाहिजे होता.

असो. श्री कांहीं केल्या राजवाड्यांत राहण्यास कबूल होईना. म्हणून सीतारामानें चित्तविश्राम नांवाचें एक लहानसें पण रमणीय क्रीडा-गृह तिला राहण्यासाठीं दिलें. तेथें ती व्याघ्रचर्मावर बसत असे. राजा रोज तिच्या दर्शनास जाई, आणि पृथक् आसनावर बसून तिच्याशीं बोलल्यानंतर परत जाई. यापासून राजावर फार अनिष्ट असा परिणाम घडून आला.

त्यांचें संभाषण तरी कशा प्रकारचें असे ! राजा तिच्याशीं नेहमीं प्रेमाच्या गोष्टी बोलायचा. श्रीसाठीं आपण किती दिवस दुःखांत काढले, तिच्यावांचून आपणास कांहीं प्रिय नाहीं, तिच्या शोधासाठीं आपण देशो-देशीं माणसें पाठविलीं व स्वतःहि हिंडलों वगैरे गोष्टी तो सांगत असे. श्री मात्र पर्वत, अरण्यें, जंगली पशुपक्षी, फलमूलें, परमहंस, ब्रह्मचारी, धर्म, अधर्म, कर्म, अकर्म, यासंबंधाच्या किंवा पुराणांतल्या अथवा देशोदेशीं-च्या राजांच्या कथा आणि देशाचार या संबंधाच्या गोष्टी बोलत असे.

पृथक आसनावर बसून श्रीच्या गोष्टी ऐकतां ऐकतां तेथेंहि सीतारामा-वर विपत्ति आली. गोष्टी फार मनोरम होत्या, आणि सांगणारी विशेषच मनमोहिनी होती. त्याच्या हृदयांत अगोदरच अग्नि पेटला होता. आतां तर तो त्याचें शरीर जाळूं लागला होता. श्री तर चिरकाळ मनोमोहिनीच होती. ज्या श्रीनें वृक्षशाखेवर उभी राहून पदर हलवून रणांत जय संपादिला होता त्या श्रीपेक्षां ही श्री रूपांत अनेक पटींनीं सरस होती. शरीराचें आरोग्य आणि चित्ताची शुद्धता असली म्हणजे रूप खुलून दिसतें. श्रीचें आरोग्य आणि मनःशुद्धि हीं दोन्हीं शंभरपटीनें वाढलेलीं होतीं. सकाळच्या वेळीं झाडावर नुकत्याच उमललेल्या पुष्पाचे ठायीं जसें पूर्ण स्वास्थ्य दिसतें–कोठें क्षीणता, व्यंग, विवर्णता किंवा शुष्कता दिसत नाहीं–सर्वत्र कोमलता, शीतलता, आणि रंगांची बहार दिसते, त्याप्रमाणें श्रीचे ठायींहि पूर्ण स्वास्थ्य आणि शरीराची संपूर्णता दिसत होती. त्यामुळें श्री ही मूर्तिमंत शोभाच उभी आहे काय असें वाटे. तशांत पुनः तिचें चित्त प्रशांत, इंद्रियक्षोभशून्य, चिंताशून्य वासनाशून्य, भक्तिपूर्ण, प्रेममय व दयार्द्र असल्यामुळें तिच्या सौंदर्यांत विकृति नाहीं, कोठें दुःखाची किंचित् छटाहि नाहीं, इंद्रियभोगाची छायासुद्धां नाहीं, चिंतेचें चिन्ह मात्र नाहीं, सर्वथा अत्यंत मधुर, हास्ययुक्त आणि सुखमय असें तें आहे असें दिसत होतें. या त्रिभुवनावर सत्ता चालविणाऱ्या मूर्तीपुढें सिंहावर आरूढ झालेल्या देवीच्या मूर्तीची काय कथा ! त्यांत पुन तिच्या मनाला मोहित करून सोडणाऱ्या गोष्टी—नाना देशच्या, नाना वि षयांवरच्या, नानाविध, अश्रुतपूर्व कुतूहल उत्पन्न करणाऱ्या, व कांहं

मनरंजन करणाऱ्या आणि ज्ञानगर्भ अशा गोष्टी—असे दोन मोह एकत्र झाल्यावर त्यांच्यापुढें सिद्ध पदवीपर्यंत न पोंचलेल्या अशा कोणत्या पुरुषाचा टिकाव लागणार आहे ! सीतारामाच्या हृदयांतला अग्नि पेटतां पेटतां अखेर तो त्याचें शरीर जाळूं लागला होता. आतां तर अग्निमुळें त्याचा पूर्ण नाश होण्याची वेळ आली होती.

प्रथम कांहीं दिवस सीताराम रोज संध्याकाळीं चित्तविश्रामाला येई आणि प्रहरभर श्रीशीं गोष्टी बोलून परत जाई. पुढें पुढें त्याला परत जाण्याला उशीर होऊं लागला. त्याला निराळ्या आसनावर बसावें लागे. तो भूक व निद्रा यांनीं व्याकुळ झालेला असला तरी तेथून लवकर परतेना. यामुळें त्याला थोडेसे कष्ट होऊं लागले. म्हणून त्यानें आपल्या रात्रीच्या जेवण्याची व निजण्याची व्यवस्था चित्तविश्रामांतच केली. ती देखील पृथक् खोलींत. श्रीच्या व्याघ्रचर्माच्या जवळ त्याला जातां येईना. त्यामुळेंहि त्याची तृप्ति होईना. दिवसेंदिवस रोज सकाळीं राजवाड्यांत परत जाण्याला त्याला उशीर होऊं लागला. कारण, सकाळीं उठल्यावर श्रीशीं एखाददुसरी तरी गोष्ट बोलल्याशिवाय त्याचे पाय तेथून निघेनात. फार उशीर होऊं लागला तेव्हां दुपारच्याहि जेवणाची व्यवस्था चित्तविश्रामांतच करण्यांत आली. भोजनोत्तर वामकुक्षि करून संध्याकाळीं एकदां राजाची स्वारी राजवाड्यांत जाऊं लागली. हळूंहळूं कधीं जावें, कधीं श्रीशीं बोलण्यांत गुंतल्यामुळें जातां येऊं नये, असें होऊं लागलें. शेवटीं तर असें होऊं लागलें कीं राजा राजवाड्यांत जाई आणि त्याच पावलीं माघारा येई. चित्तविश्रामाखेरीज अन्य स्थळीं त्याला चैनच पडेना ! अशा रीतीनें चित्तविश्राम हें त्यांचें राहण्याचें ठिकाण झालें आणि राजवाड्यांत तो कधीं काळीं जाऊं लागला.

चित्तविश्रामांत कोणत्याहि कारणावरून जाण्याची इतर लोकांना मनाई होती. चित्तविश्रामाच्या अंतःपुरांत तर कीटपतंगालासुद्धां प्रवेश करणें मुष्कील झालें होतें. अर्थातच राजकारणाशीं राजाचा संबंध बहुतेक सुटला..

प्रकरण नववें.

रामचंद व श्यामचंद नांवांचे शांत वृत्तीचे गृहस्थ महंमदपुरांत राहत होते. एके दिवशीं प्रदोषकाळीं रामचंदच्या घरांतल्या देवघरांत निवांत जागीं बसून ते दोघेजण तंबाखू खात खात गप्पागोष्टी करीत होते.

रामः—काय हो ! चित्तविश्रामासंबंधानें खरा प्रकार तरी काय आहे ! कांहीं ठाऊक आहे काय ?

श्यामः—कोणास ठाऊक बुवा ! मोठ्या घरीं असा गोंधळ चालायचाच. आपण मध्यम स्थितींतलीं माणसें. आपणाला घरचे उद्योग सोडून राजेरजवाड्यांच्या संबंधाच्या उठाठेवी करण्याचें कारण काय ? एक दोष वर्ज्य केला तर एकंदरीनें आपले महाराज चांगलेच म्हटले पाहिजेत.

रामः—असें तर खरेंच. आमचे महाराज भलत्या प्रकारें वर्तन न करणारे व अत्यंत धार्मिक आहेत. म्हणून विचारतों कीं असला प्रकार इतके दिवस नव्हता. मग आतांच तो कसा आला ?

श्यामः—महाराजांची पूर्वींची स्थिति आतां राहिली नाहीं. लोकांना तरी याच गोष्टीचें आश्चर्य वाटत आहे ! मनुष्य चिरकाल सारखाच राहत नसतो असा नियमच आहे कीं काय कोण जाणे ! ऐश्वर्य आणि संपत्ति प्राप्त झाली कीं माणसाचें मनहि चंचल होऊं लागतें. पूर्वी आपण कसे रामराज्यांत रहात होतों ! पण भूषणा जिंकल्यापासून तें पूर्वींचें स्वरूप आतां कोठें राहिलें आहे ?

श्यामः—असेंच खरें. मला वाटतें कीं हें चित्तविश्रामाचें प्रकरण उपस्थित झाल्यापासूनच असा बेतालपणा सुरू झाला आहे. महाराजांना इतकें वश करून ठेवणें ही कांहीं सामान्य गोष्ट नाहीं. पाखरूंहि कांहीं साधारणांतलें नाहीं. कोठून उडून येऊन येथें बसलें आहे कोणास ठाऊक !

श्यामः—ती कोणी बैरागिण आहे म्हणतात. कोणी म्हणतात कीं डाकीण आहे. डाकिनी मोठ्या मायावी असतात. त्या मायेनें बैरागि-

नीचा वेष घेऊन हिंडतात. कोणी म्हणतात कीं त्या दोघीजणी आहेत. दुसरी जी आहे ती कोठें तरी भटकत असते. ती फारशी कोणाच्या नजरेस पडत नाहीं.

रामः—मग काय सर्वनाशच झाला म्हणायचा! डाकिनीच्या हातीं राज्य गेल्यावर आतां या राज्याला काय सुखाचे दिवस येणार आहेत!

श्यामः—काय होणार आहे कोणास ठाऊक! महाराज तर कांहीं एक काम पाहत नाहींत. चंद्रचूड जें करतील तें करतील. पण त्यांना लढाईच्या गोष्टी काय कळतात? अन् इकडे तर नबाबाची फौज लवकरच चाल करून येत आहे!

रामः—येऊं द्या. मृण्मय आहेतच.

श्यामः—असें कसें म्हणतां? 'जेनो काम तेनो थाय बीजा करेसो गोता खाय.' मागें पाहिलें नाहीं गंगारामानें काय करून ठेविलें होतें तें? या खेपेला मृण्मय काय करील कोणाला ठाऊक! तो जर कां मुसलमानांना फितूर झाला तर मग कांहीं बोलायलाच नको!

रामः—तें तर खरेंच. म्हणूनच लोक हळू हळू येथून पाय काढताहेत. परवां आमचा शेजारी उठून यशोहरला गेला. त्याच्या जाण्याचें कारण कळेना, म्हणून मीं चौकशी केली. तेव्हां तो म्हणाला कीं, येथें महागाई फार झाली आहे. आणखीहि आमच्या शेजारची पुष्कळशी मंडळी घरेंदारें सोडून चालती झाली आहे.

श्यामः—दादा! तुम्हांला म्हणून सांगतों, कोणापाशीं बोलूं नका. मीहि लवकरच जाणार आहें.

रामः—काय म्हणतां? तर मग मी तरी इथें कशाला राहूं? पण हें सगळें घरदार व इस्टेट एवढा खर्च करून केली, ती आतां टाकून जाणें म्हणजे गरीब माणसावर मोठेंच संकट म्हणायचें!

श्यामः—पण मग काय करायचें? जिवापेक्षां तर घरदार कांहीं जास्त नाहीं ना? राज्य सुरक्षित राहिलें तर पुनः परत येऊं. घरदार कांहीं कोठें पळून जात नाहीं!

प्रकरण दहावें.

श्रीः---महाराज ! आपण तर नेहमीं चित्तविश्रामांत असतां. मग राज्यकारभाराचें काम कोण पाहतो !

सीताः---तूंच माझें राज्य. तुझ्यापासून मला जें सुख मिळतें, तें राज्यापासून थोडेंच मिळणार आहे !

श्रीः---छिः छिः ! महाराज ! यासाठीं कां आपण हिंदुसाम्राज्य स्थापन करायला प्रवृत्त झालांत ? माझ्यामुळें हिंदु--साम्राज्य नष्ट झालें ! धर्म बुडाला ! आणि मीच कायती आपली सर्वस्व होऊन बसल्यें ! राजा सीताराम राय आपणच काय ?

सीताः---स्वराज्याची तर स्थापना झालीच आहे !

श्रीः---हो ! पण तें टिकेल तेव्हां ना ?

सीताः---तें मोडण्याची कोणाची प्राज्ञा आहे ?

श्रीः---आपणच स्वतः तें मोडीत आहां. राजाचें राज्य आणि विधवेचें ब्रह्मचर्य, हीं दोन्हीं सारखीं आहेत. अतिशय जपल्या शिवाय तीं टिकत नाहींत.

सीता०---तर मग मी काय राज्याचे रक्षण करीत नाहीं असें तुझें म्हणणें ?

श्री---आपण कसलें रक्षण करतां ? आपल्याला तर मी नेहमीं माझ्यापाशींच पाहत्यें !

सीता०---मी राज्यकारभार पहात नाहीं असें नाहीं. बहुधा रोज मी बाडघांत जात असतों. मी घटकाभरांत जितकें काम करतों, तितकें काम दुसऱ्या कोणाला साऱ्या दिवसांत करतां येणार नाहीं. शिवाय तर्कालंकार ठाकुर आहेत, मृण्मयहि आहे. ते सर्व कामांत हुषार आहेत. ते असल्यावर मीं कांहीं न पाहिलें तरी चालेल.

प्रकरण दहावें.

• श्री---पण ते असतानांच एकदां राज्य जाण्याचा प्रसंग आला होता ना ? सुदैवानें आपण त्या रात्रीं येऊन न पोंचतां तर राज्य राहिलें नसतें. असें असून आतां केवळ त्यांच्यावर विसंबून आपण कसे बसतां ?

सीता०---मी येथें आहेंच ! मला आतां कोठेंहि जायचे नाहीं. तसें संकट आलेंच तर राज्याचें रक्षण करीनच.

श्री०---जोंपर्यंत आपले ठायीं इतका आत्मविश्वास आहे तोंपर्यंत आपण कांहींएक प्रयत्न करणार नाहीं, आणि प्रयत्नावांचून कार्यसिद्धि होत नसते.

सीता०---माझ्या प्रयत्नांत कोठें कमी पडलें आहे दाखीव ?

श्री---मी बायको माणूस. तशांत जोगीण ! मला राजकारणांतलें काय समजतें तर मी उत्तर देऊं ? तथापि एका गोष्टीची मला फार भीति वाटते. मुर्शिदाबादेकडची कांहीं खबर कळली आहे का ? तोराबखां मारला गेला, भूषणा हातची गेली, आणखीहि प्रांत गेला तरी नबाब चूप बसला आहे, असें का आपणांला वाटतें ?

सीता०---ती गोष्ट मनांतच आणूं नकोस. मुर्शिदकुलीखां याला जोंपर्यंत आमचेकडून खंडणीचा हप्ता वेळेवर पोंचत राहील तोंपर्यंत तो कांहींएक बोलायचा नाहीं.

श्री---पण खंडणी तरी त्याला वेळेवर मिळते आहे का ?

सीता०---हो. ती पाठविण्याचा करार केला होता खरा; पण या खेपेस बराच खर्च झाल्यामुळें ती पाठवितां आली नाहीं.

श्री---मग तो अजून स्वस्थ कसा बसला आहे ?

सीताराम कांहीं वेळ खालीं मान घालून स्तब्ध राहिल्यावर म्हणाला " त्याचा काय बेत आहे आणि तो सध्या काय करीत आहे त्याची कांहीं खबर कळली नाहीं. "

श्री:---महाराज ! चित्तविश्रामांत नेहमीं राहणें झाल्यामुळेंच ही खबर काढण्यांला आपण विसरलां असाल ?

सीताराम चिंतातुर होऊन म्हणाला "होय. असें खरें. श्री ! तुझ्या तोंडाकडे पाहिलें, म्हणजे मी बाकीच्या सगळ्या गोष्टी विसरतों."

श्रीः—तर मग माझी आपणांस एक प्रार्थना आहे. मला आपलें हें काळें तोंड आतां लपविलें पाहिजे. नाहींतर सीतारामाच्या नांवाला माझ्यामुळें कलंक लागेल, आणि या धर्मराज्याची राखरांगोळी होईल. मला वनांत जाण्यास परवानगी द्यावी.

सीताः—काय होईल आणि काय नाहीं याचा मीं पूर्वींच विचार करून ठेविला आहे. मला तुला तरी सोडावें लागेल, नाहींतर राज्य तरी सोडावें लागेल. मी राज्य सोडीन, पण तुला सोडणार नाहीं.

श्रीः—तर मग असें तरी करा. कोणातरी योग्य माणसाच्या हातांत राज्य द्या, आणि संन्यास घेऊन माझ्याबरोबर चला.

सीताराम मोठ्या विचारांत पडला. यावेळीं त्याच्या ठायींची राज्याची मोगलालसा अत्यंत प्रबळ झाली होती. यापूर्वी सीतारामानें राज्याचा त्याग केला असता; पण आतां तो पूर्वीचा सीताराम राहिला नव्हता. ऐषआरामामुळें त्याचें चित्त दूषित झालें होतें. त्याच्यानें आतां राज्याचा त्याग करवला नाहीं.

प्रकरण अकरावें.

त्या दिवशीं दरबारांत रमा मूर्छित होऊन पडल्यावर दासींनीं तिला उचलून अंतःपुरांतल्या शय्येवर नेऊन निजविलें होतें. तेव्हांपासून ती पुनः उठली नाहीं. आपल्या पातिव्रत्याविषयींच्या कीर्तीचें रक्षण करण्या-साठीं तिनें जिवाकडेहि पाहिलें नाहीं. तिची अब्रू राखली गेली, पण प्राण गेले !

रमेचा रोग आतां जुनाट झाला होता. त्याचीं पाळेंमुळें शरीरांत खोल गेलीं होतीं. राणीच ती ! तेव्हां औषधोपचारांत कांहीं कमतरता झाली नाहीं हें सांगायला नकोच. राजाच्या पदरीं अनेक राजवैद्य होते. पण त्यांना

आतांपर्यंत कांहीं कामच नव्हतें. नोकरांचाकरांना चूर्णे आणि दासदासींना पौष्टिक औषधें देऊन ते दिवस काढीत होते. आतां धाकट्या महाराणी-साहेबांच्या दुखण्यामुळें या वैद्यराजांना एकाएकीं मोठेपणा आला होता. रोगाच्या निदानासंबंधानें आतां त्यांची एकच धांदल उडाली. मूर्च्छा, वायु, आम्लपित्त, हृद्रोग, इ० नानाविध रोगांचीं लक्षणें ऐकून राजवाड्यांतल्या लोकांचे कान किटले होते. कोणी वैद्य माधवनिदानाचा आधार दाखवीत, कोणी वाग्भट पुढें करीत, कोणी चरक संहितेंतील श्लोक म्हणून दाखवीत, आणि कोणी सुश्रुताच्या टीकेचा वर्षाव करीत! इतके करून अखेर रोगाचें निदान कोणाला करतां आलें नाहीं तें नाहींच!

वैद्यांनीं केवळ शास्त्रांतलीं वचने काढून दाखविण्यापलीकडे कांहीं केलें नाहीं अशी त्यांची निंदा आम्ही करीत नाहीं. त्यांनीं नाना प्रकारचीं औषधें देण्याची व्यवस्था केली. कोणीं गोळ्या, कोणी चूर्ण, कोणी तेल, यांचीं नांवे सुचविलीं. कोणी म्हणाले, औषधें नवीनच तयार केलीं पाहिजेत. कोणी म्हणाले, आमच्याजवळ जशीं उत्तम रसायनें आहेत तशीं दुसऱ्या-कोणालाहि तयार करतां येणार नाहींत. तें कांहीं असो, येवढे खरें कीं राणीच्या रोगासाठीं, औषधांची गरज असो वा नसो, वाड्यांतल्या लोकांना चार पैसे खाण्यास मिळतील येवढ्यासाठीं तरी औषधें तयार करण्याचा एक जंगी कारखाना राजवाड्यांत सुरू करण्यांत आला होता. कोणी वनस्पतीच्या मुळ्या कुटीत आहेत, कोणी साल ठेचीत आहेत, कोणी काढा उकळीत आहेत, याप्रमाणें मोठी धामधूम चालली होती. ती पाहून एक दासी म्हणाली कीं 'राजाची राणी होऊन आजारी पडण्याला सुद्धां नशीब लागतें!'

जिच्यासाठीं औषधांची येवढी धामधूम चालली होती तिची त्या औषधाशीं प्रत्यक्ष गांठ क्वचितच पडे. वैद्यराज औषध देत नव्हते असें नाहीं; किंवा औषधें गुणकारी नव्हतीं असेंहि नाहीं. वैद्यांचे प्रयत्न व्यर्थ झाले हा सगळा रमेचा दोष. ती औषधच खाईना. मुरलेच्या जागीं आतां यमुना नांवाच्या एका स्त्रीकडे राणीचें मुख्य दासीपण आलें होतें. तिच्या वृद्धपणामुळें या जागीं तिची नेमणूक नंदेनें केली होती. यमुना आपणांला